१५६८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०५२



# सोनेरी शिखरें

REFBK-0015195

वि. स. गवाणकर

निबंध
७४९८२
१६।३।६९
२०५२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

# सोनेरी शिखरें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नोंद दि ...

लेखक

वि. स. गवाणकर

REFBK-0015195
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १५१९५

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार, पुणें २.

प्रकाशक :

अ. ज. प्रभु

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

१३२० शुक्रवार, पुणें २

© विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

किंमत : रु. ३.५०

आवृत्ति पहिली : १९६६

मुद्रक :

द. अ. इंदलकर

सरस्वती मुद्रण मंदिर

११२२ भवानी, पुणें २

# महाराष्ट्राची विविधता

" आमचा प्रिय महाराष्ट्र विविधतेनें नटलेला आहे. ही विविधता निसर्गाच्या रचनेंत जशी आहे तशी ती माणसांतहि आहे. उत्तरेस सातपुडा आणि पश्चिमेस सह्याद्रि यांचीं उत्तुंग शिखरें व त्यांच्या उतरणीवरील घनदाट जंगलें यांनीं या भागास भव्योदात्त सौंदर्य प्राप्त झालें आहे; तर वर्धा – वैनगंगेच्या खोऱ्यांत जागोजाग असलेलीं जलाशयें व पळसाच्या लाल फुलांनीं डंवरलेली रानें मनाला प्रसन्नता आणतात. कोकणचा किनारा अथांग पश्चिम सागराचें दर्शन घडवितो तर गोदेच्या पाण्यानें पुनीत व समृद्ध झालेली मराठवाड्याची भूमि महाराष्ट्राच्या तेजस्वी भूतकाळाची व संस्कृतीची आठवण करून देते. नागपूरच्या परिसरांत भारतांतच केवळ नव्हे तर सर्व आशियांत उत्तम म्हणून नांवाजलेलीं संत्रीं होतात तर रत्नागिरीकडे भारतांत ज्याच्या तोडीचा दुसरा आंबा नाहीं तो हापूस आंबा अमाप होतो. विदर्भ–मराठवाड्याच्या काळ्याभोर जमिनींत कापूस भरघोस फुलतो, तर नगर, सोलापूर, कोल्हापूर भागांत पिकणारा रसदार ऊस सर्वांचें तोंड गोड करतो. निरनिराळ्या भागांतील लोकांच्या बाबतींतहि हीच विविधता आहे. कोकणपट्टींतील माणसांचे अनुनासिक उच्चार ऐकून देशावरील माणसाला मौज वाटते तर खानदेश–वऱ्हाडचा माणूस एक विशिष्ट हेल काढून बोलूं लागला कीं, सांगली–कोल्हापूरकडील माणसाच्या चेहऱ्यावर स्मिताची रेषा न झळकली तरच आश्चर्य. पण या विविधतेंतच महाराष्ट्रांतील जीवनाचें सौन्दर्य साठवलेलें आहे आणि एकताहि सामावलेली आहे."

—यशवंतराव चव्हाण

( भारताचे संरक्षण मंत्री )

## लेखकाचें पान

हीं " **सोनेरी शिखरें** " सह्याद्रीचीं आहेत. महाराष्ट्राचीं आहेत. या शिखरांचें दर्शन ज्यांना जवळून घडलें ते तर धन्यच, पण आज ज्यांना दुरूनहि दर्शन घडतें तेहि धन्यच !

महाराष्ट्राचीं हीं सोनेरी शिखरें सर्वांनाच सतत धैर्य, शौर्य, स्फूर्ति आणि प्रकाश देतात. नवा मार्ग दाखवितात. महाराष्ट्रांत अनेक सोनेरी शिखरें आहेत. मी फक्त येथें कांहींचेंच दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

माझा हा प्रयत्न आपणां सर्वांना आवडो आणि सोनेरी शिखरांचें दर्शन घडल्याचा सर्वांनाच आनंद होवो हीच माझी इच्छा—महाराष्ट्राची मी केलेली हीच सेवा.

—वि. स. गवाणकर

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | हा माझा महाराष्ट्र | ९ |
| २ | तुम्ही आम्ही भाऊ | २१ |
| ३ | आमचा पहिला राजा | ३४ |
| ४ | मऱ्हाठिचिये नगरीं | ४३ |
| ५ | पोटींचें भय सांडावें | ५९ |
| ६ | महाराष्ट्राचा धनी | ७१ |
| ७ | धर्मासाठीं आणि देशासाठीं | ९२ |
| ८ | तयारीचें शिंग करा | १०९ |
| ९ | सोनेरी शिखर | १२८ |
| १० | वाघिणीचें दूध | १४० |
| ११ | महाराष्ट्राचा मेरूमणी | १५९ |
| १२ | माझें वंदन तुझ्या चरणीं | १७५ |

# हा माझा महाराष्ट्र !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५१८५

१

वहु असोत सुंदर संपन्न की महा
    प्रिय अमुचा एक महाराष्ट्र-देश हा ॥
गगनभेदि गिरिविण अणु नच जिथे उणे
आकांक्षापुढति जिथे गगन ठेंगणें
अटकेवरि जेथले तुरंगि जल पिणें
तेथ अडे काय जलाशय--नदांविणें ?
पौरुषासि अटक गमे जेथ दुःसहा ॥ १ ॥

प्रासाद कशास जेथ हृदय--मंदिरें
सद्भावांचीच भव्य दिव्य आगरें
रत्ना वा मौतिकांहि मूल्य मुळि नुरे
रमणीची कूस जिथें नृ-मणि-खनि ठरे
गृद्ध तिचें शीलहि उजळवि गृहा गुहा ॥ २ ॥

नग्न खड्ग करि, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेंहि शौर्य मावळे
दौडत चहुंकडुनि जवे स्वार जेथले
भासत शत-गुणित जरी असति एकले
यन्नामा परिसुनि रिपु शमित–बल अहा ॥ ३ ॥

विक्रम–वैराग्य एक जगीं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म–राजकारण समवेत चालतीं
शक्ति युक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ ४ ॥

गीत मराठ्यांचें श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति--दीप्ति--धृतिहि देत अंतरीं ठसो
वचनीं लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्र-धर्म-मर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र--देश हा ॥ ५ ॥

[श्री. कृ. कोल्हटकर]

आपल्या प्रिय महाराष्ट्राचें हें वर्णन किती सुंदर आणि यथार्थ आहे ! जगाच्या पाठीवर सुंदर आणि संपन्न किती तरी देश आहेत, पण आमचा महाराष्ट्र तो महाराष्ट्रच ! आमच्या महाराष्ट्राचें सारें कांहीं वेगळेंच आहे. सारें कांहीं वैशिष्टचपूर्ण आहे.

महाराष्ट्रांत आकाशाला भिडणारा सह्याद्रि आहे, भारताचा दक्षिण बाहूच तो ! जवळ जवळ आठशें मैल लांबीचा आणि कुठें ऐंशी तर कुठें वीस मैल रुंदीचा.

आणि उंची ? त्याची जास्तींत जास्त उंची आहे ५४३० फूट. सह्याद्रीचें समुद्रसपाटीपासून जास्तींत जास्त उंचीचें ठिकाण म्हणजे कळसूबाईचें शिखर. सह्याद्रीचें हें एव्हरेस्टच !

कळसूबाईच्या या शिखराचेंहि एक वैशिष्टच आहे. त्यालासुद्धां एक मानाचें स्थान आहे. महाराष्ट्राची जिद्द, महाराष्ट्राचा कणखरपणा, महाराष्ट्राची सत्यप्रियता हींसुद्धां कळसूबाईच्या नांवांत सांठविलेलीं आहेत. सह्याद्रीच्या ह्या उंच शिखराला 'कळसूबाई' हें नांव पडण्याची अशी एक दंतकथा आहे कीं—

कळसूबाई नांवाच्या एका कोळ्याच्या मुलीला सह्याद्रीच्या ह्या दऱ्या-खोऱ्यांतून भटकण्याची भारी हौस. ती खूप हिंडाफिरायची. अशीच ती एकदां फिरत फिरत इंदूर या खेडेगांवीं आली असतां तेथल्या एका कोळ्यानें तिला विचारलें, "मुली, तूं माझ्याकडे घरकामासाठीं म्हणून राहतेस का ?"

कळसूबाईला घरकामाची गरज नव्हतीच. तरी पण ती हंसून म्हणाली, "हो, काम करीन पण आपणाला माझी एक अट मान्य करावी लागेल."

"कोणती अट तुझी मुली ?"

"माझी अट अशी कीं, मीं भांडीं घांसणार नाहीं. झाडलोट करणार नाहीं. आहे अट मान्य ?"

"कांहीं हरकत नाहीं. तुझी ही अट मला मान्य आहे."

मग कळसूबाई त्या कोळ्याच्या घरीं राहिली..

पण थोड्याच दिवसांनीं एका लग्नांत तिला हें काम कुणीतरी सांगितलें.

कळसूबाईनें तें काम केलें पण काम होतांच तें घर तिनें सोडलें.

आणि कळसूबाई गेली ती जवळच असलेल्या सह्याद्रीच्या उंच शिखरावर. तिथें ती मरेपर्यंत राहिली. कळसूबाईच्या तेथील आदर्श जीवनक्रमामुळें लोक तिला देवी मानूं लागले. कळसूबाईचें स्मरण म्हणून त्या शिखरावर लोकांनीं तिचें लहानसें मंदिर उभारलें. कळसूबाई ही कोळ्यांची देवता झाली.

कळसूबाईसारख्याच सह्याद्रीच्या लहानमोठ्या शिखरांवर अनेक देवता आहेत. आणि या सर्व देवतांचा स्वामी शंकर आहे. शंकर ही महापराक्रमी देवता. युद्धप्रवीण. अर्जुनाला पाशुपतास्त्र शंकरानें दिलें. कर्णाला नारायणास्त्र शंकरानें दिलें. द्रोणाचें शिक्षण शंकराच्याच देखरेखीखालीं झालें. परशुरामाला परशु मिळाला तो शंकराकडूनच. दाशरथी रामाच्या पराक्रमाची पहिली खूण म्हणजे शिवाचें म्हणजे शंकराचें धनुष्य उचलून त्याला बाण लावून दाखविला ही !

अशी ही सह्याद्रीची महाप्रतापी देवता शंकर.

शंकराच्या जटेंतून गंगा वाहते ना ? अगदीं तशाच तऱ्हेनें सह्याद्रींतूनहि किती तरी लहानमोठ्या गंगा वाहतात. किती तरी लहानमोठ्या नद्या उगम पावतात. आणि या गंगामातांची थोरवी तरी किती ! यांच्या कांठीं पुण्यस्थानें तरी कितीं ! तीर्थक्षेत्रें तरी कितीं ! किती सत्पुरुषांनीं आणि साधुसंतांनीं यांच्या कांठीं चिर असा विसावा घेतला. किती देवदेवतांनीं आपलीं मंदिरें यांच्या कांठीं जागृत ठेविलीं आणि या गंगामातांना महत्त्व आणून दिलें ! किती गंगामातांनीं आपल्या जलाचा उपयोग महाराष्ट्रांतील शेतांतून मोत्याचे दाणे पिकविण्यासाठीं केला आणि खेड्यापाड्यांतील घरेंसुद्धां प्रकाशमय केलीं ! गोदामातेच्या कांठीं नेवाशास ग्रंथराज 'ज्ञानेश्वरी' रचिली गेली. भीमेच्या–चंद्रभागेच्या कांठीं महाराष्ट्राची द्वारका – पंढरपूर – येथें 'विटेवरी उभा कटेवरी हात' घेऊन युगें अठ्ठावीस पंढरीनाथ उभा राहिला. कृष्णामाता हिनें तर महाराष्ट्राला सुजलां सुफलां केली आहे. कोयना ! हिचें स्थान महाराष्ट्रांत फारच मोठें. ही हेळवाकजवळ एका प्रचंड घळींत शिरून पोफळीजवळ कोकणांत उतरते ! आणि ती असें करतांना डोंगराच्या

पोटांत बसविलेलीं प्रचंड चाकें गरगर फिरविते आणि महाराष्ट्राला वीज देते. महाराष्ट्रांतील कित्येक कारखान्यांना सजीव करते. प्रत्येक घर नि घर प्रकाशमय करते. महाराष्ट्राच्या आशा–आकांक्षा फुलवते आणि महाराष्ट्रा, तुझें भविष्य उज्ज्वल आहे, असें सूचित करते.

महाराष्ट्रांतील साऱ्याच नद्या जशा निर्मळ जलानें तुडुंब भरलेल्या आहेत, तशींच महाराष्ट्रांतील लोकांचीं अंतःकरणेंहि दया, प्रेम यांनीं तुडुंब भरलेलीं आहेत.

महाराष्ट्रांत आकाशाला भिडणारा सह्याद्रि आहे आणि येथील लोकांच्या महत्त्वाकांक्षा तर त्याहीपेक्षां उंच आहेत.

आणि महाराष्ट्राचा पराक्रम ?

महाराष्ट्राच्या पराक्रमाला तोड नाहीं. हातांत नागव्या तलवारी धरलेल्या महाराष्ट्रांतील लोकांना पाहून शत्रूचें शौर्य अगदीं–अगदींच पार फिकें पडतें. येथला घोडेस्वार दौडूं लागला कीं त्याला पाहून शत्रूच्या तोंडांतून शब्द चटकन् बाहेर पडतात, " अरे, हा एकेकटा आपणा शंभरांनाहि भारी आहे कीं रे !"

आणि त्याचे हे शब्द अगदीं खरेच आहेत. कारण मराठ्याचें नुसतें नांव ऐकूनच शत्रु गलितधैर्य होतो. मराठ्यांचे घोडे अटकेपर्यंत जाऊन तेथील पाणी पिऊन आले आहेत ते काय उगीचच !

महाराष्ट्र पराक्रमी आहे. तसाच तो रत्नांच्या खाणींनींहि संपन्न आहे. हीं रत्नें म्हणजे नररत्नें. महाराष्ट्रांतील प्रत्येक सतीची कूस म्हणजे नररत्नांची खाण. महापराक्रमी. महाविद्वान्–महाबुद्धिमान्. एकापेक्षां एक श्रेष्ठ अशीं कितीतरी नररत्नें महाराष्ट्राला लाभलीं आहेत. आणि महाराष्ट्रांतील लोकांचीं अंतःकरणें ? तीं दया, प्रेम यांनीं तुडुंब भरलेलीं आहेत. चांगल्या भावनांचे भव्य सांठेच ते !

आमच्या प्रिय महाराष्ट्राचें सर्वत्र चांगल्या बाबतींत विशेष आहे. येथें पराक्रम आहे आणि त्यागहि आहे. जरीपटका आहे आणि भगवा झेंडाहि

आहे. धर्म आहे आणि राजकारणहि आहे. शक्ति आहे, युक्तीहि आहे; आणि त्याचबरोबर आमच्या महाराष्ट्राची कीर्तीहि दशदिशा पसरलेली आहे.

अगदीं थोडक्यांतच सांगावयाचें तर असें सांगतां येईल कीं, साऱ्याच चांगल्या बाबतींत आमचा प्रिय महाराष्ट्र वैभवाच्या शिखरावर आहे. त्याला वैभवाचें लेणें चढलें आहे. आणि आणखीहि वैभवासाठीं तो प्रयत्न करीत आहे.

महाराष्ट्र हा भारताचा एक भाग आहे. सर्वांगसंपूर्ण विराट् पुरुषाचा एक अविभाज्य असा अवयव आहे.

भारतांत विविधता आहे. साऱ्या प्रकारचें हवामान, साऱ्या प्रकारच्या वृक्ष-लता, साऱ्या प्रकारचीं धान्यें, साऱ्या प्रकारचीं फुलें-फळें, साऱ्या प्रकारचे पशु-पक्षी भारतांत आहेत.

भारतांत गगनाला भिडणारा नगाधिराज हिमालय आहे. ताजमहालसारखी जगप्रसिद्ध वास्तु आहे. गंगामातेसारख्या अत्यंत समृद्ध अशा नद्या आहेत. तत्त्ववेत्ते, ऋषि-मुनि, सेनापति, साधु-संत तर भारतांत किती तरी होऊन गेले आणि आज आहेतहि. समृद्धि, सामर्थ्य, आणि सौंदर्य हीं हातांत हात घालून भारत फुलवीत आहेत. समृद्ध करीत आहेत.

महाराष्ट्र हा भारताचा अवयव. अविभाज्य भाग. आणि म्हणूनच जें जें भारतांत आहे तें तें सारें महाराष्ट्रांत आहे आणि जें जें महाराष्ट्रांत आहे तें तें भारतांत आहे.

आणि म्हणूनच आपणांला मोठ्या अभिमानानें असेंहि म्हणतां येईल कीं,

"महाराष्ट्रांत जें न दिसे कांहीं
तें ब्रह्मसृष्टींत जन्मलें नाहीं."

पृथ्वीच्या पाठीवर अनेक देश आहेत. त्यांपैकीं कांहीं देशांत धरणीकंप होतात, ज्वालामुखीचे उद्रेक होतात आणि नंदनवन असलेल्या या देशांचें स्वरूप पार पालटून जातें. क्षणांत नाहींसें होतें. नंदनवनाला क्षणांत स्मशानाचें रूप प्राप्त होतें. अशा देशांतील लोकांचे अनेक वर्षांचे श्रम मातीमोल ठरतात. धुळीस मिळतात. त्यांच्या आकांक्षा पार पार जळून जातात.

कांहीं देशांत इतकी पर्ज्यन्यवृष्टि होते कीं कांहीं विचारूंच नका. तेथें

वारंवार येणाऱ्या पुरांमुळें तेथलें सारें वैभव हां हां म्हणतां पार धुऊन जातें.

कांहीं देशांत याच्या उलट ! वर्षानुवर्षें तेथें पर्जन्याची एक शिंतोडाहि पडत नाहीं. तेथें केवळ वालुकामय रखरखाट.

हवामानाचेंहि असेंच. कांहीं देशांतील हवामान कोण थंड, तर कांहीं देशांतील हवामान कोण उष्ण !

आपल्या प्रिय महाराष्ट्राचें अशापैकीं कांहींच नाहीं. त्यामुळेंच त्याला जें कांहीं वैभव प्राप्त झालें आहे त्याला ईश्वराची इच्छा, निसर्गाची कृपा हीं कारणीभूत आहेतच, पण त्याचबरोबर माणसांच्या हजारों वर्षांच्या प्रयत्नांची पराकाष्ठाहि कारणीभूत आहे. हजारों वर्षांची तपश्चर्याहि कारणीभूत आहे. हजारों वर्षांची धडपडहि कारणीभूत आहे. रक्ताचें पाणी करीन पण महाराष्ट्रावर वैभवाचें लेणें चढवीन. त्याला वैभवाच्या शिखरावर मानाचें पान मिळवून देईन, ही प्रत्येक माणसाची जिद्द या वैभवाला कारणीभूत झालेली आहे. आणि म्हणूनच वैभवाच्या शिखराची एक एक पायरी आपला प्रिय महाराष्ट्र चढत आहे.

आपण जर शेंकडों वर्षें मागें मागें गेलों आणि आपल्या महाराष्ट्राचें मूळचें रूप मोठ्या जिज्ञासेनें पाहण्याचा प्रयत्न केला तर आपण जें म्हणतों कीं, 'महाराष्ट्राच्या वैभवाला माणसाची जिद्द आणि करणी हींच मुख्यत: कारणीभूत आहेत' तेंच खरें आहे, असें दिसून येईल. परंपरेनें आलेल्या कथा-दंतकथा, पुराणें, ग्रंथ, उत्खनन, संशोधन, चालीरीति, कार्यकारणभाव इत्यादिकांचाच काय तो या कामीं पुरावा. या पुराव्याच्या आधाराआधारानेंच आपणाला जवळजवळ पांच हजार वर्षेंच आजच्या मागें जातां येतें; त्यामुळें इ. सनापूर्वी तीन हजार वर्षांपासूनची महाराष्ट्राची थोडीफार माहिती या ना त्या रूपानें आपणांला मिळते.

पण ही माहिती अगदीं सुसूत्र असतेच असेंहि नाहीं, तर मधल्या मधल्या काळाची तुकडेवजा माहिती मिळते. अशी तुकडेवजा मिळालेली माहिती तर्काच्या आणि पुराव्यांच्या धाग्यादोऱ्यांनीं सुसूत्र करावी लागते.

पण अशा एकत्रित केलेल्या माहितीबद्दलहि विद्वानांचे, संशोधकांचे,

भाषाशास्त्रज्ञांचे, तर्कशास्त्रज्ञांचे मतभेद होतातच. अगदीं उत्तर दक्षिण ध्रुवांच्या टोकांतील अंतराइतके!

'महाराष्ट्र' या नांवाचेंच पाहा ना!

महाराष्ट्र हें नांव केव्हांपासून उपयोगांत आलें आणि तें या ठराविक भागालाच कां पडलें, याबद्दल अनेक तज्ज्ञांनीं अनेक तर्क केले आहेत. कोणी म्हणतात कीं, महाराष्ट्र–मरोठ या शब्दाचें पूर्वरूप महार हें असावें आणि या भागांतील महार या मूळ जातीवरून 'महाराष्ट्र' हें नांव या भागाला पडलें असावें.

कोणी म्हणतात, फार फार पूर्वीं राष्ट्रीक–रट्ट नांवाचे लोक या भागांत असावेत आणि त्यांच्यावरून महाराष्ट्र हें नांव या भागाला पडलें असावें.

कोणी म्हणतात, महाराष्ट्राच्या भागांत फार पूर्वीं रथी-महारथी, अधिकारी होते. योद्धे होते. म्हणून महारथी – महाराष्ट्र हें नांव पडलें असावें.

अशा प्रकारें कोणी कांहीं तर कोणी कांहीं 'महाराष्ट्र' या नांवाबद्दल विद्वान् लोक तर्क करतात.

कोणी कांहींहि तर्कवितर्क करोत, पण महाराष्ट्राचा पहिला उल्लेख वररूचि या व्याकरणकाराच्या व्याकरणांत महाराष्ट्री भाषेबद्दल केलेला आहे. वररुचीचें व्याकरण इ. सनापूर्वीं २५० च्या सुमारास रचलें गेलें असावें.

पण ह्याहिपेक्षां जुना पण अगदीं स्पष्ट उल्लेख सिलोनमधील महावंश नांवाच्या एका ग्रंथांत आढळतो. यावरून असें दिसून येतें कीं, 'महाराष्ट्र' हें नांव सर्वसाधारणपणें इ. सनाच्या तिसऱ्या शतकापासून प्रचारांत आलें होतें. त्यापूर्वी या भागाला 'दक्षिणापथ' असें नांव होतें. 'दक्षिपथ' असा उल्लेखहि महाभारतांत अनेक वेळां आलेला आहे.

या दक्षिणापथाला किंवा त्याच्या कांहीं भागाला कांहीं शतकांनंतर दुसरें नांव मिळालें तें दंडकारण्य. आणि त्याहिनंतर याच भागाला नांव मिळालें तें महाराष्ट्र.

पण हा दक्षिणापथ – दंडकारण्य – महाराष्ट्र म्हणजे कोणता प्रदेश आणि

त्याच्या सीमा कोणत्या हें आपणाला निश्चित असें सांगतां येत नाहीं. तरी पण नर्मदेच्या दक्षिणेकडील भागाला दक्षिणापथ म्हणजे दक्षिणेकडील देश असें म्हणत असावेत, असें ठिकठिकाणीं आढळणाऱ्या उल्लेखांवरून वाटतें.

इ. स. सहाशें पन्नासच्या सुमारास ह्वुएन्त्संग हा चिनी प्रवासी भारतांत आला होता. त्यानें आपल्या प्रवास-वर्णनांत महाराष्ट्राबद्दल असें लिहून ठेविलें आहे कीं, 'कोंगकिन्नपुला' पासून वायव्येस चोवीसशें अगर पंचवीसशें 'ली' म्हणजे सुमारें चारशें मैल लांब ( महाराष्ट्र ) आहे आणि त्याचा विस्तार पांच हजार 'ली' म्हणजे सुमारे आठशें मैल आहे. ह्वुएन्त्संगनें आणखी असेंहि लिहून ठेविलें आहे कीं, या देशाची राजधानी एका नदीकिनाऱ्यावर आहे. महाराष्ट्रांत पूर्व सीमेवर एक डोंगर पोखरून तयार केलेला बुद्धविहारहि आहे.'

ह्वुएन्त्संगनें इतकें जरी सांगितलें असलें तरी पण त्या काळच्या महाराष्ट्राच्या सीमा आणि त्यांचें क्षेत्रफळ याबद्दल आपणांला निश्चित असें कांहीं सांगतां येत नाहीं.

पण एवढें मात्र नक्की सांगतां येतें कीं, ज्याला पूर्वी दक्षिणापथ - दंडकारण्य – महाराष्ट्र म्हणत याचाच कमीअधिक भाग अनेक कारणांनीं वेळोवेळीं एकत्र होऊन आपला हा आजचा महाराष्ट्र बनला आहे.

आणि दुसरें आपणाला असेंहि सांगतां येतें कीं, त्या काळीं महाराष्ट्राचा बराचसा भाग अरण्यमय होता. डोंगराळ होता. सह्याद्रि, सातपुडा ह्या पर्वतांनीं आपल्या अंगाखांद्यांवर आजच्यापेक्षां किती तरी अधिक हिरवेंगार दाट जंगल पांघरलें होतें. नद्या तुडुंब भरून फोफावत जात होत्या. वारा घोंघावत होता.

अशाहि प्रदेशांत लोक राहत होते. प्राण्यांची शिकार, कदमुळें, फळें यांवर आपली उपजीविका करीत होते. ते अगदीं प्राथमिक अवस्थेंत राहत होते. मिळेल तें खाणे आणि निसर्ग जगवील तितके दिवस जगणें असें त्यांचें जीवन होतें. शिकारीसाठीं लागणारीं त्यांचीं हत्यारेंहि अगदींच मामुली

होतीं. धारदार लांबट दगडापासून तों धनुष्यबाणापर्यंत त्यांच्या हत्यारांचे प्रकार होते.

महाराष्ट्रांतील मूळचे हे लोक कोणती तरी भाषा बोलत होते हें निश्चित. कारण प्राथमिक स्वरूपाचें आणि जरुरीपुरतेच कां असेनात पण हे एकमेकांशीं भाषेच्या द्वारें व्यवहार करीत होते. विचारांची देवघेव करीत होते. आपले अनुभव एकमेकांस सांगत होते. आनंद, दुःख इत्यादि भावना हावभावांद्वारें तसेंच भाषेच्या द्वारें प्रकट करीत होते.

पण त्यांच्या भाषेची प्रगति आजच्याइतकी झाली नव्हती. मराठी भाषेचा जन्मच मुळीं इ. सन सातशेंच्या सुमारास झाला आणि त्यामुळें कित्येक शतकांपूर्वीं हे मूळचे लोक जी भाषा बोलत होते ती आजच्या मराठी भाषेपेक्षां बरीच प्राथमिक स्वरूपाची होती.

मूळची भाषा संस्कृत. तिच्या उच्चारांत कठीणता म्हणून ती बोलतांना उच्चारांत कांटेकोरपणा राहत नसे. शिवाय मनुष्याची काय किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्राण्याची काय, जें सहजसुलभ तें चटकन् स्वीकारण्याकडे प्रवृत्ति· यामुळें संस्कृत भाषेचा वापर करीत असतांना तिच्या उच्चारांत बदल होत गेला. उच्चाराबरोबर अर्थांतहि ढिलेपणा आला. अर्थाची अतिव्याप्ति किंवा अव्याप्ति होऊं लागली आणि या व अशा दुसऱ्या अनेक कारणांनीं संस्कृतपासून महाराष्ट्री आणि महाराष्ट्रीपासून आजची मराठी भाषा उत्पन्न झाली.

प्राचीन महाराष्ट्रांत मूळची जी लोकवस्ती होती तिची भाषा कदाचित् वेगळीच असण्याचाहि संभव आहे. पण आपणांस याबद्दल कांहीं पुरावा सांपडत नाहीं. आणि त्यामुळेंच भाषाशास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं, महाराष्ट्रांतील मूळच्या या लोकांची भाषा संस्कृतवरून बनलेल्या प्राकृत-मराठी भाषेंतच सामावली गेली असली पाहिजे.

महाराष्ट्रांतील मूळच्या ज्या लोकांना पुढें अनार्य हें नांव देण्यांत आलें, ते लोक ' रानटी ' होते असेंच आपणांला आज वाटेल. त्यांना जीवनच मुळीं नव्हतें असें आपण आज म्हणूं. कारण आजच्या मानानें त्यांची रहाणी, त्यांचें

खाणेंपिणें, त्यांच्या देवदेवतांविषयींच्या समजुती कांहींशा प्राथमिक स्वरूपाच्या, स्वार्थाच्या, निष्ठुरतेच्या वाटतात.

आपल्या या अनार्य भाऊबंदांच्या देवदेवतांचेंच पाहा ना. त्यांच्या देवदेवता निसर्गांतील भव्य, भयानक अशा स्वरूपाच्या होत्या. भीतीच्या पोटींच अशा देवदेवतांचा जन्म ! आणि त्यांची भक्ति स्वतःच्या संरक्षणासाठीं !! अतिवृष्टि होऊ नये आणि आपल्या जीविताला धोका पोहोंचूं नये म्हणून वरुणदेवतेची भक्ति. अग्नीचा कोप होऊं नये म्हणून अग्निदेवतेची भक्ति. दगड, सर्प, वृक्ष, रानडुकर, व्याघ्र इत्यादि देवता अशाच कारणांनीं अस्तित्वांत आल्या. आपल्या पूर्वजांच्या या समजुती आज आपणांला कांहींशा विचित्र वाटतात खऱ्या, पण आपण जरी दोन हजार वर्षांपूर्वींच्या त्या काळांत असतों तरी आपल्याहि समजुती तशाच असत्या नाहीं का ? आज आपण विज्ञानयुगांत वावरत आहोंत. हजारों वर्षांच्या अनुभवांचा सांठा आपल्याजवळ आहे. आपली कल्पकता वाढली आहे. विचारांची देवघेव वाढली आहे. आपलीं आजचीं घरेंच पाहा ना, सुखसोईंनीं किती युक्त आहेत ! पण त्या काळीं ? त्या काळींहि लोक घरेंदारें करून राहात. पण घरादाराबद्दलची आपली आजची जी समजूत आहे ती समजूत मात्र त्या काळीं मुळींच नसावी. स्वसंरक्षणासाठीं प्राथमिक स्वरूपांत ज्याचा आश्रय बराच काळ घेतां येईल तीं त्या वेळच्या लोकांचीं घरें किंवा आश्रयस्थानें.

अनार्यांचीं घरें किंवा आश्रयस्थानें आरंभींच्या काळांत एकमेकांजवळ जवळ नसावींत. पण पुढें तीं जवळ जवळ असावींत असें वाटतें. कारण त्यांना पुढील काळांत समुदायानें म्हणजे गटागटानें रहाणेंच हिताचें आहे आणि सुरक्षिततेचेंहि आहे, असें वाटूं लागलें. श्वापदांचे हल्ले, दुसऱ्या लोकांनीं केलेले हल्ले, निसर्गकोप अशा अनेक संकटांना संघटनेनें तोंड दिलें तरच आपणांला टिकाव धरतां येणें शक्य आहे, असा अनुभव आणि समुदायानें राहण्याची सहजप्रवृत्ति इत्यादि अनेक कारणांनीं अनार्य गटागटांनीं राहूं लागले. घरें करूं लागले. आलेल्या संकटांचा जमावानें प्रतिकार करूं लागले.

पण आपण हें जाणलें पाहिजे कीं, अनार्यांचे हे जमाव फारसे मोठे नसत

आणि ते फार काळ एका ठिकाणीं रहातहि नसत. इतकेंच नव्हे तर जमावांतील सर्व माणसें त्याच एका जमावांत रहातच असेंहि नाहीं. तर दुसऱ्या एखाद्या परिचित जमावांतसुद्धां आपला समावेश करून घेत.

महाराष्ट्राच्या कांहीं भागांत कित्येक शतकें असें चाललें होतें तर कांहीं भागांत आपण ज्याला विदर्भ म्हणतों त्या व त्याच्या आसपासच्या भागांतील राहणारे लोक बरेच सुधारलेले होते. समाजव्यवस्थाहि तिथें चांगली होती, असेंहि कांहीं संशोधकांचें मत आहे.

त्या काळीं असा हा आमचा महाराष्ट्र होता. पण तो तसाच राहिला का? नाहीं. त्याच्यांत पुढें फरक पडला. खूप फरक पडला. तो दिवसेंदिवस आपली प्रगति करून घेऊं लागला. त्याच्या प्रगतीला हातभार लावण्यासाठीं खूप दुरून त्याचे बांधव धांवून आलें. अडीअडचणींतून मार्ग काढीत काढीत आले.

महाराष्ट्राचे हे बांधव कोण, ते कसे आलें आणि त्यांनीं महाराष्ट्राच्या प्रगतीला कसा हातभार लावला तेंच आतां आपण पाहूं.

# तुम्ही आम्ही भाऊ

## २

आर्य प्रथम इ. सनापूर्वी दोन हजार वर्षांपासून उत्तर भारतांत आले. त्यांनीं गंगा, सिंधू या नद्यांच्या कांठाकांठानें सोईस्कर ठिकाणें पाहून आपली वस्ती केली. पुढें ते शेतीहि करूं लागले. गुरें पाळूं लागले. त्यांना भारताच्या पूर्व भागांतूनच वस्ती करणें त्या काळीं सोईचें होतें. भारताच्या दक्षिणेकडील भागांत प्रवेश करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला असता तरी त्यांना तें फारसें शक्य नव्हतें. कारण पूर्व-पश्चिम असा विंध्य आडवा होता आणि तो उल्लंघून उत्तरेकडून दक्षिणेकडे येणें फारच कठीण होतें.

आणि त्यामुळेंच आर्य लोकांना आरंभींच दक्षिण भारतांत येतां आलें नाहीं. त्यांना उत्तर भारतांतच नद्यांच्या कांठाकांठांनीं पूर्वेकडे वस्ती करावी लागली.

आर्यांना विंध्य पर्वताच्या उंचीमुळेंच भारताच्या दक्षिण भागांत येणें कठीण झालें होतें. त्यांना एवढा उंच विंध्य ओलांडतां येत नव्हता.

विंध्याच्या या उंचीविषयीं पुराण-वाङ्मयांत एक गोष्ट सांगितलेली आहे. ती अशी कीं, एके काळीं विंध्य अतिशय उंच होता. मेरु पर्वताइतका ! तरी पण त्याला वाटे कीं, आपण मेरूपेक्षांहि उंच व्हावें. मेरूसभोंवतीं सूर्य-चंद्र प्रदक्षिणा घालतात तर त्यांनीं आतां माझ्यासभोंवतीं प्रदक्षिणा घालाव्यात.

विंध्य सूर्य-चंद्राला सांगूंहि लागला कीं, "सूर्य-चंद्रा, तुम्ही त्या मेरूसभोंवतीं प्रदक्षिणा घालायच्या थांबवा आणि माझ्यासभोंवतीं प्रदक्षिणा घाला. तुम्हीं यापुढें मेरूसभोंवतीं प्रदक्षिणा घालावयाच्या नाहींत."

विंध्याच्या या विरोधामुळें सूर्य-चंद्रांची गति कुंठित झाली आणि जगावर अंधार पसरला. धरणी कंपायमान झाली. प्रलयकाळ अगदीं जवळ येऊन ठेपला.

आतां करावें काय याची देवांना मोठी चिंता उत्पन्न झाली.

मग देवांनीं विचार केला कीं, विंध्याचे गुरू अगस्ति. तेव्हां अगस्तीकडे जाऊन त्यांना विनंति करावी कीं, विंध्याच्या या हटवादीपणावर कांहीं उपाय सुचवा आणि जगावरचें हें संकट टाळा.

देवांनीं विनंती केल्यावर अगस्ति म्हणाले, "ठीक आहे. पाहूं."

आणि मग अगस्तींनीं विंध्याला आज्ञा केली कीं, "अरे विंध्या, मी दक्षिणेंत जात आहें. तिथून मी परत येईपर्यंत तूं अष्टांगावर पडून राहा."

आपल्या गुरूची आज्ञा विंध्यानें अक्षरशः मानली. तो अष्टांगावर पडून राहिला. त्यानें गुरूला दंडवत घातला! विंध्य उभा होता तो आडवा झाला!

विंध्याची उंची कमी झाली.

विंध्याला–आपल्या या शिष्याला–अगस्तींनीं असें करावयास लावलें आणि ते दक्षिणेकडे आले. त्यांनीं उत्तरेचें दक्षिणेशीं दळणवळण सुरू केलें. त्यांनीं काशी हें आपलें रहाण्याचें ठिकाण सोडलें. पण असें करतांना त्यांना काशीविश्वेश्वराचें दर्शन घडणार नव्हतें. म्हणून त्यांनीं तिथून निघतांनाच काशीविश्वेश्वराची प्रार्थना केली कीं, 'मी दक्षिणेस जात आहें तर आपलें दर्शन मला तिकडेहि घडावें.'

काशीविश्वेश्वरानें अगस्तींची इच्छा पुरी करण्याचें मान्य केलें आणि तो काशीहून रामेश्वरीं येऊन राहिला.

अगस्ति दक्षिणेंत आले ते येथेंच राहिले. ते परत उत्तरेंत गेलेच नाहींत.

आणि बिचारा विंध्य! तो आपल्या गुरूची आज्ञा म्हणून जो अष्टांगावर पडून राहिला तो तसाच राहिला!!

विंध्याच्या या गोष्टीवरून विद्वान् संशोधकांनीं असा शोध लाविला आहे कीं, आर्यांना विंध्य पर्वताच्या उंचीमुळें भारताच्या दक्षिण भागांत येणे कठीण

झालें होतें. त्यांना एवढा उंच पर्वत ओलांडतां येत नव्हता. या काळीं गंगा, यमुना वगैरे नद्याहि उत्तरवाहिनी होत्या. आज जिथें हिमालय पर्वत आहे तिथें त्या काळीं समुद्र होता आणि या समुद्राला ह्या उत्तरवाहिनी नद्या मिळत होत्या.

पण पुढें कांहीं काळानें भूगर्भांत फार मोठी घडामोड झाली आणि त्या महासागरांतून हिमालयाचा जन्म झाला.

आणि मग एक नवल घडलें. तें म्हणजे ज्या नद्या उत्तरवाहिनी होत्या त्यांपैकीं कांहीं दक्षिणवाहिनी आणि कांहीं पूर्ववाहिनी झाल्या.

आपल्या धार्मिक ग्रंथांत ही घडामोड 'मनू आणि महापूर' या गोष्टीनें कांहींशी सूचित केली असावी असें वाटतें. 'मनू आणि महापूर' ही गोष्ट थोडक्यांत अशी आहे :-

ब्रह्मदेवानें प्रथम जग उत्पन्न केलें आणि शेवटीं मनू नांवाचा माणूस निर्माण केला.

एके दिवशीं या मनूला एक लहानसा मासा सांपडला.

तो मासा मनूला म्हणाला, " मनू, मी कधीं तरी तुझ्या उपयोगी पडेन. तूं मला पाळ."

" अरे वा ! माशा, तूं मला फार आवडला आहेस. मी तुला पाळणारच आहें." असें म्हणून मग मनूनें एका भांड्यांत पाणी भरलें व त्या माशाला आंत सोडलें.

मासा दिवसेंदिवस वाढूं लागला.

कांहीं दिवसांनीं माशाला तें भांडेंच पुरेना.

मग मासा मनूला म्हणाला, " मनू, मी आतां मोठा झालों. मला हें भांडें राहायला पुरत नाहीं. तूं आतां मला समुद्रांत नेऊन सोड ना !"

मनू म्हणाला, " बरं. तसें करतों."

आणि मग मनूनें माशाला समुद्रांत नेऊन सोडलें.

मासा समुद्रांत जातां जातां म्हणाला, " मनू, मी तुला सांगून ठेवतों तें ऐक. कांहीं दिवसांनीं मोठा प्रळय होईल. मोठा मोठा पूर येईल. सगळीकडे पाणीच पाणी होईल. आणि मग सगळें जगच बुडून जाईल."

"असं का ! मग मी काय करूं ?" मनूनें माशाला विचारलें.

"तूं ? तूं होडींत बस आणि माझी आठवण कर. मग मी तुझ्या मदतीला धांवत येईन."

मनू म्हणाला, "बरं."

पुढें कांहीं दिवसांनंतर आकाशांत काळेकुट्ट ढग जमा झाले. जोराचा वारा सुटला. कडकड विजा चमकूं लागल्या. जोराचा पाऊस पडूं लागला आणि जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें.

झाडें बुडूं लागलीं. डोंगर बुडूं लागले. पर्वत बुडूं लागले !

मनू ?

मनू होडींत बसला. त्यानें माशाची आठवण केली. तो माशाला हांका मारूं लागला.

मासा आला.

अरे बापरे ! मासा आतां किती तरी मोठा झाला होता.

मासा आला. त्यानें होडीची दोरी तोंडांत धरली आणि तो होडी ओढीत ओढीत चालला.

किती दिवस आणि किती रात्री मासा होडी ओढीत ओढीत एका उंचच उंच ठिकाणीं गेला.

मनूनें होडीची दोरी एका झाडाला घट्ट बांधली.

"मनू, झालें आतां ? जाऊं मी ? जातों आतां. आणि मनू, हें बघ, पाणी जसजसें कमी होत जाईल तसतसा तूं होडी घेऊन खालीं ये."

मनू म्हणाला, "बरं."

मासा गेला.

पाणीहि कमी कमी होऊं लागलें.

मनूची होडीहि खालीं खालीं येऊं लागली–

पाणी अगदींच कमी झालें.

मनूची होडी अगदींच खालीं आली. तो होडींतून जमिनीवर आला आणि माणसें कुठें दिसत आहेत का पाहूं लागला. पण त्याला माणसेंच नव्हे तर पशु, पक्षी, झाडें कांहीं कांहींच दिसेना.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ८४९६२ दि. ३।७।६१
२०४१२ नों. दि. २६।६।७१


मग मनूनें देवाची प्रार्थना केली. मोठा यज्ञ केला.

मग मात्र मनूला जिकडे तिकडे माणसें, पशु-पक्षी, झाडें...दिसूं लागलीं.

मनूला किती किती तरी आनंद झाला.

'विंध्य आणि अगस्ति' व 'मनू आणि महापूर' या दोनहि गोष्टी जरी एकाच काळीं घडल्या नसल्या तरीहि त्या दोन गोष्टींवरून अनुमान करतां येतें तें असें कीं, फार फार पूर्वीं केव्हांतरी भारतांतील उत्तर भागांत फारच मोठा धरणीकंप झाला असावा आणि धरणीकंपामुळें महासागराच्या ठिकाणीं हिमालय उभा राहिला असावा. महासागरांतील जमिनीचा भाग उंच झाला असावा; आणि त्यामुळें पूर्वीं ज्या नद्या दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहत होत्या त्यांचे प्रवाह बदलून त्या उत्तरेकडून दक्षिणेकडे-पूर्वेकडे वाहूं लागल्या असाव्यात.

कांहीं कां असेना, पण सृष्टीच्या या घडामोडींत हिमालय व विंध्य यांमधील सखल भाग धरणीकंपामुळें म्हणा किंवा नद्यांतून वहात येत असलेल्या गाळामुळें म्हणा, जवळ जवळ तीन हजार फूट भरून उंच झाला. त्यामुळें साहजिकच विंध्याची उंची तीन हजार फुटांनीं कमी झाली. विंध्य तीन हजार फुटांनीं ठेंगणा झाला !

आतांपर्यंत विंध्याच्या उंचीमुळें आर्यांना भारताच्या दक्षिण भागांत येणें कठीण झालें होतें. त्यांना उंच असा हा विंध्य ओलांडतां येत नव्हता. पण आतां ?

आतां जर कोणी विंध्य ओलांडण्याचा प्रयत्न करील तर त्याला तें शक्य आहे. मात्र तो धाडसी, उत्साही, महत्त्वाकांक्षी असला पाहिजे. विंध्य पर्वत ओलांडून भारताच्या दक्षिण भागांत जाईनच जाईन अशा जिद्दीचा असला पाहिजे.

आणि त्या काळीं अशा जिद्दीचा एक महापुरुष पुढें सरसावला.

कोण हा महापुरुष ?

अगस्ति ऋषि.

विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील भागांत अगस्ति ऋषि फार लोकप्रिय होते. त्यांच्या पाठीशीं आर्यांचा बराच समुदाय होता. अगस्ति ऋषि स्वतः

सो...२

ज्ञानी होते तसेंच ते धाडसीहि होते. कल्पक होते तसेंच ते कर्तृत्ववानहि होते. त्यांनीं आपल्याबरोबर कांहीं आर्य घेतले व विंध्य ओलांडून ते दंडकारण्यांत आले.

अगस्ति ऋषि ज्या दिवशीं दंडकारण्यांत आले तो दिवस महाराष्ट्राच्या भाग्याचा ! महाराष्ट्राच्या वैभवाच्या मुहूर्ताचा ! सोन्याच्या पावलांचा !

अगस्ति ऋषि दंडकारण्यांत ज्या काळीं आले त्या काळीं इथें काय होतें ? सगळीकडे दाट अरण्यच अरण्य. पशु-पक्षी यांची वस्ती. राक्षस तर होतेच होते. माणसांचीहि वस्ती होती. नाहीं असें नाहीं.

अगस्ति ऋषि आले आणि दंडकारण्याची कळा बदलली. ती पुण्यभूमि झाली आणि म्हणूनच पुढें अयोध्याधिपति राम सीता शोधण्याच्या निमित्तानें दंडकारण्यांत आले. त्यापूर्वी येथें आर्यांची वसाहत झालेली होती. रामाला शूर्पणखा राक्षशीण भेटली तशी शबरी भिल्लीणहि भेटली. शबरीची प्रेमळ रामभक्ति प्रसिद्धच आहे. मातंग ऋषींच्या आश्रमांत राहून तिची मनोभूमि उज्ज्वल झाली. मातंग ऋषींच्या कृपेनेंच तिला रामाची भेट झाली. रामानें तिला कृतार्थ केलें. ऋषि-मुनींच्या यज्ञयागांत अडथळा आणणाऱ्या राक्षसांचा रामानें संहार केला. 'राक्षसांना मारून कृतार्थ हो.' असा आशीर्वाद अनेक ऋषि-मुनींनीं रामाला दिला. राम चौदा वर्षांच्या वनवासापैकीं १२ वर्षें गोदावरी तीरीं पंचवटींत राहिले. त्र्यंबकेश्वराच्या डोंगरावर मारुतीला जन्म देणारी तपस्विनी अंजनीमाता राहिली.

अशी ही महाराष्ट्र पुण्यभूमि !

या पुण्यभूमींत अगस्ति ऋषि कांहीं आर्यांसह ज्या काळीं आले. त्या काळीं दंडकारण्यांत माणसांची वस्ती होती. नाहीं असें नाहीं. पण ती एके ठिकाणीं नव्हती. इथें तिथें, इथें तिथें अशी वस्ती होती.

दंडकारण्यांतील या लोकांना अगस्ति ऋषि आणि त्यांच्याबरोबर आलेल्या आर्यांनीं 'अनार्य' असें नांव दिलें. या अनार्य लोकांचें जीवनच मुळीं असंबद्ध होतें. निसर्ग देईल तें खायचें आणि जगवील तितके दिवस जगावयाचें. कारण निसर्गावर मात करण्याइतपत ते सुधारलेच नव्हते !

आर्य दंडकारण्यांत आले ते मात्र आपल्याबरोबर पूर्वजांचा अनुभव घेऊन आले. चालीरीति घेऊन आले. त्यांनीं रीतिरिवाज आणले. कल्पकता आणली. सुधारलेल्या पद्धतीचीं हत्यारें आणलीं. त्यांना दंडकारण्य तोडून साफ करावें आणि तेथें वस्ती करावी, शेती करावी, गाईंचीं खिल्लारें बाळगावींत, यज्ञयाग करावेत असें वाटूं लागलें.

आणि यासाठींच आर्य लोकांनीं दंडकारण्य तोडण्यास सुरुवात केली.

उत्तर भारतांतून कांहीं आर्य घेऊन अगस्ति ऋषि आले. त्यानंतर तिकडून आर्यांच्या अनेक टोळ्या भारतांत आल्या. मात्र त्या टोळ्या एकाच काळीं आणि एकाच मार्गानें आल्या असें नाहीं, तर निरनिराळ्या काळीं आणि निरनिराळ्या मार्गांनीं आल्याचा उल्लेख संस्कृत, पाली, अर्धमागधी वाङ्मयांत आहे.

आर्यांची संख्या दंडकारण्यांत आणि त्याच्या आजूबाजूच्या भागांतहि दिवसेंदिवस वाढूं लागली. दंडकारण्य तोडून ते आपली वसाहत करूं लागले.

पण या लोकांना दंडकारण्यांतील मूळच्या लोकांचा त्रास प्रथम प्रथम फारच झाला. त्यांना या मूळच्या लोकांशीं झगडावें लागलें. त्यांचा विरोध सहन करावा लागला. पण आर्य हे अनार्यांपेक्षां बुध्दीनें श्रेष्ठ आणि शस्त्रांनीं बरेच सुधारलेले असल्यामुळें अनार्यांना आर्यांवर मात करतां आली नाहीं. त्यांना आर्यांशीं नमतें घ्यावें लागलें. त्यांच्या अधीन व्हावें लागलें – अंकित व्हावें लागलें.

आर्यांचे आरंभीचे श्रेष्ठ आणि द्रष्टे पुरुष अगस्ति. त्यांनीं खूप प्रयत्न करून दंडकारण्यांतील झाडी तोडली आणि लोकवस्तीस योग्य असे भाग तयार केले. विशेषत: नदीच्या कांठाकांठानेंच वस्ती करतां येईल असें योजनाबद्धच हें काम त्यांनीं केलें. आज आपणांस नद्यांच्या कांठाकांठानें म्हणजे नद्यांच्या जवळपास जीं जुनीं शहरें आढळतात तीं त्या काळच्या जुन्या शहरांचींच नवीं प्रतीकें असण्याचा संभव अधिक आहे. दंडकारण्याविषयीं रामायणांत असें वर्णन आहे कीं, '...तें घोर अरण्य होतें. त्यांत राक्षसांचा म्हणजे रानटी जातींच्या लोकांचा उपद्रव होत होता.'

आणि हें अगदीं खरें आहे. दंडकारण्यांत जोंपर्यंत जंगलच जंगल होतें तोंपर्यंत तेथील मूळच्या लोकांचा उपद्रव होतच होता. आर्य जंगलतोड करतात, वस्ती करतात हें अनार्यांना पसंतच नव्हतें. कारण त्यांच्या उपजीविकेस त्यामुळें अडथळे येऊं लागले, त्यांना कष्ट पडूं लागले. पूर्वीं अनार्य लोकांना आपली उपजीविका कंदमुळें, पशु-पक्षी यांची शिकार, यांवर सहज सुलभ करतां येई. पण आर्य लोक जसजसें जंगलें तोडून जमीन साफसूफ करूं लागले तसतसें कंदमुळें, पशुपक्षी, फळें इत्यादि उपजीविकेच्या वस्तु अनार्यांस मिळणें फार कठीण पडूं लागलें. एकटचा दुकटचाला सहज सांपडणारी शिकार आतां मिळेनाशी झाली. त्यांना उपजीविका करणें फार त्रासाचें आणि श्रमाचें होऊं लागलें. त्यामुळें त्यांचें जीवन दिवसेंदिवस कठीण होऊं लागलें. ज्या भागांतील जंगलें तुटूं लागलीं तो भाग अनार्यांना नकोसा होऊं लागला. आणि त्यामुळेंच असा भाग सोडून दुसऱ्या ठिकाणीं एखाद्या जंगलमय भागांत अनार्य लोक हळूहळू सरकूं लागले.

पण जर कोणी असें विचारील कीं, अनार्य लोक सुखासुखी दुसरीकडे जंगलमय भागांत सरकत होते का ? तर त्याचें उत्तर ‘ नाहीं ’ असेंच द्यावें लागेल. कारण ते लोक आर्यांना प्रतिकार करीत होते. त्यांच्या कार्यांत अडचणी आणीत होते.

पण आर्य हे विशेष सुधारलेले. विशेष कल्पक. त्यामुळें आर्यांनीं अनार्यांचा प्रतिकार सहज सहन केला. इतकेंच नव्हे, तर त्यांच्यावर मात केली. त्यामुळें अनार्य लोकांना कळून चुकलें कीं, एक तर आपणाला या लोकांपासून दूर तरी राहिलें पाहिजे, त्यांचा संबंध टाळला तरी पाहिजे किंवा या लोकांच्या सहवासांत राहून त्यांच्याशीं सलोख्यानें वागलें तरी पाहिजे – त्यांच्या मता-प्रमाणें तरी वागलें पाहिजे.

कांहीं अनार्यांनीं – आर्येतरांनीं तसें केलेंहि. ते आर्यांच्या सहवासांत राहूंहि लागले. त्यामुळें साहजिकच आर्यांची भाषा, त्यांचे रीतिरिवाज, विचार, पोषाख यांची देवघेव सुरू झाली. मात्र आर्य लोकांना या मूळच्या लोकांवर आपल्या भाषेचा संपूर्ण पगडा बसवितां आला नाहीं. उलट, आर्येतरांच्या

भाषाच आर्यांना कमीअधिक प्रमाणांत स्वीकाराव्या लागल्या. त्यांच्या भाषेंतील शब्द आपल्या संस्कृत भाषेंत समाविष्ट करून घ्यावे लागले–अधिक करून आर्येतरांचे आचार, रीतिरिवाज थोड्याफार फरकानें कां असेनात पण तेहि स्वीकारावे लागले. इतकेंच नव्हे, तर त्यांचीं कांहीं दैवतेंहि आर्य लोकांना स्वीकारावीं लागलीं.

आर्यांनीं असें केलें आणि अनार्यांनीं असें कांहीं केलें नाहीं, असें कांहीं नाहीं. अनार्यांनींहि आर्यांच्या सहजसुलभ आणि सुखदायक अशा चालीरीति, रीतिरिवाज, पोषाख, भाषा वगैरे अनेक गोष्टी थोड्याच काळांत स्वीकारल्या. आर्यांच्या बोलीभाषेंतील साध्या, सोप्या, सहज उच्चारतां येतील अशा शब्दांचाहि ते आपल्या बोलींत उपयोग करूं लागले.

दोन संस्कृतींची देवाण–घेवाण सुरू झाली आणि महाराष्ट्राच्या घडणींत भर पडूं लागली. प्राथमिक स्वरूपाचे कां असेनात पण नवीन उद्योग सुरू झाले. शेतीच्या उपयोगासाठीं नांगरासारखीं नवीं हत्यारें निर्माण होऊं लागलीं. आणखीहि जरूरीप्रमाणें नवीन वस्तु निर्माण होऊं लागल्या. त्यांचीं नांवें प्रचारांत येऊं लागलीं, त्यामुळें नव्या नव्या शब्दांची भाषेंत भर पडूं लागली. आर्यांच्या सहवासानें कांहीं आर्येतर घरेंसुद्धां करून राहूं लागले.

पण ज्या कांहीं आर्येतरांनीं आर्यांचा संबंध ठेविला नाहीं आणि जे दूर दूर जंगलमय भागांत जाऊन राहिले, अशा लोकांच्या मूळच्या परिस्थितींत फारसा फरक पडला नाहीं. ते लोक पहिल्या पहिल्यानें एकटे दुकटेच रहात. वाटल्यास तात्पुरत्या झोपड्या जमिनीवर किंवा झाडांच्या फांद्यांवरहि बांधीत आणि त्यांत रहात. सोईस्कर अशा गुहा सांपडल्या तर त्यांतहि रहात. पूर्वींचेंच जीवन ते जगत असें म्हटलें तरी चालेल.

पण पुढें जसजशी जंगलांची अधिकाधिक तोड होऊं लागली आणि तिथें घरेंदारें होऊं लागलीं, शेतेंभातें होऊं लागलीं तसतसें आर्यांपासून दूर जाऊन राहिलेल्या या आर्येतरांच्या स्वैराचाराला अडथळे येऊं लागले. या ना त्या निमित्तानें आर्यांशीं वारंवार संघर्ष होऊं लागले. पुढेंपुढें तर या लोकांच्या गरजाहि वाढूं लागल्या. वैयक्तिक शिकार करण्यापेक्षां सामुदायिकरीत्या

शिकार करणें सुलभ आहे याचा अनुभवहि त्यांस येऊं लागला. दुरून कां होईना पण आर्यांचें त्या काळचें आदर्श जीवन पाहावयास मिळूं लागलें.

आणि या सर्व गोष्टींमुळें आर्यांशीं संबंध न ठेवणाऱ्या आर्येतरांनाहि असें वाटूं लागलें कीं, आपण एकटेदुकटे अगर चार पांचांच्या संख्येनें दूरदूर न रहातां जर जवळ जवळ राहूं लागलों, समुदायानें राहूं लागलों तर आपणाला संरक्षण चांगलें करतां येईल आणि सामुदायिकपणें शिकार करणेंहि सुलभ जाईल. इतकेंच नव्हे तर आर्यांना भिऊन दूरदूर जावेंहि लागणार नाहीं.

आणि ह्यामुळेंच हे अनार्य लोक–आर्येतर लोक छोट्या मोठ्या जमावानें राहूं लागले.

मात्र आपण एक गोष्ट स्मरणांत ठेवली पाहिजे ती ही कीं, आर्येतरांचे असे जमाव पुष्कळ दिवस एकत्रच रहात असें नाहीं, आणि एकाच ठिकाणीं रहात असेंहि नाहीं. जेथें जाऊन राहिलें असतां आपणाला अधिक सुरक्षितता आणि उपजीविकेचें साधन अधिक सुलभ, तेथें ते वारंवार जात आणि रहात. आज इथें, उद्यां तिथें ! मात्र एक गोष्ट खरी कीं, बहुतेक अनार्य आतां जमावा-जमावानें राहूं लागले. टोळ्या–टोळ्यांनीं राहूं लागले.

अनार्य लोक छोट्या मोठ्या जमावानें रहातां रहातां साहजिकच त्यांच्यांत सहकार्याची भावना निर्माण होऊं लागली. जमावाचा फायदा तो आपला फायदा, जमावाचा तोटा तो आपला तोटा ही भावना त्यांच्यांत निर्माण झाली. तिची वाढ झाली आणि ती आचरणांतहि येऊं लागली. कांहीं अंशीं त्यांचें सामुदायिक जीवन सुरू झालें. पूर्वी व्यक्ति-व्यक्तीचे संबंध येत. आतां जमावा–जमावाचे संबंध या ना त्या कारणानें येऊं लागले. आणि पुढें पुढें तर असें होऊं लागलें कीं, अनेक जमावांचें हित अगर अहित एकाच गोष्टींत गुंतलेलें असल्यास ते जमावहि सहकार अगर प्रतिकार करण्याच्या निमित्तानें वारंवार एकत्र येऊं लागले. त्यांच्यांत प्रतिकारापेक्षां सहकारच अधिक वाढला.

पण याहि पुढें जाऊन अशा जमावांचें टोळ्यांत रूपांतर होऊं लागलें.

प्रत्येक टोळी आपलें एखादें तत्त्व ठरवूं लागली. टोळींतील प्रत्येकाला स्वत:च्या टोळीचा, टोळीच्या शक्तीचा अभिमान वाटूं लागला. टोळचा-टोळचांत वस्तीच्या ठिकाणावरून, शिकारींवरून आणि दुसऱ्या अनेक हलक्या फुलक्या गोष्टींवरून भांडणें होऊं लागलीं. एकमेकांवर उघड वा गुप्त रीतीनें हल्ले प्रतिहल्ले होऊं लागले. जेवढी टोळी मोठी तेवढें तिचें बळ अधिक; त्यामुळें लहान लहान टोळचा एकत्र येऊन त्या एकमेकींत सामावल्या जाऊं लागल्या.

पण अनार्यांच्या बनलेल्या या टोळचा-टोळचांत भांडणें होत नव्हतीं का? भांडणें होत होतीं. एक किंवा अनेक टोळचा जशा एकत्र येत होत्या तशाच एका टोळींत भांडणें होऊन तिच्या लहान लहान अनेक टोळचा होतहि होत्या. भांडणें, सलोखे.....हें चाललेंच होतें.

अशा प्रकारें अनार्य लोक टोळचा--टोळचांनीं राहून आपलें जीवन जगूं लागले खरे, पण आपल्या टोळीचा रोजचा व्यवहार नीट पार पडावा, आलेल्या संकटाला व्यवस्थित तोंड देतां यावें, शत्रूवर योजनाबद्ध हल्ला करतां यावा, टोळीच्या हिताचें कमी श्रमांत काम करतां यावें, यासाठीं टोळींतील कुणातरी एकाची हुकमत टोळींतील इतरांवर असली पाहिजे, ही गरज प्रत्येक टोळींतील लोकांना भासूं लागली आणि यामुळेंच प्रत्येक टोळीचा नायक किंवा प्रमुख निर्माण झाला.

आणि नायकाच्याच हुकमतीखाली, त्याच्याच धोरणानें टोळींतील साऱ्या लोकांनीं वागलें पाहिजे, असा दंडक पडला!

आतां अनार्य कितीतरी सुधारले. टोळींतील लोकांचे रोजचे व्यवहार नीट चालावेत म्हणून टोळींतीलच ठराविक लोकांना आतां ठराविक कामें देण्यांत येऊं लागलीं! आणि तीं नीट होऊंहि लागलीं.

अशा प्रकारें अनार्य दिवसेंदिवस सुधारूं लागले. समाज करून राहूं लागले. त्यांच्या जीवनांत बरीचशी स्थिरता आली.

पण ही स्थिरता येण्यास आणि त्यांच्यांत सुधारणा होण्यास किती तरी शतकें लागलीं. किती तरी काळ जावा लागला, ही गोष्ट मात्र आपण विसरतां कामा नये.

दक्षिणापथांतील–दंडकारण्यांतील आणि त्याच्या आजूबाजूच्या भागांतील अनार्यांच्या जीवनांत अशा प्रकारें हळूहळू बदल होत असतांना आर्यांच्याहि जीवनांत हळूहळू बदल होत होताच. तेहि आपली प्रगति करीत होतेच.

अगस्ति आणि त्यांच्याबरोबर आलेल्या आर्यांनीं दंडकारण्य तोडून तेथें लोकवस्ती करण्यास सुरुवात केल्यानंतर उत्तरेकडून अनेक मार्गांनीं आर्यांच्या वेळोंवेळीं अनेक टोळ्या आल्या. ह्या आलेल्या टोळ्या ज्या ज्या काळांत आल्या त्या त्या काळच्या सुधारलेल्या चालीरीति, आचारविचार, नवे नवे शब्दभांडार, सुधारलेलीं आयुधें, नव्या कल्पना आपल्या बरोबर घेऊन आल्या. आणि त्यामुळेंच महाराष्ट्रांत स्थायिक झालेले आर्य, उत्तरेकडून टोळ्या-टोळ्यांनीं येत असलेले आर्य आणि येथील अनार्य यांच्या जीवनांत एकसारखा संघर्ष सुरू झाला.

या संघर्षामुळें महाराष्ट्रांत एक प्रकारें चैतन्य निर्माण झालें. भाषा, चालीरीति, आचारविचार, उद्योगधंदे, शेती इत्यादि अनेक गोष्टी सुधारल्या. जें सोपें, कमी श्रमाचें, चटकन् होणारें आणि संरक्षणास अधिक सुरक्षित ते सारेजण एकमेकांपासून चटाचट घेऊं लागले.

आर्य हे सुधारलेले असल्यामुळें त्यांना सामुदायिक जीवन जगण्याचें माहीत होतें. आर्य महाराष्ट्रांत–दंडकारण्यांत आले तेच मुळीं समुदायानें आले. आणि येथेंहि ते सामुदायिक जीवन जगूं लागले. त्यांनीं दंडकारण्य तोडलें तें सामुदायिकरीत्या; वसाहती केल्या त्या सामुदायिकरीत्याच.

आर्यांचीं काय किंवा अनार्यांचीं काय घरें साधींच असत. फार तर असें म्हणतां येईल कीं, अनार्यांच्या घरांपेक्षां आर्यांचीं घरें कांहीशीं सुधारलेल्या बांधणीचीं होतीं इतकेंच. त्या काळीं बहुतेक सर्वच घरें लाकडें, पर्णें, गवत ह्यांचा मुख्यतः उपयोग करून तयार करीत असें दिसतें. आर्य जीं वस्त्रें वापरीत तीं पट्ट स्वरूपाचीं म्हणजे न शिवलेलींच वापरीत. आर्यांच्या सहवासानें अनार्यहि अशाच स्वरूपाच्या वस्त्रांचा उपयोग करीत असावेत असें वाटतें. ते पौर्णिमेचा किंवा प्रतिपदेचा दिवस पवित्र मानीत.

आर्यांची मालमत्ताहि त्या काळीं आजच्या स्वरूपाची नव्हती. जमीन-

जुमला, कुरणें आणि गाई हें मालमत्तेचें मुख्य स्वरूप होतें. गृहपतीनें अगदीं पहांटे उठून गाईचा गोठा साफ करावयाचा. दूध काढावयाचें. त्या वेळच्या लोकसमाजांत मान, प्रतिष्ठा मिळण्यास प्रत्येकाजवळ कमींत कमी सहा तरी दुभत्या गाई असाव्या लागत. सहापेक्षां ज्याच्याजवळ जास्त गाई तो अधिक प्रतिष्ठित मानला जात असे. त्यामुळें प्रत्येक आर्याला वाटे, आपल्या गोठ्यांत अधिक गाई असाव्यात. त्यासाठीं गाईंच्या चोऱ्या सुद्धां होत.

कधीं कधीं आर्यांच्या गाई अनार्य चोरून नेत. अशा वेळीं आर्य लोक मोठमोठ्यानें ढोल वाजवून गवगवा करीत आणि पावलांच्या ठशांवरून माग काढून चोरांचा तपास करीत आणि शक्य तर आपल्या गाई परत मिळवीत.

अशा प्रकारें दक्षिणापथाच्या म्हणा, दंडकारण्याच्या म्हणा नाहीं तर महाराष्ट्राच्या म्हणा, पण प्रगतीची चढती कमान सुरू झाली. अन्न, वस्त्र आणि आसरा यांत दिवसेंदिवस प्रगति होऊं लागली.

आतां पूर्वीसारखा आर्य आणि अनार्य यांच्यांतील झगडा चालू राहिला नाहीं. दिवसेंदिवस तो कमी कमी होऊं लागला. इतकेंच नव्हे तर आर्य-अनार्य सारेच महाराष्ट्राच्या प्रगतीसाठीं झटूं लागले आणि त्याचबरोबर ते स्वतःचीहि प्रगति करूं लागले.

आतां पुढें काय ?

महाराष्ट्राचा पहिला राजा कोण ?

# आमचा पहिला राजा

## ३

महाराष्ट्रांत वस्ती झाली. आर्य, अनार्य गुण्यागोविंदानें नांदूं लागले. शेती करूं लागले. गुरांचीं खिल्लारें बाळगूं लागले. देवदैवतांची पूजाअर्चा होऊं लागली. करमणुकीचीं साधनें निर्माण झालीं. तीं प्रचारांत आलीं. सारें कांहीं ठीक झालें. पण महाराष्ट्राचा पहिला राजा कोण ? आणि त्यानें महाराष्ट्राच्या वैभवांत कोणती भर घातली ? हा प्रश्न आपली उत्सुकता वाढवितो.

महाराष्ट्राचा पहिला राजा कोण ?

या प्रश्नाचें उत्तर निश्चित स्वरूपाचें आणि अगदीं बरोबर असें मिळेलच असें नाहीं. कारण आपणाजवळ इतक्या पूर्वीच्या काळाचा कांहींच निश्चित पुरावा नाहीं. तरी पण आपणाला असें म्हणतां येईल कीं, पूर्वीच्या काळीं महाराष्ट्रांत एकाच काळीं एकच राजा असेलच असें संभवत नाहीं. उलट एकाच काळीं अनेक राजे असण्याचा संभवच अधिक. कारण त्या काळच्या महाराष्ट्रांत आर्यांच्या आणि अनार्यांच्या ठिकठिकाणीं ज्या टोळ्या होत्या त्यांना आपल्या हुकुमतींत ठेवणारा, त्यांच्या संरक्षणाची आणि जीविताची काळजी घेणारा असा जो कोणी एका किंवा अनेक टोळ्यांचा प्रमुख, तो त्या काळीं त्या त्या भागाचा राजा ! आर्यांच्या आणि अनार्यांच्या त्या काळीं महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं अनेक टोळ्या होत्या. तेव्हां त्या काळीं महाराष्ट्रांत

राजेहि अनेक असण्याचा संभव अधिक आहे. टोळीप्रमुख हा त्या भागाचा राजा ! टोळयांतील लोक ही त्याची प्रजा आणि त्या टोळया जेवढया भागांत वस्ती करून रहात आणि आपले जीवनविषयक व्यवहार करीत तेवढा भाग त्या राजाचें राज्य !

अशा रीतीनें कित्येक राजे लहानशा राज्याचे तर कित्येक राजे मोठया राज्याचेहि असतील आणि अशा राजांपैकीं चांगला राजा कोण आणि वाईट राजा कोण ह्याचें गमकहि ठरलें असेल. जो राजा आपल्या प्रजेची अधिकांत अधिक चांगली काळजी घेईल तो राजा चांगला. त्याच्या बाजूची त्याची प्रजा. प्रजेच्या हितासाठीं झटणें, तिची प्रगति करणें, राज्याचें रक्षण करणें इत्यादि बाबींची हे राजे विशेष काळजी घेत असतील. पण एक गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे कीं, ह्या लहान-थोर राज्यांत सतत भांडणें होणें शक्य होतें. ‘ जो बळी तो कान पिळी ’ हें तत्त्व ह्या राज्यांच्या बाबतींत असण्याचाच संभव अधिक.

कांहीं कां असेना, पण एक गोष्ट खरी कीं, त्या काळींहि महाराष्ट्राच्या प्रगतीचें एक एक पाऊल पुढेंच पडत होतें. महाराष्ट्राची जडण घडण होत होती.

महाराष्ट्रांत त्या काळीं अनेक राज्यें आणि त्यांचे अनेक राजे असण्याचा संभवहि आहे.

पण आपणाला ज्ञात असलेला महाराष्ट्राचा पहिला राजा फक्त एकच – प्रतिष्ठान येथील नरसिंह राजा.

नरसिंह राजाचा काळ अगदीं नक्की जरी सांगतां येण्यासारखा नसला, तरी बहुधा इसवी सनापूर्वी सहाशें ते सातशेंच्या दरम्यानचा असावा. मात्र त्याच्याविषयीं मिळालेल्या माहितीवरून एवढें ठरवितां येतें कीं, हा राजा पराक्रमी होता. नरसिंह राजा आणि पाटलीपुत्राचा राजा विक्रमादित्य यांचें युद्ध झालें होतें. त्या युद्धाची हकीकत अशी : प्रतिष्ठानचा राजा नरसिंह दक्षिणेंत जसा पराक्रमी होता तसा उत्तरेकडे पाटलीपुत्राचा राजा विक्रमादित्य पराक्रमी होता. त्याला राज्यविस्ताराची जबर महत्त्वाकांक्षा होती.

त्याला दक्षिणेकडील राज्यांवर सार्वभौमत्व मिळविण्याची जबर महत्त्वाकांक्षा होती आणि त्यामुळेंच त्यानें दक्षिणेंतील इतक्या दूरच्या प्रतिष्ठानच्या नरसिंह राजाच्या मुलुखावर स्वारी केली. तो पाटलीपुत्राहून स्वारीस निघतांनाच प्रतिज्ञा करून निघाला कीं, ' मी नरसिंह राजाला जिंकीन आणि माझा सेवक करीन तरच मी विक्रमादित्य ! '

पाटलीपुत्राहून प्रतिष्ठान म्हणजे पैठण किती तरी दूर. दऱ्याखोरीं, पर्वत, डोंगर, जंगलें पायाखालीं घालीत, नद्या पार होत, अडचणींना, संकटांना तोंड देत देत यायचें म्हणजे किती कष्टाचें. पण केवळ राज्यलोभानें विक्रमादित्यानें यांपैकीं कशाचीहि पर्वा न करतां तो अफाट सैन्य घेऊन पैठणजवळ आला.

शत्रू एकाएकीं दाराशीं येऊन उभा राहिला हें पाहून नरसिंह राजा कांहींसा डगमगला. आपल्याजवळ गज, घोडे नाहींत. सैन्यहि बेताचेंच आणि तशांतहि शत्रू समोर उभा ! तयारीसहि वेळच नाहीं ! !

तरी पण नरसिंह राजानें जेवढी कांहीं सवड मिळाली तेवढ्यांतच शक्य तितकी तयारी केली आणि मोठ्या धैर्यानें शत्रूला तोंड दिलें.

दोघांचें फार मोठें युद्ध झालें–मोठा संग्राम झाला. आणि शेवटीं नरसिंह राजानें विक्रमादित्याला पिटाळून लावलें !

नरसिंह राजाचा युद्धांत जय झाला खरा, पण त्यासाठीं त्याला फार मोल द्यावें लागलें. त्याचें फार नुकसान झालें. त्या काळीं सैन्यांत घोडदळ नव्हतें. घोड्यावर बसून लढाई करण्याचा प्रघात नव्हता. तो पुढें महाराष्ट्रांत जेव्हां शकाचें आगमन झालें तेव्हांपासून सुरू झाला. पायदळ हेंच त्या काळीं होतें.

या युद्धामुळें महाराष्ट्राच्या जडणघडणींत कांहीं विशेष भर पडली असें जरी नसलें, तरी भारतांतील उत्तरेकडून दक्षिणेकडे पूर्वीपेक्षां दळणवळण वाढलें आणि युद्धनीति, युद्धसाहित्य यांच्या ज्ञानांत थोडीफार भरच पडली असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं.

नरसिंह राजाच्या नंतर पुढें तीनशें–चारशें वर्षांत महाराष्ट्रांत होऊन गेलेले राजे, त्यांच्या राज्यांचा विस्तार, त्यांच्या राजधान्यांचीं ठिकाणें,

त्यांची राज्यपद्धति वगैरे निश्चित स्वरूपाची अशी माहिती मुळींच मिळत नाहीं. पुढची माहिती मिळते ती इ. सनापूर्वी २३२ च्या सुमाराची.

इ. सनापूर्वी २३२ च्या सुमारास महाराष्ट्रांत जीं कांहीं लहान मोठीं राज्यें होतीं त्यांत शातवाहन राजांचें राज्य विशेष प्रबळ होतें. या शातवाहनांचा पहिला ज्ञात राजा शिशूक. याचा कुठें कुठें शिमूक असाहि उल्लेख सांपडतो. याची पहिली राजधानी पैठण येथें होती. पहिली राजधानी असें म्हणण्याचें कारण हें कीं, पुढें कांहीं वर्षांनीं शातवाहनांनीं आपल्या राजधानीचें ठिकाण आंध्र प्रदेशांतील गंतूर जिल्ह्यांत धन्यकाकट हें केलें. अमरावतीच्या जवळपासच धन्यकाकट हें ठिकाण होतें.

शिमूक राजानें महाराष्ट्राच्या वैभवांत बरीच भर घातली. त्यानें राज्यविस्तार तर केलाच, पण त्याचबरोबर आपल्या राज्यांत बऱ्याच सुखसोयीहि केल्या. ठिकठिकाणीं लेणीं खोदविलीं. त्या काळीं म्हणजे सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी (ठाणें जिल्ह्यांतील) सोपारा (शूर्पणक) बंदरांतून जुन्नर, पैठणकडे जाण्या-येण्याचा एक महत्त्वाचा मार्ग नाणे घाटांतून होता. हा नाणे घाट शातवाहनांच्या अमदानींतच नाना आणि गुणा या दोन लोक-कार्यकर्त्यांनीं जवळ जवळच पण दोन ठिकाणीं खोदविला होता. तो बांधून काढला होता. त्यांपैकीं एका सोईस्कर अशा ठिकाणाहून वाहतुकीस उपयोगांत आणला होता. या नाणे घाटांतच जीं लेणीं खोदविलीं त्यांपैकीं एका लेण्यांतील एका पुतळ्याखालीं असें वाक्य आहे :

‘ राया शिमूक शातवाहनो श्रीमतो ’.

या वाक्याचा अर्थ असा कीं, ‘ प्रसिद्ध राजा शिमूक शातवाहन. ’

शातवाहन किंवा शालिवाहन हें कुणा एकाच राजाचें नांव नाहीं तर तें एका वंशाचें, कुलाचें, घराण्याचें उपनांव आहे. शातवाहन घराण्यांतील राजे एकापेक्षां एक पराक्रमी होते. पण ह्यांतहि सर्वांत इ. स. १०६ च्या सुमारास होऊन गेलेला गौतमीपुत्र शातकर्णी हा विशेष पराक्रमी राजा होता. त्याचें राज्य पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंत पसरलेलें होतें. एका शिलालेखांत त्याच्याविषयीं पुढील मजकूर आहे :

" तो क्षत्रियांचा दर्प व मान यांचें मर्दन करणारा होता. तो प्रियदर्शी असून शत्रू चुकला तरी त्याचे प्राण हरण करीत नव्हता. तो रामकृष्ण, अर्जुन, भीमसेन यांच्यासारखा पराक्रमी होता. त्याच्या आज्ञा सर्व मांडलीक मानीत."

शातवाहन राजांबद्दल आणि त्यांतल्या त्यांत गौतमीपुत्र शातकर्णी याच्या-बद्दल एवढें विस्तृत सांगण्याचा हेतु हा कीं, या राजाच्या कारकीर्दीत महा-राष्ट्राची खूप जडण घडण झाली. बऱ्याच नव्या गोष्टी आणि त्याहि महा-राष्ट्राच्या वैभवांत भर घालणाऱ्या घडल्या. सामाजिक जीवन पूर्वीपेक्षां कांकणभर अधिक स्थिर झालें, स्वास्थ्याचें झालें. या राजांच्या कारकीर्दीत व्यवहारासाठीं तांबें, कथील, आणि शिसें यांच्या मिश्रणापासून पोटीन नांवाची धातु तयार करून त्या धातूचीं नाणीं तयार केलीं होतीं. मात्र हीं नाणीं एकाच छापाचीं किंवा एकाच आकाराचीं नव्हतीं, तर ज्या राजाची सत्ता ज्या वेळीं चालू होती त्या राजानें आपल्या इच्छेप्रमाणें त्या वेळच्या चालू घडामोडीस–त्या वेळच्या एखाद्या वैशिष्टयास धरून तो नाण्यांचे आकार, त्यावरील लिपि आणि लिपीचें वळण, छाप बदलीत असे. असें असलें तरी बहुतेक शातवाहन राजांच्या नाण्यांवर चैत्य म्हणजे स्तूप असे. कठडा, त्याच्या आड वृक्ष किंवा वर सोंड केलेला हत्ती असे. नाण्यावरील भाषा प्राकृत असून राज्ञाऐवजीं रन्नो, श्रीच्या ऐवजीं शिरी, यज्ञ याच्या ऐवजीं यन्न अशीं रूपें असत. कार्षापण, प्रतीक व सुवर्ण हीं सोन्याचीं नाणींहि त्या काळीं शातवाहनांच्या राज्यांत चालू होतीं.

व्यापाराच्या बाबतींतहि शातवाहनाच्या कारकीर्दींत महाराष्ट्र मागें नव्हता. महाराष्ट्रांत व्यापार फार मोठया प्रमाणांत चालत होता. पैठण, सोपारा, कल्याण, चौल, जुन्नर हीं ठिकाणें तर व्यापाराच्या मोठया पेठाच. व्यापाराच्या फार मोठया उलाढालींचीं हीं ठिकाणें, पैठण आणि भडोच या दोन पेठांचा व्यापाराच्या निमित्तानें फारच संबंध होता.

व्यापाराच्या बाबतींत महाराष्ट्र शालिवाहन काळीं जसा प्रगतीच्या पथा-वर होता, तसाच तो उद्योगधंद्यांच्या बाबतींतहि प्रगतीच्या पथावर होता,

व्यापार आणि उद्योगधंदे ह्या दोन बाबी एकमेकींवर अवलंबून असतात आणि राज्याची भरभराट या दोन बाबींवरच मुख्यतः अवलंबून असते; त्यावरून महाराष्ट्र त्या काळीं बराच भरभराटींत होता.

शालिवाहन काळीं वैयक्तिक धंदे आणि व्यापार बहुधा नसतच. तर सामुदायिकरीत्याच ते चालत. एकजुटीनें मालाची ने-आण करणें आणि त्यांतून मिळणारा पैसा हिस्सेरशीनें वांटून घेणें या सहकारी पद्धतीचाच अवलंब केला जात असे. मालाची ने-आण करतांना वाटेंत येणाऱ्या अडचणी, दूरदूरच्या भागांत व्यापारानिमित्त जाणें आणि तेथें रहाणें, उद्योगधंद्यांना भांडवल पुरविणाऱ्या स्वतंत्र पेढया आणि हुंडयांची पद्धत, यामुळेंच सहकारी व्यापाराच्या पद्धतीचा जन्म झाला असावा असें वाटतें.

थोडक्यांत आपणाला असें म्हणतां येईल कीं, त्या काळीं सहकार पद्धति बरीच प्रचारांत होती. सहकार पद्धतीनें व्यापार करणाऱ्यांचा समूह–एकच धंदा–व्यापार करणाऱ्यांचा समूह असे निरनिराळे समूह असत आणि अशा समूहांना त्या काळीं 'श्रेणी' असें म्हटलें जात असे.

जसें 'श्रेणी' तसें 'गण'हि असत. एकच काम करणारे अनेक जातींचे लोक – सोनार, तांबट, बुरूड, कोष्टी यांच्या श्रेणी होत्या. आजहि आपण एखाद्या मोठ्या शहरीं गेलों असतां तेथें बुरूड आळी, कोष्टी आळी, तांबट आळी.... असे त्या त्या लोकांचे व्यवसाय आणि राहणें यांवरून नांवें पडलेले भाग पाहावयास मिळतात.

शातवाहनांच्या कारकीर्दीत म्हणजे इ. सनापूर्वी ३४६ च्या सुमारास व्यापारासाठीं आणि प्रवासासाठीं कोणतीं वाहनें होतीं हें आपणाला जरी निश्चितपणें कळत नसलें तरी बैलांच्या पाठीवरून आणि स्वतः वाहून मालाची ने-आण होत असावी. कदाचित घोडे आणि गाढवें यांचाहि उपयोग होत असेल. इतकेंच नव्हे तर बैलगाडी हें वाहनहि त्या काळीं उपयोगांत आणलें जात असावें. महाराष्ट्र व्यापाराच्या बाबतींत किती तरी पुढें गेला होता. मसाल्याचे पदार्थ, मोर, माकडें इत्यादि बरेच पदार्थ भारतांतील इतर भागांतून जसे जात तसेंच महाराष्ट्रांतूनहि जात. व्यापार आणि शेती

हीं दोनच व्यवसायाचीं प्रमुख अंगें त्या काळीं होतीं. तसें पाहिलें तर शेती हाच प्रमुख धंदा बहुतेक लोकांचा होता.

महाराष्ट्राचा पहिला शेतकरी अगस्ति ! धान्याची पहिली मूठ त्यानेंच जमिनीवर टाकली आणि जमिनींतून मोत्यासारखें पीक काढायला शिकविलें. त्यापूर्वीं रानटी अवस्थेंत असणारे महाराष्ट्रांतील–दंडकारण्यांतील–लोक कंदमुळें, फळें, प्राण्यांचें मांस यावर आपली रोजची गुजराण करीत होते. पण आतां त्यांचेच वंशज सोन्या-मोत्याच्या किमतीचेंच नव्हे तर त्याहिपेक्षां जास्त किमतीचें पीक काढून त्यावर आपली उपजीविका वरूं लागले. धान्याची सांठवण करून ठेवून गरजेच्या वेळीं त्याचा उपयोग करूं लागले. मातीचा तुकडा सोन्याच्या मोलाचा आहे असें त्यांना वाटूं लागलें. आज विसाव्या शतकांत आपणाला जमिनीचें किती महत्त्व वाटतें–शेतीचें किती महत्त्व वाटतें. शेतकरी किती श्रेष्ठ वाटतो. 'शेतकरी सुखी तर जग सुखी, शेतकरी हा जगाचा पोशिंदा' असें आपण म्हणतों.. त्याचें कौतुक करतों.

दीड–दोन हजार वर्षांपूर्वीं जमिनीला आणि शेतकऱ्याला असेंच महत्त्व होतें. त्या वेळींहि तो जगाचा पोशिंदाच होता. आज जशी जमिनीची व्यवस्था आहे तशीच व्यवस्था त्या काळींहि होती. आज आपण गुंठा, एकर, किलोमीटर या मापानें जमीन मोजतों, तर त्या काळीं महाराष्ट्रांत निवर्तन या मापानें जमीन मोजीत. शेतकरीच जमिनीचे मालक होते तसे कुठें कुठें जमिनीचे मालक वेगळे आणि ती जमीन कसणारे वेगळे–कुणी आपल्या मालकाला धान्याच्या रूपानें खंड देत तर कुणी नाण्यांच्या रूपानें खंड देत. शेतकऱ्यांना 'हली' म्हणत. हल म्हणजे नांगर–हल हाकणारे ते हली. हली म्हणजे कुळें–खंडानें जमिनी कसण्यासाठीं घेणारे. पण कांहीं स्वतःच्या जमिनी स्वतःच कसणारे होते. त्यांना 'कुटुंबी' म्हणत. कुटुंबी याचेंच पुढें कालांतरानें कुणबी असें रूप झालें असावें. 'कुणगा' म्हणजे जमिनीचा तुकडा. कुणगा हाहि शब्द कुटुंबी शब्दाचेंच रूप असण्याचा संभव आहे, असें वाटतें.

शालिवाहन राजाच्या काळांत म्हणजे सुमारें इ. स. ७८ च्या सुमारास या काळांत महाराष्ट्राची भरभराट होत होती. घडण घडत होती. समाज-

रचना, समाजजीवन यांची चांगली घडी बसली होती. महाराष्ट्र सर्व बाजूंनीं आकारांत येत होता. शालिवाहन राजांनीं प्रजेच्या धार्मिक, सामाजिक बाबतींत विशेषतः हात घातला नाहीं. आपल्या आवडीनिवडी, आपलीं मतें प्रजेवर लादलीं नाहींत. उलट जेणेंकरून प्रजेचें हित होईल, अशा बऱ्याच गोष्टी त्यांनीं केल्या, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्या काळचे राजे उदार होते आणि त्या काळचे लोकहि उदार होते. विद्वान् होते. धार्मिक होते. सावकार, व्यापारी, श्रेणी, समूह, शेतमालक यांचा धर्म करण्याकडे ओढा होता. रस्ते, धर्मशाळा, आश्रयस्थानें, अन्नछत्रें, उदपान म्हणजे विहिरी खोदणें, नद्यांवर धर्मार्थ नावा ठेवणें, नद्यांवर घाट बांधणें इत्यादि सार्वजनिक हिताचीं आणि धार्मिक कामें करण्याकडे राजांचा आणि धनवान लोकांचा ओढा होता. महाराष्ट्राच्या समृद्धीसाठीं अशीं किती तरी कामें त्या काळीं केलीं जात होतीं. ब्राह्मणांना जमीन, गाई, नारळीचीं झाडें, सोन्याचीं नाणीं वगैरे राजा दान देत असे. धार्मिक प्रवृत्तीचे लोकहि दान देत असत. वैजयन्तीचा (उत्तर कानडा जिल्हा) व्यापारी भूतपाल यानें कार्ल्याचें लेणें उभारलें असा उल्लेख सांपडतो.

शातवाहनांच्या कारकीर्दींत सनातन धर्माला विशेष स्थान होतें. बौद्ध धर्महि त्या काळीं महाराष्ट्रांत होता. जैन धर्महि होता. या धर्मांचे साधु, भिक्षु, भिक्षुणी लेण्यांतून रहात. विशेषतः पावसाळ्याच्या दिवसांत लेण्यांत राहून धार्मिक चर्चा वगैरे चाले.

महाराष्ट्रांत लेणीं, शिलामंदिरें त्या काळीं किती तरी खोदलीं गेलीं. या लेण्यांतसुद्धां प्रकार आहेत. कांहीं ब्राह्मणी लेणीं, कांहीं बौध्द लेणीं, कांहीं जैन लेणीं आहेत. त्या लेण्यांचे प्रकार पडले ते ज्या धर्माच्या पुरस्कर्त्यानें तीं लेणीं खोदविलीं त्यावरून, हें खरें असलें तरी या लेण्यांच्या आकारांतील आणि तीं खोदण्याच्या प्रकारांतील फरकावरूनहि लेण्यांचे प्रकार पडले आहेत.

आपणांस हे लेण्यांचे प्रकार सहज समजण्यासारखे आहेत. ज्या लेण्यांवर पुराणांत वर्णिलेल्या देवदेवतांच्या प्रतिमा कोरलेल्या असतात आणि गाभाऱ्यानजीक सभामंडप असतो ( घारापुरी येथील लेणीं ब्राह्मणी आहेत ) त्यास ब्राह्मणी लेणें म्हणावयास हरकत नाहीं. बाकी बौद्ध लेणीं हीं बरींच मोठीं होतीं, आणि जैन लेणीं हीं बौद्ध लेण्यांसारखींच पण कांहींशीं आकारानें

सो....३

लहान व साधीं होतीं, महाराष्ट्रांत हीं तीनहि प्रकारचीं लेणीं आहेत आणि त्यांतल्या त्यांत पुणें, अहमदनगर, नाशिक, ठाणें, कुलाबा जिल्ह्यांत व विदर्भांत अधिक आहेत. व्यापारी किंवा बंदरी गांवाजवळ आणि त्या काळच्या जाण्या-येण्याच्या मार्गावरच अशीं लेणीं खोदलेलीं आहेत. ठाणें जिल्ह्यांतून पुणें जिल्ह्यांत प्रवेश करण्यास त्या काळीं मुख्यतः दोनच मार्ग होते. त्या मार्गा-वरच बरीचशीं लेणीं खोदलेलीं आहेत. अजिंठा आणि वेरूळ येथील लेणीं तर महाराष्ट्राचें फार मोठें भूषण आहे.

महाराष्ट्रांतील लेण्यांविषयीं आपण जो एवढा विस्तृत विचार केला त्याचें कारण हें कीं, महाराष्ट्राच्या जडण-घडणींत या लेण्यांमुळें फार मोठी भर पडली. वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला, धर्माची आवड, दानधर्म कर-ण्याची प्रवृत्ति आणि कोणत्याहि धर्माशीं सलोख्यानें वागण्याची प्रवृत्ति महा-राष्ट्रांत किती शिगेला पोंचली होती आणि दिवसेंदिवस ती कशी सुधारत होती हें स्पष्ट दिसून येतें.

शातवाहन राजे हे महाराष्ट्रांतील पहिले सम्राट्! यांचें आणि आंध्र राजांचें वितुष्ट होतें. वारंवार त्यांच्यांत लहान मोठीं युद्धेंहि होत होतीं. पण या सम्राटांनीं बऱ्याच चांगल्या गोष्टी केल्या. यांच्या आश्रयामुळेंच देवळें काय, लेणीं काय किंवा दुसऱ्या वास्तु काय, संख्येनें वाढतच होत्या. आणि त्याचबरोबर त्यांची नीट व्यवस्थाहि होत होती. आपणाला अगदीं थोडक्यांत म्हणावयाचेंच झालें तर असें म्हणतां येईल कीं, शातवाहन राजाच्या कार-कीर्दींत महाराष्ट्राची उभारणी बरी झाली. आणखीहि उभारणी झाली असती, पण काळाच्या ओघांत शातवाहनांची सत्ता संपुष्टांत आली! एका घराण्याची सत्ता जाऊन त्या ठिकाणीं दुसऱ्या घराण्याची सत्ता येणें हें कधीं ना कधीं होतेंच. शातवाहनांचेंहि तसेंच झालें.

महाराष्ट्रांवरील शातवाहनांची सत्ता जाऊन त्या ठिकाणीं चालुक्यांची सत्ता आली.

आतां चालुक्य राजांनीं महाराष्ट्राच्या वैभवांत कोणती भर घातली आहे हें आपण पाहूं.

# म्‍हाठिचिये नगरी

# ४

महाराष्ट्राच्या उभारणीची माहिती आपण जी पाहिली त्यावरून आपणाला सर्वसाधारणतः असें म्हणतां येईल कीं, महाराष्ट्राच्या सीमा निश्चित नव्हत्या. आतांपर्यंतच्या कोणत्याहि एका शतकांत महाराष्ट्र म्हणजे एवढा प्रदेश असें निश्चित म्हणतां येणार नाहीं. याचें कारण असें कीं, आपणांजवळ तसा निश्चित पुरावा नाहीं हें एक, आणि जीं जीं त्या काळीं महाराष्ट्रांत राजघराणीं झालीं, त्या त्या घराण्यांनीं कमीअधिक केलेल्या पराक्रमामुळें महाराष्ट्राच्या सीमांत पडलेला फरक ! कित्येक वेळां महाराष्ट्रांत दुसरा मुलूख जोडला जाई, तर कित्येक वेळां महाराष्ट्राचा मुलूख तोडला जाई. पण एवढें मात्र निश्चित कीं, महाराष्ट्रांतील माणसांचें जीवनमान उंचावत होतें. त्याला एक प्रकारें छानदार आकार येत होता. त्यांच्या जीवनांतील ओबडधोबडपणा जाऊन त्याला निश्चित, सरळ रूप प्राप्त झालें होतें. रोजचा दिनक्रम निश्चित झाला होता. सामान्य माणसांचेंच काय पण राजाचेंहि रोजचें जीवन ठरून गेलें होतें. याज्ञवल्क्यस्मृतींत तर राजाचा दिनक्रम पुढीलप्रमाणें दिलेला आहे :

" राजानें प्रतिदिनीं प्रातःकाळीं उठल्यावर स्वतः जमाखर्च पाहावा. नंतर न्यायाचीं कामें पाहून मध्यान्हसमयीं स्नान करावें व स्वेच्छेनें योग्य समयीं जेवावें. नंतर त्यानें नवीन संपादिलेलें धन भांडारांत ठेवावें. हेरांची भेट घ्यावी.

अपराण्हकाळीं विश्रांति घ्यावी. नंतर उत्तम वस्त्रें व अलंकार घालून चतुरंग सेनेची पहाणी करावी व सेनापतीबरोबर राज्यरक्षणाचा विचार करावा. संध्यासमयीं संध्योपासना उरकून हेरांशीं गुप्त भाषण करावें. त्यामागून नृत्यगायनादिकांनीं कांहीं काळ मन रमवून भोजन करावें. भोजनोत्तर विस्मरण होऊं नये, यासाठीं यथाशक्ति स्वाध्यायाचा पाठ करावा. नंतर मंगल वाद्यें व शंख यांचा घोष होत असतां रात्रौ झोपीं जावें, व प्रातःकाळीं त्या वाद्यांचा गजर ऐकतांच उठावें. येणेंप्रमाणें ब्राह्ममुहूर्तावर जागें झाल्यानंतर ज्योतिष्याचें दर्शन घेऊन त्याजकडून ग्रहादिकांची स्थिति जाणावी. वैद्यास आपली प्रकृति दाखवावी."

आतांपर्यंत महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या राजांविषयीं आपणांला एक विशेष गोष्ट कळते ती ही की, महाराष्ट्रांतील कोणत्याहि राजानें दूरच्या दुसऱ्या राज्यावर राज्यविस्ताराच्या दृष्टीनें स्वारी केल्याचा दाखला सांपडत नाहीं. शातवाहनानंतर जेव्हां महाराष्ट्रावर चालुक्यांची सत्ता आली तेव्हां मात्र दुसऱ्या पुलकेशी चालुक्यानें नर्मदा नदीच्या उत्तरेकडील कनोजच्या राज्यावर स्वारी केली. चालुक्य राजांपैकीं कांहीं चालुक्य राजे पराक्रमी होते. पहिला पुलकेशी तर बराच पराक्रमी होता. पण त्याहिपेक्षां दुसऱ्या पुलकेशीचा पराक्रम डोळयांत अधिक भरण्यासारखा होता. दुसरा पुलकेशी शूर होता आणि त्याची राज्यतृष्णाहि फार होती. शेकडों मैल दूर जाऊन कनोजच्या हर्षाचा पराभव करावा, असें त्यास नेहमीं वाटे. आणि त्यानें तो बेत नक्कीहि केला.

एक दिवस तो आपल्या सेनापतीस म्हणाला, "अप्पायीक, आमच्या इच्छेला कनोजवर स्वारी करावी आणि सुवर्णादि संपत्ति मिळवावी, असें आलें आहे. तर आपला मनोदय काय असावा?"

"आपली आज्ञा हाच आमचा मनोदय. अन्य मनोदय आमच्या चित्तांत नलगे."

"ठीक आहे. तर मग आपणाला द्वितीय पक्षे, पंचम दिवशे गमन करावयाचें."

"आपली आज्ञा."

आणि मग ठरल्या दिवशीं राजा दुसरा पुलकेशी आपल्या चतुरंग सेनेसह उत्तरेस निघाला.

आणि तो लवकरच हर्षाच्या मुलुखांत शिरला. पुढें भारताच्या उत्तर भागांतील आणि दक्षिण भागांतील या दोन बलाढ्य राजांचें तुंबळ युद्ध झालें. फार मोठी लढाई झाली.

या लढाईंत हर्षाचें किती तरी सैन्य मृत्युमुखीं पडलें. त्याचे बरेच हत्ती मारले गेले. रथांचा चक्काचूर झाला.

पुलकेशीचें कांहीं थोडेंथोडकें नुकसान झालें नाहीं. त्याचेंहि बरेंच नुकसान झालें. पण या लढाईंत पुलकेशीचा जय झाला. त्यानें हर्षाकडून बरीच खंडणी वसूल केली आणि तो महाराष्ट्रांत परत आला.

पुलकेशीनें हर्षावर जय मिळविला खरा, पण त्यानें या प्रसंगीं पक्की खूणगांठ बांधली कीं, हर्ष हा आपल्यापेक्षां कांहीं कमी पराक्रमी आहे असें नाहीं. तोहि पराक्रमी दिसतो. आज ना उद्यां तोहि माझ्यावर स्वारी करील.

आणि या कारणामुळेंच पुलकेशीनें आपल्या राज्याची हद्द नर्मदा नदी ठरवून तेथें त्यानें आपलें सैन्य कायमचेंच ठेवून दिलें.

आतां दुसऱ्या पुलकेशीची कीर्ति भारतांतच दुमदुमली असें नाहीं, तर ती भारताबाहेरील देशांतहि पसरली. पुलकेशीशीं आपले राजकीय संबंध असावेत असें भारताबाहेरील अनेक राजांसहि वाटूं लागलें. इराणचा त्या वेळचा राजा दुसरा खुशरू याच्या दरबारांत पुलकेशीचा वकील गेला होता. बऱ्याच देशांच्या राजांनींहि आपले वकील व्यापाराच्या सवलती मिळविण्यासाठीं पुलकेशीच्या दरबारीं पाठविले होते. परदेशांशीं सन्मानानें संबंध येणें हें महाराष्ट्राच्या मोठेंपणाचेंच एक अंग होतें. इ. स. सहाशें आठच्या सुमारास व्यापाराच्या बाबतींत महाराष्ट्र पूर्वींपेक्षां दोन पावलें पुढेंच होता. अरबस्तान, इराण इत्यादि देशांतील व्यापाऱ्यांचीं जहाजें पश्चिम किनाऱ्याला लागत होतीं. ते व्यापार करीत होते.

अशा प्रकारें त्या काळीं महाराष्ट्रांत व्यापार वाढत होता आणि जसजसा व्यापार वाढत होता तसतशी शहरांचीहि वाढ होत होती. रस्ते होत होते.

दळणवळण वाढत होतें. चालुक्यांच्या राजधानीचें शहर बदामी. हें तर फारच भरभराटीस आलें होतें. बदामी पवित्र क्षेत्र तर होतेंच, पण त्याबरोबरच तें विद्येचें माहेरघरहि होतें. चौदा विद्यांत निष्णात असे हजारों ब्राह्मण तिथें रहात होते.

त्या काळीं महाराष्ट्रांत जशी शहरांची वाढ झाली तशीच देवळांचीहि वाढ झाली. ठिकठिकाणीं देवळें बांधलीं गेलीं. चालुक्य राजे सनातनी धर्माचे होते. पण त्यांनीं जैन किंवा बौद्ध धर्मावर जुलूम केला नाहीं. राजासारखे ते वागले. राजाचीं कर्तव्यें त्यांनीं बऱ्याच अंशीं पार पाडलीं. त्यांच्या कर्तव्यापैकीं जुन्या सडका दुरुस्त करून त्यांना महत्त्व आणणें आणि नव्या सडका तयार करणें हें एक महत्त्वाचें कर्तव्य त्यांनीं चांगल्याच प्रकारें पार पाडलें.

चालुक्य राजांनीं महाराष्ट्राला वैभव मिळवून दिलें तसें राष्ट्रकूट घराण्यांतील राजांनीहि वैभव मिळवून दिलें. राष्ट्रकूट हे चालुक्यांच्या राज्याच्या एका भागावरचे अधिकारी होते. हल्लींचा तापी आणि मही या नद्यांमधला जो प्रदेश आहे त्यालाच पूर्वीं 'लाट देश' म्हणत. राष्ट्रकूट हे या लाट देशाचे पहिले अधिकारी. राष्ट्रकूट घराण्याचा मुख्य संस्थापक दन्तिदुर्ग ! हा मोठा पराक्रमी होता. बदामीच्या चालुक्यांची सत्ता जेव्हां खिळखिळी झाली तेव्हां दन्तिदुर्ग याचें फावलें. त्यानें त्या वेळचा चालुक्य राजा कीर्तिवर्मा याशीं युद्ध केलें आणि त्यांत जय मिळवून महाराष्ट्राचें आधिपत्य मिळविलें.

राजा दन्तिदुर्ग शूर होता, पराक्रमी होता आणि मुत्सद्दीहि होता. धाडसीहि होता. सनातनी हिंदु धर्माचा कट्टा अभिमानी होता. त्यानें इ. स. ७५४ सालीं रथसप्तमीच्या दिवशीं हिरण्यगर्भ महादानहि केलें. हिरण्यगर्भदान हें फार मोठें दान समजलें जातें. दात्यानें उत्तरेस तोंड करून सुवर्णपात्रांत बसावयाचें. हातांत ब्रह्मा व धर्मराज यांच्या सुवर्णमूर्ति घ्यावयाच्या आणि हें सुवर्णपात्र गुरु आणि इतर पुरोहित यांना द्यावयाचें.

हें दान केलें असतां दात्याला हिरण्यगर्भाचा म्हणजे दैवी देह प्राप्त होतो अशी त्या काळीं समजूत होती.

दन्तिदुर्ग राजाच ! त्याला सुवर्णाचा काय तोटा !! त्यानें हें हिरण्यगर्भ दान केलें होतें ! दानधर्महि त्यानें बराच केला होता. त्यानें महाराष्ट्राच्या जडण-घडणीतील आपला वांटा उचललाहि असता पण तो अल्पवयी ठरला, आणि वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी तो मरण पावला.

दन्तिदुर्गाला मूलबाळ कांहीं नसल्यामुळें त्याचा चुलता पहिला कृष्ण महाराष्ट्राचा राजा झाला. त्यानें आपल्या अठरा वर्षांच्या कारकीर्दीत महाराष्ट्राच्या वैभवांत बरीच भर घातली. सुंदर सुंदर वास्तु बांधविल्या. अनेक शिवालयें बांधलीं. जगविख्यात वेरूळचें लेणें त्यानेंच खोदविलें. वेरूळचें लेणें हें महाराष्ट्राचें एक भूषण आहे. वेरुळच्या कैलास लेण्याच्या बाबतींत त्या काळीं एका ताम्रपटांत असें लिहून ठेविलेलें आहे कीं—

"एलाचपूर येथील पर्वतांत कृष्णराजानें एक विलक्षण आकाराचें देऊळ रचिलें. देव विमानांत बसून जात असतां त्या देवळाकडे आश्चर्यानें पाहात व म्हणत, 'हें शिवालय स्वयंभू आहे. कारण मानवी कलाकृति इतकी सुंदर असणार नाहीं."

देवांनाच असें वाटत होतें असें नाहीं, तर ज्या कारागिरानें तें रचिलें त्यालाहि त्याकडे पाहून मागाहून नवल वाटे. आपणास पुन्हा असली कृति कधीं साधेल कीं नाहीं याविषयीं त्याला शंका येऊन तो म्हणे, "काय आश्चर्य ! मला पुन्हा ही कृति येईल कीं नाहीं कोण जाणे !"

अशा प्रकारें राष्ट्रकूट घराण्याच्या चौदा राजांनीं आपल्या अडीचशें वर्षांच्या कारकीर्दीत किती तरी सुंदर सुंदर कलाकृति करवून घेतल्या. याचें कारण त्यांना कदाचित् स्वास्थ्य मिळालें असावें. आणि त्यांची म्हणजे त्या काळाच्या महाराष्ट्रांतील जनतेची सौंदर्याची आवड वाढली असावी. मात्र आपणांला एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, या राजांच्या कारकीर्दींत सामाजिक, धार्मिक, राजकीय बाबतींत फारसा फरक पडला नाहीं. व्यापार, दळणवळणाचीं साधनें आणि शेती या बाबतींत मात्र बरीच प्रगति झाली. शेती ही महाराष्ट्राची नाडी–प्राण. ही गोष्ट राष्ट्रकूट राजांनींहि जाणली होती. म्हणून त्यांनीं कालवे खोदण्यास उत्तेजन दिलें. या काळांत

इमारती अधिक मजबूत, अधिक सोयीस्कर आणि अधिक सौंदर्यदृष्टि ठेवून बांधल्या जाऊं लागल्या. महाराष्ट्रांत सहाव्या शतकांत पल्लव राजांनीं लाकडी इमारतींऐवजीं दगडी इमारती बांधण्यास सुरुवात केली. खडकांत देवळें खोदण्याची कला पल्लव राजांच्याच वेळची. राष्ट्रकूटांनीं त्यांत सुधारणा केल्या.

महाराष्ट्रांतील सर्वच भागांत ग्रामपंचायतीची पद्धत होती. गांवची व्यवस्था पंचायतीच्याच मार्फत चाले. न्यायनिवाडेसुद्धां !

पंचांनीं दिलेला निकाल राजासुद्धां बदलीत नसे. तसें पाहिलें तर राजा आणि प्रजा यांचा संबंध फारसा येतच नसे. राजेलोकांत लढाया होत, पण त्यांचा परिणाम प्रजेवर होत नसे. कारण या लढाईंत जय झालेला राजा पराभूत झालेल्या राजाकडून खंडणी घेई. आपलें मांडलिकत्व मान्य करावयास लावी. मिळालेलें राज्य आपल्या ताब्यांत घेऊन तेथील कारभार पाहण्याच्या भानगडींत तो पडत नसे. त्यामुळें त्याच्या विचार-आचारांचा पगडा प्रजेवर बसत नसे. अकराव्या शतकापूर्वींच्या बहुतेक राजांनीं ज्या लढाया केल्या त्या आपलेंं राज्य वाढवियासाठींच केल्या असें नसून, केवळ आपण सम्राट् ही उपाधि लावून घ्यावी, दुसऱ्या राज्यांना आपलें श्रेठत्व मान्य करावयास लावावें, दुसऱ्या राजांना मांडलिक बनवावें आणि खंडणी मिळवावी ह्याच हेतूनें. राजाच्या उत्पन्नावर राजांचा लहानमोठेपणाचा दर्जा ठरत असे. सामंत, मांडलिक, राजा, महाराजा, सम्राट्, विराट्, सार्वभौम असा चढत्या क्रमानें राजांचा दर्जा असे.

ज्याचें उत्पन्न एक लक्ष कार्षाणपर्यंत असे तो सामंत. तीन लक्ष कार्षाण उत्पन्न असलेला मांडलिक. वीस लक्ष कार्षाण तो राजा. वीस ते पन्नास लक्ष कार्षाण उत्पन्न असलेला महाराजा. एक ते दहा कोटी कार्षाण उत्पन्न तो सम्राट्. दहा ते पन्नास कोटी कार्षाण उत्पन्न तो विराट् आणि ज्याचें उत्पन्न पन्नास कोटी कार्षाणांच्यावर असेल तो सार्वभौम असें त्या काळीं समजलें जाई.

इ. स. ९७३ ते ११५० या पावणेदोनशें वर्षांत कल्याणचे चालुक्य राजें महाराष्ट्रांत प्रबळ होते. (इ. स. ५०० ते ७०० या काळांत जे राजे होऊन

गेले ते बदामीचे चालुक्य म्हणून ओळखिले जातात.) विक्रमादित्य तर बराच प्रबळ होता. त्यानें जवळजवळ एकावन्न वर्षे राज्य केलें ! त्याच्या राजधानीचें शहर कल्याण. (कलबुर्ग्याजवळचें) याच्या कारकीर्दींत काश्मीर-हून बिल्हण कवि महाराष्ट्रांत आला होता. त्यानें या कल्याण राजधानीचें वर्णन लिहून ठेविलें आहे तें असें आहे :

" कल्याण येथील हर्म्य इतके उंच आहेत कीं, त्यावरील दीपज्योतींनीं रात्रीं काजळासारखें असणारें काळें आकाशहि प्रकाशतें. कल्याणासभोंवतीं तट आहे व त्या तटाला स्फटिकाची मुढरी आहे. नगरांतील घरांच्या स्फटिकमय भूमीच्या प्रकाशामुळें आकाश काजळासारखें दिसतें. नगरापाशीं राजानें बांधलेल्या तडागाभोंवतीं वृक्षांनीं गर्दी केली आहे. राजानें पांथस्थां-करितां पाणपोई घातली आहे. घरांच्या गच्च्यांवर रेशमाचे ध्वज फडकत आहेत. कल्याण नगराभोंवतालचा तट दुर्जनांनाहि अनुल्लंघनीय आहे. तेथील हौद इतके उंच आहेत कीं, त्यांवर चंद्र टेकल्यासारखा वाटतो."

विज्ञानेश्वर या पंडितानेंहि असें म्हटलें आहे कीं, 'पृथ्वीच्या पाठीवर कल्याणसारखें दुसरें शहर नाहीं.'

बिल्हणानें काय किंवा विज्ञानेश्वरानें काय, कल्याण राजधानीचें हें केलेलें वर्णन थोडेंफार अतिशयोक्तीचेंच असण्याचा जरी संभव असला तरी एवढें खरें कीं, विक्रमादित्याच्या काळीं महाराष्ट्र किती तरी भरभराटींत असला पाहिजे आणि लोकांचा श्रमापेक्षां सुखांतच अधिक काळ जात असावा, असें वाटतें. चोरीमारी फारशी होत नसावी असेंहि वाटतें. कारण त्या काळचा एके ठिकाणीं असा एक उल्लेख आहे कीं, 'प्रजाजन रात्रीं निजतांना आपल्या घरांना कड्या घालीत नसत व त्यांच्या घरांत चोर न शिरतां खिडक्यांतून चंद्रकिरण मात्र शिरत.'

राज्यवैभवाचा कळस झाला म्हणजे साहित्य, संगीत, सौंदर्य इत्यादि कलांना उत्तेजन मिळतें. राजाश्रय मिळतोच मिळतो. पण लोकाश्रयहि मिळतो. सहाव्या विक्रमादित्याच्या काळांत या कलांना उत्तेजन मिळत होतें

आणि म्हणूनच महाराष्ट्राचें वैभव कळसास पोंचलें होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं.

सहाव्या विक्रमादित्यानें आपल्या एकावन्न वर्षांच्या कारकीर्दींत अनेक प्रकारें महाराष्ट्राच्या वैभवांत भर घातली यांत मुळींच शंका नाहीं. त्यानें आपल्या मर्जींतील बरींच राजघराणीं उदयास आणलीं. हळेबीडचें होयसळ घराणें अशापैकींच एक होय. देवालयांना तर त्यानें मुक्त हस्तानें देणग्या दिल्या. कांहीं ठिकाणीं विष्णुमंदिरें बांधलीं. विजापूर जिल्ह्यांतील असिबिडी ऊर्फ विक्रमपूर नगर सुधारलें. तेथें एक सुंदर मंदिर बांधलें व त्यासमोर एक तळें खोदलें.

अशा प्रकारें महाराष्ट्राची प्रगति झपाट्यानें होत होती. महाराष्ट्र वैभवाची एकेक पायरी चढत होता. राजे, महाराजे आणि महाराष्ट्रांतील जनता आपापल्या परीनें झटत होती. कित्येक शतकांपासून झटत आली होती. आतांहि झटत आहे. महाराष्ट्राची जडण घडण करीत आहे. रामाच्या सेतूसाठीं वाळूचा एकेक कण खार आणून टाकीत होती. कणाकणानें सेतु होत होता. महाराष्ट्राचें वैभव क्षणाक्षणाला कणाकणानें वाढत होतें. त्याच्यांत भर पडत होती.

आरंभीं अरण्यमय असलेला महाराष्ट्र कुठें आणि आतां शहरांनीं गजबज-लेला, मंदिरांच्या सोनेरी शिखरांनीं शोभणारा, फळाफुलांनीं भरलेला, नानाविध धान्यांनीं भरलेला महाराष्ट्र कुठें !

आतां महाराष्ट्राचे राजे आहेत यादव घराण्यांतील. आणि हा काळ आहे इ. स. ११७८ च्या सुमाराचा. आपलें यादव घराणें म्हणजे यदुकुल घराणें असें या घराण्यांतील लोक समजतात. त्यांनीं आपणांला 'यादव कुलतिलक यादव कुलांबर द्युमणि' आणि 'द्वारकावतीपूर वराधीश' अशा पदव्या लावून घेतल्या होत्या.

या यादवांचा पहिला राजा सुबाहू. त्यानंतर बरेच राजे झाले. भिल्लम हा यादव राजा इ. स. ११७८ सालीं गादीवर बसला. यानें महाराष्ट्राच्या वैभवांत जी फार मोठी भर घातली ती म्हणजे इ. स. ११८५ च्या सुमारास

१५३९५

वसविलेल्या देवगिरी ह्या शहराची. त्यानें देवगिरी हें शहर वसविलें आणि तेथें त्यानें आपली राजधानी केली. देवगिरीस पूर्वी सुरगिरी म्हणत असत. जुन्या ग्रंथांतून या राजधानीच्या शहराचें वर्णन कुठें कुठें आढळतें. त्याचें सार दोनच वाक्यांत असें सांगतां येईल कीं, 'देवगिरी...हें त्रिभुवन सौंदर्याचें सारसर्वस्व आहे. तेथील घरांचीं शिखरें मेरू पर्वताच्या शिखराशीं स्पर्धा करणारीं आहेत.'

पण खुद्द ज्ञानेश्वरांनीं देवगिरीबद्दल असें सांगितलें आहे कीं, "देवगिरीस मोठमोठे बाजार होते. त्यांना मोतीबाजार, हिरेबाजार अशीं नांवें होतीं. त्यांत सोनार, नक्षीकाम करणारे सराफ, सोनें-चांदी गाळून ती शुद्ध करणारे, मोत्यांना वेजे पाडणारे, त्यांची परीक्षा करणारे, हिऱ्यांस पैलू पाडणारे असे अनेक कारागीर होते. फिरकीचें फूल, मूद, टिका, कांकणें, हातांत मुदीच्या बांगड्या, सोन्याचे मणी, मोत्यांच्या एकावली, कुडू, कुडीं, बुगड्या इत्यादि अलंकार करण्यांत कारागीर तरबेज होते."

जैत्रपाळ यादव राजा हा तर विद्वानांचा भोक्ता होता. त्यानें भास्कराचार्यांचा पुत्र लक्ष्मीधर यास राजसभेंत पंडितांत अग्रभागीं स्थान दिलें होतें. अनेक पंडितांस त्याचा आश्रय होता. ह्या जैत्रपाळाच्याच कारकीर्दीत महाराष्ट्राला भूषणावह अशी आणखी एक विशेष गोष्ट घडली; ती ही कीं, प्रसिद्ध संतकवि मुकुंदराज यानें विवेकसिंधु या ग्रंथाची केलेली 'मराठी' रचना. जैत्रपाळ राजाच्या मनाचा ओढा जैन धर्माकडे अधिक होता. केव्हां केव्हां तो सनातन धर्मांत दोष दाखवी आणि जैन धर्माकडे आपला ओढा आहे असें दाखवी. पण मुकुंदराजानें जैत्रपाळास आंबेजोगाई येथें ब्रह्मोपदेश केला. इतकेंच करून मुकुंदराज थांबला नाहीं, तर त्यानें जैत्रपाळाच्या समाधानासाठीं 'विवेकसिंधु' हा ग्रंथ लिहिला. आजहि जरी आपण आंबेजोगाईस गेलों तरी आपणास मुकुंदराजानें जैत्रपाळास ज्या ठिकाणीं उपदेश केला ती जागा दाखवितात. मुकुंद पर्वत, जैत्रपाळाची गढी इत्यादि स्मृतिविशेष पाहावयास मिळतात.

तेराव्या शतकांत – यादवांच्या काळीं – महाराष्ट्राच्या अंगाखांद्यावर म्हणण्यापेक्षां त्याच्या हृदयदेवतेवर जें एक विशेष लेणें चढलें तें म्हणजे भाषेचें लेणें !



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत

मुकुंदराज हे ज्ञानेश्वरांच्या अगोदरचे कवि म्हणून त्यांना आदिकवि म्हणतात. त्यांनीं 'विवेकसिंधु' आणि 'परमामृत' हे दोनहि ग्रंथ मराठी भाषेंत लिहून एक नवा पायंडा पाडला. त्यांच्या या ग्रंथरचनेपूर्वी कोणींहि मराठी भाषेंत ग्रंथरचना केली नव्हती. सारे ग्रंथ संस्कृत भाषेंतच असत. त्यामुळें सामान्य जनांस ब्रह्मज्ञानाची ओळख होत नसे. म्हणूनच मुकुंदराज विवेक-सिंधूच्या पहिल्याच प्रकरणांत सांगतात :

"वेदशास्त्राचा मथितार्थू । मऱ्हाठिया होय फलितार्थू ।
तरी चतुरीं परमार्थू । कां न घ्यावा ? ॥"

आणि म्हणूनच मीं सामान्य जनांसाठीं ही मराठींत ग्रंथरचना केली आहे.

मुकुंदराजांनीं मराठी ग्रंथरचनेस आरंभ केला तसाच आरंभ त्या काळीं महाराष्ट्रांत जो महानुभाव पंथ होता, त्या पंथांतील साधुपुरुषांनींहि मराठी भाषेंत ग्रंथरचना करण्यास आरंभ केला. मात्र अशी रचना करण्याचा त्यांचा हेतु हा होता कीं, आपल्या महानुभाव पंथाचीं मतें जर लोकभाषेंत सांगितलीं तर आपल्या पंथाचा प्रसार चांगला होईल.

महानुभाव पंथाचे गोविंद प्रभु, चक्रधर वगैरे मंडळींच्या ग्रंथांची भाषा मराठीच होती. या पंथाच्या केशवराज सूरीनें 'सिद्धान्त सूत्रपाठ' नांवाचा ग्रंथ प्रथम मराठींत तयार केला. आणि मग त्यानें जेव्हां त्याचें संस्कृत भाषांतर करावयास घेतलें तेव्हां नागदेवाचार्य त्यास म्हणाले,

"नको गा केशवदेवा ! येणें माझीये स्वामीचा (चक्रधराचा) सामान्य परिवार नागवैल कीं:"

नागदेवाचार्यांचें म्हणणें असें कीं, आपले गुरु चक्रधरस्वामी मराठींत निरूपण करीत असत. सबब आपणहि मराठींत ग्रंथरचना केली पाहिजे. महानुभावांच्या काळीं म्हणजे इ. स. १८७८ च्या सुमारास मराठी भाषेचें स्वरूप आजच्या मराठी भाषेइतपत नव्हतें. त्या काळीं मराठी भाषेचें सर्व-साधारण स्वरूप कसें होतें याची कल्पना चक्रधरांनीं धानाई नांवाच्या एका लहान मुलीला काऊचिऊची जी एक कहाणी सांगितली आहे तीवरून येईल. कहाणीचा आरंभ असा :

" साळैचें घर मेणाचें : काउळे याचें घर सेणाचें : पाउसाळां काउळेयाचें घर पुरें जाए : साळैचें वांचे : "

मुकुंदराजानें विवेकसिंधूची रचना करून यादव राजांच्या कारकीर्दीला शोभा आणली. महाराष्ट्राच्या अंगाखांद्यावर लेणें चढविलें हें जरी खरें, तरी पण ज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरीची रचना करून जें कांहीं महाराष्ट्राला सौंदर्य आणलें, जी कांहीं शोभा आणली, तिचें वर्णन कोण करूं शकेल !

आजपर्यंत सारे ग्रंथ संस्कृत भाषेंत रचले जात होते. कारण सुशिक्षित लोक सदाच संस्कृत भाषेचा वापर करीत. विद्वानांची तर रोजच्या व्यवहारांतील भाषा संस्कृत होती. त्यामुळें या ग्रंथांतील ज्ञानाचा लाभ या लोकांनाच होत असे. सामान्य लोकांना याचा मुळींच फायदा होत नसे. याचें कारण सामान्य लोकांची भाषा प्राकृत होती. मराठी होती. मात्र त्या मराठीचें स्वरूप आजच्यासारखें नव्हतें.

यादवकालीन मराठीचा पुढील नमुना पाहा, म्हणजे आपणांस त्या काळीं मराठी कशी होती हें दिसून येईल. यादवकालीन मराठी (सन १२०६)–

इयां वाटणी जे केणें उघडे तेव्हाचा असि आढू जो राउला होता, ग्राहकापासीं तो मढा दीन्हला। ब्राह्मणा जें विकतेयापासीं ब्रह्मोत्तर तें ब्राह्मणीं दिन्हलें। ग्राहकापासीं दासाचा वीसोवा आसुपाठी मगरें दीन्हला ।। जलादाइयां बैलां सिद्धवे ।। बाहीरिला आसुपाठी विधनें ग्राहकापासी पांच पोफळी ग्राहकापासी ।। पहिले आ घाणे आ दानाचीं लोठी मठा दीन्हली ।। जेती घाणे वांहति तेतींया प्रति पली पली तेला । एथ जें मविजे तें मढीचेन मापें मवापें मापाऊ मढा अर्ध्य अर्ध्य मापहारी । तूपाचें सूंक । तथा भूमिः । चतुरा घाट विशुद्ध ॐ ढुग्रामु पथम बाले आ कामतुमध्यें वडबंधु ।। पंडितांचा कामतु । चीतेग्रामी चाउरा ।। धमी जिची आ सोढिआं ।। "

तेराव्या शतकांतील हें मराठी आपणाला नीट वाचतां येत नाहीं आणि त्याचा नीट अर्थहि कळत नाहीं.

आजच्या मराठींत आपण हेंच असें लिहूं (सन १९६५) —

" येथें जो माल विकावयास येतो त्याच्यावरील असि नांवाचा जो कर राजवाड्यांत अग्रस्थानीं ग्राहक नांवाच्या कामगारापाशीं जमत होता तो मठासाठीं दिला आहे. ब्राह्मणांना माल विकणाऱ्या दुकानदारांकडून जी दक्षिणा मिळेल ती ब्राह्मणांनीं मठास दिली. मगर आडनांवाच्या घोडेस्वाराकडे दामाचा जो विसावा हिस्सा आला होता तो मठासाठीं ग्राहक नामक अधिकाऱ्याकडे दिला. मठाला पाणी पुरविणाऱ्या बैलास ग्राहक नामक अधिकाऱ्यानें तयार ठेवावें. " वगैरे.

अशा प्रकारची मराठी भाषा त्या काळीं बहुजनसमाज जरी बोलत होता तरी धार्मिक ग्रंथ मात्र संस्कृत भाषेंतच रचले जात होते. त्यामुळें बहुजनसमाजास या ग्रंथांचा लाभ घेतां येत नसे आणि धर्म, ईश्वर यांबद्दलचें खरें ज्ञानहि त्यांस होत नसे. सामान्य जनता – बहुजनसमाज – या बावतींत अगदीं अंधःकारांत होता. पण त्या काळीं महाराष्ट्रांत असा एक महापुरुष झाला कीं त्यानें मराठींत प्रथम ग्रंथरचना केली आणि ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. सामान्य जनतेला – बहुजनसमाजाला – धर्म, ईश्वर...वगैरेंच्या ज्ञानाच्या भांडाराचे दरवाजे सताड उघडून दिले.

महाराष्ट्राला भाषेचें मौल्यवान लेणें देणारा हा महापुरुष म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज आणि त्यांनीं अजोड असा जो ग्रंथ रचिला त्याचें नांव ' ज्ञानेश्वरी '.

श्रीज्ञानेश्वरमहाराज मनाचा ठाम निश्चय करून ज्ञानेश्वरीच्या रचनेस बसले. त्यांनीं आपल्या सद्‌गुरूस वंदन केलें. आणि त्यांनीं ब्रह्माला वंदन करण्यासाठीं पहिली ओवी रचली–

ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।
जय जय स्वयंवेद्या । आत्मरूपा ॥

आणि मग ज्ञानेश्वरमहाराजांनीं आत्मविश्वासानें सांगितलें कीं,

म-हाठियेचिया नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी ।
देणें घेणें सुखचिवरी । हों देईं या जगा ॥

आणि ब्रह्मविद्येचा सुकाळ संस्कृतांत न करतां मराठींत करीन. ज्ञानेश्वर-महाराज सांगतात–

माझा मऱ्हाठाचि बोलु कवतिकें । परी अमृतातेंही पैजेसी जिंके ।
ऐसीं अक्षरेंचि रसिकें । मेळवीन ।।

'ज्ञानेश्वर' महाराजांनी बाराशें बारोत्तरीं (शके) म्हणजे इ. स. १२९० सालीं ज्ञानेश्वरी ग्रंथ पूर्ण रचिला !

'ज्ञानेश्वरी' या एका ग्रंथानें महाराष्ट्राचें रूप पालटलें. आत्मोन्नतीचा साधा–सोपा मार्ग दाखविला गेला. वारकरी सांप्रदाय सुरू झाला. महाराष्ट्रांतील निरनिराळे समाज आपला उच्च-नीच भाव विसरून पंढरीला विठोबाच्या दर्शनाला जाऊं लागले. ज्ञानेश्वरांपूर्वी कित्येक शतकें पंढरपूरचा विठोबा तेथें कटीवर हात देऊन भक्तांची वाट पाहात उभा आहे. पण त्याच्या भेटीला हजारोंनीं–लाखोंनीं लोक हातांत दिंडी-पताका घेऊन जाऊं लागले तें ज्ञानेश्वरी ग्रंथामुळेंच ! महाराष्ट्राची कीर्ति जगभर पसरविली ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीमुळेंच. यादवांच्या कारकीर्दींत महाराष्ट्राचा कीर्तिस्तंभ उभारला गेला. अनेक विद्वान्, अनेक संत, अनेक धार्मिक ग्रंथ यांच्याच कारकीर्दींत निर्माण झाले.

भारतीय युद्धानंतर श्रीकृष्ण पंढरीस आले आणि ते महाराष्ट्राला साजेल, शोभेल असे पांडुरंगाच्या रूपानें पंढरीस राहिले. त्यांनीं पंढरपूर पावन केलें. तें भू-वैकुंठ बनविलें. आणि म्हणूनच एकनाथांनीं म्हटलें आहे :

" उदंड क्षेत्राची पाहिली रचना
पंढरीं ते जाणा भूवैकुंठ
तीर्थ आणि देव संतसमागम
ऐसें सर्वोत्तम कोठें नाहीं ।। "

देवगिरीच्या गादीवर जेंव्हां रामचंद्रदेव आला तेंव्हां तर महाराष्ट्र विशेष भरभराटींत होता. सोनें आजच्या नाण्यांत पंधरा रुपये तोळा होतें.

चामड्यावर सनदा लिहिल्या जात होत्या. अन्न, वस्त्र आणि आसरा याला मुळींच ददाद नव्हती.

सकलांचें दुरित जावो । विश्व स्वधर्मसूर्य लाहो ।
जें जें वांच्छील तें तें पावो । प्राणीजात ॥

या ज्ञानेश्वरमहाराजांच्या आशीर्वादाप्रमाणेंच महाराष्ट्रांत घडूं लागलें. तेव्हांपासून आधुनिक महाराष्ट्राच्या स्थापनेस सुरुवात झाली. मराठी भाषा, संस्कृति, परंपरा यांत फरक होऊं लागला. नव्या कला येऊं लागल्या. यादवराजे दानधर्माच्या बाबतींत आणि धार्मिक वागणुकीच्या बाबतींत फार दक्ष असत. त्यांनीं अनेक वेळां मोठमोठीं दानें केलीं. ब्राह्मणांनीं आपल्या श्रेष्ठ धर्माप्रमाणें वागावें यावर यादव राजांचा विशेष कटाक्ष होता. रामदेवरावानें आपल्या राज्याभिषेकाच्या निमित्तानें कांहीं ब्राह्मणांस पैठणनजीक तीन गांवें ज्या वेळीं दान दिलीं, त्या वेळींच त्यानें ज्या अटी घातल्या होत्या त्या अशा होत्या : ' ब्राह्मणांनीं वंशपरंपरेनें त्या गांवीं राहावें. आपल्या जमिनी गहाण टाकूं नयेत. आपल्या गांवीं वेश्यांची वस्ती होऊं देऊं नये. जुगारीस प्रतिबंध असावा. ब्राह्मणांनीं शस्त्रें वापरूं नयेत व त्यांनीं आपला काळ सत्कार्यांत घालवावा. '

कोणत्याहि राज्याची भरभराट होण्यास त्या राज्याचे राजे प्रबळ, सुवर्तनी, दिलदार, सौंदर्याचे भोक्ते, विद्वत्तेचे जाणते आणि विद्वानांचे चहाते असावे लागतात. तसेंच त्या राज्यांत राजकारणी, कल्पक, विद्वान्, सद्गुणी माणसेंहि असावीं लागतात.

यादवांच्या काळांत राजकारणांत बरींच माणसें प्रसिद्धीस आलीं. भारद्वाज गोत्री कृष्ण, खोलेश्वर, हेमाद्रि हे तर विशेषच प्रसिद्धीस आले. हेमाद्रि हा तर यादवांचा कर्णाधिपच होता. तो विद्वान् होता तसा दाताहि होता. रसिकहि होता. ' चतुवर्ण चिंतामणि ' हा त्याचा ग्रंथ अतिशय मोलाचा आहे. हेमाद्रीनें महाराष्ट्राच्या उभारणींत अनेक प्रकारची जी भर घातली आहे त्यांपैकीं त्यानें नवीन रीतीनें बांधलेल्या देवळांची भर ही विशेष आहे.

दगडावर दगड नीट रचून बिनचुन्याचीं विशिष्ट आकाराचीं देवळें हीं हेमाडपंताच्या कल्पकतेची साक्ष आहे.

पण त्याहिपेक्षां त्यानें महाराष्ट्राला दिलेली मोठी देणगी मोडी लिपीची. असें सांगतात कीं—

" पूर्वीं तया देवगिरीसी। रामचंद्रराव रायापाशीं
असतां हेमाडपंतासीं । युक्ति असे आठवली ।।
मोडी लिपी लंकेहुनि आणिली ।
त्यावरी स्वमति युक्त रचिली ।
आणि कामराजाशी आज्ञा दिधली ।
शेणवाई पद्धत रचावया "

( काळे पेस्तक )

हेमाडपंतानें लंकेहून मोडी लिपि आणली आणि जमाखर्च लिहिण्याची नवी पद्धत सुरू केली असें म्हणतात.

यादव राजांच्या कारकीर्दीत म्हणजे ११८७ ते १३१८ या शें-सव्वाशें वर्षांत महाराष्ट्रांत आणखी किती तरी पुरुष प्रसिद्धीस आले. थोर गणिती भास्कराचार्य हा महाराष्ट्रांतला. विज्जलपट्टण येथें राहणारा. त्यानें 'लीलावती' नामक मुलीसाठीं म्हणून गणितशास्त्रावर उत्तम ग्रंथ लिहिला. याच भास्कराचार्याचा पुत्र लक्ष्मीधर यादवांच्या दरबारीं 'पंडित' होता. आणि आचार्याचा नातू चांगदेव यानें तर ज्योतिष, गणित या शास्त्रांच्या अध्यापनासाठीं सिंघण यादवाच्या कारकीर्दीत खानदेशांत पाठशाळा चालविली होती.

अशा प्रकारें महाराष्ट्राची जडण-घडण वेगानें, अधिक घाटदार आणि प्रगतीच्या एका विशिष्ट दिशेनें होऊं लागली. सांपत्तिक, सांस्कृतिक, बौद्धिकदृष्टचा बदलूं लागली. महाराष्ट्र बदलूं लागला. पुढें तो आणखीहि बदलेल. आणखीहि बलवान होईल. आणखीहि धनवान होईल, आणखीहि सर्वतोपरी उत्कर्षास चढेल असें वाटूं लागलें.

पण महाराष्ट्राच्या कुंडलींत वेगळेंच कांहीं दर्शविलें होतें. त्याची एकी,

सो ... ४

त्याचा धर्म, त्याचा कणखरपणा, त्याचें धैर्य, त्याचें शौर्य पणाला लागावयाचें होतें. त्याची परीक्षा व्हावयाची होती. त्याचा कायाकल्प व्हावयाचा होता. म्हणूनच महाराष्ट्राला फार मोठा अपघात झाला. महाराष्ट्रावर फार मोठें संकट आलें !

असें हें संकट कोणतें ?

—तर मुसलमानांचा दक्षिणेंत प्रवेश ! महाराष्ट्रावर मुसलमानांच्या स्वाऱ्या !

पण या स्वाऱ्यांनीं महाराष्ट्र दबला का ? वांकला का ? नामशेष झाला का ?

नाहीं—नाहीं—नाहीं !

महाराष्ट्र सतत लढत राहिला. स्वातंत्र्यदेवतेची आराधना करीत राहिला. तलवारीला तलवारीनेंच उत्तर देत राहिला !

पण असें करीत असतां कांहीं काळ महाराष्ट्राच्या जीवनाला थोडेंफार निराळेंच वळण लागलें. आचार, विचार आणि उच्चार यांत बदल होऊं लागला. सौंदर्यदृष्टींतहि फरक पडूं लागला. दौलताबाद, चौल, दाभोळ इत्यादि ठिकाणीं मदरसे स्थापन होऊं लागले. मदरसे म्हणजे शिक्षणाच्या शाळा. मुसलमान संस्कृतीची छाप महाराष्ट्रावर पडते कीं काय असें वाटूं लागलें.

पण महाराष्ट्र लेचापेचा नाहीं. तो आपलें वैशिष्टच चटकन् सोडणार नाहीं आणि दुसऱ्याचें चटकन् घेणार नाहीं. तो आपलें वैशिष्टच टिकविण्याचा प्रयत्न करील.

पण तो असा वागला का ?

तेंच आतां आपणाला पाहावयाचें आहे.

# पोटीचें भय सांडावें

## ५

महाराष्ट्रांत मुसलमानांचा प्रवेश इ. स. १२९४ सालीं झाला हें खरें असलें, तरी त्यापूर्वींच भारतांत मुसलमानांचा प्रवेश झाला होता. उत्तर भारतावर मुसलमान राजे मधूनमधून स्वाऱ्या करीत होते. गिझनीच्या महमुदाचा नातू मसूद पहिला यानें आपला पुत्र महमूद यास इ. स. १०७५ मध्यें भारतांतील जिंकलेल्या मुलुखावर सुभेदार नेमलें होतें. त्यानें माळव्याच्या परमार राजाचा पराभव केला होता. कुतुबुद्दीन ऐबकानें गुजराथचा चालुक्य राजा दुसरा भीम यावर स्वारी केली होती. दिल्लीचा बादशहा अल्तमश यानें इ. स. १२३३ च्या सुमारास माळव्यावर स्वारी केली होती. खुद्द अल्लाउद्दिनानें सुद्धां माळव्याचा परमार राजा महालक याजवर स्वारी केली होती.

असें हें इतकें लांबलचक सांगण्याचा हेतु एवढाच कीं, उत्तर भारतांत मुसलमान राजे फार प्रबळ झाले होते. दिल्लीवर तर त्यांची सत्ता होतीच होती. इ. स. १२९० च्या सुमारास जलालउद्दीन हा दिल्लीचा बादशहा होता. अल्लाउद्दीन हा त्याचा पुतण्या.

अल्लाउद्दिनाला महाराष्ट्राची कीर्ति ऐकून माहीत होती. महाराष्ट्रांत खूप संपत्ति आहे, सोन्याचा धूर वाहतो आहे असें त्याला कळलें होतें आणि

त्याचा धर्म, त्याचा कणखरपणा, त्याचें धैर्य, त्याचें शौर्य पणाला लागावयाचें होतें. त्याची परीक्षा व्हावयाची होती. त्याचा कायाकल्प व्हावयाचा होता. म्हणूनच महाराष्ट्राला फार मोठा अपघात झाला. महाराष्ट्रावर फार मोठें संकट आलें !

असें हें संकट कोणतें ?

—तर मुसलमानांचा दक्षिणेंत प्रवेश ! महाराष्ट्रावर मुसलमानांच्या स्वाऱ्या !

पण या स्वाऱ्यांनीं महाराष्ट्र दबला का ? वांकला का ? नामशेष झाला का ?

नाहीं–नाहीं–नाहीं !

महाराष्ट्र सतत लढत राहिला. स्वातंत्र्यदेवतेची आराधना करीत राहिला. तलवारीला तलवारीनेंच उत्तर देत राहिला !

पण असें करीत असतां कांहीं काळ महाराष्ट्राच्या जीवनाला थोडेंफार निराळेंच वळण लागलें. आचार, विचार आणि उच्चार यांत बदल होऊं लागला. सौंदर्यदृष्टींतहि फरक पडूं लागला. दौलताबाद, चौल, दाभोळ इत्यादि ठिकाणीं मदरसे स्थापन होऊं लागले. मदरसे म्हणजे शिक्षणाच्या शाळा. मुसलमान संस्कृतीची छाप महाराष्ट्रावर पडते कीं काय असें वाटूं लागलें.

पण महाराष्ट्र लेचापेचा नाहीं. तो आपलें वैशिष्टच चटकन् सोडणार नाहीं आणि दुसऱ्याचें चटकन् घेणार नाहीं. तो आपलें वैशिष्टच टिकविण्याचा प्रयत्न करील.

पण तो असा वागला का ?

तेंच आतां आपणाला पाहावयाचें आहे.

# पोटीचें भय सांडावें

## ६

महाराष्ट्रांत मुसलमानांचा प्रवेश इ. स. १२९४ सालीं झाला हें खरें असलें, तरी त्यापूर्वींच भारतांत मुसलमानांचा प्रवेश झाला होता. उत्तर भारतावर मुसलमान राजे मधूनमधून स्वाऱ्या करीत होते. गिझनीच्या महमुदाचा नातू मसूद पहिला यानें आपला पुत्र महमूद यास इ. स. १०७५ मध्यें भारतांतील जिकलेल्या मुलुखावर सुभेदार नेमलें होतें. त्यानें माळव्याच्या परमार राजाचा पराभव केला होता. कुतुबुद्दीन ऐबकानें गुजराथचा चालुक्य राजा दुसरा भीम यावर स्वारी केली होती. दिल्लीचा बादशहा अल्तमश यानें इ. स. १२३३ च्या सुमारास माळव्यावर स्वारी केली होती. खुद्द अल्लाउद्दिनानें सुद्धां माळव्याचा परमार राजा महालक याजवर स्वारी केली होती.

असें हें इतकें लांबलचक सांगण्याचा हेतु एवढाच कीं, उत्तर भारतांत मुसलमान राजे फार प्रबळ झाले होते. दिल्लीवर तर त्यांची सत्ता होतीच होती. इ. स. १२९० च्या सुमारास जलालउद्दीन हा दिल्लीचा बादशहा होता. अल्लाउद्दीन हा त्याचा पुतण्या.

अल्लाउद्दिनाला महाराष्ट्राची कीर्ति ऐकून माहीत होती. महाराष्ट्रांत खूप संपत्ति आहे, सोन्याचा धूर वाहतो आहे असें त्याला कळलें होतें आणि

त्यामुळेंच त्याला फार दिवसांपासून वाटत होतें कीं एकदां तरी महाराष्ट्रा-वर स्वारी करावयाचीच !

आणि सन १२९४ सालीं त्यानें महाराष्ट्रावर स्वारी केलीच ! तो आठ हजार सैन्य घेऊन आला ! !

देवगिरीस रामदेवराय त्या वेळीं ऐषआरामांत गुंग झाला होता. आपल्या राज्यावर कोणाची केव्हां स्वारी होईल याची त्याला कल्पनाहि नव्हती. पण एक दिवस त्याच्या कानीं शब्द पडले :

" महाराज—महाराज, यवन आले ! "

" यवन आले ? कुठून आले ? कसे आले ? "

" महाराज, फार मोठें सैन्य घेऊन आले. "

" सैन्याचा अंदाज ? "

" हेरांकरवीं जी माहिती मिळते त्यावरून आठ-दहा सहस्रांचा अंदाज. "

" आपलें सैन्य ? "

" आपलें सैन्य शंकरदेवांबरोबर राज्याच्या इतर भागांत गेलेलें आहे. "

मग ! अल्लाउद्दिनाचा आठ-दहा सहस्रांचा आकडा ऐकतांच रामदेवराव गंभीर झाला. त्याच्या चेहऱ्यावर भीतीची छाया पसरली. स्वतःचें सैन्य जवळ नाहीं. शत्रु दारांत येऊन उभा राहिलेंला. आतां पुढें करावें काय !

रामदेवानें थोडा वेळ विचार केला आणि मग तो स्वतःशींच म्हणाला, " शंकरदेव कांहीं सैन्यानिशीं दुसरीकडे गेला आहे नाहीं का ! बरं ! प्रधानजी, सैन्याची जेवढी काय जमवाजमव करतां येईल तेवढी जमवाजमव करण्यास आज्ञा द्या. "

' आज्ञा. '

आणि मग रामचंद्रदेवाच्या आज्ञेनें सैन्याची जमवाजमव झाली.

आणि मग रामचंद्रदेवाच्या सैन्यानें अल्लाउद्दिनाच्या सैन्याला तोंड दिलें. पराक्रमाला सुरुवात झाली.

पराक्रमाची पराकाष्ठा झाली !

पण ? नाहीं. जयाची आशा नाहीं. शस्त्रें, शरीरबल, सैन्यसंख्या, युद्धाचा

अनुभव, लढण्याची जिद्द, धर्मभावना इत्यादि अल्लाउद्दिनाच्या सैन्याच्या अनेक गुणांमुळें रामदेवरावाला जयाची आशा दिसेना.

आतां पुढें ?

देवगिरीचा आश्रय घेणें रामदेवरावाच्या सैन्याला भागच पडलें.

अल्लाउद्दिनानें सारें देवगिरी शहर उद्ध्वस्त केलें आणि त्यानें आपला मोर्चा देवगिरीच्या किल्ल्याकडे वळविला. पण देवगिरीचा किल्ला 'शैल्यदुर्ग' त्यांत सहजासहजीं प्रवेश करतां येणें शक्य नव्हतें. मार्ग अडचणीचा. डोंगर पोखरून मार्ग काढलेला. किती तरी जुना ! किती तरी मजबूत! इ. स. चारशेंच्या सुमारास राष्ट्रकूट राजांनीं हा बांधला असावा. त्याच्या बांधणीवरून असेंहि वाटतें कीं, सन ११७८ च्या सुमारास होऊन गेलेल्या चौथ्या बिल्हण राजानें हा बांधला असावा. कोणी केव्हांहि बांधो, पण देवगिरीचा किल्ला अतिशय मजबूत होता. संरक्षणास अतिशय मजबूत होता. आणि अल्लाउद्दिनाला त्यांत प्रवेश करणें फार कठीण होतें !

आणि म्हणूनच रामदेवरावाला वाटत होतें कीं, त्या किल्ल्यांत राहून आपलें संरक्षण होईल.

अल्लाउद्दिनाचा वेढा देवगिरीच्या किल्ल्यासभोंवतीं पडला आहे. रामदेवराव किल्ल्यांत आहे.

असे बरेच दिवस गेले, तरी पण अल्लाउद्दिनाला किल्ल्यांत प्रवेश करतां येईना !

शेवटीं त्यानें रामदेवरावास निरोप पाठविला कीं, 'मी फक्त आठ हजार सैन्य घेऊन आलों आहें. माझें अधिक सैन्य मागाहून येत आहे.'

अल्लाउद्दिनाचा हा निरोप रामदेवरावास खराच वाटला. अल्लाउद्दिनाचें जर अधिक सैन्य आलें तर फार दिवस या किल्ल्यांत आपलें संरक्षण होणार नाहीं. आपण त्याच्या सैन्याला तोंड देऊं शकणार नाहीं, असें त्याला वाटलें. त्याच्या मनानें कच खाल्ली.

आणि त्यांतहि दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, किल्ल्यांतील अन्नधान्य संपत आलें आहे. धान्याऐवजीं मिठाचीं पोतीं भरलीं गेलीं आहेत असेंहि आढळून आलें !

करावें काय ! तह करण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं.

रामदेवरावानें हाच मार्ग स्वीकारला आणि त्यानें अल्लाउद्दिनाला निरोप पाठविला–

" मी तहास तयार आहें."

" ठीक आहे "— अल्लाउद्दिनाकडून उत्तर आलें.

तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. आणि याच वेळीं रामदेवरावाचा मुलगा शंकरदेव यास देवगिरीवर अल्लाउद्दिन आल्याची बातमी कळली आणि तो लगबगीनें अल्लाउद्दिनावर चालून आला.

फार मोठें युद्ध झालें.

पण फितुरी झाली म्हणा किंवा गैरसमज झाला म्हणा, शंकरदेवाचाच या युद्धांत पराभव झाला आणि महाराष्ट्रांत मुसलमानांचा प्रवेश झाला. मुसलमानी सत्तेची छाया महाराष्ट्रावर पसरण्यास आरंभ झाला. महाराष्ट्रांतून दिल्लीच्या मुसलमान बादशहास याच वेळेपासून खंडणी जाऊं लागली.

हजारों वर्षांपासून महाराष्ट्राच्या जडण-घडणीचें काम विस्कळित झालें. तिला निराळेंच स्वरूप प्राप्त झालें.

महाराष्ट्रांत मुसलमानांचा राबता वाढूं लागला.

महाराष्ट्राची कित्येक शतकांपासून प्रगति चालू असतां, त्याची सर्वांगीण उन्नति होत असतां महाराष्ट्रांत मुसलमानांचा प्रवेश झाला आणि तोहि राजसत्तेचा दंड हातांत धरून. मुसलमानी संस्कृति, श्रद्धा, विचार, धर्म इत्यादि मुसलमानांच्या साऱ्याच गोष्टी महाराष्ट्राला कांहींशा अनोळखी. उत्तर भारतांतून दक्षिण भारतांत राजसत्तेच्या बळावर येणाऱ्या मुसलमानांपूर्वी महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यालगतच्या भागांत म्हणजे कोंकणांत व्यापाराच्या निमित्तानें दूरदूरचे मुसलमान जहाजें घेऊन येत असत. मालाची ने-आण करीत असत. क्वचित् ठिकाणीं मुसलमान आपली कायमची वस्ती करूनहि रहात असत. इ. स. १०८० च्या सुमारास गोव्याच्या कदंब घराण्यांतील राजा गुहल्ल हा एकदां समुद्रमार्गें सोरटी सोमनाथाच्या यात्रेस जात होता. पण दुर्दैवानें म्हणा त्याच्या जहाजाचें शीड मोडलें ! आणि त्यामुळें

त्याला गोवें बंदरांतच उतरावें लागलें. तेथें महमद या नांवाचा मोठा श्रीमंत मुसलमान व्यापारी रहात होता. त्यानें गुहल्लाला मदत केली.

पण त्याहि पूर्वीच्या काळांत मुसलमान व्यापारी महाराष्ट्रांत येऊन व्यापार करीत असल्याचा पुरावा आहे. व्यापाराच्या निमित्तानें जे मुसलमान येत, त्यांतील कांहीं महाराष्ट्रांतील कायमचे रहिवाशीहि होत. पण असे प्रकार फार कमी.

त्या काळीं महाराष्ट्रांत मुसलमान तुरळक; त्यामुळें त्यांचा कसलाच परिणाम महाराष्ट्रावर झाला नाहीं. त्यांच्या भाषेचा परिणाम झाला नाहीं. आचाराविचारांचा नाहीं. धर्माचा नाहीं. कसलाच परिणाम झाला नाहीं.

महाराष्ट्रावर परिणाम झाला तो अल्लाउद्दिनाच्या स्वारीच्या पुढच्या काळापासून ! पहिली गोष्ट म्हणजे मराठ्यांचें देवगिरीचें राज्यच नाहींसें झालें आणि दक्षिणेंतील मुसलमानांची देवगिरी राजधानी झाली. दिल्लीच्या महमद तुघलखानें देवगिरी आपली राजधानी करण्याचें ठरविलें आणि दिल्लीच्या जनतेस देवगिरीस जाण्याचा त्यानें कडक हुकूमहि फर्माविला. पुढें त्याला राजधानी बदलण्याची चूक कळून आली तो भाग वेगळा !

पण महंमद तुघलख महाराष्ट्रांतील आपली सत्ता सोडून गेला का ? नाहीं. मुळींच नाहीं. त्यानें झफरखान नांवाचा आपला सुभेदार महाराष्ट्रांत ठेवला आणि तो गेला.

पण झफरखानच दिल्लीच्या बादशहास जुमानीनासा झाला. तो आपणच देवगिरीच्या राज्याचा राजा असें म्हणूं लागला. त्यानें आपल्या राज्याचें नांवहि बहामनी राज्य असें ठेविलें.

अशा प्रकारें बहामनी राज्य हें महाराष्ट्रांतील पहिलें मुसलमानी राज्य. पहिला मुसलमान राजा !!

आपल्यांत अशी एक म्हण आहे कीं, 'जसा राजा तशी त्याची प्रजा'. येथें याचा एवढाच अर्थ घ्यावयाचा कीं, राजाच्या इच्छेप्रमाणें प्रजेला वागावें लागतें. राजाचा धर्म, राजाची भाषा....यांचा फार मोठा परिणाम प्रजेवर होत असतो. या मुसलमान राजाचाहि महाराष्ट्रांतील प्रजेवर असाच

परिणाम झाला. सरकार–दरबारांत मराठी शब्दांऐवजीं फारसी व उर्दू शब्दांचा उपयोग होऊं लागला. महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं मशिदी उभारल्या जाऊं लागल्या. या ना त्या निमित्तानें हिंदूंच्या धार्मिक भावना दुखविल्या जाऊं लागल्या. कांहीं स्वार्थी हिंदु, मुसलमानी धर्म स्वीकारूं लागले. दिवसेंदिवस मुसलमानांचें महत्त्व महाराष्ट्रांत वाढू लागलें. या काळांतील हिंदू लोकांच्या मन:स्थितीचें वर्णन कृष्णदासानें केलें आहे तें असें :

"यवन पुरवील जें धन। त्याविण कोण देईल अन्न ।। वांचावयास प्राण। दुजें साधन नसे ।।" त्या काळीं म्हणजे चौदाव्या शतकाच्या सुमारास दक्षिण भारतांत हिंदु राजे नव्हते असें नाहीं. हिंदु राजे होते, पण मुसलमान राजांना शह देण्याइतकें त्यांच्यांत त्राण नव्हतें. त्यांच्यांत बळ नव्हतें. कारण मुसलमानांची युद्धरीति, त्यांचें युद्ध साहित्य, सैन्यसंख्या आणि संपत्ति ही दक्षिणेंतील हिंदु राजांच्या मानानें कितीतरी अधिक, कितीतरी प्रभावी होती. त्यामुळें मुसलमान राजांना शह देणें हिंदुराजांना जमलें नाही. आणि त्यामुळेंच बहामनी राज्याच्या स्थापनेपासून जवळ जवळ एकशें चौतीस वर्षें तें महाराष्ट्रांत टिकलें आणि आपापसांतील वैरामुळें, कमकुवत वृत्तीच्या राजांमुळें पुढें बहामनी राज्याचे इ. स. १४८० साली पांच तुकडे झाले !

आतां महाराष्ट्रांत एकाऐवजीं लहान लहान पांच मुसलमानी राज्यें झालीं !

अशा ह्या पांच मुसलमानी राज्यांमुळें महाराष्ट्रावर पूर्वीपेक्षां धार्मिक परिणाम फार होऊं लागला. महाराष्ट्राला एक प्रकारचा सुंदर आकार येऊं पाहत होता तो वेडावांकडा होतो कीं काय असें वाटूं लागलें. महाराष्ट्राच्या जडण-घडणीचा ओघ बदलतो कीं काय असें वाटूं लागलें. मुसलमान संस्कृतीच्या लाटेंत हिंदु संस्कृति पार धुऊन जाते कीं काय अशी शंका येऊं लागली. पण हिंदु संस्कृति तितकी लेचीपेची नव्हती. तिचा पाया मजबूत होता. हजारों वर्षांची पुण्याई तिच्या पाठीशीं होती. हजारों वर्षांचा अनुभव तिच्या गांठीशीं होता. आणि त्यामुळेंच महाराष्ट्र यवनमय होऊं शकला नाहीं. मुसलमानी संस्कृतीची लाट थोपवून धरण्याची फार मोठी कामगिरी त्या

वेळीं जर कोणीं केली असेल तर त्या काळच्या संतांनीं आणि विजयनगरच्या राजांनीं !

विजयनगरच्या राज्याचा फार मोठा आधार ! बहामनी राज्य स्थापनेच्या दहा वर्षें अगोदर महाराष्ट्राच्या दक्षिणेस हरिहर आणि बुक्क या बंधुद्वयांनीं विजयनगरचें राज्य स्थापन केलें होतें; त्यामुळेंच हिंदूंचें त्या काळीं रक्षण झालें. विजयानगरचें राज्य त्या काळीं भरभराटींत होतें. त्याची राजधानी चौदा मैल पसरलेली होती. तींत तीस लाख लोकवस्ती नांदत होती. वीस हजार पालख्या फिरत होत्या. नुसतीं प्रमुख देवळें चार हजार होतीं. विद्यालयें तर असंख्य होती. विजयनगरला दुसरा देवराय राज्य करीत असतां अबदुल रझाक हा इराण तुराणच्या बादशहाचा वकील इ. स. १४४३ सालीं इकडे आला होता. त्यानें 'पंधराव्या शतकांतील हिंदुस्थान' नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्या पुस्तकांत तो विजयनगर शहराचें वर्णन असें करतो :

विजयनगर हें अशा प्रकारचें शहर आहे कीं, माझ्या डोळ्यांनीं त्याच्या-सारखें ठिकाण अजून कधींच पाहिलेलें नाहीं. जगांत दुसरीकडे याच्यासारखें ठिकाण कुठें आहे, असें माझ्या कानांनी ऐकलेलें नाहीं. राजवाड्याजवळ एकमेकांस समोर असे चार बाजार आहेत. प्रत्येक बाजाराच्या अग्रभागीं भव्य कमानदार छत घातलेली वाट आणि विशाल गॅलरी आहे. बाजार खूप लांबरुंद आहे. दुकानापुढें उंच कठडे आहेत. फुलें विकणारे फुलें विकतात. सुगंधी, ताजी, रंगीबेरंगी अशीं फुलें केव्हांहि मिळतात.

अबदुल रझाकनेंच विजयनगरचें वैभव वर्णिलें आहे, असें नाहीं, तर इटालियन प्रवाशी निकोलोकोंटी यानें व पोर्तुगीज व्यापाऱ्यांनींहि विजय-नगरचें वैभव डोळ्यांत भरण्यासारखें आहे, असें म्हटलें आहे.

या विजयनगरच्या राजांनीं मुसलमानी सत्ता आणि संस्कृति थोपवून धरण्याची फार महत्त्वाची कामगिरी केली खरी, पण या बाबतींत फारच मोठी कामगिरी महाराष्ट्रांतील संतांनीं केली. धर्म, नीति, श्रध्दा, भक्ति यांचें बीज रुजविणें, तें वाढविणें आणि त्यांचीं पाळेंमुळें हृदयांत खोलवर

पोंचविणें ही कठीण कामगिरी संतांनीं केली. धार्मिक ग्रंथ लिहून आणि अभंग, पदें, आख्यानें, भूपाळ्या, भारुडें लिहून त्या वेळचा समाज बहुश्रुत बनविला. देवागिरीच्या यादवांनंतर महाराष्ट्रावरील मुसलमानी सत्तेचा दोन-तीनशें वर्षांच्या काळांत लोकांची धर्मश्रद्धा कायम टिकविण्याचें अवघड कार्य केलें संतांनीं. भागवत धर्माची पताका फडकत ठेवून, पंढरीच्या पांडुरंगाचा वारकरी पंथ निर्माण केला संतांनीं. देवाच्या पदीं जातिभेद नाहीं, पंथ नाहीं. उच्च नाहीं. नीच नाहीं–सारे समान अशी माणसाची भावना बनविली संतांनीं.

आरंभी आरंभी मुसलमानी राजसत्तेविरुद्ध संतांनीं उघड उघड असा फारसा बोभाटा केला नाहीं. पण पुढें पुढें एकनाथादि साधुसंतांनीं काव्य आणि कीर्तनांतून बराच बोभाटा केला आणि तसें करणें त्यांना भागच पडलें. मुसलमान हिंदूंवर वारंवार अन्याय करीत. साधुसंतांवरसुद्धां ! चौदाव्या शतकांत होऊन गेलेल्या जनीजनार्दनावर असाच अन्याय विजापूरच्या बादशहानें केला ! !

जनीजनार्दन विजापूरच्या राज्यांत कमावीसदार असतां एका वर्षीं फार मोठा दुष्काळ पडला. लोकांना अन्नाचा कण मिळेनासा झाला. लोक उपासानें पटापट मरूं लागले. तें पाहून जनीजनार्दनांचें हृदय कळवळलें आणि त्यांनीं सरकारी धान्याचीं कोठारें सताड उघडलीं. तीं गोरगरिबांकडून लुटविलीं.

ही बातमी बादशहास कळली. बादशहानें जनीजनार्दनाला विजापुरास नेलें व त्यांना एका मस्त हत्तीच्या पायाखालीं तुडवून मारण्याची शिक्षा दिली !

पण चमत्कार असा घडला कीं, तो मस्त हत्ती जनीजनार्दनांजवळ जाईनाच मुळीं ! मग पायाखालीं तुडविणार काय ! !

राजाला आश्चर्य वाटलें आणि त्यानें जनीजनार्दनाला सोडून दिलें. ‘ माझी चूक झाली. आपणाला त्रास दिला ही. ’ असेंहि राजा म्हणाला व कमावीसदाराच्या कामावर पुन्हा रुजू होण्यास त्यास सांगितलें. पण जनी-जनार्दनांनीं असा निश्चय केला कीं, यवनांची सेवा प्राणांतींहि करावयाची

नाहीं. इतकेंच नव्हे तर ' यापुढें जो कोणी आपल्या वंशांतला यवनांची सेवा करील तो कुलबाह्य समजला जाईल, असेंहि त्यांनीं म्हटलें.

दासोपंत कवींचीहि गोष्ट अशीच आहे.

हल्लीं हैदराबाद जिल्ह्यांत नारायणपेठ म्हणून जें गांव आहें तेथें दासोपंताचा जन्म सन १५५० मध्यें झाला. वडिलांचें नांव दिगंबर आणि आईचें नांव पार्वती. आडनांव देशपांडे. नारायणपेठ हा महाल त्या वेळीं बेदर येथील बहामनी राज्याच्या ताब्यांत होता आणि या महालाची जमाबंदी ( वसुली ) करण्याचें काम दिगंबरपंतांकडे होतें.

पण एके वर्षीं त्या भागांत फार मोठा दुष्काळ पडला व दर वर्षाप्रमाणें जमावंदीची सरकारी वसुली झाली नाहीं. त्यामुळें बादशहानें दिगंबरपंतांस पकडून बेदरास आणलें व वसुलीचा पैसा सरकारांत कां पावता केला नाहीं असें त्यांस विचारलें.

त्यावर दिगंबरपंत म्हणाले, " नारायणपेठ महालांत दुष्काळ पडला आहे, तेव्हां सरकारी वसुली होत नाहीं ! "

पण बादशहानें दिगंबरपंतांचें कांहीं ऐकलें नाहीं. त्यानें हुकूम केला कीं, " सरकारी पैसा खजिन्यांत आणून भरीपर्यंत तुमच्या मुलाला आमच्याकडे ' ओलीस ' ठेविला आहे. जर तूं एक महिन्याच्या आंत पैसे खजिन्यांत भरलें नाहींस तर तुझ्या मुलाला – दासोपंताला – मुसलमान धर्माची दीक्षा दिली जाईल ! मला पुत्रसंतान नाहीं. तेव्हां दासोपंताला मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन राज्याचा अधिकारीहि मी करीन ! ! "

दिगंबरपंतांना अतिशय वाईट वाटलें. मुसलमानी धर्म स्वीकारून राज्य नको. संपत्ति, अधिकार यांपेक्षां धर्म श्रेष्ठ. वाटेल तें करीन आणि एक महिन्याच्या आंत सरकारी खजिन्यांत नारायणपेठच्या जमाबंदीचा पैसा भरीन, असा त्यांनीं निश्चयच केला व स्वतःच्या पदरचा म्हणा किंवा कुणाकडून तरी कर्जाऊ म्हणा, पैसा आणून तो सरकारी खजिन्यांत भरला व आपल्या मुलाची – दासोपंताची – सुटका करून घेतली !

दासोपंतांनीं या प्रसंगीं ईश्वराचा धांवा केला आहे. तो असा :

> हा जो यवनरूप व्याघ्र । मज गिळूं पाहे समग्र ।
> तरी कृपाशस्त्रें वधून शीघ्र । रक्षी मातें दयाळा ।।
>
> आज अस्तास जातां दिनमणी । माझे ब्रह्मत्यास असे हानि ।
> हें तो जाणतोस कीं दंडपाणी । दयार्णवा दयाळा ।।

जनीजनार्दन आणि दासो दिगंबर यांचीं हीं दोन उदाहरणें येथें नमूद करण्याचें कारण एवढेंच कीं, चौदाव्या-पंधराव्या शतकांत मुसलमानी राज्यापासून महाराष्ट्राला कसा त्रास होत होता आणि त्याची जडण-घडण विस्कळित करण्याचा प्रयत्न कसा होत होता हें कळावें.

पण असें जरी होत होतें तरी महाराष्ट्रांतील हिंदु जनतेनें आणि साधुसंतांनीं आपलें कार्य सोडलें नाहीं. साधुसंतांनीं तर कितीतरी धार्मिक ग्रंथसंपत्ति निर्माण केली. एकटच्या दासोपंतांचेंच उदाहरण घ्या ना ! त्यांना दररोज लेखनासाठीं एका ढबूची ( तीन पैशांची ) शाई लागत असे.

महाराष्ट्रांतील जनतेचीं मनें खंबीर बनविण्याचें फार मोठें कार्य सगळ्याच संतांनीं केलें. या सगळ्या संतांत ज्ञानेश्वरांपासून तों तुकाराम, रामदासांपर्यंत सारेच साधुसंत येतात.

महाराष्ट्रावर मुसलमान आपली सत्ता बसवूं पाहत असतां त्यांना राजे लोकांनीं जसा प्रतिकार केला तसा साधुसंतांनींहि केला. मात्र त्यांनीं हा प्रयत्न केला तो महाराष्ट्रांतील जनतेचीं मनें तयार करण्याचा: त्यांच्यांत चैतन्य निर्माण करण्याचा. तुझें बळ तुझ्या मनगटांत आहे. तुझी शक्ति तुझ्या धीर वृत्तींत आहे. ऊठ आणि उभा राहा. हातांत ढाल-तलवार घे आणि एक एक पाऊल चालायला लाग. असें तूं धीरानें, नेटानें चाललास, आत्मविश्वासानें चाललास तर यशस्वी होशील. महाराष्ट्राचा मान राखशील. जा, हातांत ढालतलवार धर आणि धैर्यानें शत्रूवर तुटून पड. महाराष्ट्रांतील शूरांनो, तुम्ही कसे आहांत :

खेटक करवाळे सतेज । सूडसाधनी विशाळ पैंज ।
या नांवें महाराष्ट्र झुंज । खंडिताहि न खंडवे ।।

( मुक्तेश्वर )

तुकाराममहाराजांनीं एक प्रकारें महाराष्ट्राला जागें केलें. ईश्वरसाधना करावी. पंढरीची वारी करावी. भजनपूजन करावेंच पण त्याचबरोबर आपलें कर्तव्यहि करावें. धर्माप्रमाणें आचरण करण्याचा आटोकाट प्रयत्न करावा आणि याच्याआड ज्या ज्या गोष्टी येतील त्या त्या गोष्टी दूर करण्याचा प्रयत्न करावा, हेंहि सांगितलें.

तुकाराममहाराजांच्या या शिकवणीचा परिणाम धर्मावर, आचारावर अधिक श्रद्धा बसण्याकडे झाला, आणि अप्रत्यक्षपणें मुसलमानी सत्तेला विरोध झाला.

समर्थ रामदासस्वामींनीं तर शब्दांना खड्गाची धार देऊन सारा महाराष्ट्र नव्हे, सारा भारत चैतन्यमय केला. मेल्या मुडद्यांना उठवून उभे केलें. यवनांनीं चालविलेले अत्याचार, बळकावूं पाहणारी राजसत्ता, धर्मच्छल हें सारें पाहून त्यांनीं धीर दिला. धीराचे शब्द दिले :

" धीर्धरा धीर्धरा तकवा, हडबडूं गडबडूं नका
काळ देखोनि वर्तावें, सांडावें भय पोटींचें "

इतकेंच नव्हे तर आणखी काय करावें तें सांगितलें :

" मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ।।
नजर करार राखणें । कार्य पाहुनि खतल करणें ।
तेणें रणशूरांचीं अंतःकरणें । चकित होतीं ।
मराठा तेतुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।
येंविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ।। "

समर्थांनीं ओळखलें होतें कीं, महाराष्ट्रीयांच्या तलवारीची धार बोथट झाली आहे. तिच्यावर गंज चढला आहे म्हणून ती साफसूफ केली पाहिजे· तिला धारदार बनविली पाहिजे. आणि म्हणूनच त्यांनीं महाराष्ट्रांत वीर मारुतीची स्थापना केली. हजारों तरुणांपुढें शूराचें, योद्धयाचें, अन्यायाविरुद्ध लढणाराचें प्रतीक ठेविलें. गांवोंगांवीं मठ स्थापिले. धर्माबरोबरच राजकारण सुरू केलें आणि शत्रूला रोखणाऱ्या महाराष्ट्रधर्माचा प्रसार केला. शूर-वीर वृत्तीचें महाराष्ट्र भूमीवर बीं पेरलें. आणि म्हणूनच श्रीछत्रपति शिवाजी-महाराजांना स्वराज्य स्थापन करण्यास यांचा हातभार लागला.

# महाराष्ट्राचा धनी

## ६

महाराष्ट्राचें नशीब थोर. परंपरा थोर. शौर्य थोर. बुद्धि थोर. म्हणूनच महाराष्ट्राच्या कुशींत असा एक महापुरुष जन्माला आला कीं, ज्यानें आपल्या कल्पनेनें, शौर्यानें, आपल्या उदार अंतःकरणानें, आपल्या नैतिक वागणुकीनें महाराष्ट्राला संपूर्ण स्वातंत्र्याच्या सिंहासनावर मानानें बसविलें आणि "यावच्चंद्र दिवाकरौ" अशी कीर्ति मिळवून दिली ! महाराष्ट्राचा धनी झाला. महाराष्ट्र हाच त्याचा परमेश्वर. ह्या परमेश्वराचीच त्यानें भक्ति केली. महाराष्ट्राचें सुराज्य आणि स्वराज्य बनविलें !

असा हा महापुरुष कोण हें आपणाला माहीतहि आहे. कारण प्रत्येकाच्या हृदयावर या महापुरुषाचें नांव 'शिवाजीमहाराज' असें कायमचें कोरलेलें आहे, आणि प्रत्येकाच्या जिव्हेवर तें घोळलेलें आहे, घोळत आहे. प्रत्येकाच्या मुखांतून पुढील वाक्यपंक्ति नेहमीं बाहेर पडलेल्या आहेत आणि पडत आहेत :

"लाख हिरे ओवाळून टाका असा तयांचा धनी
महाप्रतापी प्रभू शिवाजी उदार वीराग्रणी
महाराष्ट्र हा केवळ त्याचा दुसरा परमेश्वर
नाहिं असा कुणि भक्त जाहला दुसरा धरणीवर ॥"

शिवाजीमहाराज हें महाराष्ट्राचें दैवत. महाराष्ट्राचें भूषण. महाराष्ट्राचें स्फूर्तिस्थान.

समर्थांनीं ओळखलें होतें कीं, महाराष्ट्रीयांच्या तलवारीची धार बोथट झाली आहे. तिच्यावर गंज चढला आहे म्हणून ती साफसूफ केली पाहिजे· तिला धारदार बनविली पाहिजे. आणि म्हणूनच त्यांनीं महाराष्ट्रांत वीर मारुतीची स्थापना केली. हजारों तरुणांपुढें शूराचें, योद्धयाचें, अन्यायाविरुद्ध लढणाराचें प्रतीक ठेविलें. गांवोंगांवीं मठ स्थापिले. धर्माबरोबरच राजकारण सुरू केलें आणि शत्रूला रोखणाऱ्या महाराष्ट्रधर्माचा प्रसार केला. शूर-वीर वृत्तीचें महाराष्ट्र भूमीवर बीं पेरलें. आणि म्हणूनच श्रीछत्रपति शिवाजी-महाराजांना स्वराज्य स्थापन करण्यास यांचा हातभार लागला.

# महाराष्ट्राचा धनी

## ६

महाराष्ट्राचें नशीब थोर. परंपरा थोर. शौर्य थोर. बुद्धि थोर. म्हणूनच महाराष्ट्राच्या कुशींत असा एक महापुरुष जन्माला आला कीं, ज्यानें आपल्या कल्पनेनें, शौर्यानें, आपल्या उदार अंतःकरणानें, आपल्या नैतिक वागणुकीनें महाराष्ट्राला संपूर्ण स्वातंत्र्याच्या सिंहासनावर मानानें बसविलें आणि "यावच्चंद्र दिवाकरौ" अशी कीर्ति मिळवून दिली ! महाराष्ट्राचा धनी झाला. महाराष्ट्र हाच त्याचा परमेश्वर. ह्या परमेश्वराचीच त्यानें भक्ति केली. महाराष्ट्राचें सुराज्य आणि स्वराज्य बनविलें !

असा हा महापुरुष कोण हें आपणाला माहीतहि आहे. कारण प्रत्येकाच्या हृदयावर या महापुरुषाचें नांव 'शिवाजीमहाराज' असें कायमचें कोरलेलें आहे, आणि प्रत्येकाच्या जिव्हेवर तें घोळलेलें आहे, घोळत आहे. प्रत्येकाच्या मुखांतून पुढील वाक्यपंक्ति नेहमीं बाहेर पडलेल्या आहेत आणि पडत आहेत :

"लाख हिरे ओवाळून टाका असा तयांचा धनी
महाप्रतापी प्रभू शिवाजी उदार वीराग्रणी
महाराष्ट्र हा केवळ त्याचा दुसरा परमेश्वर
नाहि असा कुणि भक्त जाहला दुसरा धरणीवर ॥"

शिवाजीमहाराज हें महाराष्ट्राचें दैवत. महाराष्ट्राचें भूषण. महाराष्ट्राचें स्फूर्तिस्थान.

इ. स. १६३० सालीं महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला आणि इ. स. १६४६ साली म्हणजे महाराजांनीं आपल्या वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी मुसलमानांपासून तोरणा किल्ला घेतला !

महाराजांना आपल्या वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षीच स्वराज्य-स्थापनेची तीव्र इच्छा व्हावी याला कारणहि तसेंच होतें; आणि तें म्हणजे मागें सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रांत मुसलमानी सत्ता धुमाकूळ घालीत होती. महाराष्ट्र दरिद्री झाला होता. महाराष्ट्र यवनमय होतो कीं काय, असें वाटूं लागलें होतें.

"पदार्थ मात्र तितुका गेला । नुस्ता देशचि उरला ।
येणें करितां बहुताला । संकट जालें ।।
माणसा खावया धान्य नाहीं । आंथरुण पांघरुण तेंहि नाहीं ।
घर कराया सामग्री नाही । काये करिती ।।
कांहींच पाहतां धड नाहीं । विचार सुचेना कांहीं ।
अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडिले लोक ।।
प्राणीमात्र जाले दुःखी । पाहातां कोण्ही नाहीं सुखी ।
कठिण काळे वोळखी । धरीनात कोण्ही ।। "

शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राची ही स्थिति पाहिली आणि त्यांच्या मनांत विचार आला. आपणाला नाही कां महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापतां येणार ? नक्कीच येईल !

आणि त्या दिशेनें त्यांनीं प्रयत्न चालविले.

शिवाजीमहाराजांना माता जिजाबाईंकडून आणि गुरु दादोजी कोंडदेव मलठणकर–कुलकर्णी यांजकडून शिक्षण मिळालें होतें. सोळाव्या-सतराव्या शतकांत रामायण–महाभारत वगैरे ग्रंथ मुलांस ऐकविण्याचा प्रघात होता. रामायण–महाभारतांतील गोष्टी मुलांना सांगण्याची पद्धत होती. शिवाजीमहाराजांनाहि ह्या गोष्टी ऐकायला मिळाल्या होत्या. शिवाय त्यांना दादोजींकडून सरकारदरबारांत बसून न्याय-निवाडे कसे द्यावेत, राज्यकारभार कसा करावा, ह्याचें शिक्षण मिळालें होतें. साधुसंतांचीं धार्मिक कीर्तनें ऐकून

महाराजांना धर्माबद्दल अभिमान वाटत होता. शिवाजीमहाराज तुकारामाचें कीर्तन ऐकण्यासाठीं देहूस जात असत. संस्कृत पठण, राजनीति, पुराणवाचन असे कित्येक विषय महाराजांस शिकविलेले होते.

शिवाय शिवाजीमहाराजांच्या वडिलांची – शहाजी राजांची – जहागीर पुणें प्रांतीं होती. या जहागिरीची व्यवस्था पाहण्याचें काम जरी दादोजी कोंडदेवांकडे होतें, तरी शिवाजीमहाराजांकरवींच दादोजी ही व्यवस्था पाहत होते. त्यामुळें महाराजांचा संबंध मावळे लोकांशीं वारंवार येऊं लागला. आणि त्यांतून स्वराज्याची कल्पना निघाली.

आणि मग एक दिवस सुमुहूर्त पाहून रोहिडेश्वरीं कांहीं निवडक मावळे मंडळी जेव्हां जमली तेव्हां महाराज म्हणाले,

"ठरल्याप्रमाणें जमली का माझी मावळे मंडळी ?"

"होय, पण येसाजी अजून आला नाहीं."

"पण त्याला सांगितलें होतें का आपण इथें जमणार हें ?"

"होय महाराज, मीं स्वतः जाऊन सांगितलें त्याला ?"

"मग तो अजून आला नाहीं कसा ?"

"आला, आला, तो पाहा येसाजी आला. ये, ये येसाजी. महाराज तुझीच वाट पाहत आहेत. बैस इथें या दगडावर."

"महाराज, ठरवा काय तो बेत. करा सुरुवात."

"माझ्या मावळे मित्रांनो, मी काय ठरविणार ? तुम्ही सगळेजण तें ठरविणार."

"होय महाराज, तुम्ही म्हणतां तें सगळें खरें, पण आतां मला असें सांगा कीं, मुसलमानांना अडसर घालायचा ना ?"

"हा काय तुझा प्रश्न झाला का रे दौलती ! आजच मुहूर्त करायचा. बेलभंडार आज उचलायचा."

"पण मी म्हणतों......"

"कोण ? जानोजी तूं ? काय म्हणतोस तूं ?"

सो...५

" मंडळी, मी म्हणतों कीं, कशाला ह्या हाणामाऱ्या करा. हातपाय हालवावे. चार कुणगे करावे आणि त्यांत पिकेल तें खावें. मी म्हणतों हें पटतें का पाहा मंडळी."

जानोजीचा हा विचार ऐकून महाराज म्हणाले, " जानोजी, जें वडिलांनीं मिळविलें तें खाऊन राहणें योग्य नाहीं. आपण हिंदु. सर्व दक्षिण देश यवनांनीं ग्रासिला. देव, ब्राह्मण, गायी ह्यांस व क्षेत्रांस पीडा केली. धर्म बुडविला. ह्यांच्या रक्षणार्थ प्राणहि वेंचून धर्म रक्षूं व आपले पराक्रमें नवीन दौलत संपादूं. तें अन्न भक्षूं. नवें साधावें हें या कुळांत जन्मल्याचें सार्थक. दैवावर भार न घालूं. पुरुषप्रयत्न बलवत्तर होय. दैव पंगु आहे. यास्तव प्रयत्न अचळ करावे. त्यास दैव जसें अधिक साहाय्य होईल तसतसें अधिक करीत जावें. देव परिणामास नेणारा समर्थ आहे."

" राणोजी, महाराजांनीं मोलाचें सांगितलें. आपण मावळे मेलेल्या आईचें दूध प्यालों का ? ' महाराष्ट्र राज्य ' आपणाला करायचें आहे कीं नाहीं ? आपण सगळ्यांनीं महाराज सांगतात तो ' मुद्दा ' ध्यानांत आणायचा कीं नाहीं ? बोला, राणोजी, बोल काय तें !!"

" महाराजांचा ' मुद्दा ' मलाहि कबूल आहे. मी मघांशीं बोललों म्हणजे वागलों का ? मी तर असें म्हणतों कीं, आपण महाराजांच्या पायांशीं इमान धरून वतनास देखील सोडून, आपणच नाहीं तर आपले लेकसुद्धां महाराजां-जवळ राहून शत्रू मारून काढूं या !"

" शाबास गड्या राणोजी, एका दमांत बोललास रे. तुझ्या बोलण्यानें आम्हांला फार बरें वाटलें."

" अरे गड्यांनो, मी बोललों म्हणून काय झालें ! हा राणोजी तसा नाहीं. तुमच्या मनांतलें खरें काय तें काढून घेण्यासाठीं हा बोलण्याचा मीं उलटा डाव टाकला. राणोजीचें घोडें तुमच्या सगळ्यांच्या पुढें. मागें नाहीं. येसाजी, बोल ना तूं. तुला काय बोलायचें तें बोल."

" बोलतों. राणोजी, मला असें सांगा कीं, मुसलमानांना अडसर घालायचा ना ?"

"हा काय तुझा प्रश्न झाला रे ! आपणांला तोरणा किल्ला घ्यायचा आणि महाराष्ट्र राज्याचें तोरण बांधायचें."

"पण एवढें मुसलमान सैन्य किल्ल्यावर आहे तें !"

"आणि आम्ही एवढे आहोंत ते ! महाराज, बारा मावळचे लोक आपल्या विचाराबाहेर नाहींत. ते म्हणतात, शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य-स्थापनेच्या कामीं आम्ही हातावर शीर घेऊन मुसलमानांशीं लढायला तयार आहोंत. परवांच्या मेळाव्यांत सांगितलें आहे हें."

"आणि आजहि तेंच सांगत आहों."

"मित्रांनो, आपला धर्म टिकला पाहिजे. आपणांला सुखानें राहतां आलें पाहिजे. यासाठीं आपलें राज्य असलें पाहिजे. आणि आपलें राज्य व्हायला महाराष्ट्रांतून मुसलमानांना घालवून द्यायला तुमची सगळयांची एकी पाहिजे. सगळयांचे श्रम पाहिजेत. सगळयांनीं प्राणपणानें लढण्यास तयार झालें पाहिजे."

"महाराज, आम्ही सगळे तयार आहोंत."

"होय. राणोजी, येसाजी, दौलती आणि इतर तुम्ही सगळे बोलत होतां त्यावरून हें कळतेंच. मी अधिक न बोलतां तुम्हांलाच अधिक बोलू दिलें, याचें कारण तुमचे विचार मला कळावे हेंच होतें. आपण आपल्या उद्योगाला लागू या."

शिवाजीमहाराज मावळयांना स्फूर्ति देत होते. त्यांच्यांत स्वातंत्र्याची आवड उत्पन्न करीत होते. स्वातंत्र्यासाठीं प्राण पणास लावण्याचें धैर्य त्यांच्यांत आणीत होते.

या महापुरुषाची हीच फार मोठी कामगिरी. महाराष्ट्राला हीच फार मोठी देणगी. हाच स्फूर्तीचा झरा. महाराष्ट्राला स्वातंत्र्यासाठीं प्राण पणाला लावायला शिवाजीमहाराजांनीं शिकविलें. महाराजांची ही शिकवण आज कित्येक वर्षें महाराष्ट्राला उपयोगी पडली आणि तशीच ती पुढेंहि उपयोगी पडेल यांत शंकाच नाहीं. त्यांनीं महाराष्ट्राच्या मनाची मशागत केली. हें महाराष्ट्राच्या वैभवाचें एक अंगच आहे.

शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राच्या वैभवांत आणखी जी भर घातली ती किल्ल्यांची. महाराष्ट्रांत रायगडासारखे फार पूर्वीचे कांहीं किल्ले होते. पण शिवाजीमहाराजांनीं कांहीं नवीन किल्ले बांधले. या किल्ल्यांनींच महाराष्ट्राची घडण केली. या किल्ल्यांनींच महाराष्ट्राला चैतन्य दिलें. या किल्ल्यांनींच महाराष्ट्राच्या पराक्रमाच्या नौबती वाजविल्या आणि या किल्ल्यांनींच महाराष्ट्राच्या धैर्याची, शौर्याची कीर्ति जगाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत पसरविली.

महाराष्ट्राच्या पराक्रमाचा प्राण किल्ल्यांत होता.

"चौघडा यशाचा झडे
उचलती विडे
थाट सरदारी
तळपती तिखट तलवारी"

मराठ्यांच्या सैन्याच्या तलवारी तळपत होत्या त्या या किल्ल्यांच्या आधारामुळेंच. शिवाजीमहाराजांनीं आपल्या राज्याचे रक्षणकर्ते किल्ले आहेत, हें ओळखलें होतें.

एकदां मोरोपंत चिटणीस महाराजांना म्हणाले, "किल्ले बहुत झाले. आतां आणखी कशाला?"

त्यावर महाराज म्हणाले, "जैसा कुळंबी शेतांत माळा घालून शेत राखतो तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळे मारून बळकट करतात तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे."

किल्ल्यांची राज्यास बळकटी खरी, पण केव्हां? तर त्यांची व्यवस्था नीट असेल तेव्हां. शिवाजीमहाराज किल्ल्यांची काय, दुर्गांची काय किंवा गडांची काय, व्यवस्था अतिशय चोख राहावी म्हणून काळजी घेत. गडाच्या व्यवस्थे-विषयीं महाराजांचा असा दंडक होता कीं–

"गडावर एक हवालदार, एक सबनीस, एक सरनोबत असे तिघेजण एकाच हुद्द्याचे असून त्या तिघांच्या एकमतानें कारभार पाहावा. कार-खानीसानें जमाखर्च लिहावा. गड तोलदार, ज्या गडाचा घेर थोर त्या जागां सातपांच तट–सरनोबत ठेवावे. त्यास तट बांधून घ्यावेत. हुशारी

खबरदारीस त्यांनीं सावध असावें. गडावरील लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. एक सबनीस ब्राह्मण व कारखानीस प्रभू ठेवावेत. असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे. एका हवालदाराचे हातीं किल्ला नाहीं. हरएक फितवाफांदा यास किल्ला कोणाच्यानें देववेना."

महाराष्ट्राला शिवाजीमहाराजांनीं वैभवाच्या शिखरावर चढविलें खरें, पण तें करतांना किती दूरदर्शीपणानें वागावें लागत होतें हें आपणांला महाराजांनीं केलेल्या किल्ल्यांच्या व्यवस्थेवरून दिसून येतें.

त्या काळीं सह्याद्रींतील किल्ले हीं खरीं मंदिरें होतीं. धारातीर्थें होतीं. किल्ले ज्या कोणाच्या ताब्यांत असतील त्याचा ताबा किल्ल्याच्या आजूबाजूच्या मुलुखावर ! म्हणून किल्ल्यांची व्यवस्था शिवाजीमहाराजांनीं नीट केली होती. किल्ल्यावरच्या हवालदारावर किल्ल्याची फार मोठी जबाबदारी होती. गडावरच्या लोकांच्या बदल्या करणें, सरकारी पत्रकें लिहून त्यांवर स्वतःची मुद्रा करणें हे तर अधिकार त्यास होतेच; शिवाय रात्रीं किल्याचे दरवाजे बंद करून त्यांस कुलुपें लावून किल्ल्या आपल्या उशाखालीं ठेवून निजावें व सकाळीं सूर्योदयीं दरवाजे उघडावे हें फार जबाबदारीचें काम त्याचेंच होतें.

शिवाजीमहाराजांनीं किल्ल्यांची बांधणी केली आणि जशी त्यांची नीट व्यवस्था ठेविली तशीच त्यांनीं आपल्या सैन्याचीहि नीट व्यवस्था ठेविली.

महाराजांच्या सैन्यांत शिलेदार व बारगीर असे दोन प्रकारचे सैनिक होते. शिलेदार म्हणजे स्वतःचा घोडा बाळगणारा स्वार. शेतकरी आपल्या शेतीचें काम आटोपून पावसाळा संपतांत स्वतःचा घोडा घेऊन सैन्यांत दाखल होत असे. बारगीर हा सैन्यांत कायमची नोकरी करणारा.

शिवाजीमहाराजांजवळ आरंभीं आरंभीं सुमारें तीन हजारांच्या आसपासच सैन्य होतें. पण पुढें तें वाढतां वाढतां नुसतें कायमचें पायदळच एक लक्षापर्यंत गेलें. शिवाय शिलेदार साठ हजार आणि पागेचें सैन्य पंचेचाळीस हजार होतें.

शिवाजीमहाराजांनीं सैन्य वाढवून आपलें सारें लक्ष केवळ राज्यविस्तारा-कडेच दिलें असें नाहीं, तर त्यांनीं आपल्या राज्यांतील प्रजा सुखी कशी राहील, शेतजमीन कशी सुधारेल, लोकांना शांततामय जीवन कसें जगतां येईल, यांकडेहि ते लक्ष पुरवीत. याचीहि ते काळजी घेत. आपल्या राज्यांत नवीन रयत आली तर तिची नीट व्यवस्था लागावी म्हणून तिला मदत म्हणून दाणागोटा देत. शेतीस गुरेंढोरें देत. कसावयास जमीनहि देत. महाराजांनीं शेतकऱ्यांच्या सोईसाठीं जमिनीची मोजणीहि केली होती. त्या काळांत जमिनीची मोजणी काठी, हात, बिघा या मापानें मोजण्याची पद्धत होती. पांच हात व पांच मुठीची काठी ( चौदा तसूंचा हात ) औरस-चौरस वीस काठ्यांचा एक बिघा. एकशेंवीस बिघ्यांचा एक चावर. सरकारी 'दस्त' पिकावर अवलंबून असे. जें पीक येईल त्याचे पांच भाग करून तीन भाग शेतकऱ्यास मिळत आणि दोन भाग सरकारांत भरावे लागत.

महाराष्ट्र शेतकऱ्यांचा. नांगर हा शेतकऱ्यांचा पोशिंदा. नांगर जितका बळकट तितकी राज्याला बळकटी अधिक हें शिवाजीमहाराजांना ठाऊक होतें. म्हणून महाराज शेतकरी सदाचा राजी कसा राहील याची नेहमीं चिंता बाळगीत. त्यांची आपल्या सैन्यास सक्त ताकीद होती कीं, शेतांत घोडीं न घालावीं. उपद्रव न द्यावा. सक्तीनें धान्यगोटा न घ्यावा.

शिवाजीमहाराज आग्र्याहून औरंगजेबाच्या कैदेंतून निसटले त्या नंतरच्या थोड्याच दिवसांनी एक अशी गोष्ट घडली कीं, शिवाजीमहाराज आणि त्यांच्या बरोबरची मंडळी आग्र्याहून महाराष्ट्रांत येत असता वाटेंत संध्याकाळीं मुक्काम करावा म्हणून एका पाटलिणीच्या घरीं गेले आणि तिला विचारलें, "आजच्यापुरती राहावयास जागा द्याल तर येथें रात्र काढून सकाळीं निघून जाऊं."

त्यावर ती पाटलीण रागानें म्हणाली, "घर नाहीं, पण गुरांचा गोठा तेवडा खालीं पडला आहे. शिवाजीच्या स्वारांनीं सगळीं गुरें नेलीं. शिवाजी कैदेंत तसाच पडो!"

असें म्हणून त्या पाटलिणीनें अनेक शिव्याहि दिल्या!

पण वेश पालटलेले महाराज कांहींच बोलले नाहींत. ते निराजीपंताकडे पाहून हसले आणि त्या पाटलिणीचें नांवगांव लिहून घेतलें.

आणि कांहीं दिवसांनीं महाराज महाराष्ट्रांत आल्यावर त्यांनीं चौकशी केली तेव्हां त्यांना कळलें कीं अनंतराऊ व तेलंगराऊ यांच्या फौजांनीं त्या गांवांतील गुरेंढोरें नेलीं खरीं.

मग महाराजांनीं पाटलिणीला बोलावून आणलें व तिची नुकसानभरपाई करून दिली.

एवढें विस्तारानें सांगण्याचा हेतु हाच कीं, महाराष्ट्र प्रगतिपथाचें एक एक पाऊल चाल करीत होता तो त्याला मिळालेल्या महाराजांच्या वागण्याच्या आधारामुळेंच. ज्या वेळीं राजा नीतिनियमानें वागतो, दुसऱ्यांचीं अंतःकरणें जाणतो, प्रजेच्या दुःखांवर सहृदयतेनें फुंकर घालतो आणि राजदंडाचें सतत स्मरण ठेवून वागतो, त्या वेळींच राजाच्या राज्याची प्रगति होतेच होते. त्याचें राज्य वैभवाचें शिखर केव्हां ना केव्हां गांठतेंच गांठतें !

शिवाजीमहाराजांना शत्रु फार. विजापूरकर, औरंगजेब, जंजिऱ्याचा सिद्दी, पोर्तुगीझ, डच, इंग्रज हे तर राज्यलोभाच्या आणि व्यापाराच्या दृष्टीनें उघड उघड परकीय शत्रू होते; पण जावळीच्या चंद्रराव मोऱ्यासारखे स्वकीय असेहि कांहीं शत्रू होते; या सर्वांना आपल्या जरबेंत ठेवणें फार अवघड काम होतें. त्यांच्या तलवारीला आपली तलवार भिडविणें हें जसें शक्तीचें काम होतें, तसेंच तें युक्तीचेंहि काम होतें. मोंगल सरदार अफझलखान याची आणि महाराजांची जावळी खोऱ्यांत झालेली भेट ! या भेटीच्या प्रसंगीं दिसून आलेला महाराजांचा धूर्तपणा ! औरंगजेबाच्या कैदेंतून (आग्र्याहून) सुटण्यासाठीं दाखविलेली कल्पकता आणि धैर्य !! एक का दोन प्रसंग !! सारी कारकीर्द अशा प्रसंगांनीं भरलेली. तरीहि महाराजांनीं महाराष्ट्राची जडण-घडण चांगली केली.

मागें म्हटल्याप्रमाणें शिवाजीमहाराजांनीं डोंगरावर, सपाट जमिनीवर कांहीं किल्ले बांधले अगर कांहीं किल्ले दुरुस्त केले असेंच नाहीं, तर त्यांनीं समुद्रकिनारीं अगर समुद्रांतहि कांहीं किल्ले बांधले. कांहीं दुरुस्त केले; आणि

तसें करणें त्यांना जरूरीचेंच होतें. कारण इ. स. सोळाशेंच्या मागेंपुढें पांच-पंचवीस वर्षांपासूनच डच, पोर्तुगीझ, फ्रेंच, इंग्रज यांचा पश्चिम समुद्रावरील बंदरांतून जोराचा व्यापार चालला होता. या व्यापाराच्या निमित्तानें त्यांनीं फौजाहि ठेविल्या होत्या. आणि ते तागडीबरोबर तलवारहि वेळप्रसंगीं हातांत घेत होते.

शिवाजीमहाराजांना त्यांचा हेतु कळला होता. समुद्रावर जर या लोकांची आरमारी सत्ता जबर झाली तर आपणास शह बसेल; इतकेंच नव्हे तर आपला स्वराज्यस्थापनेचा हेतु पार धुळीस मिळेल. म्हणून आपणहि आपली आरमारी सत्ता वाढविली पाहिजे, ती बळकट केली पाहिजे. जहाजें, पडाव आपणहि बांधले पाहिजेत, असें महाराजांस वाटूं लागलें.

आणि अनेक वर्षे मागें पडलेला हा जहाजें बांधण्याचा उद्योग महाराजांनीं पुन्हा सुरू करविला. भोज राजांच्या कारकीर्दींत म्हणजे इ. स. ८५० या काळांत महाराष्ट्र जहाजें बांधण्याच्या कामांत पटाईत होता – अग्रगण्य होता. भोजाच्या 'युक्तिकल्पतरु' ह्या ग्रंथांत नौकांची रचना, त्यांची बांधणी आणि त्यांचें महत्त्व याविषयीं स्पष्ट असें फार उत्तम वर्णन केलेलें आढळतें. याच ग्रंथांत नदीवर, समुद्रावर, सफरीसाठीं, युध्दासाठीं उपयोगांत आणावयाच्या नौकांचीं नांवें दिलीं आहेत. जहाजें बांधतांना कोणती काळजी घ्यावी, हेंहि सांगितलें आहे. जहाजांच्या बांधणींत लोखंडाचा उपयोग करूं नये. कारण समुद्रांतील लोहचुंबकीय खडकांमुळें जहाजें आकर्षिलीं जातील व तीं फुटतील हें इ. स. ६०० च्या पूर्वीं माहीत होतें. आणि म्हणूनच त्या काळीं जहाजांच्या बांधणीसाठीं जहाजांना जोडावयाच्या फळ्या आंतून व बाहेरून तागानें जोडीत. त्यावर रोगण लावीत. अंबाडी व कळीचा चुना एकत्र (कुटून) एकजीव करीत आणि हें घट्ट चिकण रोगण जहाजांना लावीत.

जहाजें बांधणें ही महाराष्ट्राची विशेष कला होती. गौतमीपुत्र सातकर्णी याचें समुद्रावरील आधिपत्य दाखविणारा 'त्रिसमुद्र पीततोय वाहन' असा उल्लेख नाशीकजवळील लेण्यांत केलेला आहे, आणखी ठिकठिकाणीं असेच उल्लेख सांपडतात. महाराष्ट्रांतील ही कला कांहीं काळ लोप पावली होती.

शिवाजीमहाराजांनीं तिला पुन्हा ऊर्जितावस्था आणली. त्यांनीं महाराष्ट्राच्या 'सागर परंपरेंतहि' जडण-घडण केली. सन १६५९ सालीं कल्याण व पनवेल येथें कांहीं जहाजें बांधविलीं. महाराजांच्या आरमारांतील जहाजांची संख्या जवळजवळ सातशें होती. मात्र या जहाजांचा लहान मोठेपणा, आकार, वेग यावरून निरनिराळे प्रकार होते. गुराब, तरांडी, गलबतें, दुबारें, शिबाडें, पागार, मचवे, बाथोर, तिरकटी, पाल अशा जाती होत्या.

महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यालगत राहणारे लोक दर्यावर्दीपणांत नेहमींच निपुण असतात. कारण त्यांचा समुद्राशीं नेहमींच संबंध येतो. महाराजांच्या आरमारांत बहुतेक लोक समुद्रकिनाऱ्यालगतचे होते. मायनाक भंडारी यांची नेमणूक महाराजांनीं सुभेदार म्हणून केली होती. इतर लोकहि दर्यावर्दीपणांत कुशल होते आणि त्यांचाहि भरणा आरमारांत होता.

महाराष्ट्राच्या किनाऱ्यालगतचे लोक आजहि दर्यावर्दीपणांत कुशल आहेत याचें कारण शिवाजीमहाराजांपर्यंत जाऊन पोहोंचतें !

शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राच्या सागरी परंपरेंत आणखी जी एक विशेष गोष्ट केली ती जलदुर्गांच्या निर्मितीची ! महाराजांनीं पहिला दुर्ग बांधला तो मालवणचा सिंधुदुर्ग. मार्गशीर्ष वद्य २ शके १५८६ म्हणजे ता. २५ नोव्हेंबर १६६४ रोजीं सुमुहूर्त पाहून शिवाजीमहाराजांनीं स्वहस्तें दुर्गासाठीं चिरा बसविला. गणेशपूजन व सागरपूजन केलें. शंभर सुवर्ण होन दक्षिणा सागराला अर्पण केली. आणि मग तीन हजार लोक सतत तीन वर्षें या किल्ल्याचें काम करीत होते. तटबंदी केली. या तटबंदीचा उल्लेख असा आहे :

"तटबंदीच्या बांधकामाकरितां पायाचे व इमारतीचे धोंडे काढून ते तयार करविले. कांहींना आरपार छिद्रें पाडून कायम केले. पांच खंडी शिसें आणविलें व जंजिरेचा पाया घातला. धोंड्यास शिसेबंदी आरपार घालून पक्कें काम. पाण्यास भीति न खाय असें बांधिलें. बांधण्याची सारी युक्ति महाराजांनीं सांगितली."

शिवाजी महाराजांनीं एकच सिंधुदुर्ग बांधला असें नाहीं, तर समुद्र-

किनाऱ्यालगत त्यांनीं लहान सहान कां होईनात पण बरेच किल्ले बांधले आणि बांधलेले होते ते दुरुस्त केले. माऱ्याचीं ठिकाणेंहि मजबूत केलीं.

इ. स. १६५९ च्या १६ ऑगस्टला फ्रॅन्सिस्को–द–मेलो–ए कस्टो आणि अँटोनियो-डि-सोझा-कुन्हितो या वसई, ठाण्याच्या गव्हर्नरांनीं आपल्या राजाला लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर लिहिलेला आहे :

'आदिलशाही सरदार शहाजी यांच्या मुलानें वसई, चौलजवळचा प्रदेश जिंकून कल्याण, भिवंडी, पनवेल येथे आरमारी सैन्य जमविलें आहे. म्हणून आम्हीं आमच्या कप्तानाला असा हुकूम देऊन ठेविलेला आहे कीं, त्याच्या गलबतांना दर्यांत अटकाव करा.'

पण शिवाजीमहाराजांना कोण अटकाव करणार ! इंग्रज ? पोर्तुगीज ? छे ! ते तर शिवाजीला दबून वागत. 'शिवाजीच्या गलबतांना दर्यांत अटकाव करा' हा कप्तानास आपण दिलेला हुकूम केवळ पोकळ आहे हें त्या गव्हर्नरांना माहीत होतें. शिवाजीमहाराजांच्या वाटेस जाण्यास कोणासच धैर्य नव्हतें.

कारण महाराजांचा दरारा होताच तसा !

आणि हा दरारा केवळ महाराष्ट्रापुरताच किंवा भारतापुरताच होता असें नाहीं तर साता समुद्रांच्या पलीकडेहि होता. इराण, अरबस्तान, इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत असा डंका वाजत होता कीं, हिंदुस्थानांतील – महाराष्ट्रांतील शिवाजीमहाराज शूर आहेत. पराक्रमी आहेत, मुत्सद्दी आहेत, आणि उदारहि आहेत.

आणि हें महाराष्ट्राचें एक प्रकारें वैभवच होतें. शिवाजीमहाराजांनीं तें मिळवून दिलें. स्वत:च्या कीर्तीनें महाराष्ट्राला वैभवाला चढविलें. महाराष्ट्राची कीर्ति जगभर पसरविली !

महाराष्ट्राचें नशीबच थोर. आणि रायगड किल्ल्याचें नशीब तर त्याहिपेक्षां थोर.

रायगड आज कित्येक शतकें आहे तिथेंच आहे. कित्येक राजे त्याचे धनी झाले आणि गेले. पण रायगड कुणाच्याहि ताब्यांत फार वर्षें राहिला नाहीं.

त्याला आपल्या अंगाखांद्यावर राज्याभिषेकाचें लेणें चढल्याचा आनंद लाभला नाहीं.

रायगड फार जुनाट. हा किल्ला कोणीं बांधला अगर राहावयास तयार केला हें कुणालाच निश्चित असें माहीत नाहीं. पण एवढें मात्र सांगतां येतें कीं, रायगड हें बाराव्या शतकांत कोणा एका मराठे पाळेगाराचें राहण्याचें ( निवासस्थान ) ठिकाण होतें; आणि त्या वेळीं या किल्ल्यास रायरी ऊर्फ रायगिरी असें नांव होतें. पुढें हा किल्ला अनेकांच्या सत्तेखालीं अनेकवार होता. पण शेवटीं १६५६ ( बहुधा १५ जानेवारी ) सालीं हा शिवाजी-महाराजांच्या ताब्यांत आला. आणि इ. स. ४ सप्टेंबर १६५६ रोजीं महाराजांनीं त्याचें नांव रायगड असें ठेविलें.

रायगड हें ठिकाण समुद्रकिनाऱ्यापासून सुमारें अठ्ठेचाळीस मैलांवर असून महाडपासून अवघ्या सोळा-सतरा मैलांवर आहे. मुंबई, पुणें, सातारा ह्या शहरांच्या जवळ जवळ मध्यावर. शिवाय नैसर्गिक रचनेमुळें शत्रूपासून संरक्षणासहि उपयुक्त. शत्रूला अवघड वाटणाऱ्या ठिकाणांत हें अधिक अवघड ठिकाण. कुलाबा गॅझेटियरमध्यें रायगडाविषयीं असें लिहून ठेविलें आहे कीं--

"रायगड उत्तर अक्षांश १८°-१४° आणि पूर्व रेखांश ७३°-२०° वर आहे. त्याची समुद्रसपाटीपासून उंची २८५१ फूट असून तो किल्ले महरुआ ऊर्फ जंजिरा यापासून चाळीस मैलांवर आहे. तुटलेल्या कड्यामुळें तो सह्याद्रीपासून कांहींसा अलगच आहे. त्यामुळें त्याच्याभोंवतीं सुमारें एक मैल रुंदीची दरी निर्माण झाली आहे. रायगडचा माथा पूर्व-पश्चिम दीड मैल लांबीचा असून त्यची उत्तर-दक्षिण रुंदी सुमारें एक मैल आहे."

शिवाजीमहाराजांच्या ताब्यांत रायगड आल्यानंतर त्यांनीं त्याचें नीट निरीक्षण केलें.

"राजा खासा जाऊ पाहातां गड बहुत चखोट.-चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणें दीड गांव उंच. पर्जन्यकाळीं कडियावर गवत उगवत नाहीं आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबाद हा पृथ्वीवर चखोट गड खरा,

पण तो उंचीनें थोडका. दौलताबादचे दशगुणी उंच. असें देखोन संतुष्ट झाले आणि बोलिले, तक्तास जागा हाच गड करावा. रायगडीं राहूनच महाराष्ट्राचें राजकारण चांगल्या प्रकारें साधतां येईल." हें त्यांनीं मनीं आणलें.'

आणि मग महाराजांनीं आपल्या कल्पनेप्रमाणें बांधून काढला. उंचउंच दरवाजे, तट व बुरूज तयार झाल्यावर तोफा वर नेल्या. जागा सुरक्षित केल्या. एका मार्गाशिवाय बाकीचे सारे बंद केले.

आणि मग एके दिवशीं महाराजांनीं जाहीर केलें कीं, 'शिडी किंवा दोर यांच्या सहाय्याशिवाय आणि जाण्यायेण्यासाठीं जो मार्ग ठेविला आहे त्याच्या-शिवाय रायगड किल्ल्यावर कुठूनहि जो कोणी चढून दाखवील त्याच्या हातांत सोन्याचें कडें घालण्यांत येईल.'

महाराजांना वाटत होतें कीं, किल्ल्याच्या सर्व जागा सुरक्षित आहेत; आणि जर कुठें ढिलाई असेल तर आपल्या या जाहीर करण्यानें कळून येईल.

आणि झालेंहि तसेंच. त्या वेळच्या एका अस्पृश्यानें आपण गड चढून दाखवितों, असें सांगून तो एका ठिकाणाहून गड चढला !

" महाराज, मी गड चढलों. माफी व्हावी."

" नाहीं. माफी नाहीं. तूं राज्यास बळकटी आणलीस. गडाच्या मजबुतीची ढिलाई आमच्या ध्यानीं आणलीस. महाराष्ट्र राज्याच्या मजबुतीला तूं हातभार लावलास."

असें म्हणून त्या गड चढणाऱ्या माणसाला महाराजांनीं सोन्याचें कडें बक्षीस दिलें आणि ज्या वाटेनें तो गड चढला होता ती वाट त्यांनीं बंद केली.

रायगड सुरक्षित झाला. महाराजांनीं पन्नास हजार होन खर्च करून रायगडावर घरें, तळीं, बाजारपेठा, वाडे बांधले.

आणि शिवाजीमहाराज आतां अधून मधून रायगडावर राहूंहि लागले.

आतां तर त्यांनीं महाराष्ट्राच्या राजधानीचें ठिकाण रायगडच करावयाचें ठरविलें !

महाराष्ट्राची राजधानी रायगड !!

रायगड राजधानीमुळें महाराष्ट्राच्या वैभवांत फार मोठी भर पडली. महाराष्ट्रांतील प्रत्येक माणसाला माझ्या महाराष्ट्राची राजधानी 'रायगड' याचा अभिमान वाटूं लागला. चारी दिशांकडून रायगडाकडे मोठ्या आशेनें, उत्सुकतेनें, शिवाजीमहाराजांच्या कृपेसाठीं साऱ्यांचीं पावलें वळूं लागलीं. रायगड आणि शिवाजीमहाराज हीं दोन नांवें टोपीकरांच्याच देशापर्यंत नव्हे तर जगांतील साऱ्या देशांपर्यंत जाऊन पोहोंचलीं.

महाराष्ट्राला केवढें हें वैभव प्राप्त झालें ! महाराष्ट्राच्या वैभवांत किती ही भर पडली ! !

पण महाराष्ट्राच्या राजधानीच्या या वैभवावर जो कळस चढला तो महाराजांच्या राज्याभिषेकानें. महाराष्ट्रांत आज कित्येक शतकें हिंदु राजाचा राज्याभिषेक झालाच नव्हता. देवगिरीच्या यादवांनंतर नांव घेण्यासारखा कुणी राजाच झाला नव्हता आणि देवगिरी, विजयानगर अशा वैभवशील राजधान्याहि नव्हत्या.

शिवाजीमहाराजांना हल्लीं कित्येक दिवस वाटूं लागलें होतें कीं, महाराष्ट्रांतील आपल्या लोकांच्या ठिकाणीं देशप्रेम, धर्मप्रेम, एकी, स्वातंत्र्याची महति सतत तेवत राहावयास पाहिजे असेल तर, आणि माझ्या मावळे बंधूंनीं लढाईंत केलेल्या पराक्रमांचा, शत्रूशीं लढतां लढतां अंगावर करून घेतलेल्या जखमांचा, महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं, महाराष्ट्राच्या वैभवासाठीं, महाराष्ट्राच्या कीर्तीसाठीं बलिदान केल्याचा जर अभिमान वाढावयास पाहिजे असेल, तर महाराष्ट्राच्या राजाला राज्याभिषेक होणें जरूर आहे.

आणि महाराष्ट्रासाठीं, मायभूमीसाठीं ज्यांनीं रक्ताचें पाणी केलें, ज्यांनीं आपलीं मनगटें पिचविलीं, ज्यांनीं स्वराज्य आणि स्वधम यांसाठीं स्वतःचे प्राण वेळप्रसंगीं पणाला लाविले, जे महाराजांशीं म्हटलं तर मित्र, म्हटलं तर बंधु, म्हटलं तर पिता इतक्या प्रेमानें वागले त्यांना काय वाटत होतें ?

महाराष्ट्राच्या राजाला – शिवाजीमहाराजांना – राज्याभिषेक होणें जरूर आहे. आणि म्हणूनच शिवाजीमहाराजांनीं स्वतःला राज्याभिषेक करून घेण्याचें ठरविलें.

महाराष्ट्राला कित्येक शतकें राज्याभिषेकाचा सोहळा लाभला नव्हता. हिंदु राजांची जुन्या काळची राज्याभिषेकाची पद्धति संपूर्ण नष्ट झाली होती. शिवाजीमहाराजांच्या महापराक्रमामुळें महाराष्ट्राला ती आज पुन्हा लाभली आहे.

शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक.

कधीं ?

आज ! शालिवाहन शके १५५६ आनंदनाम संवत्सरे. ज्येष्ठ शुद्ध १३ ( दि. ५ जून १६७४ ) या दिवशीं !

किती आनंदाचा दिवस उगवला ! साऱ्या महाराष्ट्रांत, साऱ्या भारतांत आनंदच आनंद.

आणि असा आनंद होणें अगदीं योग्यच होतें. महाराष्ट्राच्या अंगाखांद्यावर राज्याभिषेकाचें लेणें चढलें म्हणजे महाराष्ट्राचा पराक्रम, महाराष्ट्राचें वैभव, महाराष्ट्राची अभेद्य एकी, निर्मळ नीति, धार्मिक रीति आणि पवित्र कृति या साऱ्यांच्या एकाच गुंफणीचें सुंदर लेणें जगाला पाहावयास मिळेल. महाराष्ट्राचा लौकिक, महाराष्ट्राचा अभिमान, महाराष्ट्राचें धैर्य आणि शौर्य जर कशानें वाढणार असेल तर राज्याभिषेकानें – शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकानें !

दि. ५ जून १६७४ या दिवशीं तीन घटका रात्र उरली असतां पहांटे राज्याभिषेकाचा विधि रायगडावर सुरू झाला !

शिवाजीमहाराजांनीं सचैल व समंत्रक शुद्धोदकाचें स्नान करून कुलस्वामिनीचें दर्शन घेतलें. कुलोपाध्याय नागांवचे प्रभाकर भट्ट यांचे पुत्र बाळंभट्ट, गागाभट्ट आणि इतर विद्वान् ब्राह्मण यांस नमस्कार केला. समर्थ रामदासस्वामी, मातु:श्री जिजामाता यांस वंदन केलें आणि मग महाराज राज्याभिषेकासाठी सुवर्णचौकीवर येऊन बसले. ही चौकी दोन फूट लांब, दोन फूट रुंद व दोन फूट उंच होती. शिवाजीमहाराजांच्या डाव्या बाजूस पट्टराणी

सोयराबाई बसली व मागच्या बाजूस संभाजी बसला. सोयराबाईच्या पदराशीं शिवाजीमहाराजांच्या शेल्याची गांठ मारलेली होती.

नंतर सप्त महानद्या व समुद्र यांच्या उदकानें भरलेले सुवर्णकलश व सुवर्णाचे तांब्ये घेऊन अष्टप्रधानांनीं मंत्रोच्चारांच्या गजरांनीं व मंगल वाद्यांच्या घोषांत महाराजांस अभिषेक केला. सोळा सुवासिनींनीं पंचारती ओवाळली.

अशा प्रकारें अभिषेकाचा विधि पुरा होतांच महाराजांनीं कपडे बदललें. त्यांनीं कलाबतूचें विणकाम केलेला शेंदरी रंगाचा अंगरखा घातला. रत्नजडित सुवर्णालंकार घातले. मोत्यांचा कंठा घातला. मोत्यांचा तुरा असलेला टोप मस्तकावर घातला.

मग महाराजांनीं ढाल, तलवार, धनुष्यबाण यांची पूजा केली. गुरुजनांस व मातोश्री जिजामाता यांस नमस्कार केला आणि मग ज्या दालनांत सिंहासन ठेवलें होतें त्या दालनांत महाराजांनीं प्रवेश केला.

हें दालन राज्यारोहणासाठीं उत्तम प्रकारें शृंगारलें होतें. भिंतींवर शुभ वृक्षांचीं चित्रें काढलीं होतीं. ठिकठिकाणीं स्वस्तिकें काढिलीं होतीं. दालनाला भरजरी छत असून त्यांना मोत्यांच्या झालरी लावलेल्या होत्या. खालीं सुंदर रुजामे पसरलेले होते.

शिवाजीमहाराजांनीं विष्णूची प्रतिमा उजव्या हातांत घेतली आणि त्यांनीं सिंहासनाकडे उजव्या बाजूनें जाऊन गुडघा टेकून वंदन केलें. मग पाय न लावतां पूर्वाभिमुख होऊन आरोहण झालें !

" क्षत्रिय कुलावतंस श्रीशिवछत्रपति सिंहासनाधीश्वर " झाले.

महाराष्ट्राच्या राजावर पुष्पवृष्टि झाली !

नौबती, चौघडे, कर्णे, शिंगें, सनया वाजूं लागल्या. महाराष्ट्रांतील महाराजांच्या सगळ्या किल्ल्यांवर ठरविलेल्या वेळीं तोफांची सरबत्ती झाली.

समारंभाचे मुख्य पुरोहित गागाभट्ट यांनीं मोत्यांचा तुरा लावलेला भरजरी मुकुट घेऊन तो शिवाजीमहाराजांच्या मस्तकावर ठेविला मात्र ! आणि त्याबरोबर एकच आवाज दुमदुमला 'शिवाजीमहाराज की जय.'

अशा प्रकारें रायगडावर शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक झाला.

आतां महाराजांना नजराणे देण्यास सुरुवात झाली.

तो पाहा—गोवळकोंडचाचा पातशहा हजरत अबुल हसन कुतुबशहा याचा वकील. त्यानें आणलेला नजराणा पुढें केला.

महाराजांनीं त्याला स्पर्श केला व ते म्हणाले, " मोरोपंत, यांना रीतसर पोशाख द्या."

" महाराज, हे इंग्रजांचे वकील. मुंबईच्या गवर्नराकडून आले आहेत. हेन्री आक्झेंडन."

मोरोपंतांनीं हेन्री आक्झेंडनची अशी ओळख करून देतांच त्यानें महाराजांना लवून मुजरा केला.

शिवाजीमहाराजांनीं त्याला खुणेनें सिंहासनाच्या पायरीजवळ बोलावून घेतलें. दुभाषा नारायण शेणवी बरोबर होताच. हेन्री आक्झेंडननें हिरेजडित अंगठी महाराजांस नजर केली.

महाराजांकडून हेन्री आक्झेंडनला मानाचा पोषाख मिळाला.

अशा प्रकारें अनेकांच्या नजराण्यांचा महाराजांनीं स्वीकार केला आणि मग महाराजांस गागाभट्ट म्हणाले, " महाराज, आपणाला शुभ्र अश्वावर स्वार होऊन राजवाडचाच्या मैदानापर्यंत जावयाचें आहे."

मग महाराज सिंहासनावरून उतरून एका शृंगारलेल्या शुभ्र अश्वावर आरूढ झाले आणि राजवाडचाच्या मैदानापर्यंत गेले.

आतां ?

" महाराज, आतां आपणाला हत्तीवर आरोहण व्हावयाचें आहे—"

मग महाराज अश्वावरून उतरून सजविलेल्या एका हत्तीवर आरूढ झाले.

फार मोठी मिरवणूक निघाली. या मिरवणुकीचें वर्णन असें केलेलें आहे कीं, ' सर्वांच्या पुढें जरीपटका व भगवा झेंडा दोन हत्तींवर. त्यांच्यामागें हत्तीवर आरूढ झालेले शिवाजीमहाराज. हत्तींच्या आसपास अष्टप्रधान, मागें सगळा फौजफाटा. त्यामागें आपापल्या तुकडीचे पृथक् पृथक् झेंडे घेऊन सज्ज झालेलें पायदळ. नंतर तोफखाना. नंतर वाद्यें असा या स्वारीचा

थाट होता. रायगडावर या वेळीं प्रत्येक घर नि घर ध्वजा-पताकांनीं, तोरणांनीं शृंगारलेलें होतें.

महाराजांची स्वारी हत्तींवरून निघाली तेव्हां घरोघरच्या सुवासिनी महाराजांना मंगल दीपक ओवाळीत होत्या. लाह्या, फुलें, दूर्वा यांचा महाराजांवर पाऊस पाडीत होत्या. महाराज रायगडावरील अनेक मंदिरांत जाऊन देवदर्शन घेत होते. अवर्णनीय – अवर्णनीय असा तो मंगल देखावा होता !

महाराजांनीं देवदर्शन घेतलें आणि मग महाराज राजमहालांत आले.

अशा प्रकारें महाराष्ट्राच्या राजाला राज्याभिषेक झाला. राज्याभिषेक समारंभासाठीं भारतांतील सर्व ठिकाणचे मिळून जवळ जवळ अकरा हजार ब्राह्मण सहकुटुंब सहपरिवार रायगडावर आले होते. शिवाय इतर पाहुणे, सरदार, आप्तमंडळी, राज्यांतील अंमलदार, इतर राजांचे वकील, व्यापारी, प्रवासी, प्रजाजन इत्यादि सारे मिळून जवळजवळ एक लाख लोक जमले होते. आणि या साऱ्यांच्या नीट सुखसोई करण्यांत आल्या होत्या. पंचपक्वान्नांच्या जेवणाची व्यवस्था होती.

ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार दक्षिणा, नजराणे देण्याचीहि व्यवस्था होती.

राज्याभिषेकासाठीं जवळजवळ पांच कोट रुपये खर्च करण्यांत आला.

महाराष्ट्राच्या राजाला झालेला राज्याभिषेक हा महाराष्ट्राच्या वैभवाचा कळस ! कीर्तीचा कळस ! पराक्रमाचा कळस ! छत्रपति शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राला अभिमानानें राहावयास शिकविलें आणि कुणाचेंहि भय न बाळगतां वागावयास शिकविलें.

कवि भूषण यानें आपलें ‘ शिवराजभूषण ’ नांवाचें काव्य रचलें आहे. किती यथार्थ आहे हें काव्य ! शिवाजीमहाराज आग्र्याहून औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन निसटले ही बातमी जेव्हां भूषणला कळली तेव्हां तो आनंदून गेला आणि त्याच वेळीं त्यानें ठरविलें कीं, ‘ ह्या अलौकिक महापुरुषाचें दर्शन घ्यावयाचेंच.’

भूषण हा चित्रकूट संस्थानच्या सोळंखी राजाच्या रुद्र नांवाच्या राजाकडे आश्रयास होता. त्याच्या वडिलांचें नांव रत्नाकर. आडनांव त्रिपाठी.

सो. . ६

कवि भूषण शिवाजीमहाराजांच्या दर्शनासाठीं म्हणून रायगडावर आला आणि एका महादेवाच्या देवळांत उतरला.

शिवाजीमहाराजहि त्याच देवळांत संध्याकाळच्या वेळीं देवदर्शनास गेले असतां तिथें त्यांना कळलें कीं, आपल्या दर्शनासाठींच हा कवि फार दुरून आला आहे.

मग महाराजांनीं कवि भूषणाची जेव्हां विचारपूस केली तेव्हां त्यानें आपली सर्व माहिती सांगितली व आपलें काव्यहि महाराजांना ऐकविलें.

आणि त्याच दिवसापासून कवि भूषणावर महाराजांची मर्जी बसली. तो महाराजांच्या दरबारचा कवि झाला! आणि त्यानेंच 'शिवराजभूषण' काव्य रचलें.

भूषण कवीनें राज्याभिषेकाचें वर्णन आपल्या काव्यांत फार सुंदर रीतीनें केलें आहे. तो म्हणतो:

"शिवाजीनें आपल्या तलवारीच्या जोरावर वेद आणि पुराणें यांचें संरक्षण केलें. हिंदूंची शेंडी राखली. शिपायांची रोटी चालविली. खांद्यावर जानवीं आणि गळचांत माळा सुरक्षित ठेविल्या. देवळांत देव व घरांत कुलधर्म, कुलाचार कायम ठेवले. शत्रूचें चूर्ण केलें.

शिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राचा मनु पार पालटून टाकला. त्यांनीं हिंदवी स्वराज्य स्थापन केलें!

"प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते॥"

ही राजमुद्रा महाराष्ट्राचें वैभव चंद्राच्या कोरीप्रमाणें वाढवूं लागली आणि त्यामुळें महाराष्ट्राची आणि छत्रपति शिवाजीमहाराजांची कीर्ति दशदिशां पसरली.

महाराष्ट्राचें वैभव वाढलें!

पण!

महाराष्ट्राचें वैभव फार काळ टिकावें अशी ईश्वराची इच्छा नसावी असेंच म्हणावेंसें वाटतें. कारण इ. स. १६३० ते १६८० ह्या पन्नास वर्षांच्या

काळांत महाराष्ट्राचें जें सर्वंच बाजूंनीं वैभव वाढलें होतें त्याला इ. स. १६८१ पासून उतरती कळा लागली म्हणा किंवा निराळें वळण लागलें म्हणा, पण तें दिवसेंदिवस कमी होऊं लागलें खरें !

आणि याचें कारण छत्रपति शिवाजीमहाराजांचा मृत्यु. इ. स. १६८० च्या एप्रिल महिन्याच्या ५ तारखेस शिवाजीमहाराज मृत्यु पावले. सूर्यास्त झाला !

सूर्यास्त जरी झाला तरी त्याचा प्रकाश एकाएकीं संपूर्ण नाहींसा होत नाहीं, महाराष्ट्राचेंहि तसेंच झालें.

छत्रपति शिवाजीमहाराजांच्या मागें त्यांच्या पराक्रमाचा प्रकाश राहिला.

या प्रकाशांत आतां महाराष्ट्राला वावरावयाचें आहे. महाराजांनीं दाखविलेल्या मार्गानें चालावयाचें आहे. महाराष्ट्राची जडणघडण करावयाची आहे. महाराष्ट्राला वैभवाला चढवावयाचा आहे. इतकेंच नव्हे तर आपल्या पराक्रमानें नवा प्रकाश मिळवावयाचा आहे.

शिवाजीमहाराजांनंतर कोण करणार हें ?

महाराष्ट्र ! संभाजी राजे !!

केलें का त्यांनीं हें ?

तेंच आपण आतां पाहूं.

# धर्मासाठीं आणि देशासाठीं

## ७

संभाजी महाराष्ट्राचा राजा झाला !

जेव्हां संभाजी राजा झाला तेव्हां त्याच्या आजूबाजूस फारशी शांतता नव्हती. उलट, शत्रूंनीं बऱ्याच नेटानें उचल खाल्ली होती. औरंगजेब तर आतां मनांत मांडे खात संभाजीच्या पारिपत्यास उभा राहिला आहे. आतांपर्यंत त्याची निराशा झाली होती. तो म्हणतहि होता, "शिवाजी हा फार मोठा सेनापति होऊन गेला. नवीन स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचें सामर्थ्य त्याच्यांत होतें. भारतांतील जुन्या सत्ता मोडून टाकण्याचे माझे प्रयत्न सारखे चालले आहेत. सतत एकोणीस वर्षें माझें सैन्य त्याच्याशीं लढा देत आलें असूनहि शिवाजीचेंच राज्य दिवसेंदिवस वाढत होतें. आतां ? आतां संभाजीला आपण हां हां म्हणतां नामशेष करूं आणि महाराष्ट्र आपल्या सत्तेखालीं आणूं."

पण औरंगजेब हा एकटाच का असें म्हणत होता ? नाहीं. पोर्तुगीझ, इंग्रज, जंजिऱ्याचा सिद्दी, असे आणखी किती तरी असेंच म्हणत होते.

पण संभाजीच्या पराक्रमाची त्यांना प्रथम कल्पना आली नाहीं. तो भीमपराक्रमी आहे, हें त्यांना प्रथम कळलें नाहीं.

पण संभाजीशीं जेव्हां त्यांचा संबंध आला तेव्हां त्यांना कळून चुकलें कीं,

आपली कल्पना साफ साफ चुकीची आहे. जसें श्रीकृष्णाचें सुदर्शन चक्र, रामाचा बाण, भीमाची गदा तशी संभाजीची तलवार आहे. ती म्यानांतून बाहेर पडल्यावर शत्रूचा समाचार घेतल्याशिवाय म्यान व्हावयाची नाहीं. संभाजी हा आपल्या पित्यापेक्षां कांकणभर अधिकच धाडसी आहे आणि तो सहजासहजीं आपल्या हातीं लागावयाचा नाहीं किंवा त्याला आपण शरणहि आणूं शकणार नाहीं, हेंहि त्याच्या शत्रूंना समजून आलें.

गोव्याच्या पोर्तुगीझांची प्रथम संभाजीबद्दल निराळीच कल्पना होती, म्हणून त्यांनीं संभाजीच्या मुलुखांत लुटालूट करण्यास आरंभ करुन संभाजीची आगळीक केली. म्हणून संभाजीनें गोव्यावर स्वारी केली ! आणि पोर्तुगीझांस चांगलाच धडा शिकविला. औरंगजेबाच्या बऱ्हाणपुरापर्यंत सरदार पाठवून त्याचा मुलूख मिळविला. इंग्रजहि संभाजीस दबकून होते.

असें जरी होतें तरी संभाजीला सर्व बाजूंनीं असलेल्या आपल्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शत्रूंना सतत तोंड देणें शक्य नव्हतें. कारण जुने अनुभवी सरदार उरले नव्हते. नांव घेण्यासारखा फक्त एकच सरदार उरला होता तो म्हणजे हंबीरराव ! संभाजीला उणेपणा आला तो यामुळेंच. जर चांगले कसलेले सरदार पदरीं असते तर त्याला एकाच वेळीं अनेक ठिकाणीं अनेक शत्रूंना चांगल्या प्रकारें तोंड देतां आलें असतें. चारहि दिशांच्या शत्रूंना पायबंद घालतां आला असता, पण तसें झालें नाहीं. पदरीं मातबर कसलेले सेनानायक नाहींत. राज्यकारभार आणि राज्यरक्षण ह्या दोनहि गोष्टी एकट्या संभाजीवरच पडल्या !

आणि त्यामुळेंच औरंगजेबाचें सैन्य रायगडाच्या – महाराष्ट्राच्या राजधानीच्या – पायथ्याशीं येऊन पोंचलें !

संभाजीमहाराज धूर्त होते कीं नाहींत, हें नक्की कुणाला सांगतां येईलच असें नाहीं, पण ते शूर होते हें मात्र नक्की सांगतां येईल.

पण महाराष्ट्राचें दुर्दैव म्हणा किंवा महाराष्ट्र धर्मपरीक्षेंत उतरून त्याच्या वैभवांत भर पडावयाची होती म्हणून म्हणा, संभाजीमहाराजांच्या

शौर्याला यश आलें नाही. ते विशाळगडावरून आंबेघाटांतून रायगडाकडे यावयास निघाले असतां ता. १ फेब्रुवारी १६८९ रोजीं संगमेश्वर येथें औरंगज़ेबाचा सरदार शेख निजाम ऊर्फ मुकर्रबखान यानें संभाजीमहाराजांस पकडलें.

ही बातमी औरंगजेबाच्या कानीं पडतांच त्याला कोण आनंद झाला ! आपण महाराष्ट्रांत आलों. शिवाजीशीं लढतां लढतां आयुष्याचीं वीस वर्षें घालविलीं; पण सारी खटपट वांया गेली. सारी संपत्ति मातीमोल केली. फुकट घालविली. बरेंच सैन्य बळी दिलें. आपण अगदीं निराश निराश झालों होतों. पण आज ! हें सारें विसरायला हरकत नाहीं ! ! शिवाजी नाहीं. नाहीं तर नाहीं, पण संभाजी तर हातीं लागला ना ! महाराष्ट्राचा राजा आपल्या हातीं लागला ना ! आतां सारा महाराष्ट्र हां हां म्हणतां माझ्या सत्तेखालीं येईल आणि मग माझे सारे बेत सिद्धीस जातील. सारा महाराष्ट्र यवनमय करतां येईल. मशिदी बांधतां येतील. दहा वर्षांपूर्वी—हो दहाच वर्षांपूर्वी—मीं हिंदूवर जिझिया कर बसविला म्हणून इ. स. १६७९ च्या एप्रिलांत ३ तारखेस शिवाजीनें मला पत्र लिहिलें होतें की, ‘ पातशाही ही पुरातन हिंदूंची आहे. तुमचें दक्षिणेंत कांहीं नाहीं. गरीब, अनाथ, मुंग्या-चिलटांसारखे त्यांस उपसर्ग करण्यांत आपला मोठेपणा नाहीं. ’

पण आतां दक्षिणेंत राज्य कोणाचें होईल ? अं ?

औरंगजेबाला कोण आनंद झाला ! आपण धन्य धन्य झालों असें त्याला झालें. संभाजी आपणापुढें कैदी म्हणून केव्हां उभा राहतो आणि आपण त्याला केव्हां पाहतों याची त्याला उत्कंठा लागली. मुकर्रबखान संभाजीसह येत आहे ही बातमी कानीं पडल्यापासून आज चार दिवस औरंगजेबासच काय पण भिकाऱ्यापासून तों थेट मोठमोठ्या लोकांपर्यंत इतका उत्साह पसरला होता कीं, त्यांना रात्रीं झोंपहि लागत नव्हती. ज्या रस्त्यानें मुकर्रबखान संभाजी-सह येत होता त्या रस्त्यावर लोक उभे राहून त्यांच्या येण्याची ‘ मार्गप्रतीक्षा ’ करीत होते.

ओरंगजेबाला तर फारच उत्कंठा लागली होती.

त्यानें एका सरदारास विचारलें, " संभाजीस कैद करून मुकर्रबखान आतां कुठेंसा आला आहे ?"

" खाविंद, अकलूजपासून जवळच आला आहे."

" तर मग शूर मुकर्रबखानाला सरदार वगैरे लोकांच्या फार मोठ्या जमावानें सामोरे जा आणि त्याचें स्वागत करा. पण कुणी तरी एका सरदारानें जाऊन मुकर्रबखानाला सांगा कीं....कुणी तरी नको. हमीदुद्दीन-खान, तूं–तूंच जा आणि त्याला सांग–संभाजीला हातकड्या घालून आण ! हो, न जाणो....! "

औरंगजेबाला महाराष्ट्र राजाचें किती हें भय ! संभाजी सांपडला खरा, पण त्याचें पुढें काय ? वाघ सांपळ्यांत सांपडला खरा, पण त्याचें पुढें काय ? संभाजीचा वडील शिवाजी. त्यानें दरबारांत दाखविलेला तो करारीपणा आणि आग्र्याहून माझ्या हातावर तुरी देऊन सुटण्याचा तो प्रसंग !

त्या शिवाजीचा पुत्र संभाजी. त्याचा आतां कसा बंदोबस्त करावयाचा ! संभाजीला ठार मारावें का !

" आसदखान, संभाजीची काय वासलात लावावी ? "

" जहांपन्हा, मला वाटतें संभाजीला जिवंत ठेवणेंच हितावह होईल. "

" तें कसें काय ?"

" जहांपन्हा, संभाजी आपल्या कैदेंत असला तर त्याच्या जिवास धोका पोहोंचूं नये म्हणून दख्खनचे हे लोक मऊ येतील. जहांपन्हा, मराठ्यांची महाराष्ट्राच्या राजावर फार मोठी निष्ठा आहे. मीं म्हणतो तसें, संभाजी आपल्या कैदेंत असला तर मराठ्यांना राजाच्या जिवाला धोका दाखवून वठणीवर आणतां येईल. "

" बरं. तसं करून पाहतां येईल. त्याला आणा आमच्यासमोर. त्यानें इस्लाम धर्माची दीक्षा घेतली तर पुढें साऱ्याच गोष्टी सोप्या होतील. आणा त्याला. नीट बंदोबस्तानें आणा. हातकड्या घालून आणा. "

" जहांपन्हा, खावंदांचा हुकूम. "

असें म्हणून आसदखान तिथून गेला.

आणि थोड्याच वेळांत संभाजीमहाराजांस औरंगजेबापुढें आणण्यांत आलें. औरंगजेब संभाजीकडे पाहातच राहिला. त्याला थोडा वेळ कांहीं बोलावयास सुचेचना. त्याला संभाजीची भीति वाटली कीं काय न कळे.

पण मग तो थोड्याच वेळांत संभाजीला म्हणाला,

"काय संभाजीराजे, तबियत ठीक आहे ना ?"

"ईश्वरीकृपेनें ठीक आहे."

"राजे, आपण आम्हांला बहुत त्रास दिला. आम्हीं घेतला किल्ला परत घेतला. बरीच लूटमार केली. राजे, तरी पण तुम्हांला जीवदान देण्याचा आमचा विचार आहे. मात्र आम्ही सांगतों त्या रीतीनें वागा म्हणजे आमचे मेहेरवानीस पात्र व्हाल. तुमचा इतमाम वाढेल. आम्ही तुम्हांला दख्खनचे राजे म्हणूनच वागवूं."

"आपलें काय म्हणणें असेल तें स्पष्ट बोला."

"तुम्ही इस्लाम धर्माची दीक्षा घ्या. पवित्र धर्माच्या आश्रयास या."

"शक्य नाहीं. तें कालत्रयीं शक्य नाहीं."

"कां ? पवित्र धर्माचा आश्रय घेण्याचें तुम्हांला एवढें कां कठीण वाटावें ? तुम्हांला दख्खनची सुभेदारी नको, स्वतःचा प्राण नको, इस्लाम धर्म पवित्र आहे. पाक आहे."

"आलमगीर, तुझा धर्म जसा तुला प्रिय, तुझा धर्म जसा तुला पवित्र, तसा माझा धर्म मला प्रिय, तसा माझा धर्म मला पवित्र. छत्रपति शिवाजी-महाराज यांनीं गोब्राह्मणांचा प्रतिपाळ केला. धर्मासाठीं जिवाचा आटापिटा केला. मी त्यांचा पुत्र. मी माझा धर्म सोडीन ? शक्य नाहीं. असें होणें कदापि शक्य नाहीं !"

"तुला प्राणाची पर्वा नाहीं ?"

'नाहीं. मला माझ्या प्रिय धर्मापेक्षां प्राण श्रेष्ठ नाहीं. प्राणाची पर्वा नाहीं. संभाजी हिंदु म्हणून जन्मला आणि तो हिंदु म्हणूनच मरणार !

आलमगीर, प्राणाची भीति आणि दख्खनच्या राज्याचें आमिष कोणाला ? या संभाजीला? नाहीं...नाहीं. मी कदापि धर्म सोडणार नाहीं. धर्मासाठीं हा संभाजी या क्षणाला मरावयास तयार आहे. मला प्राणापेक्षां धर्म श्रेष्ठ आहे ! "

संभाजीमहाराजांचे हे दृढनिश्चयाचे शब्द ऐकून औरंगजेब कांहींसा चपापला. त्याला माहीत होतेंच, मराठे बोलतील तसे वागतील. ते दिलाचे पक्के. त्यांना स्वराज्य, स्वधर्म ही प्राणापेक्षांहि प्रिय आहेत.

आणि तसेंच झालें. महाराष्ट्राच्या राजाला प्राणाची पर्वा नव्हती. आपल्या प्रिय धर्माची पर्वा होती.

आणि म्हणूनच संभाजीमहाराजांनीं धर्मासाठीं मरण पत्करलें. त्यांना तुळापुराजवळ वडू बुद्रुक येथें सन १६८९ मार्चच्या ११ तारखेस औरंगजेबानें हालहाल करून ठार मारविलें !

महाराष्ट्राच्या राजानें धर्मासाठीं प्राण गमाविला !

हा दुःखदायक प्रसंग तर खराच, पण याच दुःखदायक प्रसंगानें महाराष्ट्राच्या घडणीला फार मदत झाली. या प्रसंगानें महाराष्ट्राच्या भावना उफाळल्या. स्वधर्म, स्वराज्य, स्वाभिमान, स्वत्व, सहकार्य या महाराष्ट्रांतील लोकांच्या श्रद्धेला अधिक दृढता आली.

संभाजीमहाराजांनीं कर्तव्यनिष्ठा राखली. जन्मधर्म आणि राजधर्म यांचें निष्ठेनें पालन केलें आणि प्रत्येक महाराष्ट्रीयाला आत्मसामर्थ्याची, आत्म-कर्तव्याची जाणीव करून दिली. औरंगजेबापुढें मान न तुकवितां ताठ मान करून निश्चयानें अमानुष हाल सोसले. पण आपला जन्मधर्म व राजधर्म सोडला नाही. 'स्वधर्मे निधनं श्रेयः' हें फार मोठें उदाहरण त्यांनीं महाराष्ट्राला घालून दिलें. आणि त्यामुळें पुढील काळांत महाराष्ट्राची घडण जलद आणि नीट घडली.

आज आपण तुळापुरास किंवा त्याच्या शेजारींच असलेल्या वडू बुद्रुकला गेलों कीं त्या पावनभूमीचें आपणांला दर्शन घडतें. मागच्या साऱ्या घटना आठवतात. डोळ्यांसमोर इतिहास उभा राहतो. तो औरंगजेब, ते संभाजी-महाराज, त्यांनीं औरंगजेबास दिलेलें तें उत्तर......सारें सारें कांहीं आठवतें.

आपले हात जोडले जातात. डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु उभे राहतात आणि मुखांतून सहज शब्द निघतात, 'संभाजी राजे, 'प्राणापेक्षां मला धर्म श्रेष्ठ' या आपल्या उद्गारांनीं महाराष्ट्राला महामंत्र मिळाला. संजीवनी मंत्र मिळाला."

संभाजी काय किंवा छत्रपति शिवाजीमहाराज काय, महाराष्ट्राच्या सगळ्याच राजांनीं आपल्या धर्मावर प्रेम केलें खरें, पण त्याचबरोबर दुसऱ्या धर्माचा आदर केला, मान राखला. महाराष्ट्राचें हें एक वैशिष्टयच आहे. आजहि हें आहे. हिंदूंच्या उत्सवाला जर आपण मुसलमान बंधूंना बोलावलें तर ते मोठ्या आनंदानें येतात. आजहि खेड्यापाड्यांत मुसलमानांच्या ताबुताला हिंदु जातात. शिवाजीमहाराज 'गोब्राह्मण प्रतिपालक' होते. त्यांनीं साधुसंतांना, देवस्थानांना जशीं अनुदानें दिलीं, त्यांच्या पूजेअर्चेची सोय केली, दिवाबत्तीची सोय केली, तशी त्यांनीं फकिरांना, मशिदींना अनुदानें दिलीं. त्यांच्याहि दिवाबत्तीची सोय केली. बाणकोटापासून चार मैलांवर केळोशी येथील मुसलमान सत्पुरुष बाबा याकूत यांचेसाठीं झोपडी वगैरे बांधून देऊन त्याच्या योगक्षेमाची व्यवस्था छत्रपति शिवाजीमहाराज यांनीं केली. अफझुलखानाची कबर स्वत: शिवाजीमहाराजांनीं बांधवून तिच्या व्यवस्थेसाठीं महाराजांनीं सोयहि केली. विजापूरच्या राजाकडून नोकरी सोडून आलेले सातशें पठाण शिवाजीमहाराजांनीं आपल्या नोकरीस ठेवले होते. शिवाजीमहाराजांची आपल्या सैन्याला सक्त ताकीद असे कीं, 'मुसलमान प्रजा, फकीर, गोसावी, मशिदी यांची लूटमार करायची नाहीं. त्यांस त्रास द्यावयाचा नाहीं.' महाराजांचें हें धोरण संभाजीमहाराजांनींहि कसोशीनें पाळलें होतें.

भागवतधर्माची मुळीं महाराष्ट्राला शिकवणच अशी लाभलेली कीं,

जो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषानें नेणेचि कही ।
अपपरू नाहीं । चैतन्य जैसा ॥

किंवा, नेणे वर्ण धर्म जीं आली सामोरी । अवघीच हरी आळिंगिली ॥

महाराष्ट्राचीं देवदैवतेंहि अशीं आहेत कीं, त्यांनीं जातिधर्माचा द्वेष केलेला नाहीं. संभाजीमहाराजांनीं प्राणापेक्षांहि मला धर्म श्रेष्ठ आहे असें म्हणून धर्मासाठीं प्राणाचें मोल दिलें!

आणि त्यामुळेंच पुढील काळांत महाराष्ट्राच्या जडण-घडणीला संजीवनी मंत्र मिळाला. एकी, धैर्य चिकाटी, आत्मविश्वास.....ह्याची महाराष्ट्राला फार मोठी देणगी मिळाली.

महाराष्ट्राच्या जडण-घडणीला संभाजीमहाराजांचा विशेष हातभार लागला नाहीं असें आपणांस वाटतें तें अगदींच कांहीं खोटें आहे असें नाहीं, पण त्यांची कारकीर्द तरी किती आणि त्यांच्या कारकीर्दींत त्यांना अवसर सांपडला तरी किती! अवघी नऊ वर्षांची कारकीर्द! ही कारकीर्द शत्रूचा बंदोबस्त करण्यांतच गेली! संभाजीनंतर राजारामाच्या हातीं महाराष्ट्राची सत्ता आली, पण त्याचेंहि तसेंच झालें. त्यालाहि महाराष्ट्राची जडणघडण करण्यास पाहिजे तसें स्वास्थ्य मिळालें नाहीं.

राजारामाच्या हातीं सत्ता आली त्या वेळीं त्याचें वय अवघें एकोणीस वर्षांचें होतें. आणि सत्ता हातीं येऊन पुरता एक महिना झाला असेल नसेल तों ईतिकखान यानें ता. २५ मार्च १६८९ रोजीं राजारामास पकडण्यासाठीं रायगडास वेढा घातला.

पूर्वींचीं अनुभवी माणसें मरून गेलीं होतीं. फौज, पागा मोडल्यासारखेंच झालें होतें. खजिन्यांत शिल्लक नव्हती. पोर्तुगीज, सिद्दी, इंग्रज, मोंगल वगैरे शत्रूनीं चहूंबाजूंनीं धुमाकूळ घातला होता. वादळांत नौका सांपडली होती. त्यांत आणखी कांहीं सरदार मंडळीस वाटत होतें कीं, संभाजीचा मुलगा शाहू हाच रायगडच्या गादीवर यावा. कांहीं सरदारांस वाटत होतें, शाहू अगदी लहान आहे – अप्रौढ आहे. आजच्या या अस्थिर वातावरणांत म्हणून राजारामानेंच कारभार चालवावा.

राजधानीच जिथें धोक्यांत तिथें राज्यकारभाराचें काय! रायगडच्या

वेढ्यांत राजाराम, त्याच्या बायका, संभाजीची बायको येसूबाई आणि पुत्र शाहू ही सगळी सांपडली होती. सारीं चिंतेंत होतीं.

पण एक दिवस येसूबाईच म्हणाली, " तुम्हीं सर्व पराक्रमी सरदारांनीं एकविचारानें चालून राजारामांनीं त्यांचे बायकांसुद्धां बाहेर पडावें. आम्हांस मुलास घेऊन राहण्यास रायगडासारखी सुरक्षित जागा नाहीं. तुम्ही बाहेर पडल्यावर शत्रु तुमचे अंगावर जाईल. तुमचा सर्वांचा एके ठिकाणी पोक्त विचार झाला म्हणजे प्रयत्नें आम्हांस काढून तिकडे न्यावें."

येसूबाईच्या या सांगण्याप्रमाणें करणें राजारामाला तितकेसें बरें वाटलें नाहीं. तरी पण प्रसंग ओळखून तो म्हणाला, " राज्याचे अधिकारी शिवाजी राजे पूर्वीचे तेच हे ऐसें लक्ष ठेवून आम्ही कारभारी आपले आज्ञेंत राहून पूर्वींहून विशेष पराक्रम करून औरंगजेबास जिंकून राज्य रक्षावें ये विषयीं सर्वांची शपथा प्रमाणें व्हावीं."

असें ठरल्यानंतर सर्वांच्या शपथा झाल्या आणि मग ता. ५ एप्रिल १६८९ रोजी राजाराम रायगडावरून प्रतापगडावर गेला.

आणि इकडे रायगडावर काय घडलें ?

मोंगलांचा प्रवेश रायगडावर झाला !

औरंगजेब स्वतः त्या वेळीं कोरेगांव येथें होता. तेथें त्याला जेव्हां कळलें कीं, महाराष्ट्राची राजधानी रायगड आपल्या हातीं आली, तेव्हां त्याला कोण आनंद झाला !! आपण मराठ्यांच्या राजाला पकडून ठार मारलें. राणी येसूबाई आणि राजपुत्र शाहू यास कैद केलें. आतां फक्त एक राजाराम ! त्याला पकडले कीं संपलें मराठी राज्य !! आपल्या ह्यातींत आपण यशाचा परमोच्च बिंदु गांठला. दिल्ली सोडून दक्षिणेंत येऊन वीस वर्षें घालविलीं त्याचें सार्थक झालें. यशाचें शिखर गांठलें.

पण त्याला काय माहीत कीं, आपण यशाचें शिखर गांठलें नसून उलट अपयशाच्या गर्तेत जात आहोंत हें ! महाराष्ट्रावर आपण कधींच संपूर्ण सत्ता गाजवूं शकणार नाहीं हें ! राजारामाला आतां आपण सहज–सहज

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम... सोनेरी शिखरे. दि:
२०४२

पकडूं असें औरंगजेबाला वाटत होतें. पण राजाराम त्याच्या हातीं सांपडणें शक्य होतें का ?

अंहं ! नाहीं – कधींच नाही. कारण राजाराम रायगडाहून पन्हाळगडावर गेला. तेथें मोंगल सैन्याचा वेढा पडतो असें दिसतांच तेथून तो दुसऱ्या गडावर गेला. तेथून तो तिसऱ्या गडावर गेला.

राजाराम इकडून तिकडे, तिकडून इकडे जात होता आणि मोंगल सेनेस खेळवीत होता – नाचवीत होता. त्याला हुलकावण्या देत होता.

औरंगजेबाचें सैन्य महाराष्ट्रभर पसरलें होतें. राजारामाला पकडण्यासाठीं तें धडपडत होतें. त्याला धुंडाळीत होतें.

मोठा आणीबाणीचा प्रसंग होता.

महाराष्ट्रांत सर्वत्रच मोंगली फौजा पसरल्या आहेत. तेव्हां आतां पुढें करावें कसें ! यापुढें महाराष्ट्रांत राहणें धोक्याचें आहे. सुरक्षित अशा ठिकाणीं जाणेंच योग्य आहे.

पण असें सुरक्षित ठिकाण कोणतें ?

जिंजी !

जिंजी येथें मराठ्यांचें राज्य होतें. आज जिंजीला शिवाजीमहाराजांचे जांवई हरजीराजे महाडीक हे प्रमुख होते. तेव्हां तिकडेच जाणें सोईस्कर आणि सुरक्षिततेचें होईल. चला, जिंजीसच जाऊं.

पण जिंजीला जाणें ही गोष्ट सोपी नाहीं. एक तर शेकडों मैल दूर जायला पाहिजे आणि दुसरें असें कीं, मोंगल सैन्य ठिकठिकाणीं टपून बसलेले. तेव्हां या सैन्याच्या डोळ्यांत धूळ फेकून जिंजीस कसें जावें !

जिंजीस कसें जावें याचा विचार करण्यासाठीं रामचंद्रपंत अमात्य, जनार्दनपंत हणमंते, संताजी घोरपडे, मालोजी व बहिरजी घोरपडे, खंडो बल्लाळ वगैरे प्रमुख मंडळी बसली.

त्यांत खंडो बल्लाळानें एक युक्ति काढली कीं, सर्वांनीं मिळून लिंगायत यात्रेकरूंचा वेष घ्यावा व पृथक् पृथक्पणें तीर्थयात्रा करण्याच्या मिषानें



दा. क. १५१८५.

जिजीच्या रस्त्याला लागावें आणि मजल दरमजल करीत इच्छित स्थळीं पोहोंचावें.

ही कल्पना साऱ्यांनाच पसंत पडली आणि मग सारे बैराग्याचा वेष घेऊन जिजीच्या रस्त्याला लागले.

पण या देशप्रेमी लोकांच्या देशभक्तीची कसोटी लागावयाची होती म्हणून म्हणा किंवा या लोकांच्या जिद्दीला अधिक चेव यावयाचा होता म्हणून म्हणा, कांहीं फितूर लोकांमुळें मोंगलांना मराठ्यांच्या या हाल-चालीची बातमी मिळाली !

आणि त्यामुळेंच जागोजागीं हुकूम गेले कीं, ही मंडळी जेथें मिळतील तेथें तिला पकडा आणि ठार मारा.

पण आमचे मराठे गडी–बैरागी यात्रेकरू–असेतसे नव्हते. ते चांगले कसलेले होते. औरंगजेबाला वांकुल्या दाखवून त्याच्या हातावर तुरी देऊन येणाऱ्या शिवाजीमहाराजांच्या तालमींत तयार झालेले होते. शाहिस्ते-खानाला कात्रजच्या घाटांत चकविणाऱ्याचे चेले होते. ते औरंगजेबाच्या सैन्याला थोडेच जुमानतात ! त्यांच्याजवळ थोडच्या का युक्त्या होत्या ! त्यांनीं दोन दोन, तीन तीन जणांच्या टोळ्या केल्या. निरनिराळ्या पंथांच्या यात्रेकरूंचा पेहराव केला आणि ते निरनिराळ्या रस्त्यांनीं जिंजीकडें निघाले. मात्र, रात्रीं ठराविक जागीं, ठराविक वेळीं सर्वांनीं एकत्र जमावें, आपला दिवसभरचा कार्यक्रम सांगावा व पुढील दिवसाचा बेत ठरवावा, असेंहि त्यांनीं ठरविलें. आणि मग ही सर्व मंडळी जिंजीचें अंतर कापूं लागली.

मोंगल सैनिक आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत होतेच. ते राजारामाला आणि त्याच्या सोबत्यांना धुंडाळीत होते. अगदीं डोळ्यांत तेल घालून धुंडाळीत होते. संशयानें अनेकांना पकडीत होते आणि संशय फिटतांच त्यांना सोडूनहि देत होते.

अशीच ही जिंजीकडे जाणारी आपली यात्रेकरू मंडळी एका रात्रीं बंगलोर येथील धर्मशाळेंत एकत्र जमली. त्या धर्मशाळेंत आणखीहि अनेक बैरागी, गोसावी, साधु जमले होते. ठिकठिकाणीं स्वयंपाक चालला होता. कुणी पोथी

वाचीत होते. कुणी नामस्मरण करीत होते. आपल्या या जिंजीच्या बैरागी प्रवाशांनीं आपापला स्वयंपाक वेगवेगळा केला. जेवण केले.

नंतर राजाराममहाराज शौचाहून जाऊन आले. धनाजी जाधवानें पाय धुण्यासाठीं त्यांच्या पायांवर पाणी घातलें आणि दुसऱ्या एकानें त्यांचे पाय धुतले.

हें दृश्य त्या धर्मशाळेंत जमलेल्या इतर बैराग्यांनीं, गोसाव्यांनीं पाहिलें आणि तें आपापसांत कानडी भाषेंत कुजबुजूं लागले–

"काय रे, हे बैरागी असे कसे ?"

"कां असें म्हणतोस तूं ?"

"यांच्यांत धनी आणि नोकर असा भेद दिसतो."

"मराठ्यांचा राजा राजाराम आणि त्याचे साथीदार तर नसतील हे ?"

"असें असेलहि कदाचित्."

"मग उद्यां सकाळीं आपण ही हकीकत जवळच्या ठाणेदाराच्या कानांवर घालूं या का ?"

"हो. सरकारनें तशी दवंडी पिटलीच आहे. इनाम पण आहे यासाठीं."

"उद्यां सकाळीं जवळच्या ठाणेदाराच्या कानीं घालूं या."

खंडो बल्लाळाला कानडी भाषा चांगली अवगत होती. त्यानें त्या बैराग्यांचें बोलणें ओळखलें आणि पुढें काय करावयाचें याच्या विवंचनेंत तो पडला. त्याला जेवणहि गोड लागलें नाहीं. धर्मशाळेंतील सर्व मंडळी झोपली तरी खंडो बल्लाळाला झोपच येईना. तो अस्वस्थ अंतःकरणानें अंथरुणावर एकसारखा तळमळत होता. 'महाराष्ट्रांतून पळालेली मराठे मंडळी तर ही नसावी ना ? मराठ्यांचा राजा राजाराम तर या मंडळींत नसावा ना ?'

हे शब्द खंडो बल्लाळाच्या कानांत एकसारखे घुमत आहेत. धर्मशाळेंतील सारी मंडळीं झोपी गेली आहेत. धर्मशाळा अगदीं शांत – शांत झाली आहे.

आणि खंडो बल्लाळ ? तो – तो बघा ! !

तो हळूच उठला आणि पाय न वाजवितां अगदीं हळूहळू प्रल्हादपंत निराजीजवळ गेला आणि त्यानें हलक्या हातानें प्रल्हादपंतांस जागें केलें.

मग ते दोघे धर्मशाळेच्या बाहेर गेले.

" हं, काय – काय आहे रे ?"

" प्रल्हादपंत, प्रसंग मोठा बाका आहे. आतांच्या आतां धर्मशाळा सोडली पाहिजे. येथें जर सकाळपर्यंत आपण राहिलों तर सर्वच नाश होईल. महाराष्ट्राचा राजा कदाचित् मोंगलांच्या हातीं सांपडेल."

" तूं कशावरून म्हणतोस हें ?"

असें प्रल्हाद निराजी म्हणतांच खंडो बल्लाळानें यात्रेकरूंची 'ती कुजबूज' त्यांच्या कानांवर घातली आणि शेवटीं विचारलें, " काय करूं तें सांगा."

" तुझा काय बेत आहे ?" प्रल्हाद निराजीनें काळजीच्या स्वरांत विचारलें.

त्यावर खंडो बल्लाळ म्हणाला, " मला वाटतें येथून आतांच्या आतां पलायन करावें."

" होय, हाच एक मार्ग आहे. चल, तसेंच करूं या."

आणि मग ते दोघे परत धर्मशाळेंत आले. त्यांनीं आपल्या सोबत्यांना हळूंच जागें केलें. राजाराममहाराजांना उठविलें.

पण अशा मध्यरात्रीं सर्वच मंडळी एकदम बाहेर पडली तर धर्मशाळेंतील इतर बैराग्यांना संशय येईल व मग अनर्थ ओढवेल म्हणून कांहीं मंडळींनीं धर्मशाळेंतच राहावयाचें आणि राजाराममहाराजांसह कांहीं मंडळींनीं ताबडतोब रस्त्याला लागावयाचें असें ठरलें.

आणि त्याप्रमाणें राजाराममहाराजांसह कांहीं मंडळी धर्मशाळेंतून निघालीहि. खंडो बल्लाळ आणि इतर चार-पांच मंडळी धर्मशाळेंतच राहिली.

आणि सकाळ होते न होते तों मोंगल ठाणेदारानें धर्मशाळेला वेढा दिला ! खंडो बल्लाळ आणि त्याच्या बरोबरच्या लोकांना त्यानें चौकीवर नेलें.

" हं, काय ! तुमचे साथीदार कुठें गेले ?"

" ठाणेदारसाहेब, कोणी नाहींत आमचे साथीदार. आम्हीं कापडी यात्रेकरू. रामेश्वरास जातों. धर्मशाळेंत कोणी दहा-पांच आणखी होते ते जिकडे जाणार तिकडे गेले असतील. आम्हांला दुसरीकडे जाणें आहे म्हणून राहिलों."

" नाहीं, हें खरें नाहीं. हरामखोरांनो, बोला, तुमचा राजाराम कुठें आहे ?"

" ठाणेदारसाहेब, आम्ही गरीब यात्रेकरू काशीहून आलों आणि रामेश्वराला जात आहोंत, आम्हांला काय ठाऊक राजाराम कुठचा कोण तो !"

" कुठचा राजाराम आणि कोण राजाराम तो मी तुम्हांला दाखवितों ! चाबकाचे फटाफट फटकारे बसल्याशिवाय तुम्ही खरें सांगणार नाहींत." असें म्हणतच ठाणेदारानें खंडो बल्लाळास आणि त्याच्या साथीदारास चाबकाचे फटाफट फटके मारण्यास सुरुवात केली. आणि तो म्हणूं लागला, " सांगा, अगदीं खरें सांगा – तुम्ही कोण आणि तुमचा राजाराम कुठें आहे ?"

" राजाराम कोण हें नाहीं ठाऊक आम्हांला ठाणेदारसाहेब. आम्ही आहोंत यात्रेकरू. आम्हांला ' राम ' माहीत आहे पण राजारास माहीत नाहीं. नको आम्हांला छळूं. "

" अरे, खरें सांगा. नाहीं तर......नाहीं, तुमच्या डोक्यावर धोंडे ठेवून पायावर फटके मारल्याशिवाय तुम्ही मुळींच कबूल होणार नाहींत आणि खरें कांहींच सांगणार नाहींत. '

असें म्हणून ठाणेदारानें खंडो बल्लाळाच्या आणि त्याच्या साथीदारांच्या डोक्यावर मोठमोठें धोंडे ठेवून पायावर फटाफट फटके मारण्यास सुरुवात केली.

" आतां तरी बोला. उगाच नाहक मरूं नका. बोला, तुम्ही मराठेच ना ? आणि तुमचा राजाराम कुठें आहे ?"

" ठाणेदार, आपण आमचा कितीहि छळ केलात तरी जीवाच्या आशेनें तुम्हांला आम्हीं खोटें कसें सांगावें ! आमचा तुम्हीं कितीहि छळ केलांत आणि हजारदां जरी विचारलेंत तरी दुसरें उत्तर आम्ही काय देणार ? आम्ही कापडी यात्रेकरू क्षेत्रोंक्षेत्रीं फिरतों. जपमाळा विकतों. गंगोदक विकतों. आम्हांला कुठचे मराठे आणि कुठचा राजाराम हें माहीत नाहीं."

" काय हीं माणसें ! डोकीवर दगड ठेविले, फटके मारले – उपाशी ठेविलें तरी दांतीं धरलेले शब्द सोडीत नाहींत अं ! कोण आहे रे तिकडे ? यांना राखेचे तोबरे द्या पाहूं !'

सो...७

"द्या–द्या, राखेचे तोबरे द्या नाहीं तर जीव घ्या. तुम्हीं कांहीं केलेंत तरी जें आम्हांला माहींत नाहीं तें आम्ही कसें सांगणार ?"

"कसें सांगणार ? आतां सांगतां कीं नाहीं तें पाहूं. द्या रे द्या, यांना राखेचे तोबरे द्या."

खंडो बल्लाळास आणि त्याच्या साथीदाराला मोंगल ठाणेदारानें राखेचे तोबरे दिले. तरी पण त्यांचें एकच उत्तर. "आम्ही यात्रेकरू–आम्हांला–राजाराम कोण – काय कांहींच माहीत नाहीं."

आतां मात्र ठाणेदार कांहींसा गंभीर झाला. त्याला वाटलें असावें, नसेल माहीत यांना कांहीं ! असतील हे यात्रेकरू. यांनीं इतका मार खाल्ला, यांचा छळ झाला तरी ज्याअर्थीं हे राजारामाबद्दल कांहींच सांगूं शकत नाहींत त्याअर्थीं हे यात्रेकरूच असतील ! जाऊं द्या यांना. द्यावें सोडून झालें !

"द्या रे द्या सोडून. जाऊं द्या त्यांना. उगाच फुकट वेळ मात्र. गेला"

असें ठाणेदारानें सांगतांच खंडो बल्लाळ आणि त्याचे साथीदार यांस सोडून देण्यांत आलें.

स्वराज्यासाठीं–स्वातंत्र्यासाठीं, स्वतःच्या राजासाठीं महाराष्ट्राच्या या शूर पुत्रांनीं किती हा छळ सोसला ! किती ह्या यातना सहन केल्या! प्राणाच्या आशेनें जर का महाराष्ट्राच्या राजाबद्दल–राजारामाबद्दल माहिती ठाणेदारास दिली असती तर ?

तर महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्राचें वैभव, महाराष्ट्राची संस्कृति...हीं सारी धुळीस मिळालीं असतीं. पण मराठ्यांनीं – महाराष्ट्राच्या शूर पुत्रांनीं–प्राणापेक्षांहि आपला देश, आपला राजा मोलाचा मानला म्हणूनच महाराष्ट्राच्या वैभवांत पुढें किती तरी भर पडली. महाराष्ट्र सर्वतोपरी घाटदार बनत गेला.

महाराष्ट्राचें वैभव वाढविण्यास महाराष्ट्रांतील साऱ्यांचेच हात लागत होते. कुणाचे उघडउघड तर कुणाचे लपूनछपून, गुप्तपणें. इतकाच काय तो फरक.

आणि त्यामुळेंच राजाराम जिंजीस पोहोंचतांच त्यानें तेथें राज्याची नीट घडी बसविण्यास सुरुवात केली. राज्याचा कारभार व्यवस्थित चालू केला.

छत्रपतिपद व राजचिन्हें धारण केलीं. मात्र त्यानें राज्याभिषेक समारंभ करून घेतला नाहीं. याचें कारण असें कीं, राजारामास वाटत होतें कीं, "चिरंजीव शाहू कालेंकरून तरी श्री देशीं आणील. शाहू सर्व राज्यास अधिकारी. आम्ही करतों तें तरी त्यांच्यासाठींच आहे. प्रसंगास सर्व लोकांस त्यांजकडेच पाहणे आहे. हें कारण ईश्वरेंच नेमिलें आहे.

राजाराम आपल्या पुतण्याचें, शाहूचें राज्य सांभाळीत होता. शाहू आणि येसूबाई औरंगजेबाच्या कैदेंत होतीं.

तसें पाहिलें तर राजारामाची धावपळच चालली होती. गनिमी काव्यानें त्यास मोंगलांशीं तोंड द्यावें लागत होतें. मोंगली फौज अफाट! तिच्यापुढें एके ठिकाणीं तळ देऊन समोरासमोर उभे राहून तलवारीला तलवार भिडवणें मराठ्यांना शक्य नव्हतें. म्हणून 'मराठे यांनी आज ये ठायीं तर उद्यां वीस–पंचवीस कोसांवर जावें, पुन्हा भर्रकन् एकत्र जमून छापा घालावा. कित्येकदां लढाई देऊन लुटून पळून जावें. कधीं शत्रूची रसद मारावी. पातशहाचीं ठाणीं असतील तीं उठवावींत. आपलें नाकें, जागा, किल्ले कोट यांस दिलभरंवसा देऊन खुद्द पातशहाचा मुक्काम असेल तेथें छापा घालावा. मुलूख मारावा. हत्ती, घोडें, उंट पळवावे. एखादें ठाणें बळकावून झाडीचे आश्रयानें छावणीस राहावें. मोगल फौजांना अडवावें. लढाई करावी. प्रसंग पडल्यास लुटावे.'

मराठ्यांच्या या लढाईच्या रीतीमुळें मोंगलांस एवढी दहशत बसली कीं, मोंगल सैनिक झोपेंतहि ओरडत – मराठें आले! मराठे आले!!

मराठ्यांची 'गनिमी काव्याची' लढाई हें महाराष्ट्राचें वैशिष्ट्य शिवाजी-महाराजांपासून जरी होतें तरी राजाराममहाराजांच्या कारकीर्दीत तिला फार महत्त्व आलें. या गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचें फार छान वर्णन एका इतिहासकारानें केलें, तें असें कीं —

"मराठ्यांचें सामान म्हटलें म्हणजे थोडीशी कांदाभाकरी व एक घोंगडी एवढें काय तें असे. रात्रीं कोठें उतरलें तर ते घोड्याचे लगाम हातांत धरूनच घोंगडी पसरून त्यावर कांही वेळ अंग टाकून राहत. त्याचप्रमाणें

दिवसा दोन प्रहरीं कांहीं खाण्याकरितां किंवा ऊन टाळण्याकरितां ते उतरले म्हणजे पांच-पांच, सहा-सहा जणांत एखादें झाडझूड जवळ असलें तर त्याच्या छायेखालीं उतरत. परंतु उघडें मैदानच असलें तर ते जमिनींत भाले रोवून त्यांस ते आपले घोडे बांधून भाल्याचे टोकावरून एखादी घोंगडी आडवी पसरून देत व तिच्या लहानशा छायेंत फक्त डोकीं ठेवून बाकी सर्व अंगास दुपारचें जबर ऊन लागत असतांहि जमिनीवर घोरत पडलेले आढळत. आपल्या तलवारीस मात्र ते कधीं विसंबत नसत. ते ती कुशीशीं ठेवीत. त्यांच्याजवळ उंट, बैल वगैरे नसून फक्त लहान, खुजीं, चपळ, काटक अशीं तट्टें असत. मिळालेली लूट त्यांवर लादून ती ते फार जलदीनें लांबवीत."

मराठ्यांची गनिमी काव्याची युद्धपद्धति हें एक महाराष्ट्राचें वैशिष्टय होतें. आणि या वैशिष्टयामुळें अफाट शक्तीच्या मोंगल बादशहास मराठ्यांनीं दातीं तृण धरावयास लाविलें.

राजाराम जिंजीस गेला. त्यानें तेथें छत्रपतिपद आणि राजचिन्हें धारण केलीं. महाराष्ट्राचा राज्यकारभार व्यवस्थित सुरू केला—सारा जम बसविला खरा, पण थोड्याच दिवसांत जिंजीसहि मोंगलांनीं वेढा दिला !

आतां राजारामाला तेथें राहणें अशक्य झालें आणि त्यामुळेंच नाना युक्त्याप्रयुक्त्या करून तो जिंजीहून निसटला आणि वेलोरला गेला.

तिथेंहि मोंगलांचें सैन्य पाठीवर !

राजारामाची धांवपळ सुरू झाली होती. तो या किल्ल्यावरून त्या किल्ल्यावर, त्या किल्ल्यावरून त्या किल्ल्यावर जात होता. मोंगल सैन्याला चकवीत होता. वेळप्रसंग साधून मोंगलांवर हल्ले चढवीत होता.

असें करतां करतां तो शेवटीं सिंहगडावर आला. आणि थोड्या दिवसांच्याच आजारानें ता. २ मार्च १७०० रोजीं मृत्यु पावला.

आणि मग पुढें ?

# तयारीचें शिंग करा

## ८

" ऐकलें का रे ? "

" काय ? "

" आपले राजाराममहाराज मृत्यु पावले. "

" होय बाबा, ही दुःखद बातमी ऐकली खरी. "

" आणि दुसरें काय ऐकलेंस का ? "

" काय ? "

" आपले शाहूमहाराज दिल्लीहून येत आहेत. "

" खरं ? आपले शाहूमहाराज ? "

" होय, शाहूमहाराज. संभाजीमहाराजांचे पुत्र. औरंगजेबाच्या कैदेंत होते ना, ते ! "

" चांगली बातमी सांगितलीस. "

शाहूमहाराज आले ही आनंदाची बातमी साऱ्या महाराष्ट्रांत पसरली. आपला धीराचा राजपुरुष आला याचा आनंद सगळ्यांनाच झाला.

महाराष्ट्राच्या गादीविषयींचे आणि मराठे सरदारांचे आपसांतील मतभेद सोडले तर राजारामाच्या मृत्यूनंतर महाराष्ट्र खचला नाहीं. तर तो शाहूच्या कारकीर्दीतहि पूर्वीच्याच जोमानें, पूर्वीच्याच हिरीरीनें मोंगलांशीं

सामना करण्यास छाती पुढें काढून उभा राहिला. शाहूमहाराजांचें आजपर्यंतचें सारें आयुष्य जरी औरंगजेबाच्या कैदेंत गेलें होतें तरी त्यानें औरंगजेबाचें राजकारण पाहिलें होतें. स्वतः तलवार हातीं घेण्याची त्याची जशी तयारी होती, तशीच मुत्सद्देगिरीनें एखादें काम कसें पार पाडावें याची त्याला चांगली माहिती होती, तो साताऱ्च्या गादीवर आल्यानंतर त्याला अनेक भलीबुरीं माणसें भेटलीं. अनेक सरदारांनीं त्याला बऱ्यावाईट गोष्टी सांगितल्या. तरी पण तो थोर पुण्यश्लोक स्वतःच्या विचारानेंच वागला. त्यानें अत्यंत धूर्तपणें आपला पेशवा बाळाजी विश्वनाथ यास इ. स. १७१३ सालीं नेमिलें.

शाहूच्या कारकीर्दींत महाराष्ट्राचा दरारा सगळीकडेच बसला. निजामच काय पण दिल्लीचा बादशहाहि मराठ्यांना वचकून वागूं लागला.

बाळाजी विश्वनाथ पेशव्यानंतर त्याचा मुलगा बाजीराव यास शाहूनें आपला पेशवा नेमिलें.

बाजीराव तर फारच पराक्रमी. पराक्रमाचा पुतळा. त्यानें दिल्लीपर्यंत झेप घेतली. मराठी राज्य नुसतें सांभाळलेंच नाहीं तर तें वाढविलें, बंगालपर्यंत जाऊन चौथाई, सरदेशमुखीचा वसूल केला. तो एकदां साताऱ्यास शाहूच्या दरबारीं म्हणाला होता, " निजाम, नबाब इत्यादि लहान लहान सत्ताधीशांशीं भांडत बसण्यापेक्षां एकदम दिल्लीचाच रोख धरला पाहिजे. कारण मूळच उपटलें कीं फांद्या आपोआपच खालीं येतात."

आणि याच उद्योगाला तो लागला होता. त्यानें इ. स. १७२९ सालीं बुंदेलखंडाचा छत्रसाल यास जी मदत केली ती याच दृष्टीनें.

छत्रसालावर महंमदखान बंगष यानें स्वारी करून बुंदेलखंड मिळविण्याचा जेव्हां प्रयत्न केला तेव्हां छत्रसालानें बाजीरावाजवळ मदतीची मागणी केली. आणि ही मदतीची मागणी बाजीरावानें मोठ्या आनंदानें मान्य केली. तो स्वारीच्या तयारीला लागला. त्यानें हुकूम केला—

" तयारीचें शिंग करा. स्वारीची सूचना द्या. गोंविदा, गंगाजळांत आतां तांब्या बुडवूं नकोस. आम्हांला स्नान करीत बसण्यास वेळ नाहीं."

" पण... श्रीमंत... "

" काय म्हणणें आहे पुरंदरे ?"

" स्नानसंध्या, पूजाअर्चा, भोजन वगैरे सारें...."

" छे छे ! आतां कांहीं नाहीं. आतां छत्रसाल राजाची मुक्तता करून आल्याशिवाय पुण्यास आमचें स्नान नाहीं. पूजाअर्चा नाहीं आणि भोजनहि नाहीं. दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर मात करूं पाहणाऱ्यांचें पारिपत्य करणें हें आपलें पहिलें कर्तव्य. पुरंदरे, छत्रसालानें पत्रांत काय लिहिलें आहे ?"

"श्रीमंत, छत्रसाल पत्रांत लिहितो कीं, 'क्षणाचाहि विलंब न लावतां माझ्या राज्याची व माझी महंमदशा बंगषापासून मुक्तता करावी. हा वृद्ध व चिंताग्रस्त राजा पत्रद्वारें मदतीसाठीं तुम्हांकडे आला आहे.' "

" अस्सं ! तर मग बुंदेलखंडाच्या स्वारीच्या तयारीला लागा. "

" श्रीमंतांची आज्ञा ! पण... श्रीमंत...."

" आणखी काय म्हणणें आहे ?"

" सातारला महाराजांना ही बातमी कळविली पाहिजे. "

" होय. महाराजांस ही बातमी कळविली पाहिजे. पुरंदरे, नेहमींच्या रिवाजाप्रमाणें सारें कांहीं महाराजांस स्वाराबरोबर आतांच कळवा. मला स्वतःच महाराजांच्या दर्शनासाठीं आणि आज्ञेसाठीं जाणें उचित होतें. पण बुंदेलखंडाकडे जाण्यास विलंब होणें उपयोगी नाहीं. तुम्ही जा आतां, आणि तयारीचें शिंग करा. आम्हीहि तयारीला लागतों. "

बाजीराव बल्लाळ ऊर्फ पहिले बाजीराव पेशवे हे पुण्यांतील आपल्या वाड्याच्या मागील चौकांत स्नानास बसले होते. गोविंदा शागीर्द गंगाजळां-तील पाण्यांत तांब्या बुडवून बाजीरावांच्या हातीं देत होता आणि बाजीराव आपल्या डोकीवर तो ओतीत होते.

इतक्यांत पुरंदरे दिवाण एक मोहोरबंद लखोटा घेऊन तेथें आले. तेव्हां त्या दोघांत वरीलप्रमाणें बोलणें होऊन बाजीराव पेशवे बुंदेलखंडाच्या स्वारी-वर तावडतोब निघाले.

बाजीराव पेशवा म्हणजे आधुनिक द्रोणाचार्य ! शिवाजीमहाराजांनंतर बाजीरावाइतका शूर योद्धा, राजकारणी पुरुष भारतांत झाला नाहीं. निकोप शरीरप्रकृति, पिळदार शरीर, पाणीदार चेहरा आणि धीराचा पुतळा ! घोड्यावरची मांड तसूभरहि ढळूं न देतां घोडा तीरासारखा दवडण्यांत पटाईत. भाला फेकणें, बंदुकीनें नेमकें निशाण टिपणें वगैरे लढाईचीं अंगेंप्रत्यंगें बाजीरावाच्या अगदींच अंगवळणीं पडलीं होतीं. योद्ध्यांत योद्धा, आणि राकारणांत राजकारणी ! बाजीरावानें आजपर्यंत किती तरी लढाया मारलेल्या होत्या आणि विजयश्री मिळविलेली होती.

आणि आजहि विजयश्रीसाठींच बाजीराव नव्या कामगिरीवर निघालेला आहे. तो आपल्या सात-आठ विती उंची घोड्यावर स्वार झाला आहे. त्याच्या डोकीस शिरस्त्राण असून त्यावर फेटा गुंडाळलेला आहे. अंगांत चिलखत असून त्यावर शिलेदारी बाण्याचा रूदार अंगरखा आहे. कंवरेस समशेर आणि जंबिया आहे.

बाजीराव बुंदेलखंडाच्या छत्रसालाच्या मदतीला निघाला. महंमदशहा वंगषशीं दोन हात करून छत्रसालचें स्वातंत्र्य टिकविण्याला निघाला ! छत्रसालकडून मदतीच्या याचनेचा खलिता हातीं पडतांच त्यानें प्रतिज्ञा केली होती कीं, ' बंगषाचें पारिपत्य करून छत्रसालचें राज्य त्याच्या स्वाधीन करीन आणि जेव्हां पुण्यास येईन तेव्हांच पुण्यांत भोजन करीन. तत्पूर्वीं नाहीं. '

बाजीरावाची प्रतिज्ञा म्हणजे भीष्मप्रतिज्ञा ! ती शेवटास जायचीच. या प्रतिज्ञापूर्तीसाठीं बाजीराव निघाला.

शिंग फुंकलें गेलें. तुताऱ्या वाजूं लागल्या. नौबती झडूं लागल्या.

पेशव्यांचें सैन्य निघालें. उंट, हत्ती, घोडेस्वार, पायदळ...तोफखाना' बैलगाडे.... सैन्य निघालें.

बाजीरावानें मधेंच घोडा उभा करून एका सेनापतीस विचारलें, "बातमीचे लोक गेले ना ?"

"होय श्रीमंत, ते बरेंच अंतर चालूनहि गेले असतील."

"ठीक आहे. आपली एकंदर फौज ?"

" साठ हजार ! "

" अस्सं. जरीपटक्याचा हत्ती ? "

" जरीपटक्याच्या हत्तीबरोबर वीस हजारांचें पथक आहे. श्रीमंतांनीं लावून दिलेली सैन्यपद्धतीच याहि वेळीं आहे. "

सेनापतीचें हें बोलणें ऐकून बाजीरावानें स्मित केल्यासारखें केलें आणि घोड्याला टांच दिली.

पेशव्यांचा सेनासागर पुणें पार झाला. संगमाच्या किती तरी दूर गेला. सबंध दिवसभर चालला. त्यानें पहिल्याच दिवशीं जवळजवळ दहा कोस मजल गांठली. आणि जेव्हां अगदीं संध्याकाळ झाली तेव्हां एका विस्तीर्ण मैदानावर सैन्यानें आपला तळ ठोकला.

सैन्याचा तळ म्हणजे एक लहानसें शहरच. कुणीं इथें तर कुणीं तिथें तंबू ठोकले आहेत. कुणी उघड्यावरच एका खुंटीला आपलें घोडें बांधून शेजारींच कांदा-भाकर खात बसले आहेत. कुणी आपल्या घोड्याला दाणापाणी देत आहे, तर कुणी विसांवा घेत गप्पागोष्टी करतां करतां गुडगुडी ओढीत आहेत. त्या तिकडे घोड्यांचें खिकाळणें चाललें आहे. या इकडे हत्तींच्या गळ्यांतील घंटा किणकिणत आहेत.

खुद्द खासा स्वारीचे दोन रणतंबू होते. 'दलबादल' म्हणून ते ओळखिले जात. हे तंबू याहि वेळीं स्वारीबरोबर होतेच. ते सैन्याच्या तळापासून जवळच थोड्या अंतरावर ठोकण्यांत आले होते आणि त्यासभोंवतीं पहारा ठेवण्यांत आला होता.

बाजीरावानें प्रथम घोड्यावरूनच तळाची पहाणी केली. सारी व्यवस्था नीट आहे कीं नाहीं याची खात्री करून घेतली आणि मगच तो आपल्या तंबूजवळ आला.

त्याबरोबर एक नोकर झटकन् पुढें आला. बाजीराव म्हणाला, " जा तूं. आपली शिधासामग्री सोड. सोड जा."

आणि आपण घोड्यावरून उडी टाकली. घोड्यावरील खोगीर स्वतःच उतरलें. घोडा ठाणबंद केला आणि मग बाजीराव आपल्या तंबूंत गेला.

नंतर कांहीं वेळानें आपलें भोजन केलें.

या वेळपर्यंत बहुतेक सैनिकांचें जेवणखाण आटोपलें होतें. आणि चार दोन–चार–दोन सैनिक एके ठिकाणीं बसून गप्पागोष्टी करीत होते. त्यांच्या ह्या गप्पा म्हणजे लढाईच्याच हकीकती ! सैनिकांच्या पराक्रमाची उजळणी. आपल्या धन्याच्या थोर अंतःकरणाचीं उदाहरणें आणि त्याच्या पराक्रमाचीं वर्णनें.

कुणी आपल्या धन्याची आपणाला अधिकांत अधिक माहिती आहे हें दाखविण्यासाठीं बाजीरावाविषयीं जुन्यांत जुनी माहिती सांगत होता, तर कुणी पूर्वजांच्या पराक्रमाची माहिती अगदीं तिखटमीठ लावून सांगत होता.

कुणी म्हणे, "काय बारगीर, अरे तूं सैन्यांत दाखल झाला नव्हतास तेव्हांची गोष्ट.–आपल्या शाहूराजानें सातारला फार मोठा दरबार भरवला आणि आपल्या बाजीराव धन्याला पेशवा केला. जरीचीं मोठमोठीं कापडं दिलीं. सोन्या-मोत्याचे कसले दागिने दिले. मी त्या दरबारला हजिर होतों."

"तूं ? हजिर होतास ?"

"मग मी काय खोटं बोलतों ? पाहिजे तर शपथ घेऊन सांगतों. मग तुला पटल कीं नाय? अरे, मी त्या दरबारला हजिर होतों. दरवाजाबाहीर उभा राहून समदं पहात होतों. ऐकत होतों. मीं समदं पाहिलं–समदं ऐकलं. आपल्या धन्यानें भाषण केलं तें पण मी या कानांनीं ऐकलं."

"खरंच ?"

"मग ! मी काय खोटं सांगतों कीं काय !"

"काय भाषण केलें आपल्या धन्यानें ?"

"भाषण होय ? भाषण असें केलें कीं, माझ्या कुडींत प्राण असेपर्यंत मी सातारच्या या गादीशी बेइमान होणार नाहीं आणि शत्रूचा नायनाट केल्याशिवाय राहणार नाहीं. प्रजेच्या कल्याणासाठीं सदासर्वकाळ प्रयत्न करीन."

"पुढें रे काय झालें ?"

"अरे, बाजीराव धन्याचें हें भाषण ऐकून आपले शाहूमहाराज अगदीं खूष झालें बघ ! त्यांनीं बाजीरावास जरीचा पोशाख दिला. मोत्याचा हार

दिला. आणखी काय काय दिलें मला समदं नाहीं आठवत. पण मीं हें सारें डोळे भरून पाहिलें आणि त्याच मुहूर्ताला ठरविलं कीं, आपले पुढचे दिवस सैन्यांत काढायचे. सरदारा, सांग बघूं मला तलवार हातीं धरल्याला किती वर्षं झालीं असतील तें ? "

"झालीं असतील दोन नाहीं तर तीन वर्षं."

"हट् लेका ! अरं, वर्षं झालीं दहा. हा सरदार दहा वर्षं लढतो आहे. पराक्रम करतो आहे."

या इथें ह्या अशा प्रकारच्या गप्पा चालल्या आहेत, तर त्या ठिकाणीं एक जुना सैनिक आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगत आहे.

"हं, मग पुढें काय झालें दौलती तें सांग ना ! "

"सांगतों–सांगतों. असे उतावळे कां होतां ? बरं, मी मघाशीं कुठपर्यंत आलों ?... हं, आपल्या धनाजी जाधवानें...."

श्रीमंत बाजीराव पेशव्यांच्या तंबूंत याच वेळीं निवडक सरदार जमले असून बुंदेलखंडाच्या लढाईची पुढील योजना ठरवीत आहेत.

बोलतां बोलतां बाजीराव म्हणाला, "सैन्य कूच करीत असतांना त्याचा आजूबाजूच्या गांवास उपद्रव न पोहोंचेल ह्याबद्दल प्रत्येकानें काळजी घ्या. माझे शूर सैनिक उत्साहाच्या भरांत आगळीक करणार नाहींत अशी दक्षता घ्या. पीकपाण्याची नासधूस होऊं देऊं नका. कुणास उपद्रव न पोहोंचेल असें वागा. लूटमार करूं नका. मोबदला दिल्यावांचून कुणाचें कांहीं घेऊं नका. असें सर्वांस कळवा."

"श्रीमंतांच्या मनीं असा किंतु न यावा. या बाबतींत योग्य ती खबरदारी घेण्यांत कसूर होणार नाहीं. मराठी सैन्याला बट्टा लागेल असें होणार नाहीं."

असें आश्वासन बाजीरावास सरदार मंडळीनें दिलें, तेव्हां त्यांनीं हास्य केलें. थोडा वेळ स्तब्ध राहिले, आणि मग त्यांनीं विचारलें, "माळव्यांत अप्पा आणि मल्हारराव होळकर आहेत, त्यांना आम्ही बुंदेलखंडांत प्रवेश करीत असल्याचा लखोटा रवाना झाला ना ? आणि आम्ही तेथें पोहोंचतांच आम्हांला येऊन भेटा असें त्यांत लिहिलें आहे ना ?"

"श्रीमंतांच्या मोहोरेचा लखोटा आपण स्वारीस निघतांच सांडणीस्वाराच्या हातीं दिला."

अशा प्रकारें पुढील योजनेच्या मसलती होत असतांच पहांट झाली आणि पुढील कूच करण्याच्या इशाऱ्याचें शिंग वाजलें.

आणि त्याचबरोबर प्रत्येक सैनिक चटकन् तयारीला लागला. थोड्याच वेळांत सारें आटपून निघण्याच्या सूचनेचें शिंग होतांच सारे सैनिक वाट चालूं लागले.

रात्रीं हजारों सैनिकांनीं व्यापलेला तळ क्षणार्धांत मोकळा झाला.

पेशव्यांचें सैन्य बुंदेलखंडाच्या दिशेनें चालत होतें. मजल दरमजल करीत सातपुडा, कासारघाट, अजिंठयाचा घाट, सप्तशृंगी, विंध्याद्रि इत्यादि अवघड वांकड्यातिकड्या वाटेनें चढ उतार–चढ उतार करीत वेड्यावांकड्या वळणावळणानें चाललें होतें.

कितीतरी खडतर वाट ! फार कष्टदायक !!

पण मराठी सैन्याला त्याची पर्वा नव्हती. महाराष्ट्राच्या इभ्रतीसाठीं, दयेची याचना करणाऱ्याच्या मदतीसाठीं, आपल्या धन्याच्या कीर्तीसाठीं, मराठी सैनिक वाटेल तें करण्यास आनंदानें तयार होते. त्यांना श्रम जाणवत नव्हते. कष्ट वाटत नव्हते. त्यांच्या डोळ्यांसमोर एकच होतें – फक्त बुंदेलखंड. त्यांना एकच दिसत होता – महंमद बंगष. रानावनांतून, दगडधोंड्यांतून, तापी नदीच्या किनाऱ्या किनाऱ्यानें, मराठी फौज सळसळत्या रक्तानें चालली होती. महंमद बंगषाच्या शिकारीला. ही शिकार साधली कीं सारे श्रम कारणीं लागले. ही शिकार साधली कीं बस्स !

मराठी सैन्य वाटेंत ज्या ज्या ठिकाणीं विश्रांतीसाठीं थांबे त्या त्या वेळीं सैनिकांच्या बोलण्याचा विषय एकच – बुंदेलखंडांत जाऊन महंमद बंगषाचा नक्षा उतरवायचा ! आपल्या धन्यापुढें,– श्रीमंत थोरल्या बाजीरावांपुढें महंमद बंगष म्हणजे सिंहापुढें बकरी !

आजहि सैन्याचा तळ एका मैदानावर पडला आहे. रात्रीची वेळ आहे. जनावरांच्या पुढ्यांत दाणावैरण पडली आहे. सैनिकांचें शिधापाणी झालें

आहे. कुणी सैनिक घोंगडीवर आडवा होऊन घोरतो आहे तर कुणी अर्धवट झोपेच्या गुंगींत आहे. कुणी इतक्या रात्रींहि चिलीम ओढतो आहे आणि मधूनमधून खोकतो आहे.

ते त्या तिकडे तीन-चार सैनिक हळूहळू गप्पागोष्टी करीत आहेत.

कसल्या गप्पागोष्टी होत्या त्या ?

ऐका तर खऱ्या !

" दौलतराव, आपल्या धन्याच्या तलवारीचें पाणी कांही न्यारेंच आहे, नाहीं का रे ? "

" कशावरून म्हणतोस तूं मल्हारीदादा ? "

" हं हं, अरे आपल्या धन्याला सगळे शत्रु चळचळ कांपतात. तो निजाम आहे का तुला ठाऊक ? नाहीं ? मला चांगला ठाऊक आहे. त्याला म्हणजे त्या निजामाला आपल्या धन्याचा पराक्रम ऐकून माहीत होता, पण त्यानें कधीं आपल्या धन्याला पाहिलें नव्हतें ! त्याला नेहमीं वाटे, बाजीराव बाजीराव म्हणतात, तो पराक्रमी पुरुष दिसतो तरी कसा तें पाहावें. आणि एक दिवस निजामउलमुलकानें..."

" मल्हारीदादा, निजामउलमुल्क कोण रे ? "

" अरे निजाम, मी मघांपासून निजाम – निजाम म्हणतों तो. "

" बरं, मग त्यानें काय केलें ?"

" त्यानें बाजीरावाची 'तसबीर' काढून आणण्यासाठां एक नामांकित चितारी पाठविला. चिताऱ्यानें बाजीरावाचें कुठें तरी संधी साधून चित्र चितारलें, पण तें कांही नीट उतरलें नाहीं.

" निजामउलमुल्कला तर बाजीराव कसा दिसतो हें पाहण्याची फारच इच्छा ! त्यानें चिताऱ्याला सांगितलें, तूं कशीहि संधि साध. पण त्या शूर मराठ्याचें चित्र काढून आण. "

" मग निजामाच्या चित्रकारानें बाजीराव माळव्याच्या स्वारीवर जात असतां चित्र काढलें तें असें –"

" सात आठ विती उंचीच्या खंद्या सारंगा घोड्यावर बाजीराव बसलें

आहेत. भाला अंगाशीं धरला आहे. जोंधळ्याचीं कणसें हातावर चोळून खात खात चालले आहेत. डोईस शिरस्त्राण आहे. त्यावर फेटा गुंडाळलेला आहे. अंगांत चिलखत व त्यावर शिलेदारी बाण्याचा रूदार अंगरखा आहे. तुमान घातली आहे. कंबरेस नंगी समशेर व जंबिया आहे. दवासन व मेरखा तोबऱ्यांत भरून तो बरोबर बांधून घेतला आहे."

"अशी तसबीर चिताऱ्यानें काढली आणि ती निजामाला नेऊन दाखविली !"

"मग काय, निजाम अगदीं चकितच झाला असेल ?"

"दौलती, अरे ह्याच निजामाला आपल्या श्रीमंतांनीं नाकदुऱ्या काढायला लावल्या ना ! तुला नाहीं का रे माहीत ?"

"अंहं."

"तूं नव्हतास त्या लढाईस ?"

"नव्हतों मी."

"हां हां, नसशील, नसशील ! तूं बारगिरांत राहिलास त्याला दोन वर्षें झालीं नाहीं का ? मग ती लढाई अगोदर झाली. चार वर्षें–हो, चारच वर्षें झालीं तिला ! लढाई म्हणजे लढाईच !"

"इतकी मोठी लढाई ?"

"हं ! इतकी मोठी !! राम-रावणाचीसुद्धां इतकी मोठी लढाई झाली नसेल."

"मल्हारीदादा, म्हणजे कशी काय लढाई ?"

"अरे, झालें काय तें आधीं सांगतों तुला. पूर्वींपासून काय चाल होती, एक तर तो निजामउल्मुल्कराजा आपल्या शाहूमहाराजांना हैदराबादच्या मुलखाच्या उत्पन्नाची चौथाई देई आणि देशमुखी देई."

"मल्हारीदादा, चौथाई आणि देशमुखी म्हणजे रे काय ?"

"दौल्या, लेका मराठ्यांच्या सैन्यांत राहून तलवारीला तूं उगाच शिवलास ! तुला चौथाई आणि देशमुखी म्हणजे काय, हें ठाऊक नसावें ! झालास कशाला बारगीर ! मला कसें माहीत आहे बघ ! बरं, आतां सांगतों तें नीट ध्यानांत ठेव. –चौथाई म्हणजे जें उत्पन्न होईल त्याचा चौथा

हिस्सा आणि देशमुखी म्हणजे जें उत्पन्न येईल त्याचा दहावा हिस्सा. पण तें जाऊं द्या. मी काय सांगत होतों, तर निजाम शाहूमहाराजांना हैदराबादच्या मुलुखाची चौथाई आणि सरदेशमुखी देत असे. पण त्याला काय बुद्धि सुचली कोण जाणे ! त्यानें एक वर्ष ही खंडणी देण्याचेंच नाकारलें."

"मग पुढें ?"

"सांगतों कीं ! पण तें घोडें का रे खिकाळलें बघ – बघ जरा उठून."

दौलती उठला आणि घोड्याजवळ जाऊन म्हणाला, 'उगाच मरतें हाय् !' आणि मग त्यानें घोड्याच्या पाठीवर थाप मारली व तो परत जाग्यावर येऊन बसत म्हणाला, "हं, मग पुढें ?"

'सांगतों – तर पुढें असें झालें, त्या वर्षीं निजामानें कांहींतरी कारण सांगितलें आणि वसुलीचा पैका दिला नाहीं. मग निजामावर बाजीराव धन्यानें केली स्वारी ! आणि मग काय सांगूं तुला गड्या ! जी काय लढाई झाली. तूं पाहिजे होतास त्या लढाईला. निजामाचें सैन्य असें कोंडलें – असें कोंडलें कीं, त्याला पाण्याचा थेंब मिळेना कीं उत्पन्नाचा कण मिळेना. दाणावैरणीचें तर नांवच नको. निजामाचें सैन्य अन्नपाण्यावांचून किती दिवस काढणार ! शिवाय आमच्याकडून बंदुकीच्या गोळ्यांचा मारा !

सरतेशेवटीं निजाम वठणीवर आला. आणि मग काय, शरण आला कीं रे ! आतां पैका देतों आणि पुढें पण देत राहीन असें म्हणाला. अगदीं त्यानें चक्क कळविलें कीं, 'आम्ही शरण आलों आहोंत. आम्हांला जीवदान द्या. आपण सांगाल तसा तहनामा लिहून देतों.'

आणि पुढें काय ! त्यानें तसें लिहून दिलंन्. अगदीं सपशेल शरण आला. दौलती, मी–मी होतों बरं का या लढाईला ! असा लढलों–असा लढलों, काहीं विचारूं नकोस लेका !

पण पुढें काय झालें तें नाहीं ऐकलंस. अरे, निजाम शरण आला. त्याची गुर्मी साफ उतरली. मग श्रीमंत बाजीरावांनीं वेढा उठविला.

आणि मग निजामाची आणि श्रीमंत बाजीरावांची भेट झाली. निजामानें

मोठा दरबार भरविला. आपल्या श्रीमंतांना मेवामिठाईची मोठी मेजवानी दिली. भरजरी पोशाख दिला.

मग आमच्या धन्यानें–श्रीमंतांनीं पण निजामाला बडा खाना दिला. बारगीर, मी होतों हं त्या लढाईंत. मीं खूप मर्दुमकी गाजविली. चार वर्षें झालीं या गोष्टीला. ( १७२८ सालची ही गोष्ट. )

" मल्हारीदादा, आतां पण तसेंच लढणार ना बुंदेलखंडांत ?"

" हें काय विचारणें झालें तुझें दौलती ? का माझी थट्टा करतोस? मी नाहीं हटायचा कधीं. बरं, बरीच रात्र झाली. सकाळींच उठलें पाहिजे. चल, जरा अंग टाकूं या. "

असें म्हणून ते झोपी गेले.

अशा प्रकारें बाजीरावाचें सैन्य बुंदेलखंडानजीक येऊन पोहोंचलें.

आणि पुढील हालचाली करण्यापूर्वीं सैन्याचा तळ एका ठिकाणीं पडला. बाजीरावाचा 'दलबादल' तंबू जवळपासच होता. तंबूंत बाजीराव कोणाशीं तरी लढाईबद्दलच चर्चा करीत होते. तंबूसभोंवतीं पहारा होता. तंबूच्या आंत हुजुरांच्या हुकुमाशिवाय कोणास येऊं देऊं नकोस असा पहारेकऱ्यास सक्त हुकूम होता.

पहारेकरी पहारा करीत होता–सक्त पहारा करीत होता. तर एक मुसलमानी पद्धतीचा पेहराव केलेला, दाढी राखलेला शिपाईगडी आला आणि मोठ्या अदबीनें म्हणाला, " मला श्रीमंत पेशव्यांची भेट घ्यायची आहे. "

" नाहीं, श्रीमंतांची भेट व्हायची नाहीं. "

" कां ?"

" श्रीमंत पेशव्यांचा मला तसा हुकूम आहे. "

" तसा म्हणजे कसा ?"

" कुणालाहि तंबूंत पाठवूं नकोस."

" पण मला..."

" तूं कोण ? आणि तूं कुणाचा शिपाई ? निजामाचा, महंमद बंगषाचा का दुसऱ्या कुणाचा ? जा, जा. इथें वाटेल त्याला पेशव्यांची भेट होत नाहीं. नीघ इथून, नाहीं तर कैद तरी होशील नाहीं तर फुकट तरी मरशील. "

" बारगीर, मी कुणा मुसलमानाचा शिपाईगडी नाहीं – आणि मुसलमानहि नाहीं. हें बघ, हें बघ."

असें म्हणतच त्या शिपायानें पहारेकऱ्यास आपले कान दाखविले.

" हं, तुझे कान टोचलेले आहेत खरे." असें म्हणत पहारेकऱ्यानें त्या शिपायाकडे निरखून पाहिलें. थोडा वेळ त्यानें विचार केला; आणि मग तो म्हणाला, " पेशव्यांकडे काय काम होतें तुझें ? तुझीं शस्त्रें कुठें आहेत ?"

" माझ्याजवळ शस्त्रें वगैरे कांहीं नाहींत आणि काम म्हटलें तर... तर मला नोकरी पाहिजे आहे. सैन्यांत जावें, लढाई करावी, सरदार व्हावें असें वाटतें आहे."

" अरे, तूं हें खोटें सांगतोस. तूं तर शिपाईगडीच दिसतो आहेस. शपथेवर सांगतोस मी मुसलमान गडी नाहीं म्हणून ?"

" न सांगायला काय झालें ! सांगतों पाहिजे तर."

" बरं, थांब इथेंच. मी धन्यांची परवानगी आणतों."

असें म्हणून पहारेकरी बाजीरावाकडे गेला आणि अदबीनें म्हणाला, " आपल्या भेटीची कुणी एक माणूस इच्छा करतो आहे."

" कोण, कुठून आला, काय पाहिजे त्याला याची चौकशी केलीस ?"

" तो म्हणतो, मला फक्त श्रीमंतांचीच भेट घ्यायची आहे. धन्यांनाच भेटायचें आहे. दुसरें कांहींच सांगायला तो तयार नाहीं."

" बरं, येऊं दे त्याला."

पहारेकऱ्यानें त्या शिपायास आंत जाण्याची मानेनेंच जेव्हां खूण केली तेव्हां तो हंसला आणि बाजीरावाच्या भेटीस गेला.

" अरे, तूं का ? ठीक ठीक. आपल्या गोटांतील लोकांवरहि तूं विश्वास ठे ीत नाहींस ! हेरानें अशीच रीत ठेविली पाहिजे."

" धन्यांची गैरमर्जी न व्हावी. चूक झाली असेल तर माफी असावी. पहारेकऱ्याला मीं नांव-गांव सांगितलें नाहीं खरें."

" तूं योग्य तेंच केलेंस. हेरांची रीत अशीच असली पाहिजे. बरं, तूं काय बातमी आणली आहेस ?"

सो....८

"महमद बंगष अगदीं गाफील आहे धनी. त्याची लढाईची तयारी नसावी असें दिसतें. आपल्या स्वारीचा बेत त्याला कळला नसावा असें वाटतें."

"कशावरून ?"

"मी सैन्यांत नोकरी मागण्याचें निमित्त करून गेलों होतों. तेथें एका अधिकाऱ्याला भेटलों."

"मग ?"

"त्या अधिकाऱ्यानें मला विचारलें, 'कोण तूं ?' मी म्हणालों, 'पूर्वी मी होळकरांच्या सैन्यांत होतों, पण आतां मी कंटाळलों तिथें. माझें घोडें मरून गेलें. सहा महिन्यांचा माझा पगार थकला. शिवाय होळकरांच्या सैन्यांत फार त्रास. मला आपल्या सैन्यांत नोकरी करण्याची इच्छा आहे. मला नोकरी द्या.'

"अशी मीं त्या सरदाराला विनंति केली. पण महंमद बंगषाचा सैनिक अधिकारी मला म्हणाला, आमचें तूर्त कोणाशींच युद्ध नाहीं. आमच्याजवळ नोकरी नाहीं. धनी, म्हणून माझी अशी खात्री झाली आहे कीं, महंमद बंगष सावध नाहीं, गाफील आहे. आणि सरकार त्यांचें सैन्यहि फारसें नसावें."

"बरं, जा तूं."

नंतर बाजीरावानें आपल्या सरदार मंडळीस बोलावून हेरानें आणलेली बातमी त्यांस सांगितली आणि हुकूम केला कीं, आपणाला उदईकच महंमद बंगषावर स्वारी करावयाची. या लढाईंतील जयश्री तुमच्या तलवारींच्या मुठींत आहे. आपला पराक्रम, आपला दरारा आपणाला कायम टिकवावयाचा आहे. आपलें सैन्य जवळजवळ एक लाखाच्या घरांत आहे. माझे सारे सैनिक शूर आहेत. पराक्रमी आहेत. मला माहीत आहे कीं, आपण पराक्रमाची शर्थ कराल आणि या लढाईंत जय मिळवाल ! चला, आपणांला उदईक महंमद बंगषावर स्वारी करावयाची.

बाजीराव एवढें बोलले व त्यांनीं जेव्हां सर्व सरदारांकडे नजर फिरविली तेव्हां प्रत्येक सरदाराच्या अंगांत वीरश्री संचरल्याचा भास होत होता. त्यांचे चेहरे आत्मविश्वासानें फुलले होते. धन्याला वाटत असलेला 'जयाचा' विश्वास आपण पुरा करूंच करूं असें तेजदार डोळे भासवीत होते.

एक सरदार चटकन् उभा राहून आणि श्रीमंत पेशव्यांस मुजरा करून म्हणाला, "श्रीमंतांची इच्छा पुरी होईल. आजपर्यंत मराठा लढाईंत मागें हटला नाहीं. तसाच तो आजहि हटणार नाहीं. आमच्या बाहूंत शक्ति आणि कुडींत प्राण असेपर्यंत आम्ही पराक्रमाची शर्थ करूं आणि महंमद बंगषाचा पराभव करूं. छत्रसाल राजाला स्वतंत्र करूं."

"आमची तशीच खात्री आहे. मंडळी, आतां बरीच रात्र झाली आहे. उदईक आपणास बुंदेलखंडांत प्रवेश करावयाचा आहे. तेव्हां थोडी विश्रांति घेण्यास जावें."

बाजीरावानें अशी इच्छा प्रदर्शित करतांच सरदार मंडळी आपापल्या तंबूंत निघून गेली आणि श्रीमंतांची स्वारीहि बिछान्यावर पडली न पडली तोंच त्यांच्या तंबूपुढें गलबला झाला.

श्रीमंत तसेच उठले आणि तंबूच्या दाराशीं येऊन पाहतात तों कांहीं शिपायांनीं एका माणसाला धरून तंबूपुढें आणलें आहे.

पेशव्यांनीं विचारलें, "कोण आहे हा ?"

"ज्योतिषी."

"इतक्या रात्रीं ज्योतिष कसलें ?"

"धनी, हा त्या बंगषाचा हेर आहे."

"पण दिसतो हिंदूसारखा. डोकीस पागोटें, गंध, गळ्यांत माळ... "

"ओळखतां येऊं नये म्हणून हें ढोंग."

"ज्योतिषीबुवा, सांगा पाहूं, आमचा जय होईल कीं नाहीं तें ?"

पण तो वेषधारी हेर कांहीच बोलेना.

शेवटीं बाजीरावानें त्याचा योग्य तो बंदोबस्त करण्यास आज्ञा केली.

पुढें दुसऱ्या दिवशीं महंमद बंगषाचें सैन्य जेथें उतरलें होतें त्या दिशेनें बाजीरावाचें सैन्य चालून गेलें आणि त्यानें इतक्या बेमालूमपणें महंमद बंगषाच्या सैन्याला वेढा दिला कीं, बंगष अगदीं अचानकपणें बाजीरावाच्या सैन्यांत अडकला. त्याची अगदीं पांचावर धारण बसली. तो कांहींसा आश्चर्यचकित झाला. त्याला बाजीरावाच्या सैन्याची हालचाल कळली

नव्हती. आतां त्याला काय करावें हें सुचेना. शेवटीं त्यानें कसाबसा जैयत-पूरच्या किल्ल्यांत आश्रय घेतला.

पण तो किती दिवस किल्ल्यांत आश्रय घेऊन राहणार! महिना, दोन महिने? छे! नाहीं जमायचें हें.

बाजीरावाच्या सैन्याचा गराडा जैयतपूरच्या किल्ल्यासभोंवतीं पडला आहे. त्याच्या सैन्याला अन्नपाणी तर पाहिजे! एक दिवस असा येईल कीं, त्याच्या सैन्याला अन्नाचा कण आणि पाण्याचा थेंब मिळणार नाहीं.

आणि मग त्याला बाजीरावाला शरण यावेंच लागेल.

पण तसें कशाला? किल्ल्यावर तोफा डागा ना!

होय. तसेंच केलें पाहिजे. चला, किल्ल्यावर तोफा डागा.

मराठ्यांनीं जैयतपूरच्या किल्ल्यावर तोफा डागायला सुरवात केली.

महंमद बंगषाला आतां आपलें भविष्य संपलेंच असें वाटलें! त्यानें आपल्या सरदारांची सल्लामसलत घेतली. तो म्हणाला, "मराठ्यांनीं आपणाला पिंजऱ्यांत कोंडलें आहे. पिंजरा अभेद्य आहे. आतां काय करावें हें सुचत नाहीं. आपण छत्रसालावर स्वारी करावयास नको होती. छत्रसालावर आपण स्वारी केली आणि सिंहावर खडा मारला."

"खाविंद, धारच्या किल्ल्यावर इ. स. १७३२ सालीं दायबहादूर आणि चिमाजीअप्पा यांच्यांत जें युद्ध झालें त्या युद्धांत दायबहादूर मरण पावला. त्या दिवसापासून आपणाला कळलें पाहिजे होतें कीं, शत्रु फार प्रबळ आहे."

"होय, मला हें माहीत आहे. दायबहादूरच्या पूर्वी माळव्याचा मोंगल सरदार गिरिधरलाल मराठ्यांच्या तलवारीला बळी पडला होता. खाविंद, हा प्रसंगहि आपणावर असाच ओढवणार कीं काय कोण जाणे!"

दुसरा एक सरदार म्हणाला, "आपणांला बाहेरून जर रसद आली तरच टिकाव धरणें शक्य आहे."

तिसरा सरदार म्हणाला, "आतां तसें होणें शक्य नाहीं. शत्रूला चकवून किल्ल्यांतून निसटणें हा एकच मार्ग आपणांला शक्य आहे. आणि अधिक अवधि न लावतां हा शेवटचा मार्गच आपण स्वीकारूं या."

आणि मग सर्वानुमतें तसेंच ठरलें.

पण किल्ला मजबूत. सभोंवतीं मराठी सैन्याचा वेढा.

तरी पण त्याच्या लोकांनीं अतिशय कठीण अशी वाट शोधून काढली. वाट कसली म्हणा ! जीवघेणी दरीच होती ती !

त्या वाटेनें एका काळोख्या रात्रीं प्रथम महंमद बंगष आणि कांहीं निवडक सैनिक किल्ल्याबाहेर पडले. पण वाट इतकी बिकट कीं, कित्येकांचे हातपाय मोडले, तर कित्येकजण पडून मेले. अगदीं मोठ्या प्रयत्नानें कसा-बसा महंमद बंगष किल्ल्याबाहेर पडला ! थोडेंफार सैन्यहि बाहेर पडलें ! पण गस्त घालणाऱ्या मराठे शिपायांच्या हें ध्यानांत येतांच महंमद बंगषाचा आणि त्याच्या सैन्याचा पाठलाग सुरू झाला. बंगषाचें सैन्य पुढें आणि मराठ्यांचें सैन्य मागें ! मराठ्यांच्या सैन्यानें अगदीं ससेहोलपट सुरू केली. मराठ्यांनीं लांडगेतोड चालविली. मराठ्यांच्या तलवारी रक्तानें माखल्या. बंगषाचें उरलेंसुरलें सैन्य बुंदेलखंडांतून पार पळालें.

बुंदेलखंड स्वतंत्र झाला !

बाजीरावाचा जय झाला ! !

श्रीमंत बाजीराव पेशव्यांस किती आनंद झाला ! किती समाधान झालें ! ज्या दिमाखानें आलों तो दिमाख टिकला ! आनंदीआनंद झाला ! ही आनंदाची बातमी सांडणीस्वाराबरोबर पुण्यास ताबडतोब कळविली.

मराठ्यांचें सैन्य तर अगदीं बेहोष झालें. त्या रात्रीं तंबू-तंबूंतून गाणीं काय, पोवाडे काय, नाच काय... सारें कांहीं झालें. मराठी सैनिकांच्या छात्या अभिमानानें फुगल्या होत्या !

सरदार मंडळी जेव्हां बाजीरावाच्या तंबूंत जमली, तेव्हां त्यानें पहिला प्रश्न विचारला, "कोणाकोणाला जखमा झाल्या ? आपले किती सैनिक कामास आले ?"

"श्रीमंत, कोणाला विशेष जखमा झालेल्या नाहींत आणि युद्धांत फारसें कोणी कामाला आलेले नाहींत. कारण महंमद बंगषानें तलवारीला तलवार भिडवलीच नाहीं."

"पण आम्हांला आमच्या शूर सैनिकांना भेटून त्यांचें कुशल पुसलेंच पाहिजे. चला, आपण प्रथम हेंच काम करूं."

आणि मग प्रत्येक तंबूंत जाऊन त्यांनीं कुशल विचारलें.

नंतर बाजीराव सर्व सरदारांस म्हणाले, "सर्वांनीं पराक्रम केलेत. मराठ्यांच्या कीर्तींत भर घातलीत. काम फत्ते झालें, आतां उदईक आम्हांस छत्रसालच्या भेटीस जावयाचें."

"होय. पण छत्रसालनेंच आपल्या भेटीस नको का यायला? श्रीमंतांनीं हें युद्ध केवळ छत्रसालसाठींच केलें आणि विजयश्रीहि मिळविली त्याच्याच-साठीं!"

"नाहीं. आम्हांस तसें वाटत नाहीं. छत्रसाल वयोवृद्ध. शिवाय बुंदेलखंडाचे ते राजे. आम्ही कसें असलों तरी शाहूराजांचे प्रधान. आमचा मान राजाचा नाहीं. आम्हीच त्यांचे भेटीस जाणें उचित!"

त्यावर कुणी सरदार बोललाच नाहीं. मात्र उदईक श्रीमंतांबरोबर कुणी कुणी असावयाचें हें नक्की करण्यांत आलें. आणि मग सगळी सरदार मंडळी आपापल्या तंबूंत विश्रांतीस गेली.

आणि उदईक सूर्योदयाच्या सुमारास आपल्या शुभ्र घोड्यावर स्वार होऊन बाजीराव आपल्या निवडक सरदारांसह छत्रपूर राजधानीच्या वेशी-जवळ गेला, आणि त्यानें छत्रसालास निरोप पाठविला, "आम्ही आपल्या भेटीस येत आहोंत."

'बाजीराव पेशवे आपल्या भेटीस येत आहेत' हा निरोप कळतांच त्या वृद्ध राजास कोण आनंद झाला! त्यानें घाईघाईनें छत्रपूर राजधानी शृंगारली. आणि तो वृद्ध राजा मोठ्या आनंदानें, मोठ्या प्रेमानें बाजी-रावास सामोरा गेला आणि बाजीरावास त्यानें मोठ्या सन्मानानें राजवाड्यांत नेलें. मोठा दरबार भरविला आणि छत्रसालानें आपल्या उजव्या बाजूला अर्ध्या गादीवर त्यास बसविलें. नंतर तो दरबारी मंडळीस म्हणाला,

"शेंकडों मैल दूर असलेल्या दक्षिणेंतून श्रीमंत बाजीराव पेशवे आपलें सैन्य घेऊन बुंदेलखंडात आले आणि महंमद बंगषाशीं लढाई करून माझें

बुंदेलखंड त्यांनीं मला परत मिळवून दिलें. महमद बंगषाचें संकट नाहींसें केलें. श्रीमंत बाजीरावांची फार कृपा झाली आमच्यावर. आमचें बुंदेलखंड केवळ सालिना त्र्याण्णव लक्ष रुपयांच्या उत्पन्नाचें. शिवाय माझे दोनहि पुत्र–राजा जगदेव आणि राजा हरदेव हे अल्पवयी. मी तर वयोवृद्ध. तेव्हां आम्हांला बाजीरावांची मदत मोलाची झाली. त्या मदतीची भरपाई कशी करावी, हेंच मला समजत नाहीं. माझ्या सरदारांनों, मला असें वाटतें कीं, माझ्या दोन पुत्रांप्रमाणेंच श्रीमंत बाजीरावास मी माझा पुत्र मानतों आणि माझ्या या इच्छेला सर्व प्रजेनें मान द्यावा – माझ्या या तिसऱ्या पुत्राला मान द्यावा.

"आणि मी माझ्या या मानसपुत्राला झांशीचा किल्ला आणि त्याच्या आसपासचा सालीना सव्वा दोन लक्षांच्या उत्पन्नाचा मुलूख बक्षिस देतों."

नंतर छत्रसालानें श्रीमंत बाजीराव पेशव्यांस सुवर्णाच्या ताटांतून पोशाख दिला तो असा–

एक पागोटें. एक झगा किनखाबी. पायजमा किनखाबी. दुपेटा भर जरीचा. (कंबरेस बांधण्याचा.) मोत्यांचा तुरा. शिरपेच कलगी. मोत्याची कंठी. एक मोत्याचा कंठा ( करवंदाएवढ्या पाणीदार मोत्यांचा.) एक उत्कृष्ट पाणीदार तलवार. घोडा एक – रंग अबलख – सोन्या-रुप्याच्या अलंकार-सरंजामासह. हत्ती एक.

शिवाय शिंदे, होळकर आदि सरदारांस त्यांच्या दर्जाप्रमाणें पोशाख दिले. छत्रसालानें राजधानींत चार दिवस मोठा सोहळा केला.

आणि नंतर हा पराक्रमी पुरुष – थोरले बाजीराव पेशवे – मोठ्या दिमाखानें महाराष्ट्रांत परत आले. आणि प्रथम त्यांनीं आपल्या धन्याची भेट घेतली व त्यांना मानाचा मुजरा केला !

# सोनेरी शिखर

## ९

केवढा हा पराक्रम !

पण मराठ्यांचा हा एकुलता एकच पराक्रम नाहीं. तर त्यांनीं एकापेक्षां एक श्रेष्ठ असे अनेक पराक्रम केले. मराठ्यांना शत्रूहि फार आणि मराठ्यांचे पराक्रमहि फार. सतराव्या शतकापासूनच पोर्तुगीज, इंग्रज यांचा समुद्र-कांठच्या प्रदेशाला उपद्रव सुरू झाला होता. आतां तर तो अधिकच सुरू झाला. जंजिऱ्याचा सिद्दी, निजाम हेहि नेहमींच या ना त्या निमित्तानें कुरापती काढीत.

पण मराठे कुणालाच दबले नाहींत, नमलें नाहींत. बाजीरावानें आणि चिमाजीअप्पानें जसा पराक्रम केला तसाच पराक्रम त्यांच्या नंतरच्या नानासाहेब आणि भाऊसाहेब यांनीं केला. त्यांनीं भारतांतील शत्रूंनाच नमविलें असें नाहीं, तर अहमदशा अबदालीसारख्या परकीय देशांतून भारतावर स्वारी करणाऱ्या शत्रूलाहि एक वेळ पळावयास लाविलें. कित्येक वर्षें मोंगलांच्या ताब्यांत असलेलें दिल्लीचें तख्त आपल्या ताब्यांत घेतलें आणि तेथें महाराष्ट्राचा भगवा झेंडा फडकविला !

इ. स. १७६० च्या १ ऑगस्टची गोष्ट आहे ही !

अहमदशा अबदाली भारतावर स्वारी करण्यास आला ही बातमी पुण्यास पेशव्यांच्या कानीं पडतांच १४ मार्च १७६० रोजीं भाऊसाहेब पेशवे दिल्लीच्या रोखानें सैन्य घेऊन निघाले आहेत.

अहमदशहा अबदाली हा फार बलाढ्य शत्रु आहे याची जाणीव भाः-साहेबांस आहे.

आणि मराठ्यांचें सैन्य केवढ्याहि मोठ्या सैन्याला पळवून लावील याबद्दल भाऊसाहेबांना विश्वासहि आहे.

आणि म्हणूनच भाऊसाहेब दिल्लीच्या रोखानें निघाले आहेत.

आतां पुढें काय घडलें तेंच आपणांला पाहावयाचें आहे.

"भाऊ, काय घडलें हें! शेवटीं नजीबखानानेंच दगा दिला! त्यानें विश्वासघात केला. आपलीच चूक – भाऊ, आपलीच चूक. मल्हारराव होळकर कांहीं असेतसे नव्हेत. अनुभवी, धूर्त आणि मुत्सद्दी – पण तेहि फसले. तरी त्यांना सूचना होती, आपण नजीबखानावर विश्वास टाकूं नका. त्याच्या मुठींत जाऊं नका. सर्पाला दूध पाजूं नका. पण मल्हाररावांना तें पटलें नाहीं. त्यांनीं तें मानलें नाहीं. उलट नजीबला पुत्रवत् मानलें. त्याला आपली सत्ता आणि वर्चस्व वाढविण्यास भरपूर मोकळीक दिली. भाऊ, मल्हार-रावांनीं ही फार मोठी चूक केली – फार मोठी चूक केली. पण आतां त्याचा काय उपयोग? राजकारणांत एकदां डाव हुकला तो हुकला. बुद्धिबळाच्या खेळांत मेलेला सरदार पुन्हां जिवंत होतो, पण प्रत्यक्ष रणांगणावरचा सरदार? तो जिवंत होत नाहीं. दत्ताजी मरण पावला तो पावला आणि उत्तरेकडील मराठ्यांचा दराराहि कमी झाला. भाऊ, अबदाली आला तोहि नजीबखानामुळेंच. दिल्लीच्या नामधारी बादशहाचें मन नजीबखानानेंच वळवून त्याच्याकरवीं अबदालीला भारतावर स्वारी करण्यास विनंति करविली."

"उदईक दिल्लीच्या दिशेनें कूच करावयाचें आहे. आतां मराठ्यांचा भगवा 'झेंडा दिल्लीवर रोवणें हेंच आपलें कर्तव्य आहे." असें भाऊसाहेब निश्चयानें म्हणतांच नानासाहेब थोडा वेळ गप्प राहिले आणि मग भाऊ-

साहेबांस म्हणाले, " आपल्या थोरल्या पेशव्यांनीं साताऱ्यास शाहूमहाराजांसमोर हेंच बोलून दाखविलें होतें. दिल्लीवर आपण चाल करून जाऊं आणि मुसलमानी सत्तेवरच घाव घालूं.'

थोरल्या पेशव्यांचे हे उद्‌गार ऐकून छत्रपति शाहूमहाराजांना कोण आनंद झाला होता. ते आनंदानें म्हणाले होते, " बाजीराव, जा. तुम्हीं माझ्या लोकांचे खरे पुढारी आहांत. तुम्ही वाटेल त्या दिशेनें जा आणि विजयावर विजय संपादन करा. दिल्लीचीच काय कथा ! हिमालयाच्या शिखरावर आपला पवित्र झेंडा रोंवा ! "

" होय. हेंच ध्येय दृष्टीसमोर ठेवून आपणांस चालावयाचें आहे. छत्रपति शिवाजीमहाराजांनीं सह्याद्रीवर रोंवलेला भगवा झेंडा आतां आपणांला दिल्लीवर रोंवावयाचा आहे. आपल्या धन्याची इच्छा पुरी करणें आपलें कर्तव्य आहे. "

" अबदाली खालीं माळव्यांत उतरण्यापूर्वीच त्याला मार दिला पाहिजे."

" कोण कोण सरदार आहेत तुमच्याबरोबर ?"

" विठ्ठल शिवदेव आहेत, अंताजी माणकेश्वर आहेत, समशेरबहाद्दरहि आहे आणि विश्वासराव आहे. "

" हो. कालच मी विश्वासरावाला सहज म्हणालों, 'धाकटे पेशवे, तुम्ही उत्तरेच्या मोहिमेवर जाणार आहांत का ?' तर त्यांनीं मला उलट विचारलें, आपलें असें कां विचारणें झालें ?"

" नाना, मग आपण काय म्हणालां ?" भाऊसाहेबांनीं उत्सुकतेनें विचारलें.

" मी त्यांना म्हणालों, आपण कालच उदगीरच्या लढाईहून आलां आहांत म्हणून विचारलें. आपली जाण्याची इच्छा असेल तर आमची ना नाहीं. भाऊ, विश्वासराव चांगला मुत्सद्दी होईल आणि योद्धाहि होईल. नाहीं का ?"

नानासाहेब आणि भाऊसाहेब असें बोलत आहेत इतक्यांत कुणी तरी सरदार तिथें आले आणि तेवढ्यावरच तें बोलणें थांबलें.

आणि दुसऱ्या दिवशीं मराठ्यांचें सैन्य दिल्लीच्या रोखानें निघालें. भगवा झेंडा दिल्लीवर डौलानें फडकण्यास निघाला.

मराठ्यांचें सैन्य नर्मदा पार झालें. त्यानें विंध्याद्रि ओलांडला. तें चंबळे-पर्यंत जाऊन पोहोंचलें. वाटेंत जनकोजी शिंदे, दमाजी गायकवाड, संतोजी वाघ वगैरे सरदार मंडळी आपापल्या सैन्यांसह येऊन मिळाली. उत्तरेंत आणि दक्षिणेंत बऱ्याच दिवसांत घडलेल्या गोष्टी एकमेकांस सांगण्यांत येऊं लागल्या. जनकोजी शिंद्यांची भाऊसाहेबांशीं भेट होतांच ते दुःखित अंतःकरणानें म्हणाले, "दत्ताजी गेला. शूरांच्या हारांतील एक हिरा तुटून पडला."

"भाऊ, दत्ताजी गेला याचें दुःख आम्हांला नाहीं हो होत. दत्ताजी मेला तो शूराच्या मरणानें मेला. त्यानें जेव्हां अबदालीवर शस्त्र उचललें तेव्हांच तो म्हणाला होता, 'मी अबदालीचा पराभव करीन तरी, नाहीं तर लढतां लढतां मरेन तरी. माघार घेऊन मी माझें तोंड भाऊंना किंवा नानांना दाखविणार नाहीं.' भाऊ, दत्ताजी शूराच्या मरणानें मेला. मातृ-भूमीच्या स्वातंत्र्यासाठीं मेला. पण.... पण एक गोष्ट मराठ्यांच्या मानाला डिवचणारी घडली."

"म्हणजे काय म्हणतां जनकोजी ?"

"लढतां लढतां दत्ताजी जेव्हां पडला तेव्हां कुतुबशहा नांवाचा एक मुसलमान सरदार दत्ताजीजवळ आला आणि म्हणाला, 'क्यों पटेल, अभी मुसलमानोंके साथ फिर लढेंगे ?"

"मग दत्ताजी काय म्हणाला ?"

"तो शूर सेनापती म्हणाला, 'हां, बचेंगे तों औरभी लढेंगे !'"

"भाऊ, आपल्या ह्या शूर सेनापतीच्या तोंडचे शब्द ऐकून त्या भ्याड कुतुबशहानें दत्ताजीला लाथ मारली आणि त्याचें शीर कापून तें तो आपल्या गोटांत घेऊन गेला, दत्ताजीला लाथ मारली हो भाऊ ! लाथ मारली ! !"

जनकोजी असें म्हणतांच भाऊंनीं आपली नजर जमिनीकडे वळविली. एक लांब सुस्कारा सोडला आणि ते कांहीं क्षण अगदीं गप्पच राहिले.

आणि मग ते नजर तशीच निश्चल ठेवून एवढेंच म्हणाले, "मराठे मेलेल्या मनाचे नाहींत."

एवढयांत सुरजमल जाट आपल्या फौजेनिशीं मराठ्यांच्या मदतीला आल्याची वर्दी भाऊसाहेबांकडे आली. त्यांना आनंद झाला. ते चटकन् बोलून गेले, "राजपूत वगैरेंना मदतीसाठीं पत्रें लिहिलीं, पण कोणी आले नाहींत. सुरजमल मात्र आले. ठीक आहे."

भाऊसाहेबांनीं सुरजमल जाटाचें स्वागत केलें. बेत ठरविला. दोघांनींहि यमुनेचें पवित्र उदक हातांत घेऊन अहमदशहा अबदालीशीं एकदिलानें युद्ध करण्याची शपथ घेतली.

आणि मग आपल्या सर्व सरदारांसह अबदालीस कसा चोप द्यावयाचा त्याचा बेत केला.

पण यमुना दुथडी वहाते आहे. ती उतरून पलीकडील तीरावर असलेल्या अहमदशहा अबदालीचा समाचार घेणें कठीण आहे.

आतां काय करावयाचें ?

"बोला मल्हारराव, बळवंतराव मेहेंदळे, आतां काय ?"

दिल्लीवर स्वारी !

होय. दिल्लीवर स्वारी !!

मराठ्यांचें सैन्य दिल्लीकडे चाललें. दिल्ली सर करावयास चाललें.

दिल्लीच्या तख्तावर त्या वेळीं शहाअलम हा नामधारी बादशहा होता. केवळ नामधारी !

तेराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत मुसलमानांच्या ताब्यांत असलेली दिल्ली ठोठावली गेली. मराठ्यांच्या समर्थ तोफा दिल्लीच्या तटावर आगीचे गोळे ओकूं लागल्या. मराठ्यांच्या सैन्याला त्या वेळीं फक्त शत्रु दिसत होता. पूर्वजांचा पराक्रम दिसत होता.

दिल्लीचें संरक्षण करणाचा आटोकाट प्रयत्न मुसलमान सेना करीत होती. प्राणपणानें लढत होती.

पण शेवटीं मराठे दिल्लींत घुसले !

मराठ्यांनीं दिल्ली सर केली !

किती किती वर्षांची इच्छा ! दिल्लीवर विराजमान होण्याची !

ही इच्छा आज पुरी झाली. १ ऑगस्ट १७६० हा भाग्याचा दिवस. महाराष्ट्राच्या परमोच्च पराक्रमाचा दिवस. महाराष्ट्राच्या वैभवाचा, दिमाखाचा, जिद्दीचा, एकीचा मानबिंदु. सोनेरी शिखराचें उंच उंच टोंक ! !

महाराष्ट्र कधीं दबत नाहीं, कधीं नमत नाहीं. सुमारें दर दोनशें वर्षांच्या अंतरानें त्याच्या पराक्रमाचा कस लागत असतो. आजपर्यंत असेंच चालत आलें आहे. एक दिवस कां होईना, पण मराठ्यांनीं दिल्लीचें तख्त ताब्यांत घेतलें ! महाराष्ट्राचा केवढा हा पराक्रम ! केवढी ही कीर्ति ! भगव्या झेंड्याचा केवढा हा मान ! !

मराठ्यांचा भगवा झेंडा दिल्लीवर दिमाखानें फडकला !

पण पुढें हीच स्थिति कायम राहिली नाहीं. बाजीराव, नानासाहेब, भाऊसाहेब यांच्यानंतर जे पेशवे झाले ते कमी कर्तबगार होते असें नाहीं किंवा मराठे सरदार कमी शूर होते असेंहि नाहीं. माधवराव, सवाई माधवराव पराक्रमी होते. त्यांचा दरारा चांगला होता. त्यांनीं खूप युक्तीनें राज्य राखिलें; पण ते अल्पायुषी ठरले आणि मराठे सरदारांतील आपापसांतील दुही, वैमनस्य, स्वार्थ हीं वाढत गेलीं. त्यामुळें मराठ्यांचा पूर्वीइतका दबदबा राहिला नाहीं.

तरी पण नाना फडणिसानें पेशव्यांच्या उत्तरकाळांत खूप युक्तीनें राज्य राखण्याची फार मोठी कामगिरी केली.

नानांना फडणिशीचें काम त्यांच्या वयाच्या पंधराव्या वर्षापासून मिळालें ते धोरणी होते. युक्तिवान होते. नानांविषयीं बाळा बहिरू हा शाहीर म्हणतो—

श्रीमंत महाराज सवाई रावसाहेब मोतीदाणा।
खूप युक्तीनें राज्य राखिलें यशवंत फडणीस नाना॥

नाना राज्यकारभारांत चतुर होते. साडेतीन शहाण्यांपैकीं नाना हे अर्धे शहाणे होते.

आणि म्हणूनच त्यांना म्हणतात–

भले बुद्धिचे सागर नाना ऐसे नाहीं होणार ।
मर्दानें हो राज्य राखिलें मनसोबीची तलवार ।।

मराठ्यांना शत्रु फार. जंजिऱ्याचा सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज यांचा तर मराठ्यांना नेहमींच उपद्रव. निजाम हा तर या ना त्या निमित्तानें सदाच्या कुरापती काढीतच बसलेला.

अशाच एका कुरापतीमुळें राक्षसभुवन येथें निजाम व मराठे यांचें युद्ध झालें. आणि या युद्धांत मराठ्यांनीं निजामाला जेव्हां चांगलाच चोपला तेव्हां त्यानें गयावया करून मराठ्यांस ब्याऐशीं लाखांचा मुलूख देऊं केला व आपली सुटका करून घेतली.

पण पुढें निजाम बोलला तसें वागेना. मुलूख देण्याची तो टाळाटाळ करूं लागला.

नाना फडणीस हे त्या काळीं पेशव्यांचे फडणीस. त्यांनीं निजामाला एक पत्र लिहून तें आपल्या जासुदाला म्हणाले,

"ही 'याद' निजामाला देऊन ये."

जासूद निजामाकडे गेला आणि 'याद' देऊन आला तो कांहींशा रागांतच. त्यानें नानांची भेट घेतली.

नानांनीं विचारलें, "निजामानें कागदपत्र दिले आहेत का?"

"नाहीं, पण मीं नेलेल्या आपल्या कागदपत्राचा त्यानें अपमान केला. माझ्या देखत आपला कागद तुच्छतादर्शक एका बाजूला टाकला व निजामाचा दिवाण माशीरउलमुल्क मला म्हणाला, 'तुझ्या पेशव्याला लंगोटी नेसवून आणि लोटा हातीं देऊन काशीस जावयास लावूं."

नानांनीं चेहरा गंभीर केला आणि ते एवढेंच म्हणाले, "ठीक आहे. पाहूं. इंग्रजांच्या पाठिंब्यावर एवढा शिरजोर झाला का! पण त्याला माहीत नाहीं इंग्रज आमच्याशीं तूर्त तरी कलागत करणार नाहींत. सर जॉन शोअर एवढा काहीं मूर्ख नाहीं कीं तो आपल्या अंगावर जाणूनबुजून संकट

ओढवून घेईल. निजाम आणि आम्ही. पाहूं लंगोटी कोणास कोण नेसवितो आणि कोणाच्या हातांत कोण लोटा देतो तें!"

इतकें म्हणून नानांनीं परशुरामभाऊंस पत्र देऊन बोलावून घेतलें व त्यांना निजामाच्या मग्रूरीचा सारा वृत्तान्त सांगितला. तो ऐकून परशुरामभाऊ म्हणाले,

"त्याला आपण चांगलाच धडा शिकवूं. मराठ्यांना निजाम कांहीं भारी नाहीं!"

"होय. उद्यांच या कामीं तयारीला लागा."

अशा प्रकारें नाना फडणीस आणि परशुरामभाऊ पटवर्धन यांचा विचार झाला.

आणि लककरच निजामावर मराठ्यांनीं स्वारी केली. खर्ड्यांजवळ त्याला कोंडींत पकडला आणि चांगलाच झोडपून काढला!

शेवटीं निजाम शरण तर आलाच, पण त्यानें परिंड्यापासून उत्तरेस तापी नदीपर्यंतचा मुलूख आणि तीन कोट रुपये मराठ्यांस देऊन आपली सुटका करून घेतली!

असे एकापेक्षां एक मराठ्यांचे पराक्रम!

आणि त्यापेक्षांहि नानांची हुशारी नि मुत्सद्देगिरी!

नाना फडणिसांनीं राज्य राखण्यास मदत केली. आटोकाट प्रयत्न केले खरें, पण मराठ्यांचें राज्य नानांच्यानंतर फार काळ टिकलें नाहीं. नाना इ. स. १८०० सालीं मरण पावले आणि मराठ्यांचें राज्य इ. स. १८१७ सालीं गेलें! ता. १७ नोव्हेंबर १८१७ रोजीं सोमवारी तिसऱ्या प्रहरीं इंग्रजांचें निशाण शनवारवाड्यावर फडकूं लागलें!

ज्या शूर मराठ्यांनीं स्वातंत्र्यासाठीं, हिंदुपदपादशाहीसाठीं आपलीं मनगटें पिचविलीं, रक्ताचें पाणी केलें, 'हर हर महादेव' ही ललकारी देऊन शत्रूवर तलवारी चालविल्या आणि जवळजवळ दोनशें वर्षें महाराष्ट्र राज्य—मराठ्यांचें राज्य—टिकविलें, वाढविलें त्या शूर मराठ्यांची सर्व कर्तबगारी नाहींशी झाली.

'पुंडलीक वरदा हरि विठ्ल,' 'हरहर महादेव' आणि 'जय जय रघुवीर समर्थ' ह्या महाराष्ट्राच्या तीनहि ललकाऱ्यांचा आवाज, त्यांची खूण जवळ-जवळ पुसून जाण्याची वेळ आली !

महाराष्ट्रांत यादवकालापासून पेशवे कालापर्यंत बहुजनसमाजाचें मन तीन प्रकारच्या ललकाऱ्यांनीं आकर्षिलें. या तीन ललकाऱ्यांपैकीं 'पुंडलीक वरदा हरि विठ्ठल' ही एक, 'हरहर महादेव' ही दुसरी, आणि 'जय जय रघुवीर समर्थ' ही तिसरी ललकारी.

पहिली ललकारी ही महाराष्ट्रांतील भाविकांची. या ललकारीनें महाराष्ट्राची परंपरा, धर्मनिष्ठा, सलोखा आणि देवाच्या दारीं जातिभेद नाहीं, मानपान नाहीं, लहानथोर नाहीं ही भावना टिकविली. प्रेम द्यावें आणि प्रेम घ्यावें हें दाखवून दिलें.

'हरहर महादेव' ही ललकारी म्हणजे पराक्रमाची खूण ! जिवावर उदार होऊन हातीं घेतलेलें शौर्याचें काम पुरें करण्याची पूर्वतयारी ! ! मराठे या ललकारीच्या सहाय्यानें दोन शतकें पराक्रमानें जगले.

आणि तिसरी ललकारी 'जय जय रघुवीर समर्थ'. ही सावधतेची ललकारी. सावधतेची खूण. सावधानता, संघटना, प्रयत्न, अनुभव ह्या सगळ्या गोष्टी या एका ललकारींत सामावल्या आहेत. श्रीसमर्थ समदासस्वामींनीं छत्रपतींच्या काळीं एका परीनें महाराष्ट्र जागा केला. बलशाली बनविला. वीर मारुतीची स्थापना करून महाराष्ट्राला एक प्रकारें वीर्य आणलें. त्याचा परिणाम पुढें बराच काळ टिकला.

पेशव्यांच्या कारकीर्दींत पुण्याचा शनवारवाडा सोडला तर बाकी कुठें कांहीं त्यांच्या हातून डोळ्यांत भरण्यासारखें इमारतींचें, देवळांचें काम झालें नाहीं. दळणवळणाची सोय ? तीहि नाहीं. मालाची वाहतूक बैलांच्या पाठीवरून लमाण लोकांकडून होई. व्यापार, तोहि बराचसा परदेशी मालाच्या पुरवठ्यानें होई. कापड, कांच, कागद हीं तर विलायतीच ! पोलादाला 'इंग्रज' ही संज्ञा होती. यावरून पोलाद आणि त्याचा व्यापार हीं दोन्ही संपूर्ण इंग्रजांकडे कशी होती हें दिसून येतें.

पेशवाईंत नाणीं पाडण्याचा अधिकार खाजगी लोकांनाहि देण्यांत येत असे. त्यामुळें ठिकठिकाणीं टांकसाळी खूप होत्या. नाण्यांचीं नांवेंहि नाण्यांचा. आकार, घडण, गांव आणि व्यक्ति यांसारख्या गोष्टींवरून पडलेलीं होतीं सरकारनें त्या नाण्यांतील धातूंचें प्रमाण ठरवून दिलेलें होतें. पोतेदार म्हणजे सरकारच्या तिजोरींत बिनहरकत स्वीकारला जाईल तो रुपया. चांदवडी रुपया हा प्रमाण धरून त्यावरून इतर नाण्यांचा बट्टा ठरवीत. पावल्या, अधेल्या हींहि नाणीं त्या काळीं होतीं. सोन्याच्या मोहराहि होत्या. पण हीं नाणीं पाडण्याचा कारखाना (टांकसाळ) मात्र पेशव्यांचा नव्हता!

हें सांगण्याचा हेतु एवढाच कीं, राज्यकारभाराच्या सोईसाठीं नाणीं, जमिनीचा सारा, न्याय ह्या गोष्टी त्या काळच्या दृष्टीनें नीट होत होत्या. प्रजा जरी आपले रोजचे व्यवहार नीट पार पाडीत होती, तरी पण पेशव्यांच्या हातून भव्य, दिव्य – ज्यानें महाराष्ट्राच्या मोठेंपणाला कायमचें स्थान मिळेल असें कांहीं घडलें नाहीं.

आणि घडलें तें मात्र महाराष्ट्राच्या वैभवाला साजेंसें!

पुण्यास पेशव्यांनीं शनवारवाडा बांधला आणि पुण्याचें वैभव वाढलें. पुणें महाराष्ट्राच्या राजधानीचें ठिकाण बनलें. छत्रपति शाहू आणि त्यानंतरचे छत्रपति साताऱ्यास रहात, म्हणून सातारा ही राजधानी म्हणावयाचें इतकाच त्याचा अर्थ. पण महाराष्ट्राचें सारें राजकारण पुण्याहूनच चाले, म्हणून पुणें हीच खरी राजधानी.

पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत पेशवे पुरंदरास राहत असत. पुण्यास ते येऊन जाऊन राहत. पण स्वतःचा वाडा नसल्यामुळें त्यांस धडफळ्यांच्या वाड्यांत राहावें लागे. त्यामुळें पेशव्यांस पुण्यास राहण्याची फार मोठी अडचण भासूं लागली.

आणि म्हणूनच त्यांनीं पुण्यास वाडा बांधावयाचें ठरविलें.

त्या काळीं आजच्यासारखें विस्तीर्ण पुणें नव्हतें. तर तों एक कसबें गांव होता. पुणें, कुमारी आणि कासारी अशीं तीन खेडीं मिळून त्या काळचें पुणें होतें. पुण्याचें मुळचें दैवत पुणेश्वर – महादेव.

सो...९

पेशव्यांना ज्या ठिकाणीं वाडा बांधावयाचा होता त्याच्याजवळच कोळी, कोष्टी लोकांची वस्ती होती. पेशव्यांनीं ह्या लोकांना दुसरीकडे वस्ती करण्यास जागा दिली व ही जागा वाड्याकरितां घेतली. वाडा बांधण्यास ता. १० जानेवारी १७३० रोजीं मुहूर्त केला.

पहिला बाजीराव त्या वेळीं जवळजवळ नेहमींच घोड्याच्या पाठीवर— मुलूखगिरीस. यामुळें या वाड्याच्या बांधकामावर नजर ठेवण्यास शिवराम कृष्ण नांवाचा कारकून ठेविला. पण बाजीरावानें वाड्याच्या बांधकामाची त्यास पूर्ण कल्पना देऊन ठेविली होती. त्यानें बजावून बजावून सांगितलें होतें, "दूरदूरचे राजे, सरदार वाड्यांत येणार. तेव्हां आपल्या इतमामाला शोभेल असेंच वाड्याचें बांधकाम झालें पाहिजे. लागेल तो खर्च लागूं दे."

बाजीराव हौशी. चार ठिकाणीं हिंडलेला फिरलेला. त्यानें मोंगलांनीं बांधलेले वाडे पाहिलेले. तेव्हां आपलाहि वाडा त्यांच्या तोडीचा नव्हे, तर त्यांपेक्षां सर्वांगें श्रेष्ठ असावा ही बाजीरावाची इच्छा!

वाडा बांधण्याचें काम सतत दोन वर्षें चाललें आणि वाड्याची वास्तुशांत २२ जानेवारी १७३२ रोजीं झाली. बाजीरावानें बांधलेला वाडा फक्त दुमजलीच होता. आणि त्याला १६,११० रुपये खर्च आला होता.

पेशवे बाजीराव मुहूर्तानें इ. स. १७३६ सालीं वाड्यांत राहावयास आले.

पुढें शनिवारवाड्याचा दिल्ली दरवाजा १७५२ सालीं बांधला.

अशा प्रकारें निरनिराळ्या पेशव्यांच्या कारकीर्दींत वाड्याचें बांधकाम अधिक अधिक होत गेलें. तो सात मजली झाला — आणि शनिवारवाडा भव्य झाला. शनिवारवाड्यांतून महाराष्ट्राचेंच नव्हे तर भारतांतील चारी दिशांचें राजकारण होऊं लागलें. पराक्रम, दिमाख, वैभव, संस्कृति यांचा प्रकाश शनिवारवाड्यांतूनच चारी दिशांकडे पसरूं लागला.

याच वाड्यांत बसून नाना-भाऊंनीं मसलती केल्या. याच वाड्यांत बसून नाना फडणिसांनीं आपल्या कुशल कलमानें मराठ्यांच्या राज्याचीं कांहीं काळ सूत्रें हालविलीं. याच वाड्यांत दयेची याचना करण्यासाठीं इंग्रज आले. शनिवारवाड्यातच मुत्सद्यांनीं मसलती करून आणि शूर सरदारांनीं प्रतिज्ञा करून हैदर, निजाम, टिपू यांची रग जिरविली.

शनिवारवाड्यानें सारें बरेंवाईट अनुभविलें. पुराणें ऐकलीं. वेदघोष ऐकले. आणि त्याचबरोबर शाहिरांचे पोवाडे ऐकले. पूर्वजांचे पराक्रम ऐकले. स्वतःचाहि पराक्रम ऐकला. मोठ्या मानानें कांहीं दिवस घालविले.

पेशव्यांच्या कारकीर्दींतच कांहीं ठिकाणीं देवळें उभारली गेलीं. स्वारीवर असतांना ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष शत्रूंशीं दोन हात करण्याचा प्रसंग यावयाचा त्या ठिकाणच्या ग्रामदेवतेस अगर अन्य एखाद्या देवतेस अशी प्रार्थना करावयाची कीं, "जर या युद्धांत आम्हांला यश आलें तर तुझें देऊळ उभारूं." ठाणें जिल्ह्यांतील वज्रेश्वरीचें देऊळ चिमाजीअप्पानें अशाच वसईच्या रणसंग्रामाच्या निमित्तानें बांधलें असें म्हणतात.

पेशव्यांनीं महाराष्ट्राच्या सुखसोईंत, सौंदर्यांत विशेष भर घातली नाहीं, याचें कारण त्यांचा सारा वेळ लढाया करण्यांत आणि घरचे हेवेदावे मिटविण्यांत गेला.

असें जरी होतें तरी त्यांनीं जुन्या इमारती, जुनीं देवळें हीं टिकविण्यासाठीं प्रयत्न केला. कमीअधिक रकमा देऊन त्यांची डागडुजीहि करविली.

पेशव्यांच्याच काळीं महाराष्ट्रांत धार्मिक श्रद्धेनें एका व्यक्तीनें बऱ्याच लोकोपयोगी गोष्टी केल्या आणि त्यामुळें महाराष्ट्राच्या मोठेपणांत कांहींशीं भरच पडली.

अशी कोण ती व्यक्ति ?

साध्वी अहिल्याबाई होळकर.

अहिल्याबाईनें अठ्ठावीस वर्षें आपल्या राज्याचा कारभार पाहिला. अनेक ठिकाणी नद्यांना घाट बांधले. अनेक लहानमोठीं देवळें बांधलीं. तळीं खोदून प्रजेला पाणी दिलें. नद्यांवर नावा ठेवून प्रजेच्या प्रवासाची सोय केली. धर्मशाळा तर तिनें कितीतरी बांधविल्या.

पेशव्यांच्या कारकीर्दींत महाराष्ट्राची जी काय प्रगति झाली ती अशी झाली !

आणि पुढें ?

काय झालें तें पाहूं या !

# वाघिणीचें दूध

## १०

आपल्या प्रिय महाराष्ट्राची सर्व दृष्टींनीं कसकशी प्रगति होत आली, हें पाहत असतां आपणांला असें दिसून आलें कीं, महाराष्ट्रांत राजकीय घडामोडीच फार घडल्या अणि त्याहि फार जलद घडल्या. त्या मानानें सामाजिक आणि धार्मिक घडामोडी फारच कमी घडल्या आणि ज्या घडल्या त्या फारच मंद गतीनें घडल्या.

पण यापुढें मात्र याच्या अगदीं नेमकें उलट घडलेलेंच आपणांला दिसण्याचा अधिक संभव आहे. कारण महाराष्ट्रावर इ. स. १८१८ पासून एकट्या इंग्रजांचीच संपूर्ण सत्ता आली. त्यांना प्रतिकार करणारा कोणी राहिलाच नाहीं. त्यामुळें पुढील काळांत राजकीय घडामोडी फारशा घडल्या नाहींत आणि त्यांत बदलहि झाला नाहीं. बदल झाला तो सामाजिक आणि धार्मिक बाबतींत.

तसें पाहूं गेल्यास महाराष्ट्रावर इंग्रजांच्या आचारविचारांचा पगडा एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासूनच बसूं लागला होता. इंग्रज हे आमची सुधारणा करण्यासाठीं देवानें पाठविलेले दूत आहेत, असें कांहीं सुशिक्षित मोठ्या अभिमानानें म्हणूं लागले होते, आणि त्यांचें हें म्हणणें खोटें होतें, असें त्या काळीं तरी म्हणतां येण्यासारखें नव्हतें. कारण इंग्रजांनीं भारतांत अनेक सुधारणा करण्यास जसा आरंभ केला होता तसाच त्यांनीं महाराष्ट्रांतहि

केला होता. पोस्ट, तारायंत्र, आगगाडी आणि इंग्रजी भाषेचें शिक्षण यांची सोय त्यांनीं केली होती.

या व अशासारख्या दुसऱ्या लहान मोठ्या दुसऱ्या अनेक गोष्टींमुळें महाराष्ट्रांत पूर्वीपेक्षां कितीतरी फरक पडूं लागला. पूर्वीच्या रूढी, चालीरीती, मतें यांत फरक पडूं लागला. इंग्रजांना आपला राज्यशकट चालविण्यास आपल्याबद्दलचें मत जितकें अनुकूल होईल तितकें तें हवेंच होतें. आपल्या हिताच्याच दृष्टीनें जितक्या सुधारणा करतां येतील तितक्या त्यांना करावयाच्याच होत्या. मात्र त्यांना महाराष्ट्राची सर्वांगीण सुधारणा नको होती. कारण त्यांना पक्कें ठाऊक होतें कीं, महाराष्ट्राची खरी सुधारणा–खरी उन्नति–सांस्कृतिक आणि राजकीय सुधारणांवरच अवलंबून आहे. आणि त्यामुळेंच इंग्रजांनीं या दोन सुधारणांकडे लक्ष दिलें नाहीं. फार करून दुर्लक्षच केलें !

पण महाराष्ट्रांतील लोकांचा स्वभाव जसा जुन्यास चिकटून राहण्याचा आहे तसाच तो जें कांहीं चांगलें आहे तें चटकन् ग्रहण करण्याचाहि आहे. नवें स्वीकारावें, तें नीट राबवावें आणि आत्मसात् करावें, ह्याकडे महाराष्ट्रांतील लोकांची प्रवृत्ति आहे. जो महाराष्ट्रांत जन्मला, पोसला आणि वाढला तो भल्याबुऱ्या कोणत्याहि प्रसंगाला दबणार नाहीं–वाकणार नाहीं. जसें साधेल तसें तो जमवून घेईल.

महाराष्ट्रांतून मराठ्यांच्या राज्याचें पार उच्चाटन झालें आणि त्या ठिकाणीं इंग्रजी सत्ता आली. त्यामुळें पूर्वीच्या किती तरी गोष्टींचें व्यवहारांतून उच्चाटन होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मराठी भाषेबद्दल तर हें डोळ्यांत भरण्याइतकें भासूं लागलें. सरकार दरबारांतून मराठी भाषेचें बरेंचसें उच्चाटन होऊं लागलें. संस्कृत, मराठी भाषेचा मान कमी होऊं लागला. वेदपठण, पाठशाळा बंद पडल्या. इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली. थोडेंफार समजूं लागतांच नोकरी आणि प्रतिष्ठा मिळूं लागली. पूर्वीच्या शास्त्री-पंडितांनासुद्धां आतां इंग्रजी शिक्षण घ्यावें, असें वाटूं लागलें. कृष्णशास्त्री चिपळूणकरांना त्यांचे गुरु मोरशास्त्री साठे यांनीं एकदां सांगितलें, "खांद्या-

वर शालजोडी टाकून फिरण्याचे दिवस आतां संपले. यापुढें संस्कृत विद्या पोटाला पोटभर देऊं शकणार नाहीं. तेव्हां तूं इंग्रजी शीक." पुण्याच्या पाठशाळेंत अनेक शास्त्रें पढलेल्या, संस्कृतचा पंडित असलेल्या, आपले गुरु मोरशास्त्री साठे याजकडून 'बृहस्पति' ही मानाची पदवी मिळविलेल्या कृष्णशास्त्री चिपळूणकरांना इ. स. १८४८ सालीं आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षी इंग्रजी शिक्षणास आरंभ करावा लागला. पुढें त्यांनीं इंग्रजी भाषेंत उत्कृष्ट प्रावीण्य मिळविलें आणि ते सरकारी नोकरींत प्रविष्ट झाले. त्यांनीं अनेक पुस्तकें लिहिलीं. अनेक इंग्रजी पुस्तकांचीं मराठींत भाषांतरें केलीं.

कृष्णशास्त्र्यांप्रमाणेंच महाराष्ट्रांत त्या काळीं बाळशास्त्री जांभेकर, सदाशिव काशिनाथ छत्रे, बाबा पदमनजी, विष्णु भिकाजी गोखले ऊर्फ विष्णुबुवा ब्रह्मचारी, जगन्नाथ शंकरशेट, लोकहितवादी...वगैरे अनेक मंडळी इंग्रजी शिकून बाहेर पडली. या मंडळीला सरकार दरबारांत चांगला मान मिळूं लागला आणि त्याचबरोबर समाजांतहि फार मोठा मान मिळूं लागला. 'द्रष्टे लोक' म्हणून ही मंडळी ओळखली जाऊं लागली. सरकारनेंहि ह्याच मंडळीला हाताशीं धरून आपणाला सोईस्कर अशा सुधारणा घडवून आणण्यास सुरवात केली. या लोकांना बडया पगाराच्या सरकारी नोकऱ्या दिल्या.

तसें पाहिलें तर इंग्रजी शिक्षणामुळें या 'द्रष्टया मंडळीला' कांहींशी नवी दृष्टि आली. आपला देश सुधारावा, आपला महाराष्ट्र सुधारावा आणि आपण त्यासाठीं कांहीं तरी प्रयत्न करावे, असें त्यांस वाटूं लागलें. आणि म्हणूनच महाराष्ट्राच्या घडणीला याच विद्वान् मंडळींचा कोणत्या ना कोणत्या प्रकारें हातभार लागला. लोकजागृति करणें, लोकांपुढें चांगलें ध्येय ठेवणें, त्यांना शिक्षणाची गोडी लावणें, अनिष्ट चालीरीतींपासून परावृत्त करणें आणि जीवनास पोषक अशा चालींरीति स्वीकारण्यास प्रवृत्त करणें वगैरे गोष्टी या विद्वान मंडळींनीं हातीं घेतल्या.

सदाशीव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे ( १७८८–१८३० ) यांनीं मराठी भाषेंत अतिशय सोपी, रसाळ अशी गद्यात्मक ग्रंथरचना प्रथम केली. 'बाळमित्र', 'इसापनीति' हीं त्यांचीं पुस्तकें तर फारच प्रसिद्ध आहेत.

सन १८२८ च्या सुमारास मराठी भाषा कशी होती ह्याची कांहींशी कल्पना यावी व छत्र्यांची भाषाशैली कशी होती हें समजावें म्हणून त्यांच्या 'बाळमित्र' पुस्तकांतील लहानसा उतारा आपण पाहूं या.

( स्वतंत्र व्हावयास इच्छिणारीं मुलें )

कामू : आहा बाबा ! मला वाटतें कीं, मी मोठा असतों तर बरें होतें ! मोठा तुझे इतका.

आबा : माझे लाडक्या, तुला असें कां वाटतें ?

कामू : एवढ्यासाठीं कीं, मग मला कोणाचे आज्ञेंत राहणें नको. माझे मनास येईल तें मी करीन.

आबा : मला वाटतें कीं, मग तूं मोठे चमत्कार करिशील.

कामू : यांत काय संशय ? तसें होईल तर दाखवीन.

आबा : आणि जाई, तुला पण स्वतंत्र व्हावेसें वाटतें गे ?

जाई : होय बाबा. मलाहि तसेंच वाटतें.

कामू : आहा ! जर आम्ही दोघे स्वतंत्र झालों तर मग काय मजा पाहिजे ?

आबा : बरें तर मुलांनो, हें तुमचें कोड मी पुरवीन. उद्यां सकाळपासून तुम्हांस मोकळीक देतों कीं, जें तुमचे मनास येईल तें करा.

कामू : बाबा, तूं आमची थट्टा करितोस.

आबा : नाहीं, मी खरेंच म्हणतों.

सदाशिव काशिनाथ जसे त्या काळांतील प्रसिद्ध पुरुष तसेंच बाळशास्त्री जांभेकरहि ( १८१० ते १८६५ ). महाराष्ट्रीय असे हे पहिले प्रोफेसर ! तसेंच महाराष्ट्रांतील पहिले वर्तमानपत्रकार ! ! ह्यांनीं 'दर्पण' नांवाचें वर्तमानपत्र काढलें. या पत्राचा पहिला अंक शुक्रवार ता. ६ जानेवारी १८३२ रोजीं प्रसिद्ध झाला. पहिल्याच अंकांत 'दर्पणा'चा उद्देश असा सांगितला आहे कीं, 'विलायतेंतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धि व येथील लोकांचें कल्याण याविषयीं स्वतंत्रतेनें व उघड रीतीनें विचार करावयास स्थल व्हावें म्हणन 'दर्पण' सुरू करण्यांत येत आहे.

असा 'दर्पणा'चा उद्देश आरंभींच सांगून पुढील शब्दांत त्याचें संपादकीय धोरण सांगितलें आहे : 'मनोरंजन करणें, चालते काळाचीं वर्तमानें कळविणें आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणें या गोष्टींची "दर्पण' छापणारांस मोठी उत्कंठा आहे. म्हणोन या गोष्टी साध्य होण्याविषयीं जितका प्रयत्न करवेल तितका ते करतील.

'दर्पणा'चा २३ जून १८४० रोजीं शेवटचा अंक निघाला व तें बंद पडलें.

'दर्पणा'नंतर ता. २४ ऑक्टोबर १८४१ पासून गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन यांच्या संपादकत्वाखालीं 'प्रभाकर' नांवाचें साप्ताहिक सुरू झालें. हें साप्ताहिक दर रविवारी निघे.

गोपाळ हरि देशमुख लोकहितवादी यांनीं निद्रिस्त समाज जागा व्हावा, तो डोळस व्हावा, त्यानें स्वतःच्या उन्नतीसाठी धडपड करावी म्हणून 'प्रभाकर' पत्रांतून 'शतपत्रें' लिहून समाजाच्या विचारांना आवाहन केलें. लोकांना विचार करावयास लावलें. 'वृत्तवैभव', 'इंदुप्रकाश' इत्यादि त्या काळच्या वर्तमानपत्रांतूनहि त्यांनीं आपल्या तिखट लेखणीचा खूप उपयोग केला. मात्र, त्यांच्या सर्वच लिहिण्यांत विचारांची बैठक एकच होती असें नाहीं. इंग्रजांचा आपण जास्तींत जास्त उपयोग करून घेऊं या व आपली सर्वतोपरी उन्नति करूं या, असा त्यांच्या सर्व लिखाणाचा सारांश होता. त्यांनीं इंग्रजांचे गुण गाइले तसे त्यांचे दोषहि दाखविले. ते आपल्या एका पत्रांत लिहितात : 'लोकांना मद्यपानाचें व्यसन लावून द्रव्याची आशा धरून दुर्गुणावर उत्पन्न करतात. आणि प्रसिद्धपणें दुर्गुण वाढूं देतात'. (शतपत्र ७६) दुसऱ्या एका शतपत्रांत ते म्हणतात : "सांप्रत हिंदु लोक भिकारी होत चालले आहेत आणि त्यांना रोजगार, धंदा मिळत नाहीं. याचें कारण मला असें दिसतें कीं, या लोकांचा व्यापार अगदीं बुडाला. आपल्या लोकांनीं एकत्र येऊन असा कट केला पाहिजे कीं, आपल्या देशास दुसरे मुलखाचा जिन्नस आला तरी घ्यावयाचा नाहीं. आपले देशांत पिकेल तेवढाच माल घ्यावा. आपले लोक जाडीं कापडे वाईट करतात पण तींच नेसावीत. इकडे छत्र्या करितात त्याच घ्याव्या म्हणजे या लोकांचा व्यापार राहून इकडे सुख होईल.... आपलें सामान त्यांस द्यावें. आपले देशाचें रक्षण

करावें. असें झालें म्हणजे बहुत रोजगार राहतील."

लोकहितवादी स्वतः सरकारी नोकरींत मोठ्या हुद्यावर होते. तरी पण ते आपलें स्पष्ट मत मांडण्यास मागेंपुढें पाहात नसत. त्यांनीं आपलीं राजकीय मतेंहि अशींच स्पष्ट रीतीनें मांडलीं. एका पत्रांत ते लिहितात : "हिंदुस्थानांतील लोक शहाणे झाले म्हणजे (इंग्रजांना हळूच म्हणतील कीं,) तुमच्या देशांत पार्लमेंट आहे तसें द्या....आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून राहतील. ज्या काळीं इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कानु बसवायचा आग्रह करतील त्या काळीं अमेरिकेंत झालें तसें हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजांस सांगतील कीं, तुम्हीं आपले देशीं जावें. यास दोनशें वर्षें तरी पाहिजेत. परंतु असें होईल यांत शंका नाहीं."

लोकहितवादीबद्दल एवढें विस्तृत सांगण्याचा हेतु हा कीं, इ. स. १८३० पासून पुढच्या काळांत महाराष्ट्रांतील बहुतेक सुशिक्षितांच्या राजकीय विचारांच्या प्रवाहाची दिशा कळावी.

महाराष्ट्रांतील साऱ्याच प्रमुख लोकांना महाराष्ट्राची सामाजिक, सांस्कृतिक आणि साधल्यास राजकीय सुधारणा व्हावी असें वाटत होतें. त्याला ही विद्वान् मंडळी मूर्त स्वरूप देऊं पाहात होती. त्यांनीं इ. स. १८४० सालीं 'परमहंस' नांवाचें एक मंडळ मुंबई येथें स्थापन केलें. यांत बहुतेक मंडळी इंग्रजी शिकलेलीच होती. या मंडळाच्या सभा गुप्तपणें होत. जातिभेद मानूं नये, मूर्तिपूजा करूं नये, असे या मंडळाचे मुख्य उद्देश होते. या मंडळाचा सभासद होऊं इच्छिणारास प्रथम 'मी जातिभेद मानणार नाहीं' अशी प्रतिज्ञा तर करावी लागेच, शिवाय ख्रिस्ती भटारखान्यांत तयार केलेल्या पावाचा तुकडा तोंडांत टाकावा लागे. त्यावर परजातीच्या हातचें घोटभर पाणी प्यावें लागे. जातिभेद मानूं नये आणि मूर्तिपूजा करूं नये ह्या मंडळाच्या मुख्य उद्देशाप्रमाणेंच विधवांच्या पुनर्विवाहाबद्दल संमति असावी, वगैरे अनेक उद्देश होते.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं झटणारीं अशींच कितींतरी मंडळें, संस्था आणि व्यक्ति सन १८३० पासून १८७० पर्यंत पुढें आल्या. मुंबईस

'स्टूडंटस् लिटररी सायंटिफिक सोसायटी' डॉ. भाऊ दाजी लाड, जगन्नाथ शंकरशेट इत्यादि प्रमुख मंडळींनीं स्थापन केली. या सोसायटीनें मुलींची पहिली शाळा काढली व समाजसुधारणेचा पाया घातला! शिमग्याच्या सणांतील अश्लील व अनीतिजनक प्रकार कायद्यानें बंद करण्याबद्दल सन १८५२ सालीं जगन्नाथ शंकरशेट यांनीं सरकारकडे अर्ज केला. सार्वजनिक हिताच्या प्रकरणांवर लोकमत अजमावून तें सरकारास कळविण्याचें काम करण्यासाठीं म्हणून 'बाँबे असोसिएशन' नांवाची संस्था निघाली.

याच काळांत महाराष्ट्रांत शिक्षणाच्या प्रसाराला चांगलीच चालना मिळाली. संस्था, सरकार आणि व्यक्ति यांनीं तिहेरी प्रयत्न सुरू केले. पण शिक्षणाच्या बाबतींत मुख्यतः ज्योतिबा फुल्यांचें नांव प्रामुख्यानें डोळ्यांपुढें उभें राहतें. याचें कारण स्त्रीशिक्षणास आणि हरिजनांस शिक्षण देण्याच्या बाबतींत लोकमत अनुकूल नसतांहि त्यांनीं केलेले प्रथम प्रयत्न हें होय.

ज्योतिबा फुले ( १८२७–१८९० ) ह्यांनीं आपली सारी हयात मागासलेल्या समाजाच्या उन्नतीसाठीं आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठीं घालविली. देशांत खरी सुधारणा व्हायला हवी असेल तर मागासलेला समाज आणि स्त्रिया यांना शिक्षण मिळालें पाहिजे, असें त्यांचें पक्कें मत झालें होतें. आणि म्हणूनच त्यांनीं इ. स. १८५१ सालीं पुण्यास मुलींची शाळा सुरू केली.

ज्योतिबांनीं हें त्या काळीं केलेलें फार मोठें धाडस होतें. कारण स्त्रियांना शिक्षण देणें हें अयोग्य समजलें जाई. स्त्री शिकली तर तिचा नवरा मरतो अशा त्या काळीं अडाणी समजुतीहि होत्या.

हरिजनांच्या मुलांसाठींहि ज्योतिबांनीं शाळा काढली होती -- आणि तीहि त्यांनीं आपल्या घराच्या ओटीवर!

ज्योतिबांच्या या जनमताच्या विरुद्ध कृत्यांमुळें त्यांना फार त्रास सोसावा लागला. लोकांनीं त्यांना त्रास दिलाच पण आईवडिलांनींहि त्यांना घरांतून बाहेर काढलें. हरिजनांच्या मुलांना त्यांच्या शाळेंत प्रवेश होता. म्हणून कोणी अध्यापकहि त्यांना मिळेनासा झाला. आणि त्यामुळें ज्योतिबांनीं

आपल्या पत्नीची अध्यापिका म्हणून मदत घेतली. लोकांनीं त्या माउलीच्या अंगावर जातां येतां खडेहि मारले. तरी पण तिनें तो त्रास सहन केला आणि आपल्या पतीला शिक्षणकार्यांत शक्य ती मदत केली.

सरकारहि शहराच्या आणि मोठ्या गांवांतून शाळा काढीत होतें. मात्र त्या वेळचें शिक्षण आणि आजचें शिक्षण ( १९६६ चें ) यांत शिकावे लागणारे विषय, शिकविण्याची आणि शिकण्याची पद्धति, शिक्षणासाठीं लागणारें साहित्य यांत बराच फरक होता. केवळ कल्पना येण्यासाठीं त्या वेळच्या धूळपाटीबद्दल आणि त्या वेळच्या 'परवचा' म्हणण्याबद्दलच आपण पाहूं गेलों तरी आपणांस असें दिसून येईल कीं, आज आपण लिहिण्यासाठीं ज्या पाट्या वापरतों तशा पाट्या शंभर वर्षांपूर्वीं मिळत नसत. म्हणून लेखनासाठीं एक लहानशी लाकडी फळी घेऊन तिच्यावर बारीक, सारखी धूळ पसरावयाची आणि मग लांकडाच्या बोथट लेखणीनें लिहावयाचें. त्या वेळचीं शाळकरी मुलें दर रविवारीं पाट्या 'माजविण्यास' विसरत नसत. मुलांमुलांत पाट्या माजविण्याची जणूं काय चढाओढ चाले. पाटी स्वच्छ धुवावयाची आणि तिच्यावर ओल्या मातीचा अगर खडूचा पातळ थर द्यावयाचा. या माजविलेल्या पाटीवर अंक किंवा अक्षरें काढतांना किती आनंद व्हावयाचा ! आणि परवचा म्हणतांना ?

त्या आनंदाला सीमाच नाहीं ! क, का–कला काना का. के–कला एक मात्रा के. कै–कला दोन मात्रा कै. को–कला एक काना एक मात्रा को. अशी उजळणी मोठ्या ठेक्यांत म्हणावयाची.

आणि वाचनाची पद्धति ? ती तर मोठी गंमतीची ! पंतोजीनें अगर मालचाट्यानें ( वर्गांतील प्रमुख मुलानें ) हातांत पाटी घेऊन किंवा पुढें टांगलेल्या पाटीवर पाहून एक एक अक्षर वाचावयाचें. जसें 'नागरमोथा'– "नला काना ना. गला कांहीं नाहीं. रला कांहीं नाहीं. मला काना मात्रा मो. थला काना था.–नागरमोथा."

मुलांचें पहिलें शिक्षण पंतोजीच्या ( खाजगी शिक्षकाच्या ) शाळेंत व्हावयाचें. उजळणी, वाचन आणि वळणदार अक्षर शिकून झालें कीं मग

सरकारी शाळेंत जावयाचें असा सर्वसाधारण शिरस्ता त्या काळीं होता. वळणदार अक्षराला त्या काळीं फार महत्त्व होतें. कांहीं मुलीच्या आई-बापांना आपला जांवई चांगलें अक्षर काढतो ह्याचें भूषणहि वाटे.

महाराष्ट्रांत त्या काळीं जितक्या वेगानें सुधारणा होऊं पाहत होत्या तितक्याच वेगानें त्यांना विरोधहि होत होता. धार्मिक आणि सामाजिक बाबींना तर हा विरोध तीव्र होता. जुनी मंडळी या विरोधाची मुख्य शक्ति होती. जुन्या समजुती, जुन्या चालीरीती टिकविणें हेंच त्या विरोधाचें मुख्य कारण होतें.

असें सांगतात कीं, पेशवाई गेल्यानंतर पुण्याचे गंगाधर दीक्षित फडके नांवाचे विद्वान् गृहस्थ युरोपियन ऑफिसरांना मराठी शिकविण्याकरितां 'पंडित' म्हणून पुण्याहून मुंबईस गेले आणि तेथें सहा वर्षे पंडिताचें काम करून परत पुण्यास आले. पण पुण्याच्या भट-भिक्षुकांनीं त्यांच्यावर बहिष्कार घातला. तुम्हीं युरोपियनांस शिकविलें म्हणून तुम्हीं प्रायश्चित्त घेतलें पाहिजे, अशी एकसारखी टोंचणी त्यांच्यामागें कांहीं लोकांनीं लावली. शेवटीं गंगाधर दीक्षित फडके यांनीं जेव्हां प्रायश्चित्त घेतलें तेव्हांच त्यांना जातींत घेतलें !

दुसऱ्या बाजीरावाच्या आधारानें कांहीं ब्राह्मण कुटुंबें होतीं. त्यांपैकीं कांहींना मुंबईचा गव्हर्नर एलिफन्स्टन यानें पेन्शनें देण्याचें ठरविलें. पण तीं ब्राह्मण कुटुंबें पेन्शन घेण्यास तयार होईनात. कां ? तर म्हणे, युरोपियन हे म्लेच्छ ! या म्लेच्छांच्या हातचा पैसा कोण घेतो !

पण ह्याहिपेक्षां एक गमतीची गोष्ट इ. स. १८६० सालीं घडली ती अशी : पुण्याच्या एका न्हाव्यानें नवें घर बांधलें आणि घराच्या वास्तुशांतीला ब्राह्मणांस बोलाविलें. ब्राह्मणांनीं वास्तुशांति केली. पण दुसऱ्या कांहीं ब्राह्मणांस तें पसंत पडलें नाहीं. त्यांनीं वास्तुशांतीचें कार्य करणाऱ्या ब्राह्मणां-वर बहिष्कार घातला !

ह्या गोष्टीचा न्हाव्यांना राग आला. त्यांनीं ब्राह्मणांवर 'न्हावण्याचा' प्रयोग केला. वास्तुशांति करणाऱ्या ब्राह्मणांवर ज्या ब्राह्मणांनीं बहिष्कार

घातला होता त्यांच्या 'हजामती' करावयाच्या नाहींत असें न्हाव्यांनीं ठरविलें. मग काय ! थोड्याच दिवसांत ब्राह्मणांच्या बोट बोट दाढ्या वाढल्या की !

शेवटीं ब्राह्मण नमले. त्यांनीं आपला बहिष्कार मागें घेतला आणि मग त्यांच्या दाढ्या गुळगुळीत झाल्या ! त्या वेळच्या वर्तमानपत्रांत 'ब्राह्मण्याऐवजीं न्हावण्य' अशा मथळ्याखालीं ही बातमी छापलेली आहे !

अशीं किती तरी उदाहरणें त्या काळीं घडत होतीं. लोकहितवादी ( गोपाळ हरि देशमुख ) एवढे सुधारक ! एवढे प्रगत विचारांचे; पण त्यांनाहि प्रायश्चित्त घ्यावें लागलें. आणि तेंहि अगदीं क्षुल्लक कारणासाठीं. त्याचें असें झालें कीं, पुण्यांत शंकराचार्यांसमोर कांहीं विद्वान् मंडळींनीं 'पुनर्विवाह करावा कीं करूं नये' यासाठीं वादविवाद केला. यावर या वादविवादांत लोकहितवादींनींहि भाग घेतला ! ही बातमी लोकहितवादींच्या मुलीच्या सास्वेच्या कानांवर गेली. तेव्हां तिनें लोकहितवादींस निरोप पाठविला कीं, 'तुम्हीं या वादांत भाग घेतला म्हणून प्रायश्चित घ्या व पावन व्हा. नाहींतर तुमच्या लेकीचा त्याग करून मी माझ्या लेकाचें दुसरें लग्न केल्याशिवाय राहणार नाहीं.'

हा निरोप आल्यावर देशमुखांनीं प्रायश्चित्त घेतलें ! करतात काय !!

महाराष्ट्रांत हिऱ्याच्या खाणी नसल्या तरी मानवी हिरे मात्र खूप ! एकापेक्षां एक तेजदार ! महाराष्ट्रांत एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं पहिली पिढी ज्ञानाच्या आणि विचारांच्या दृष्टीनें प्रसिद्धीस आली. तीपेक्षां दुसरी पिढी ज्ञानानें आणि विचारानेंसुद्धां कांहींशी अधिकच प्रसिद्धीस आली ! न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे हे या सर्वांत श्रेष्ठ होते. त्यांस 'पदवीधरांचे मुकुटमणि' असेंहि त्या काळीं म्हणत.

न्या. रानड्यांनीं महाराष्ट्राच्या प्रगतीचा सोपा, सरळ मार्ग दाखविला. सरकारी नोकरी करूनहि देशहिताचीं कामें करतां येतात, सार्वजनिक कामें करतां येतात, हें स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिलें. महाराष्ट्रांतील त्या वेळच्या बहुतेक साऱ्याच सार्वजनिक चळवळींचे ते जनक होते असें जरी

म्हणतां आलें नाहीं, तरी ते मार्गदर्शक होते असें नक्कीच म्हणतां येईल. महाराष्ट्रांतूनच काय पण साऱ्या भारतांतून लोक त्यांच्याकडे सल्लामसलतीसाठीं, मार्गदर्शनासाठीं येत. आणि न्यायमूर्ति रानडे त्यांना मोठ्या आनंदानें सल्लामसलत देत. मार्गदर्शन करीत. न्या. रानडे यांजबद्दल गोपाळ गणेश आगरकर म्हणत, "पुण्यांत काय किंवा सबंध महाराष्ट्रांत काय, पुष्कळ लोक शिकून मानाच्या व अधिकाराच्या जागांवर चढलेले आहेत. ते सर्व कोणी आपली संपत्ति वाढविण्याच्या खटपटींत आहेत तर कोणी बायकामुलांत गुंग आहेत. पण रानड्यांच्या घरीं आपलें केव्हांहि जा. देशोन्नतीचे विचार, चर्चा आणि तळमळ यांविषयीं त्यांच्या आपल्या कांहीं तरी योजना सुरूच आहेत.'

कोणालाहि आणि केव्हांहि सरकारी नोकरीचा मुकुट डोकीवर घालून देशकार्य करीत राहणें ही गोष्ट फार कठीण आणि अतिशय अडचणीची. तारेवरील कसरत ! चालणाराला दोनहि बाजू संभाळून चालावें लागतें. थोडा जरी अधिक तोल एका बाजूस गेला तरी चालणारा सपशेल पडलाच ! न्या० रानडे यांनीं सरकारी नोकरी आणि देशकार्य ह्या दोनहि गोष्टी नमुनेदार केल्या. त्यांनीं फार मोठी वैचारिक क्रांति घडवून आणली. सामाजिक प्रश्नांप्रमाणें राजकीय प्रश्नांचीहि चर्चा झाली पाहिजे हें लोकांच्या लक्षांत तीव्रतेनें आणून ती कृतींत उतरविण्याची कामगिरी न्या० रानड्यांनीं केली. कोणत्याहि प्रश्नाकडे सर्वांगीण कसें पाहावें, हें रानड्यांनींच शिकविलें. नवे नवे सामाजिक व राजकीय प्रश्न उत्पन्न करून त्यांना मूर्त स्वरूप आणण्यासाठीं नवीं मंडळें, नव्या संस्था स्थापन करण्यास रानड्यांनींच प्रोत्साहन दिलें. रानड्यांनींच मार्गदर्शन केलें. नव्या-जुन्याची सांगड त्यांनींच घातली.

इ. स. १८७३ सालच्या डिसेंबर महिन्यांत त्यांनीं 'स्वदेशी व्यापार' या विषयावर एक व्याख्यान दिलें. त्यांत स्वदेशी वस्तु कां वापराव्यात आणि परदेशी वस्तु कां वापरूं नयेत, हें नीट समजावून दिलें आणि दरसाल सोळा कोट रुपयांची संपत्ति इंग्रज कशी शोषण करतात हेंहि पटवून दिलें. शिवाय

सोन्याचा उपयोग दागिने करून ठेवण्यांत देशाचें कसें नुकसान आहे, हेंहि समजावून सांगितलें. ते म्हणाले, "१८६१ पासून १८७० पर्यंत हिंदुस्थानांत सोनें व रुपें १५० कोटी रुपयांचें आलें. त्यांतल्या अर्ध्या सोन्यारुप्याचें नाण्यांत रूपांतर झालें आणि बाकीचें पाऊणशें कोटींचें सोनें-रुपें लोकांनीं आपल्या हातांनीं मातींत मिसळलें. ( दागदागिने केले. ) सोन्या-रुप्याचा व्यवहारांत उपयोग होऊन इतर द्रव्याचें त्यास रूपांतर मिळून देशांत रोजगारधंदे वाढण्याचे कामीं तें उपयोगी पडलें पाहिजे. तरच देशाची भरभराट होईल आणि व्यापार वाढेल."

न्यायमूर्तींच्या शिक्षणाचा काळ सोडला तर जवळजवळ चाळीस वर्षे महाराष्ट्राच्या जडणघडणीला त्यांचा हातभार लागला आणि महाराष्ट्राला उन्नतावस्था प्राप्त झाली. आणि म्हणूनच म्हणतात कीं, "महाराष्ट्राचीं ( आणि भारताचींसुद्धां ) जीं अनेक भूषणें आहेत त्यांत न्या० रानडे हें पहिल्या प्रतीचें भूषण आहे. महाराष्ट्रांत सन १८३० पासून जरी अनेक चळवळी होत होत्या. तरी त्या इंग्रजी शिकून शहाणे झालेल्या लोकांच्या जवळपासच होत्या. समाजाच्या सर्व थरापर्यंत त्या जात नव्हत्या. त्याच्या कानांवरहि पडत नव्हत्या. पुणें, मुंबई, नाशिकसारखीं मोठीं शहरें सोडलीं तर सामाजिक सुधारणा आणि राजकीय सुधारणा यांचा इतर ठिकाणीं गंधहि नव्हता. सन १८५९ सालीं घडलेली सोलापूर जिल्ह्याच्या माढें गांवची ही हकीकत आपणांस कळली तर मग आपण चटकन् म्हणूं 'हो, सुधारणेचें लोण त्या काळीं खेडोंपाडीं पोंचलें नव्हतें हेंच खरें !'

माढें गांवची गोष्ट अशी आहे : "एका गृहस्थाचें घर अतिवृष्टीमुळें पडलें. घराच्या ढिगाऱ्याखालीं त्या गृहस्थाची विधवा बहीण सांपडली आणि ती प्राणास मुकली. तिचें वपन झालें नव्हतें. अर्थात् तिच्या प्रेताला स्पर्श केल्यास ब्राह्मणांस जातिभ्रष्ट व्हावें लागलें असतें. प्रेताच्या वपनाला न्हावी तयार होईनात. अखेरीस शूद्रांच्या हातून तिला अग्निसंस्कार मिळाला."

इ. स. १८७० च्या सुमारास महाराष्ट्र एक थंड गोळा होता. या थंड गोळ्यास कोणत्या तऱ्हेनें ऊब द्यावी म्हणजे तो हातपाय हालवूं लागेल

याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं, अनेक रीतींनीं त्यास जिवंतपणा आणण्यासाठीं न्या० रानड्यांनीं जिवापाड मेहनत घेतली. त्यांचीं व्याख्यानें ऐकून सार्वजनिककाकांसारखे विद्वान् गृहस्थ तेथल्या तेथें प्रतिज्ञा करीत, ' मी माझें आयुष्य देशासाठीं खर्चीन. '

पुण्यास सन १८७२ सालीं न्यायमूर्तींनीं स्वदेशी वस्तूच कां वापराव्यात याविषयीं जें व्याख्यान दिलें त्या दिवसापासूनच पुण्यांत स्वदेशी वस्तु वापरणें हें मानाचें आहे, असें समजण्यांत येऊं लागलें. सार्वजनिककाकांनीं तर त्या दिवसापासून फार मोठी चळवळ केली.

सार्वजनिककाका होतेच तसे. ते हातीं जें काम घेत त्यासाठीं ते आपली सारी शक्ति ओतीत. त्यांच्या या गुणामुळेंच त्यांचें खरें नांव गणेश वासुदेव जोशी हें बहुतेकांस माहीतहि नव्हतें. तर सार्वजनिककाका म्हणूनच त्यांना लोक ओळखीत. काका मूळचे साताऱ्याचे. त्यांचा जन्म १८२८ सालीं साताऱ्यास झाला. कांहीं वर्षें त्यांनीं सरकारी नोकरी केली. पण पुढें त्यांनीं नोकरी सोडली आणि कायद्याचा अभ्यास करून ते वकील झाले. वासुदेव बळवंत फडके यांजवर देशद्रोही म्हणून सरकारनें खटला भरला. त्या खटल्यांत वासुदेव बळवंतचे बचावाचे वकील म्हणून सार्वजनिककाकांनीं वकिली केली. त्या वेळीं त्यांनीं सरकारी रोषाची पर्वा केली नाहीं. काका देशासाठीं चंदनासारखे झिजले आणि सन १८८० सालीं मृत्यु पावले.

एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धशतकांत महाराष्ट्रांत एकापेक्षां एक सरस असे अनेक पुरुष निर्माण झाले आणि त्या प्रत्येकाचें ध्येय एकच— महाराष्ट्राची (आणि त्याचबरोबर भारताची) भरभराट व्हावी, महाराष्ट्र वैभवाच्या शिखरावर चढावा. मात्र सर्वांचें हें एकच ध्येय जरी असलें तरी प्रत्येकाचें कार्यक्षेत्र वेगळें होतें. प्रत्येकजण आपापल्यापरी महाराष्ट्र धष्टपुष्ट व्हावा, बलवान व्हावा, यासाठीं झटत होता. महाराष्ट्राचा कीर्तिसुगंध दूरवर पसरवीत होता. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांची कीर्ति, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स इत्यादि पाश्चिमात्य देशांपर्यंत जाऊन पोंचली ती ते एक संस्कृत महापंडित म्हणून. राजकारणांत जसें न्या. रानडे महाराष्ट्राचे द्रोणाचार्य, तसे संस्कृत भाषेच्या ज्ञानांत आणि धर्म-

शास्त्रांत भांडारकर भीष्माचार्य. भांडारकर विद्येनें, स्वभावानें आचरणानें, अत्यंत पूज्य. महाराष्ट्राचे भीष्माचार्य ! बृहस्पति ! !

सदाचरण, लोकसेवा आणि न्यायबुद्धि यांवर डॉ. भांडारकरांचा विशेष कटाक्ष असे. विद्यार्थ्यांनाहि ते ह्याच गोष्टी अंगीं बाळगण्याचा उपदेश करीत. ते म्हणत, "आपण केवळ विद्या संपादन केली म्हणजे सुशिक्षित झालों, असें नव्हे, तर ज्याला सत्य व न्याय ह्यांस अनुसरून आपल्या आचरणास स्वरूप देतां येत नाहीं, ज्याला आपली विकसित झालेली जी सदसद्विवेक बुद्धि ती ज्या प्रकारचा उपदेश करील त्याप्रमाणें वागतां येत नाहीं, त्यास आपल्या स्वत:ला सुशिक्षित असें म्हणवून घेण्याचा कांहीं अधिकार नाहीं."

डॉ. भांडारकर हे राजकीय सुधारणांकडे आस्थेनें पाहत. मात्र राजकीय सुधारणा करण्याच्या कामीं त्यांनीं प्रत्यक्ष असा भाग घेतलाच असेल तर तो थोडा. सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक सुधारणांकडे मात्र ते अधिक आस्थेनें पाहत आणि संधि सांपडतांच त्यांत भागहि घेत. मागासलेला समाज शिक्षित झाला पाहिजे आणि तो शिक्षित होण्यासाठीं सुशिक्षितांनीं नेटानें प्रयत्न केले पाहिजेत असें त्यांचें मत होतें. ते आवर्जून म्हणत, "...या लोकांमध्यें बुद्धिमान माणसें पुष्कळ असतात व त्यांना उत्तम प्रकारचें शिक्षण देतां येईल. त्यांना असें अज्ञानांतच डांबणें म्हणजे इतक्या बुद्धीला आमच्या देशानें मुकणें होय."

अशा प्रकारचे प्रगतिपर विचार जरी डॉ. भांडारकरांनीं निरनिराळ्या वेळीं केलेल्या भाषणांतून प्रकट केले तरी त्यांनीं या विचारामुळें महाराष्ट्राला कीर्ति मिळवून दिली असेंच कांहीं आपणांला म्हणतां येणार नाहीं. त्यांनीं महाराष्ट्राला कीर्ति मिळवून दिली त्याचें कारण वेगळें आहे; आणि तें म्हणजे त्यांच्या ठिकाणीं असलेलें संस्कृत ज्ञानभांडार ! डॉ. भांडारकर हे संस्कृत भाषेचे भीष्माचार्य होते. बृहस्पति होते. भारतांतीलच नव्हे तर जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड वगैरे ठिकाणच्या विद्यापीठांनीं त्यांच्या संस्कृत ज्ञानाबद्दल मुक्तकंठानें स्तुति केली ! भारताच्या निरनिराळ्या भागांतून आणि जगांतील

सो....१०

सर्व ठिकाणांहून मोठमोठे विद्वान् डॉ. भांडारकरांच्या भेटीसाठींच महाराष्ट्रांत येत होते आणि त्यामुळेंच महाराष्ट्राची कीर्ति वाढत होती.

मागें सांगितल्याप्रमाणें एकोणिसाव्या शतकांत महाराष्ट्रांत एकापेक्षां एक श्रेष्ठ पुरुष जन्मले. पंडित काय, विष्णुशास्त्री चिपळूणकर काय, राजारामशास्त्री भागवत काय, न्या. तेलंग काय, लो. टिळक ( बाळ गंगाधर टिळक) काय, गोपाळ गणेश आगरकर काय, शिवराम महादेव परांजपे काय, आनंदीबाई जोशी काय, धोंडो केशव कर्वे काय, किती तरी नररत्नें या काळांत चमकलीं. प्रत्येकानें आपल्या कर्तृत्वानें सर्वांना दिपवून टाकलें, विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं सन १८७४ सालीं 'निबंधमाला' सुरू केली. महाराष्ट्रांत निबंधमालेपूर्वीं वर्तमानपत्रें सुरू झालीं होतीं. पण चिपळूणकरांच्या निबंधमालेचें स्वरूप अगदीं आगळें ! एखाद्या विषयाचा साधक बाधक विचार कसा करावा, आपलीं मतें स्पष्ट आणि बिनचूक कशीं मांडावीं हें महाराष्ट्राला चिपळूणकरांच्या निबंधमालेनें शिकविलें, तर राजाराम रामकृष्ण ऊर्फ राजारामशास्त्री भागवत यांनीं आपलीं मतें दुसऱ्याच्या मतांची पर्वा न करतां, आपणाला जें पटेल तें आचरणांत आणण्यास मुळींच कचरूं नये हें आपल्या स्वतःच्या वागण्यानें लोकांना पटविलें. शाळेच्या अभ्यासक्रमांत धार्मिक शिक्षणाचा अंतर्भाव करण्याविषयीं त्यांनीं अतिशय मेहनत घेतली. तुकाराम, रामदास इत्यादि संतांच्या आणि साधुपुरुषांच्या पुण्यतिथ्या दरवर्षी साजऱ्या करण्याचा अभिनव उपक्रम प्रथम त्यांनींच सुरू केला. ते जातिभेद तर मुळींच मानीत नसत. आणि हें लोकांना दाखविण्यासाठी भागवत मुंबईतील ठाकुरद्वारच्या रस्त्यावर उभे राहून इराण्याचा चहा आणि पाव खात. महाराकडे फराळ करीत. स्वतःच्या हातावर पैसा ठेवून झाडूवाल्याला म्हणत, "तूं हा पैसा माझ्या हातावरून उचलून ने." एकनाथषष्ठीच्या दिवशीं ते महारांच्या मुलांना स्वतः खाऊ वांटीत. आज वैदिक पद्धतीनें जो लग्नविधि व उपनयनविधि प्रचारांत आहे तो संक्षिप्त स्वरूपांत आणि सुधारलेल्या पद्धतीनें प्रचारांत प्रथम राजारामशास्त्री भागवतांनींच आणला.

शास्त्रीबोवांना मराठ्यांचा आणि महाराष्ट्राचा फार मोठा अभिमान. छत्रपति शिवाजीमहाराजांना ते दैवतच समजत. महाराजांचें पहिलें चरित्र शास्त्रीबोवांनीं लिहिलें आणि महाराजांचें नेहमीं दिसणारें कमरेपर्यंतचें चित्र देखील शास्त्रीबोवांनींच पहिल्यानें आपल्या पुस्तकावर छापलें आणि तेंच पुढें लोकप्रिय झालें !

महाराष्ट्रांत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक, शैक्षणिक सुधारणांकडे जसें सर्वांचें लक्ष वेधलें होतें, तसें राजकीय हक्कांकडेहि लोकांचें लक्ष वेधलें होतें. स्वातंत्र्याचें आणि स्वराज्याचें महत्त्व कळूं लागलें होतें. इतकेंच नव्हे, तर स्वातंत्र्याची तीव्र लालसा महाराष्ट्रांतील सर्व समाजांतील जनतेला उत्पन्न झाली होती. अलिकडच्या म्हणजे सतराव्या, अठराव्या शतकांत स्वातंत्र्याचीं जीं गोड फळें महाराष्ट्रानें चाखलीं होतीं त्याची त्याला आठवण वारंवार होत होती. आणि याचें उदाहरण म्हणजे इ. स. १८२० सालीं रामाजी कामत या मुंबईच्या गृहस्थांनीं आंग्र्यांशीं संधान बांधून इंग्रजांची सत्ता समूळ उखडून टाकण्याचा केलेला प्रयत्न !

स्वातंत्र्यलालसेनें असा प्रयत्न करणारा पहिला पोलादी छातीचा पुरुष महाराष्ट्रांतला !

रामाजी कामत यांनीं स्वातंत्र्यासाठीं असा प्रयत्न केला खरा, पण त्यांना त्या वेळीं यश आलें नाहीं. उलट त्यांची सारी इस्टेट जप्त झालीच; शिवाय त्यांना जन्मठेपेची शिक्षाहि झाली !

पुढें महाराष्ट्रांत स्वातंत्र्यासाठीं इ. स. १८४० च्या आंतबाहेर भाऊ खरे, चिमणाजी जाधव, नाना दरबारे, रामभाऊ गोरे वगैरे लोकांनीं आपापल्या परीनें लहानमोठे प्रयत्न केले. सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत तर महाराष्ट्रानें प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असा अत्यंत महत्त्वाचा बराचसा भाग घेतला.

पण महाराष्ट्राची स्वातंत्र्यप्राप्तीच्या तळमळीची खरी कसोटी लागली ती वासुदेव बळवंत फडके यांच्यामुळें !

वासुदेव बळवंत फडके हे कुलाबा जिल्ह्यांतील शिरढोण गांवचे. ते पुण्याला सरकारी नोकरींत होते. पण त्यांना सतत वाटत असे, भारत माझा

आहे. त्यासाठीं माझें कांहीं कर्तव्य आहे आणि तें मीं पार पाडलेंच पाहिजे. भारत स्वतंत्र झाला पाहिजे. त्याला स्वातंत्र्य पाहिजे. भारताला कसें स्वातंत्र्य मिळेल ? सशस्त्र क्रांति करून ?

होय, सशस्त्र क्रांति करून ! असें त्यांचें मन त्यांना नेहमीं सांगे.

पण मनानें घेतलेलें कृतींत उतरणें कठीण असतें. कारण त्याला पावलों-पावलीं अडथळे येतात. आपत्ति ओढवतात. छळ होतो. त्रास सहन करावा लागतो. संकटांना टक्कर द्यावी लागते. निंदा सहन करावी लागते. एक का दोन ! अशा अनेक अडचणींना तोंड द्यावें लागतें, तेव्हां कुठें मनानें ठरविलेलें कृतींनें घडलें तर घडतें.

वासुदेव बळवंत फार चिकाटीचे, धैर्याचे, निश्चयाचे ! स्वातंत्र्यासाठीं आपला देह कामीं आला तरी बेहेत्तर असें मानणारे. ते सुटीच्या दिवशीं खेड्यांत जात. तेथील जनतेला समजेल अशा भाषेंत ते आपले विचार मांडीत. स्वातंत्र्याचें महत्त्व पटवीत. स्वातंत्र्यासाठीं शीर हातावर घेऊन प्रयत्नांची शिकस्त करा, असें जनतेला सांगत. त्यांनीं पुणें, सातारा, नाशिक, वऱ्हाड इकडील रामोशी, डोंगरी, कोळी या लोकांशीं संधान बांधलें. त्यांना बंदूक उडविण्याचें शिक्षण दिलें. तलवारीचे हात सफाईदार कसे करावे, शत्रूला शिस्तीनें कसें तोंड द्यावें, हें सारें शिकविलें.

आणि पुण्यापासून दहा-बारा मैलांवर असलेल्या लोणी गांवाजवळील एका रानांत रात्रींच्या वेळीं आपल्या रामोशी वगैरे मित्रमंडळींसह वासुदेव बळवंत फडके विचार करीत बसले.

"हं, बोला, माझ्या मित्रांनो, काय बेत ठरवायचा ?"

"तुम्हीं बेत ठरवायचा आणि आम्हीं त्याप्रमाणें वागायचें."

"तर मग बेलभंडार होऊं द्या. पिरा, शस्त्रांची वांटणी कर."

"आतां हीं आमचीं शस्त्रें स्वातंत्र्यासाठीं...."

"होय, काळू, तूं म्हणतोस तें बरोबर आहे. आपण आणि आपलीं हीं शस्त्रें आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं !"

"चला, निघू आणि हातीं घेतलेल्या कार्याला लागूं."

असें म्हणत वासुदेव बळवंत आणि त्याची रामोशी, कोळी वगैरे मंडळी देशाच्या स्वातंत्र्यासाठीं हातांत तलवारी, बंदुका घेऊन बाहेर पडली !

वासुदेव बळवंताच्या या स्वातंत्र्ययुद्धाचा परिणाम इंग्रजांवर फारसा जरी झाला नाहीं आणि वासुदेव बळवंतांना जरी 'काळ्यापाण्याची' शिक्षा झाली तरी त्यांच्या या स्वातंत्र्ययुद्धामुळें महाराष्ट्र धीट बनला. त्याला थोडा आत्मविश्वास आला. आपल्या मनगटांत जोर आहे याची जाणीव झाली आणि त्यामुळेंच चाफेकर, पिंगळे यांसारखे महाराष्ट्रांतील कांहीं तरुण जिवावर उदार होऊन क्रांतीच्या मार्गाकडे वळले ! दामोदर हरि चाफेकर यांनीं पुण्याच्या पर्वतीच्या टेकडीवर 'गोफण क्लब' नांवाचा क्लब काढला. या क्लबांत लाठी फिरवण्यापासून तों रायफल उडविण्यापर्यंतचें सारें शिक्षण मिळूं लागलें. शेंकडो तरुण गोफण क्लबाचे सभासद झाले. शिक्षण घेऊं लागले. गुप्त बेत करूं लागले. देशासाठीं प्राण देण्याच्या शपथा घेऊं लागले. आणि 'आपला देश, आपली माता, आपला धर्म यांच्यावर अन्याय होत असेल आणि तो अन्याय दूर करण्यासाठीं जर आपल्या देहाची आहुति देण्याची संधि सांपडत असेल तर ती दवडतां कामा नये' असे शब्द महाराष्ट्रांतील तरुण ऐटबाजपणें बोलूं लागले.

महाराष्ट्रांतील प्रत्येक तरुणालाच काय पण प्रत्येक माणसाला धीर देण्याची, त्यांच्यांत धैर्य आणण्याची, चैतन्य निर्माण करण्याची फार मोठी कामगिरी आणखी जर कुणीं केली असेल तर त्या काळीं निघालेल्या वर्तमानपत्रांनीं ! 'केसरी', 'सुधारक' वगैरे पत्रांनीं.

'केसरी'चा जन्म इ. स. १८८१ च्या जानेवारी महिन्यांत झाला आणि त्याच्या गर्जनेनें सारी जनता खडबडून जागी झाली. पहिल्या वर्षाच्या ७ व्या अंकांत 'बहिष्कार' यावर लो. टिळकांनीं लेख लिहिले. आम्ही कोठें आहोंत, आम्हांला काय केलें पाहिजे याची निश्चित व पूर्ण कल्पना केसरीनें दिली.

महाराष्ट्रांत न्या० रानडे, भांडारकर इत्यादि थोर मंडळींनीं सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांत क्रांति घडवून आणण्याचा जसा प्रयत्न केला, तसाच राजकीय क्षेत्रांत क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न नामदार गोखले यांनीं केला.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले हेहि राजकीय सुधारणा घडवून आणण्यासाठीं प्रयत्न करीत. गोखले जबर मेहनती. जबर महत्त्वाकांक्षी. त्यांना सरकारांत फार मोठा मान. कायदे कौन्सिलचे सभासद. पहिल्या प्रतीचे वक्ते. सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी – भारत सेवक समाजाचे संस्थापक. त्यांचा आणि महात्मा गांधी यांचा संबंध कलकत्ता येथें सन १९०१ सालीं भरलेल्या काँग्रेस अधिवेशनांत आला. त्या वेळीं ते म्हणाले होते, 'फिरोजशहा मेहता मला हिमालयासारखे वाटले तर लोकमान्य टिळक मला महासागरासारखे वाटले. पण ना. गोखले मात्र मला गंगामातेसारखे वाटले. हिमालय अनुल्लंघनीय आहे. सागरांतून तरून जाणें कठीण आहे, पण गंगामाता मात्र कोणालाहि आपल्या आईसारखीच वाटते.'

ना. गोखले म. गांधींना गंगामाईसारखे वाटत. म. गांधींनीं त्यांना आपले राजकारणांतील गुरूच मानलें होतें. एकदां गोखले लंडनमध्यें आजारी पडले असतां गांधीजी त्यांच्या भेटीस गेले, पण त्या कडाक्याच्या थंडींतहि पायांत पादत्राण न घालतां! आपल्या गुरुजींच्या भेटीस जाणारा हा शिष्य किती विनयशील! नामदार गोखले १९१५ सालीं मृत्यु पावले तेव्हां एका शोकसभेंत गांधीजी म्हणाले, 'मी खऱ्या शूर माणसाचा शोध करीत होतों. सबंध भारतांत मला तसा एकच माणूस आढळला आणि तो म्हणजे नामदार गोखले.'

महात्मा गांधी या जगद्वंद्य थोर पुरुषाचा राजकारणांतील गुरु आपल्या प्रिय महाराष्ट्रांतला ही गोष्ट महाराष्ट्राला भूषणावह तर आहेच आहे; शिवाय अभिमानाचीहि आहे.

नामदार गोखले, रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, रँ. नारळीकर वगैरे अनेक मंडळींनीं महाराष्ट्राच्या जडणघडणीला हातभार लावला आणि महाराष्ट्राच्या कीर्तींत भर घातली.

आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं तर एकटा महाराष्ट्रच नाहीं तर सारा भारत जागा केला. राजकीय क्षेत्रांत फार मोठी क्रांति घडवून आणण्याचा सतत प्रयत्न केला.

# महाराष्ट्राचा मेरुमणि

## ११

लो. टिळकांना समजूं लागल्यापासूनच जुलमी सत्तेचा तिटकारा वाटत होता. ज्या ज्या वेळीं आणि ज्या ज्या ठिकाणीं अन्याय, जुलूम दिसेल त्या त्या वेळीं आणि त्या त्या ठिकाणीं सरकारला प्रतिकार करावयाचा, विरोध करावयाचा हा त्यांचा बाणा होता. महाराष्ट्ररूपी थंड गोळयाला न्या. रानडयांनीं ऊब दिली, त्याला शुद्धीवर आणलें असें म्हटलें, तर लो. टिळकांनीं त्याला उभा करून दंड थोपटावयास लाविलें, असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. महाराष्ट्रांतील त्या वेळच्या तरुणांना लोकमान्यांचा आधार एखाद्या अभेद्य किल्ल्यासारखा वाटे.

एकोणिसाव्या शतकापासून महाराष्ट्राला आपल्या तेजानें ज्यांनीं ज्यांनीं उजळा दिला, त्याच्या जडणघडणीसाठीं ज्यांनीं ज्यांनीं प्रयत्न केले, ज्यांनीं ज्यांनीं महाराष्ट्राच्या अंगाखांद्यावर भूषणें चढविलीं, जुन्या भूषणांना घांसूनपुसून तेज आणलें त्या सर्वांत सर्वतोपरी श्रेष्ठ असे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे होत, असेंच आपणांस म्हणावेसें वाटेल.

लो. टिळकांना सर्वांची संघटना करून तिच्या शक्तीचा ओघ स्वातंत्र्य-प्राप्तीच्या मार्गाकडे लावावयाचा होता. समाजाच्या सर्व थरांतील लोक एका बैठकीवर बसवावयाचे होते. एका विचारानें सर्वांनीं कसें वागावें याचे धडे जनतेला मिळावे, अशी त्यांची इच्छा होती, आणि त्यासाठींच त्यांनीं महा-

राष्ट्रांत फार महत्त्वाच्या गोष्टी घडवून आणल्या. एक 'सार्वजनिक गणेशोत्सव' आणि दुसरा 'शिवाजी उत्सव'.

सार्वजनिक गणेशोत्सवाचें महत्त्व 'केसरी'नें गर्जना करून जनतेला पटविलें. महाराष्ट्रांत श्रीगणेशाचें महत्त्व फार–विशेषतः कोंकणांत भाद्रपद शु' चतुर्थीस घरोघरीं या देवताची मनोभावें पूजा करितात. श्रीमंत पेशवे यांचें गणपती हेंच दैवत होतें. अशा अपरंपार श्रद्धा असलेल्या दैवताचा सार्वजनिकरीत्या उत्सव करण्यास मोठ्या उत्साहानें महाराष्ट्रांतील जनता चटकन् एके ठिकाणी गोळा होऊं लागली. 'गणेश मंडळें' भराभर स्थापन होऊं लागलीं. तरुण मंडळींनीं मेळे तयार केले आणि सन १८९४ पासून महाराष्ट्रांत सार्वजनिक गणेशोत्सव सुरू झाले. जुन्या विचारांना नवें वळण लागलें. गणपतीपुढें मेळे गाऊं लागले. व्याख्यानें, पोवाडे, कीर्तनें होऊं लागलीं. लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, मुत्सद्दी-पंडित, वीर सारे एका बैठकीवर आले. सामाजिक आणि राजकीय प्रश्नांची चर्चा होऊं लागली. विचारांची देवघेव सुरू झाली. लोकांच्या राष्ट्रीय भावना उचंबळूं लागल्या आणि गणपति-उत्सव मोठ्या उत्साहानें साजरे होऊं लागले. कवि विनायकांच्या कवितेंतील पुढील ओवी कानीं पडूं लागली–

'तार आम्हांला तार गणेशा !'

लोकमान्यांनीं सार्वजनिक गणेशोत्सवाप्रमाणेंच आणखी एक उत्सव करण्याचें ठरविलें. तो म्हणजे श्रीशिवाजी उत्सव. श्रीछत्रपति शिवाजीमहाराज हें महाराष्ट्राचें दैवत ! त्यांच्याबद्दल महाराष्ट्रालाच काय पण साऱ्या भारताला अपरंपार आदर खोलवर रुतलेला ! समर्थ रामदासस्वामींनीं सांगून ठेविलें आहे कीं,

शिवरायाचें आठवावें रूप
शिवरायाचा आठवावा प्रताप

आणि आतां हेंच लोकमान्य टिळक सांगत आहेत. 'माझ्या बंधूंनो, आपले छत्रपति शिवाजीमहाराज म्हणजे महाराष्ट्राची स्फूर्तिदेवता. स्वराज्यसंस्थापक. त्यांनींच महाराष्ट्राला आनंदवनभुवन बनविलें. त्यांनींच

गोब्राह्मणांचा प्रतिपाळ केला. त्यांनींच संघटनेच्या जोरावर औरंगजेबाला सळो कीं पळो करून सोडलें. विजापूरकराला दातीं तृण धरावयास लाविलें. शिवाजीमहाराज म्हणजे प्रतापाचा पुतळा. महापराक्रमी पुरुष ! या महापराक्रमी पुरुषाचा पराक्रम आपणां सर्वांच्या डोळ्यांसमोर सतत असलाच पाहिजे. हा आदर्श पुरुष आपल्या हृदयमंदिरांत कायमचा असलाच पाहिजे. या थोर पुरुषाचें आपणाला दर्शन घडलेंच पाहिजे.

या थोर पुरुषाची समाधि रायगडावर आहे. तेथें दरवर्षीं उत्सव नको कां व्हायला ? शिवाजीमहाराजांचें दर्शन नको का व्हायला ? आणि म्हणूनच लोकमान्यांनीं शिवाजी-उत्सवाची योजना जनतेसमोर ठेविली.

आणि जनतेला ही योजना इतकी आवडली कीं, महाराष्ट्रांतील लहानथोर गुणगुणूं लागला—

"चला गडावर जाऊं। शिवरायाचें दर्शन घेऊं।। "

बाराहि मावळांतील मावळे रायगडावर जमले. पुण्या-मुंबईकडील पांढरपेशी मंडळी रायगडावर आली – रायगडावरील सारा घडलेला इतिहास आठवून आठवून मनोभावें आली.

आणि ता. १५ एप्रिल १८९६ रोजीं रायगडावर पहिला शिवाजी-उत्सव झाला !

या उत्सवाचा परिणाम महाराष्ट्रावर फार चांगला झाला. गड उतरतांना प्रत्येक जण आम्ही शिवाजीमहाराजांचे वंशज आहोंत, आम्ही शिवाजीमहाराजांचे वारसदार आहोंत, आम्ही शिवाजीमहाराजांच्या महाराष्ट्रांत जन्मलों आहोंत, अशा भावनेनें भारावून गेला. आणि त्याचा परिणाम महाराष्ट्राच्या जडण-घडणीला उपयोगी पडला. प्रत्येकाला वाटूं लागलें, आपण स्वराज्यासाठीं, स्वातंत्र्यासाठीं, महाराष्ट्राच्या भरभराटीसाठीं, महाराष्ट्राच्या कीर्तीसाठीं कांहीं तरी करावें. लोकमान्य टिळक सांगतील तसें करावें.

लोकमान्यांनीं महाराष्ट्रांतील जनतेच्या मनाची मशागत अशा प्रकारें फार चांगली केली आणि त्यांत स्वराज्याच्या आवडीचें बीं पेरलें. त्या

बियांना अंकुर फुटून तें इतकें फोफावलें कीं, महाराष्ट्रांतील बऱ्याच तरुणांच्या तोंडांतून कवि गोविंदांच्या कवितेच्या पुढील पंक्ति ऐकूं येऊं लागल्या :

रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना
असा भूतकालीन सिद्धान्त जाणा।
स्वराज्येच्छुनें पाहिजे युद्ध केलें
रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ? ॥

लोकमान्य टिळक आणि शिवराम महादेव परांजपे यांच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष राजकीय प्रयत्नांचा परिणाम पुढें साठ वर्षेपर्यंत म्हणजे साधारणपणें सन १९४७ पर्यंत महाराष्ट्रावर चांगला झाला. "आपला देश, आपली माता, आपला धर्म यांच्यावर अन्याय होत असेल तर तो अन्याय दूर करण्यासाठीं जर आपल्या देहाची आहुति देण्याची संधि सांपडत असेल तर ती दवडूं नये." असें स्पष्ट सांगणारे दामोदर हरि चाफेकर.

"स्वातंत्र्यासाठीं धडपडतांना फांस मिळो वा सिंहासन मिळो, यश मिळो वा अपयश मिळो, माझ्या मनावर त्याचा किंचितहि परिणाम होणार नाहीं." असें सांगणारे विष्णु गणेश पिंगळे.

"मी भवानी आईची – या नंग्या समशेरीची शपथ घेऊन अशी प्रतिज्ञा करतों कीं, माझ्या परतंत्र मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठीं मी आजपासून यावज्जीव कायावाचामनानें झटेन आणि तिची हांक ऐकतांच तिच्या सेवेसाठीं धांव घेईन." अशी शपथ घेणारे पांडुरंग महादेव ऊर्फ सेनापति बापट – ही आणि यांच्यासारखीच भारताच्या स्वातंत्र्यासाठीं सतत तळमळणारी मंडळी लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेनेंच स्वातंत्र्यासाठीं प्राणाचें बलिदान करण्यास आनंदानें तयार झाली. महाराष्ट्राची ही शक्ति पुढें महाराष्ट्राचें भूषणच ठरली !

सन १८८० पासून महाराष्ट्राची राजकीय सुधारणा जितक्या वेगानें आणि डोळ्यांत भरण्याइतकी घडू लागली, तितक्या वेगानें आणि डोळ्यांत भरण्याइतकी सामाजिक सुधारणा घडली नाहीं, असें वाटणें आपणाला साह-

जिकच आहे, आणि त्याचें कारण असें कीं, सामाजिक, सांस्कृतिक सुधारणा ह्या नेहमींच मंद गतीनें होत असतात. महाराष्ट्रांत सामाजिक सुधारणा होत होत्या. ज्योतिराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी आदि मंडळी या कामीं नेटानें प्रयत्न करीत आली होती, प्रयत्न करीत होती. आणि त्यांच्या या प्रयत्नांना यशहि येत होतें. पोशाखांत बदल होऊं लागला होता. घरांची बांधणी आटोपशीर आणि पूर्वीपेक्षां सुखसोईची होऊं लागली होती. शहराच्या ठिकाणीं मोठमोठे वाडे अगर टुमदार घरें बांधण्याऐवजीं 'चाळीवजा' घरें बांधण्याकडेच लोकांचा कल होऊं लागला होता. पोशाखांतहि हळूहळू बदल होऊं लागला होता. 'बाराबंदीची' जागा 'सदरा' घेऊं लागला होता. पगडीची जागा टोपी, पागोटें घेऊं लागलें होतें. धार्मिक संस्कारांतहि थोडाफार निष्काळजी-पणा अगर कांहींशी चालढकल होऊं लागली होती. नाटकें, कादंबऱ्या, ललितें, काव्य हीं पुढें येऊन, पोवाडा, तमाशा असलीं करमणुकीचीं साधनें थोड्याफार प्रमाणांत मागें पडूं लागलीं होतीं. सुशिक्षितांची संख्या दिवसें-दिवस वाढत होती. शाळा, हायस्कुलें, कॉलेजें यांच्या संख्येंत दिवसेंदिवस भर पडत होती. आतां मोठमोठ्या खेड्यांतून सरकारी शाळा सुरू झाल्या होत्या. लोक सुशिक्षित होत होते आणि त्यामुळेंच लोकांच्या अभिरुचींत फरक पडूं लागला होता. बदल होऊं लागला होता. समाजसुधारक, राजकीय पुढारी, लेखक, कवि, कीर्तनकार आपापल्या परी आपापल्या विचारांचा, मतांचा प्रचार करीत होते. लोकांत जागृति उत्पन्न करीत होते. महाराष्ट्रांत त्या काळीं लो. टिळक-आगरकर आघाडीवर होते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं सुरू केलेल्या निबंधमालेचें प्रकाशन बंद झालें होतें. लो. टिळकांनीं राजकीय सुधारणांचें कंकण हातीं बांधलें होतें. आगरकर सामाजिक सुधारणांसाठीं हिरीरीनें कामाला लागले होते. राजकीय आणि सामाजिक सुधारणांचें जणुं काय वादळच सुरू झालें होतें.

याच सुमारास महाराष्ट्रांत कथा, कादंबऱ्या, काव्य यांची बरीच निर्मिति होऊं लागलीं होती. यानंतर लक्षांत भरण्यासारख्या हरि नारायण

आपटे यांच्या कादंबऱ्या बऱ्याच प्रसिद्ध होऊं लागल्या. इंग्रजींतील पुस्तकांचीं मराठींत भाषांतरें होऊं लागलीं.

गद्य वाङ्मयाप्रमाणेंच पद्य वाङ्मयहि थोडेंफार प्रसिद्ध होऊं लागलें. नवे कवि उदयास येऊं लागले. पूर्वापार चालत असलेला विषय 'धार्मिक' होता तो बदलून आतां 'सामाजिक' झाला. काव्याचे विषय बदलले. काव्यरचना बदलली. रूपापेक्षां भावनेला महत्त्व येऊं लागलें, साकी, दिंडी, आर्या इत्यादि वृत्तांच्याऐवजीं सुनीत आलें. पदें आलीं. सामाजिक आणि राजकीय विचारांचा, घडामोडींचा परिणाम काव्यविषय निवडण्याकडे होऊं लागला. सत्तावन्नचा स्वातंत्र्यसंग्राम, वासुदेव बळवंत फडके, रामोशी लोक यांनीं स्वातंत्र्यासाठीं केलेला उठाव, विधवा-विवाह इत्यादि विषय काव्यासाठीं निवडण्यांत येऊं लागले. रे. नारायण वामन टिळक, चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे ( कवि चंद्रशेखर ), मोगरे वगैरे प्रसिद्ध कवि जरी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत आघाडीवर असले तरी सर्वच कवींत 'शूर शिपाई' म्हणून केशवसुतांचा ( कृष्णाजी केशव दामले ) उल्लेख करावाच लागेल. त्यांनीं स्वतःलाच म्हणवून घेतलें आहे कीं,

"नव्या मनूंतील नव्या दमाचा शूर शिपाई आहें ।
कोण मला वठणीवर आणूं शकतो तें मी पाहें ।। "

आणि त्यांनीं क्रांतीचें निशाण हातीं घेऊन नव्या विचारांच्या तरुणांना आवाहन केलें, अशी तुतारी फुंकली, कीं—

"शूरांनो ! या त्वरा करा रे
समतेचा ध्वज उंच धरा रे
वीरांनो ! तर पुढें सरा रे
आवेशानें गर्जत हरहर "

आपल्या महाराष्ट्रांत समता नांदावी यासाठीं, सामाजिक जीवन उन्नत व्हावें यासाठीं, समाजांतील विषमता कमी करण्यासाठीं केशवसुतांनीं

आपल्या काव्याचा बराच उपयोग केला. त्यांनीं धर्ममार्तंडांवर चांगलेंच कोरडे ओढले. ते म्हणतात :

" धर्माचें माजवूनि डम्वर
नीतीला आणिती अडथळे
विसरुनिया जातात खुळे
नीतीचें पद जेथें न ढळे
धर्म होतसे तेथेंच स्थिर "
जुनें जाउं द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरूनि टाका
सडत न एक्या ठायी टाका
सावध ! ऐका पुढल्या हांका "

आणि ते म्हणतात—

" एक तुतारी द्या मज आणुनि
फुंकिन मी ती स्वप्राणानें
भेदुनि टाकिन सगळीं गगनें
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें
अशी तुतारी द्या मज लागुनि "

अशा प्रकारें सन १८९३ सालीं केशवसुतांनीं तुतारी फुंकली आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीला एक प्रकारें मदत केली. महाराष्ट्राच्या काव्य-परंपरेंत मोलाची भर घातली. 'तुतारी' या त्यांच्या कवितेइतकी जोरदार आणि मनोवृत्ति उचंबळित करून टाकणारी कविता मराठी वाङ्मयांत क्वचितच आढळेल.

आणि त्यामुळेंच महाराष्ट्राचा आधुनिक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ कवि म्हणून केशवसुतांकडे मोठ्या अभिमानानें बोट दाखवितां येतें. या कवीनें 'काव्य वैभवांत' आणखी मोलाची भर घातली असती, पण १९०५ सालींच ते मृत्यु पावले. महाराष्ट्राचा एक चांगला कवि नाहींसा झाला.

काव्यानें जसें नवें रूप घेतलें, त्याच्यांत जसा आंतरबाह्य बदल झाला तसाच बदल महाराष्ट्रांतील त्या काळच्या करमणुकीच्या साधनांतहि झाला. दिवसभर कष्ट करून थकल्या–भागलेल्या खेड्यांतील जनतेला कांहींसा विरंगुळा तमाशाचा, पोवाड्याचा, कीर्तनाचा अगर असल्यास कांहीं अन्य साधनांचा असावयाचा. कांहीं ठराविक निमित्तानें ललित, गोंधळ हीं मधून मधून व्हावयाचीं. नाटकांचा फारसा प्रसार—नव्हे फारसा उगमच झाला नव्हता म्हटलें तरी चालेल. सन १८४३ सालापासून सांगलीच्या विष्णुदास अमृत भावे यांनीं नाटकें करावयास आरंभ केला. पहिलीं नाटकें धार्मिक प्रसंगांवरच होतीं. अशा नाटकांना 'दशावतारी' नाटकें म्हणत. दशावतारी नाटकांचा विषयहि बहुधा धार्मिक असे. एखादा राक्षस भोळ्या शंकराच्या 'वरा'नें मातावयाचा आणि मग त्यानें दुष्ट कृत्यें करावयास सुरुवात करावयाची. देव, ब्राह्मण यांचा छळ करावयाचा. मग देवांनीं, ब्राह्मणांनीं विष्णूजवळ जाऊन आपल्या छळाचें गाऱ्हाणें सांगावयाचें आणि या मातलेल्या राक्षसापासून आपलें रक्षण करण्यास विनंति करावयाची, आणि मग विष्णूनें अगर अन्य एखाद्या देवतेनें त्या राक्षसाचा संहार करावयाचा. तारकासुर, भस्मासुर अशा नांवांचीं त्या वेळचीं नाटकें असत. संकासुर, कृष्ण ह्या व्यक्ति नाटकांत हटकून असावयाच्याच. राजा हरिश्चंद्र, बाळ चिलया या व अशा धार्मिक कथांवरहि नाटकें होत. पुढें इ. स. १८६० पासून नाटकांचे विषयच बदलले असें नसून भाषणांची ढब, अभिनय, वगैरेंतहि बराच बदल झाला. विनायक जनार्दन कीर्तने यांचे 'थोरले माधवराव पेशवे यांचें नाटक' हें नाटक होऊं लागलें. लोकांना नाटकें पाहणें आणि नाटकें करणें आवडूं लागलें. इ. स. १८५५ सालीं 'अमरचंद वाडीकर' या नांवाची नाट्यसंस्था मुंबईस अस्तित्वांत आली.

महाराष्ट्रांत पहिलें पक्कें नाटकगृह इ. स. १७७० सालीं मुंबई येथें बांधलें गेलें. पण हें नाटकगृह युरोपियन लोकांसाठीं होतें. पुढें १८४२ सालीं श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट यांनीं मुंबईंत नाटकगृह उभारलें. हें नाटकगृह कोणालाहि प्रयोगासाठीं दैनिक भाड्यानें मिळत असे.

ता. ३१ ऑक्टोबर १८४० रोजीं अण्णासाहेब ( बळवंत पांडुरंग किर्लोस्कर, १८४३ ते १८८५ ) यांनीं 'संगीत शाकुंतल' नाटकाचा पहिला प्रयोग पुण्यास केला. तो लोकांना फारच आवडला. प्रयोगाच्या दुसऱ्या दिवशीं केसरींत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं 'नाटकें पाहावींत कीं पाहूं नयेत' हा अग्रलेख लिहून पसंती व्यक्त केली.

नाटकें हीं समाजांतील घडामोडींचीं प्रतिबिंबें असल्यामुळें पुढील काळांत सामाजिक, राजकीय घडामोडींचें प्रतिबिंब नाटकांतून दिसूं लागलें. त्यामुळें नाटकें महाराष्ट्राच्या प्रगतीला पोषकच ठरलीं. करमणूक, प्रचार, अंगचा अभिनय वगैरे गुणांची जोपासना आणि वाव नाटकांमुळें मिळून या बाबतींत महाराष्ट्राची प्रगतीच झाली. नाटककार कोल्हटकर, खाडीलकर, वरेरकर, देवल, गडकरी, अत्रे वगैरे पुढील काळांत एकापेक्षां एक श्रेष्ठ नाटककार निर्माण झाले. त्यांनीं नाटकाच्या निमित्तानें आपापल्या काळांत सामाजिक, राजकीय प्रश्न लोकांपुढें उभे केले आणि 'लोकशिक्षण' दिलें. श्रमल्या-भागलेल्यांची करमणूक तर केलीच केली, पण त्याचबरोबर 'जीवन' म्हणजे काय हेंहि सांगितलें. महाराष्ट्रांतील नाटककारांनीं आणि नाटकांनीं महाराष्ट्राची या कलेची कीर्ति सर्वत्र पसरविली.

नाट्यकलेप्रमाणेंच गायनकला, चित्रकला आणि शिल्पकला. महाराष्ट्र प्राचीन कालापासूनच या सर्व कलांत प्रणीत. अजिंठा, वेरूळ येथील लेणीं घ्या, प्रसिद्ध क्षेत्रांतील एखादें देवालय घ्या, अगर एखाद्या राष्ट्रपुरुषाचा पुतळा घ्या. त्याच्या ठिकाणीं चित्र, शिल्प हीं विशेषानें आढळल्याशिवाय राहणार नाहींत. वेरूळचें कैलास लेणें पाहून परदेशांतील भलेभले शिल्पज्ञ, भलेभले कल्पज्ञ, भलेभले चित्रज्ञ तोंडांत बोट घालून आश्चर्य प्रकट करतात आणि म्हणतात, महाराष्ट्र जितका राकट दिसतो तितकाच तो कलेच्या बाबतींत नाजुक दिसतो !

पण तसें पाहिलें तर एकोणिसाव्या शतकापासून महाराष्ट्राची कलेच्या बाबतींत कांहींशी गळचेपीच झाली. महाराष्ट्र इंग्रजी सत्तेखालीं गेला आणि निरनिराळ्या कलांकडे त्यांचें दुर्लक्षच झालें—नव्हे, दुर्लक्ष करावेंच लागलें.

कारण सारा महाराष्ट्र सामाजिक आणि राजकीय सुधारणांत गुंतला होता. स्वातंत्र्यासाठीं धडपड करण्यांत गुंतला होता आणि त्याला राजाश्रयहि नव्हता.

महाराष्ट्रकेसरी लोकमान्य टिळक यांनीं महाराष्ट्राचेंच नव्हे तर साऱ्या भारताचें राजकारण हातीं घेतलें होतें. आपल्या भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठीं परकीय सत्तेला धडाधड धक्के मारून ती साफ कोलमडूनच नव्हे तर अगदीं जमीनदोस्त करण्यासाठीं ते प्रयत्न करीत होते. एकटा महाराष्ट्रच काय पण सारा भारत खडबडून जागा झाला होता. लोकमान्य टिळकांचें पुढारीपण शिगेला पोहोंचलें होतें

" पुण्याची पुण्याई पुन्हा ग उदेली
मूर्ति सांवळी जन्मली टिळकांची ॥
पुण्याचें वैभव पुन्हा दिसेल ठळक
तेथें आहेत टिळक देशभक्त ॥ "

असे मंजुळ स्वर लोकमान्यांच्या आदरांविषयीं घराघरांतून बायाबापड्यांच्या तोंडांतून ऐकूं येत होते.

पण सरकारला लोकमान्यांची लोकप्रियता, लोकमान्यांचें पुढारीपण, लोकमान्यांचें राजकारण नको होतें. त्याला एक प्रकारचा लोकमान्यांचा दरारा वाटत होता. या ना त्या कारणानें लोकमान्यांना तुरुंगांत डांबण्याची संधि सरकार पाहत होतें.

आणि अशी संधि सरकारला मिळाली.

त्याचें असें झालें. लोकमान्यांनीं 'बाँबगोळ्यांचें रहस्य' आणि 'हे उपाय टिकाऊ नव्हेत' असे केसरींत दोन लेख लिहिले आणि त्या लेखांत त्यांनीं असें दाखवून दिलें कीं, भारतांतील जनतेची स्वराज्यासाठीं अत्याचार करण्यापर्यंत जी प्रवृत्ति झाली आहे तिला सरकारच कारणीभूत आहे; आणि ही प्रवृत्ति नाहींशी करण्यासाठीं सरकार जी बेकायदेशीर दडपशाही करीत आहे ती सरकारला कमीपणा आणणारी तर आहेच, शिवाय अयोग्यहि आहे.

आणि हेच लेख लो. टिळकांना सहा वर्षें तुरुंगांत पाठविण्यास कारणीभूत झाले. त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांनीं लोकमान्यांवर राष्ट्रद्रोही म्हणून सन १९०८ सालीं खटला भरला !

आणि या खटल्यांत लोकमान्य टिळकांना सहा वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

आपणाला झालेली शिक्षा न्यायमूर्तींच्या तोंडून ऐकतांच लो. टिळकांनीं असे तेजस्वी उद्‌गार काढले कीं,

" ज्यूरींनीं मला दोषी ठरविलें तर खुशाल ठरवोत, पण मी गुन्हेगार नाहीं. लौकिक दृष्टीनें नियंत्रण करणारी अशी एक शक्ति न्यायपीठाहूनहि वरिष्ठ आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच अशी असेल कीं, मला शिक्षा व्हावी आणि शिक्षा भोगल्यामुळेंच मीं अंगीकारलेल्या कार्याला ऊर्जित दशा यावी. "

लोकमान्यांच्या उद्‌गारांनीं महाराष्ट्राच्या तेजस्वी परंपरेंत किती मोलाची भर घातली ! महाराष्ट्राचें मन, महाराष्ट्राचा निश्चय, निर्धार, बाणेदार-पणा, महाराष्ट्राचा कणखरपणा, महाराष्ट्राचा दिलदारपणा, निर्भीडपणा वगैरे सारें कांहीं लोकमान्यांच्या वरील निश्चयी उद्‌गारांत सांठविलेलें आहे. लोकमान्यांच्या वरील उद्‌गारांनीं महाराष्ट्रावरच काय पण साऱ्या भारता-वर एक प्रकारचें तेज चढलें. एक प्रकारचा अभिमान निर्माण झाला. आपण एक प्रकारचें वैभव मिळविलें असें भारताला वाटूं लागलें. एक प्रकारचा पराक्रम केला असें वाटू लागलें.

महाराष्ट्रांत घरोघर तरुण मंडळी छातीवर हात ठेवून मोठ्या अभि-मानानें लोकमान्यांचेच वेदतुल्य तेजस्वी उद्‌गार आपल्या मुखानें म्हणू लागली, '....शिक्षा भोगल्यामुळेंच मीं अंगीकारलेल्या कार्याला ऊर्जितावस्था प्राप्त व्हावी.' महाराष्ट्रांत त्या वेळच्या वर्तमानपत्रांनीं आणि मासिकांनीं लोकमान्यांचे हे तेजस्वी उद्‌गार काव्यांत रचण्याची चढाओढ लाविली होती. ' करमणूक ' साप्ताहिकानें तर बेळगांवचे कवि कल्लो गणेश विजापुरे

यांनीं रचलेल्या काव्याला पहिलें पारितोषिक दिलें. कवि विजापुरे यांनीं रचलेलें काव्य पुढीलप्रमाणें होतें :

" पंचांनीं दिधला निकाल मजला दोषी म्हणोनी जरी ।
माझें मानस सांगतें कि अगदीं निर्दोषि मी अंतरीं ।।
न्याय्यान्याय्य निकाल मानव सदा देतो जरी मानवा ।
त्याच्याही वरची उदात्त जगदंतः शक्ति ती आळवा ।।
माझ्या सुकार्या यश पुष्टि याया
कष्टी करावी मम जीव काया ।।
हेतू असा हा मज स्पष्ट भासे ।
वाटे वसे ईश मनींहि तैसें ।। "

लो. टिळकांना काळ्या पाण्याच्या शिक्षेचीं सहा वर्षें मंडालेच्या तुरुंगांत काढावीं लागलीं. या तुरुंगांत बसूनच लोकमान्यांनीं जगद्वंदनीय असा 'गीतारहस्य' ग्रंथ लिहिला आणि भारताची, भारतीय संस्कृतीची थोरवी जगाला पटवून दिली.

लोकमान्यांनीं महाराष्ट्राला आणखी एका विशेष गोष्टीनें मानाचें स्थान मिळवून दिलें.

कोणती गोष्ट ती ?

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच ! '

महाराष्ट्रालाच नव्हे तर साऱ्या भारताला हा महामंत्र दिला—हे स्फूर्ति-वचन दिलें !

आणि ह्या एका स्फूर्तिवचनाच्या जोरावर पुढें भारतानें स्वातंत्र्य मिळविलें !

लोकमान्यांच्या 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच' या स्फूर्तिवचनामुळें महाराष्ट्रांतील किती तरी तरुणांनीं स्वातंत्र्य-ध्येयाचीं कंकणें बांधलीं. फासांत माना अडकविल्या. मृत्यूच्या शेवटच्या क्षणाला पुढीलप्रमाणें उद्गारहि काढले :

‘परमेश्वरा, ज्या पवित्र कार्यासाठीं आम्ही आमचे प्राण बलिदान करीत आहोंत तें कार्य तूं पूर्ण कर हीच आमची तुला प्रार्थना आहे.’

‘माझ्या देशाची थोडीफार सेवा करावी अशी माझी इच्छा आहे. मातृभूमीच्या सेवेशिवाय मला दुसरी महत्त्वाकांक्षा नाहीं.’

असे अनेक उद्‌गार अनेक देशभक्तांच्या मुखांतून निघाले. याचें कारण लोकमान्य टिळकांनीं महाराष्ट्राला दिलेला स्वराज्याचा मंत्र –‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच!’

लोकमान्यांनीं महाराष्ट्राला फार–फार मोठें मानाचें स्थान मिळवून दिलें. महाराष्ट्रालाच काय म्हणतां! साऱ्या भारताला म्हणा!!

होय, साऱ्या भारताला मानाचें स्थान प्राप्त करून दिलें.

आणि हा मेरुमणि, हा महापुरुष ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं मृत्युलोक सोडून गेला!

हा द्रष्टा पुरुष महाराष्ट्रालाच नव्हे तर भारताला स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग दाखवून गेला. उठा आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं कामाला लागा. एक विचाराने पुढें चला असें सांगून गेला!

लोकमान्य टिळक गेले पण जातांना आपली शक्ति, आपलें तेज आपला राजकीय वारसा महात्मा गांधींजवळ देऊन ते गेले.

लोकमान्य टिळकांचा वारसा गांधीजींकडे आला. पण त्या वारशाचें ओझें आपल्या अंगावर घेतांना गांधीजी अतिशय दुःखी झाले. त्यांनीं आपल्या ‘यंग इंडिया’ या पत्रांत लिहिलें कीं, “लोकमान्य टिळकांची गर्जना आज लुप्त झाली तरी राष्ट्रजनक या दृष्टीनेंच भावी पिढी त्यांच्याकडे सदैव पाहत राहील. या थोर विभूतीला मृत्यु आला असें म्हणणें चुकीचें आहे. त्यांचा संदेश राष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत नेऊन पोंचविण्याचें कार्य एखाद्या सत्‌शिष्याप्रमाणें मी करीत आहें.”

म. गांधींच्या हातीं राजकारण येतांच त्यांनीं सरकारशीं असहकार, सत्याग्रह सुरू केला.

चुलीपाशी आला । गांधीचा सत्याग्रह
इंग्रजाला शह । घरीं दारीं."

असें भारतांत सगळीकडे झालें. महाराष्ट्रहि आघाडीवरच राहिला. म. गांधींच्या प्रत्येक चळवळींत त्यानें मोठ्या हिरीरीनें आपला वांटा उचलला!

सन १९४० च्या स्वातंत्र्य लढ्यांतील पहिला सत्याग्रही महाराष्ट्राचा.

कोण हा सत्याग्रही !

महात्मा गांधींचे सच्चे शिष्य. साबरमतीच्या आश्रमांत ज्यांनीं महात्माजीं-बरोबर दळण-कांडण केलें ते! ज्यांच्या ठिकाणीं गाढी विद्वत्ता, प्रखर बुद्धिमत्ता, अपूर्व स्मरणशक्ति, नियमितपणा, निर्भयता आहे; धगधगीत वैराग्य आहे, तप आहे ते! ज्यांची शरीरयष्टि उंच आहे, ज्यांचा भालप्रदेश उंच आहे, ज्यांचें नाक सरळ आहे, जे पंचा नेसतात, ज्यांच्या अंगावर एखादा फडका असतो, जे भाषण करतांना आरंभ अगदीं हळू करतात परंतु पुढें ज्यांचा आवाज खूप मोठा होतो ते !

'भूदान करा', ज्यांच्याजवळ अधिक जमीन असेल त्यानें ज्यांच्याजवळ फार कमी जमीन असेल – अगर मुळींच नसेल त्यास ती स्वेच्छेनें द्यावी असें सांगणारे व भारतभर हिंडून 'भूदान यज्ञ' पार पाडणारे.

आपल्या आजुबाजूचे लोक म्हणजेच परमेश्वर असें सतत मनांत बाळगून तसें वागणारे.

कोण हे ?

परमपूज्य विनोबाजी भावे. ( इ. स. १८९४ ).

जगाला नवा प्रकाश दाखविणारे.

विनोबाजी भावे आधुनिक काळांतील ऋषि, आधुनिक संत. दीनदुबळ्यांचे कैवारी, महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या थोर परंपरेचा वारसा निष्ठेनें चालविणारे. श्रीज्ञानेश्वरी रचिली. परमपूज्य विनोबांनीं गीताई रचिली.

गीतेचें हें मराठी भाषांतर त्यांनीं इतकें सोपें केलें कीं साऱ्या महाराष्ट्रभर गीताई पोंचली. घरोघरीं तिचें पठण होऊं लागलें.

परमपूज्य विनोबाजींबद्दल साने गुरुजी म्हणत,

विनोबाजी महाराष्ट्राचें पावित्र्य व सामर्थ्य आहे. ते महाराष्ट्राचें व भारताचें भूषण आहे. आपण त्यांच्या चरित्रापासून स्फूर्ति घेऊं. श्रद्धा, निश्चय, प्रेम, त्याग, अखंड भारताची सेवा करावयास शिकूं.

महाराष्ट्रांतील प्रत्येक नि प्रत्येक जण विनोबाजी भावे यांच्याप्रमाणेंच भारताच्या ( महाराष्ट्राच्याहि ) हितासाठीं, प्रगतीसाठीं सतत झटत होता आणि आजहि झटत आहे. सेनापति बापट काय, स्वातंत्र्यवीर सावरकर काय, महाराष्ट्राचे केवढे थोर पुत्र ! मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं प्राणांची पर्वा न करतां भारतापासून सहाशें मैल दूर असलेल्या अंदमानांतील त्या अंधाररूपी जेलमध्यें ' मातृभूमीचें स्वातंत्र्य – मातृभूमीचें स्वातंत्र्य ' असा जप करीत अर्धेंअधिक आयुष्य घालविणारे स्वातंत्र्यवीर सावरकर, मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं परदेशांत जाऊन पिस्तुलें आणि बाँबगोळे तयार करण्याचें प्रथम शिक्षण घेऊन येणारे सेनापति बापट, हे दोनहि शूर पुत्र महाराष्ट्राचे ! केवढें हें भूषण महाराष्ट्राला ! !

आणि डॉ. भी. रा. आंबेडकर केवढ्या तोलाचा पंडित ! या महापंडितानें अस्पृश्यता निवारण्यासाठीं जिवाचें रान केलें. भारताची राज्यघटना तयार करणारा हाच थोर कायदेपंडित – शासनशास्त्रज्ञ ! साने गुरुजी ?

होय. साने गुरुजी ( पांडुरंग सदाशिव साने ). महाराष्ट्राचा आधुनिक ज्ञानेश्वर. या आधुनिक ज्ञानेश्वरानें पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरापुढें उपोषण करून विठ्ठलाची आळवणी केली. तेथील भटाभिक्षुकांना विनंति केली, " देवाच्या ठिकाणीं अस्पृश्यता नाहीं. भेदाभेद नाहीं. सारीं लेकरें देवाचीं. सर्वीभूतीं एक आत्मा. स्पृश्यास्पृश्य नाहीं. देवाच्या राऊळांत त्याच्या भक्तांना प्रवेश द्या. जाऊं द्या त्यांना देवाजवळ. पाहूं द्या त्यांना डोळे भरून पांडुरंगाला. भिडूं द्या हृदयाला हृदय. होऊं द्या त्यांचा आत्मा आनंदित.

अरे, नका – नका ठेवूं त्यांना दूर. बोलवा त्यांना जवळ. या या म्हणा. घ्या, घ्या त्यांना जवळ. भेटा प्रेमानें एकमेकांना."

केवढें हें थोर अंतःकरण ! महाराष्ट्र अशा थोर अंतःकरणाचा आहे. 'हें विश्वचि माझें घर' अशी त्याला शिकवणच आहे. आणि म्हणूनच महाराष्ट्र प्रगतीची एक एक पायरी चढत आहे.

भारताच्या आधाराआधारानें, 'मदतीनें, एकमेकां सहाय्य करूं' या वृत्तीनें आणि कृतीनें पुढें पुढें प्रगतीचें एक एक पाऊल चालला आहे.

किती चालून गेला तो ? तेंच आपण आतां पाहूं या.

# माझें वंदन तुझ्या चरणीं

## १२

१ मे १९६० हा सोन्याच्या पावलांनीं आलेला दिवस ! या दिवशीं महाराष्ट्राला कोण आनंद झाला !

या दिवशीं महाराष्ट्रांतील घर नि घर आनंदानें भरून गेलें होतें. महाराष्ट्र-गीत ठायीं ठायीं घुमत होतें. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं, देवळादेवळांतून मंगल जयघोष चालले होते. महाराष्ट्राच्या राजधानींत – मुंबईंत – भारताच्या प्रवेशद्वारावर जो सोहळा होत होता त्याचें वर्णनच करतां येणार नाहीं !

महाराष्ट्राच्या या राजधानींत प्रत्येकाच्या नि प्रत्येकाच्या तोंडांतून गीतगान चाललें होतें.

> " बहु असोत सुंदर संपन्न कीं महा ।
> प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ "

आणि या गीताला सिंधुसागराच्या लहरी ताल देत होत्या. ' माझा महाराष्ट्र – माझा महाराष्ट्र ' म्हणून आनंदानें नाचत होत्या. सह्याद्रीच्या कड्याकपारींतून वारा ' आनंद आनंद ' म्हणून आनंदानें गुणगुणत धांवत सुटला होता. प्रत्येकाच्या कानांत तो हळूच सांगत होता, अरे, आज ' एकभाषी महाराष्ट्र राज्य ' अस्तित्वांत आलें ! आणि गुणगुणत होता,–

" महाराष्ट्र देश सुंदर
अहा देश माझा छान
माझें गेलें देहभान "

महाराष्ट्राचे त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं सर्व महाराष्ट्रांतील जनतेला संदेश दिला. ते म्हणाले,

" महाराष्ट्राची ही भूमि अनेक संत, पराक्रमी वीर, त्यागी, समाज-सुधारक व विद्वान् देशभक्त यांच्या वास्तव्यानें पुनीत झालेली आहे. संत ज्ञानदेव, छत्रपति शिवाजीमहाराज, महात्मा ज्योतिबा फुले व लोकमान्य टिळक हीं आमचीं प्रातिनिधिक प्रतीकें आहेत. त्यांनींच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जोपासना केली व तिचा वारसा आपल्या हातीं दिला. हा अमोल ठेवा आपल्या हृदयांत जपून ठेवणें व त्याचा विकास करणें हें प्रत्येक मराठी माणसाचें आद्य कर्तव्य ठरतें. आज आपलें मराठी-भाषी राज्य स्थापन होत असतांना, आपल्या देशाची भरभराट करण्यास व त्याची कीर्ति दिगंत पसरविण्यास आपलें शक्तिसर्वस्व देऊं अशी आपल्यापैकीं प्रत्येकानें प्रतिज्ञा केली पाहिजे. महाराष्ट्राची व भारताची सेवा करण्याचें व्रत आज आपण घेऊं या व आपलें ध्येय गांठण्याकरितां शक्ति व बुद्धि दे, अशी परमेश्वरा-जवळ प्रार्थना करूं या. "

मुख्यमंत्री आणखीहि म्हणाले, " महाराष्ट्रांतील लोकांनीं त्यांचा धर्म, जात अगर पक्ष कोणता कां असेना, आपण सर्व एकच बांधव आहोंत असें मानलें पाहिजे. नवा महाराष्ट्र हा केवळ मराठी भाषा बोलणारा नव्हे, तर जो महाराष्ट्रांत राहतो व आपल्या शक्त्यनुसार त्याचें जीवन समृद्ध करतो, असा प्रत्येक माणूस हा महाराष्ट्रीयच होय. महाराष्ट्रांतील प्रत्येक माणूस राजा आहे. अविकसित, दुष्काळी अशा कडेकपारींनीं बनलेल्या सह्याद्रीचा राजा आहे; म्हणून दुःखांत असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सांवली निर्माण करणें हें राजाचें कार्य आतां प्रत्येक मराठी माणसानें केलें पाहिजे. एकेक माणूस, एकेक मूल हें सांवली देणारें झाड आहे, असें समजून त्याला खतपाणी घातलें पाहिजे. आपल्या कर्तृत्वाला, आपल्या शहाणपणाला हें आव्हान आहे. "

# सोनेरी शिखरें

भारत स्वतंत्र झाला आणि तो आपल्या प्रगतीच्या प्रयत्नाला लागला. वैभवाच्या शिखराचीं एक एक पायरी चढूं लागला.

भारताचा अविभाज्य भाग महाराष्ट्र !

भारत मोठा झाला तरच महाराष्ट्र मोठा होईल. भारताचें आणि महाराष्ट्राचें हित जेव्हां एकरूप होईल, भारत मोठा होईल, आणि महाराष्ट्रहि मोठा होईल, हें महाराष्ट्राला पक्कें माहीत आहे. महाराष्ट्राच्या नसानसांतून ही भावना भिनलेली आहे. महाराष्ट्राची प्रगति, महाराष्ट्राचें वैभव हें भारताचेंच वैभव आहे.

महाराष्ट्र आतां भारताच्या आधाराआधारानें वैभवाची एकएक पायरी चढूं लागला आणि पूर्वींच्या मानानें त्याच्यांत कितीतरी बदल झाला. हजारों वर्षांपूर्वींचा महाराष्ट्र आणि आजचा महाराष्ट्र याच्या आकारांत, विचारांत, आचारांत, उच्चारांत फारच म्हणजे फारच बदल झाला.

कोणीं हा बदल घडवून आणला ? निसर्गानें कीं माणसानें ?

दोघांनींहि. निसर्गानें आणि माणसानेंहि.

महाराष्ट्राच्या भूमीवर पंचमहाभूतें आपलें कार्य सतत करीत राहिलीं. त्यामुळें भूमि, वृक्ष, दऱ्या, डोंगर इत्यादींची घडामोड झाली. चांगली घडामोड झाली. आणि त्यांतल्या त्यांत अधिक चांगली घडणच झाली.

माणसांनींहि महाराष्ट्राच्या भूमीवर खूपच घडामोड केली. मात्र ही घडामोड त्यानें योजनाबद्ध केली. हेतुपुरःस्सर केली. आपल्या सुखासाठीं आणि महाराष्ट्राच्या वैभवासाठीं केली.

महाराष्ट्र भंगलेल्या मनाचा नाहीं. कचरणाऱ्या दिलाचा नाहीं. महाराष्ट्र कष्ट करण्यांत जसा मागें नाहीं तसा तो कल्पनेंतहि मागें नाहीं. तो जुन्या अनुभवांचा उपयोग करील. नव्या नव्या कल्पना हुडकून काढील आणि त्या मोठ्या जिद्दीनें आचरणांत आणील.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र राज्यांत किती तरी नव्या योजना आंखल्या गेल्या. नुसत्या आंखल्याच गेल्या नाहींत, तर त्या प्रत्य-

क्षांत राबविण्यांतहि आल्या. भूतकाळाची आठवण ठेवावयाची आणि भविष्य-काळाकडे दृष्टि ठेवून चालावयाचें. मागील अनुभव जमेस धरावयाचा आणि पुढील कार्य योग्य प्रकारें हाताळावयाचें. महाराष्ट्राचें वैभव वाढवावयाचें. साध्य आणि साधन हीं दोन्हीहि पवित्र ठेवून महाराष्ट्राला सुजलाम्, सुफलाम् करावयाचा, ही महाराष्ट्राची जिद्द आहे. महत्त्वाकांक्षा आहे.

आपला महाराष्ट्र खेड्यापाड्यांत पसरलेला आहे. जमीनजुमल्यांत वसला आहे. भात, गहूं, कापूस, ऊंस, जोंधळा, शाळू, संत्रीं, मोसंबीं पिकवितो आहे.

महाराष्ट्राचे स्वामी शेतकरी. शेतकरी सुखी तर महाराष्ट्र सुखी. म्हणून मानाचें पहिलें पान शेतकऱ्याला.

शेतकरी सुखी तर महाराष्ट्र सुखी. शेतकरी बळकट तर महाराष्ट्र बळकट. म्हणून शेतकऱ्याच्या शेतांत सतत पाणी खेळलें पाहिजें. त्याच्या घरांत बिजली चमचमली पाहिजे. त्याच्या घरावर माडी चढली पाहिजे. त्याच्या राजा-परधान्याला गाडी ओढतांना त्रास पडूं नये म्हणून रस्ता चांगला असला पाहिजे.

शेतकऱ्याच्या सुखाची, महाराष्ट्राच्या प्रगतीची ही जाणीव आज सर्वांनाच झाली आहे. आणि म्हणूनच गोदावरी, कृष्णा इत्यादि महाराष्ट्रांतील अनेक नद्यांना पाटबंधारे घालून शेताशेतांतून पाणी खेळविलें जात आहे. ऊंस, गहूं वगैरे अनेक पावसाळी तशींच उन्हाळीं पिकें काढलीं जात आहेत. आणि हीं पिकें काढतांना ' जपानी पद्धत ', ' सामुदायिक शेती ' असे अनेक प्रयोग केले जात आहेत.

रत्नागिरी, ठाणें, कुलाबा हे कोकणांतील जिल्हे मागासलेले जिल्हे समजले जात. या जिल्ह्याची भूमि ' जळ ' भूमि समजली जाई. भात, नागली, वरी याशिवाय कोणतेंच पीक येथें होणार नाहीं अशी लोकांची समजूत होती. पण आज ? आज नवे नवे प्रयोग करून, सरकारच्या मदतीनें याच भूमींत भुई-मुगाचें छान पीक शेतकरी काढीत आहे. ऊंस पिकवीत आहे. काजूची लाग-वड करीत आहे. घायपात लावून तिचें उत्पन्न मिळवीत आहे.

देशावरील शेतकरीहि त्याच उत्साहानें आपल्या शेतांत राबतो आहे आणि नवे नवे प्रयोग करून शेत पिकवतो आहे.

आपण फार वर्षांपासून भूदेव म्हणजे 'ब्राह्मण' असें समजत आलों आहोंत. पण आज खऱ्या अर्थानें शेतकरी हाच भूदेव आहे. कारण तो भूमीची सेवा करतो आहे. श्रमाची प्रतिष्ठा वाढवितो आहे. सतत राबतो आहे. साऱ्यांना अन्नवस्त्र देतो आहे.

शेतकऱ्याप्रमाणेंच कामकरी. तोहि महाराष्ट्राच्या वैभवांतील वाढीचा वांटा उचलतो आहे. आपण फार पूर्वीं महाराष्ट्रांतील कारखान्यांकडे, उद्योग-धंद्यांकडे पाहूं लागलों असतों तर आपल्या एका दृष्टिक्षेपांत सारे कारखाने आले असते. पण आतां? भारत स्वतंत्र झाल्यानंतर, 'महाराष्ट्र राज्य' निर्माण झाल्यानंतर ठिकठिकाणीं छोटेमोठे कारखाने निघूं लागले. सन १८५३ सालीं मुंबईंत पहिलीं गिरणी निघाली. पण आज एकूण महाराष्ट्रांत कापडाच्या व सुताच्या एकशेंएक गिरण्या आहेत. शिवाय हातमाग, पॉवर माग यांवर कापड निघतें तें वेगळेंच. महाराष्ट्रांत असे किती तरी माग आहेत.

महाराष्ट्रांतील गिरण्या आणि हातमाग एवढीच कांहीं कारखान्यांची मर्यादा नाहीं. साखरेचे कारखाने तर जवळजवळ वीस बावीस. किर्लोस्कर कंपनीच्या यंत्रें तयार करण्याच्या कारखान्यासारखाच साताऱ्यास कूपर कंपनीचा कारखाना आहे. मुंबई, पुणें, नागपूर या ठिकाणींहि असेच लहानमोठे अनेक कारखानें आहेत. अशा लहानमोठ्या कारखान्यांतून कामकरी श्रमत आहेंत. नाना प्रकारच्या वस्तु तयार करीत आहेत. सारे कारखाने, साऱ्या गिरण्या, छोटे मोठे सारे उद्योगधंदे या श्रमणाऱ्या देवांच्या शक्तीवरच अवलंबून आहेत.

महाराष्ट्र जसा शेतकऱ्यांचा, कामकऱ्यांचा, तसा तो शूरांचा आहे. विद्वानांचा, आहे. राजकारणी पुरुषांचा आहे. लेखकांचा आहे. कवींचा आहे. कलाकारांचा आहे. महाराष्ट्र कशाच्या बाबतींत कमी नाहीं आणि कोणापेक्षां कमी नाहीं. तो सतत श्रमतो आहे. स्वतःचें अणि दुसऱ्याचें जीवन फुलवतो आहे.

तो पुन्हा पुन्हा म्हणतो आहे आणि कृतीनेंहि दाखवितो आहे कीं, मी माझ्या एकट्यासाठीं नाहीं. मी भारतासाठीं आहें. भारत माझा देश आहे. त्याची शक्ति वाढली पाहिजे, त्याचें वैभव वाढलें पाहिजे. त्याची कीर्ति दशदिशा पसरली पाहिजे. त्याला मानाचें पान मिळालें पाहिजे. तो जगाला गुरु-स्थानीं शोभला पाहिजे.

आणि यासाठीं मी आहें.

आणि ही उत्कट इच्छा पुरी करण्यासाठीं महाराष्ट्र सतत प्रयत्न करीत आहे.

धन्य धन्य महाराष्ट्राची !

बा, महाराष्ट्रा, माझें हें वंदन तुझ्या चरणीं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

संग्रह शाखा

REFBK-0015195

# आमचीं कांहीं प्रकाशनें

| | |
|---|---|
| साधकाची वाटचाल | |
| ग. वि. तुळपुळे | ५-०० |
| एकनाथी भागवतांतील पारमार्थिक शिकवण | |
| ग. वि. तुळपुळे | ६-०० |
| बुद्ध, धर्म आणि संघ | |
| श्री. शं. खानवेलकर | ३-०० |
| वाल्मीकी रामायण [ बालकांड ] | |
| दि. वा. काटे | ३-०० |
| मुस्लिम सण आणि संस्कार | |
| श्रीपाद जोशी | १-८० |
| चीनचें आक्रमण व गांधीवाद | |
| श्रीपाद जोशी | ३-५० |
| गाठ हिमालयाशीं आहे ( कादंबरी ) | |
| कृ. मु. उजळंबकर | ६-०० |
| हरी नारायण ( कादंबरी ) | |
| प्रा. भीमराव कुलकर्णी | ५-०० |
| न्यायमूर्ती ( कादंबरी ) | |
| दा. न. शिखरे | ३-०० |
| कांहीं गंभीर कांहीं विनोदी | |
| प्रा. म. ना. अदवंत | ६-०० |
| तुपाचा नंदादीप | |
| ग. दि. माडगूळकर | ३-५० |
| प्रिय आणि अप्रिय | |
| प्रा. अ. का. प्रियोळकर | ७-०० |
| वाङ्मयीन रसास्वाद | |
| प्रा. भीमराव कुलकर्णी | ५-०० |

**नवें आणि जुनें**
प्रा. कुमुदिनी घारपुरे ५-००

**संचय**
भ. श्री. पंडित ७-००

**जुनें वाङ्मय : नवें संशोधन**
पंडित आवळीकर १०-००

**मराठी निबंधाची वाटचाल**
डॉ. शं. गो. तुळपुळे ३-५०

**साहित्यांतील विवेक**
संपादक : डॉ. अ. ना. देशपांडे–श्री. ग. वा. जोशी ४-००

**गद्यप्रासाद** ( प्रातिनिधिक निबंधसंग्रह )
संपादक : प्रा. म. ना. अदवंत–प्रा. भीमराव कुलकर्णी ३-५०

**मराठी गद्यगौरव**
संपादक : प्रा. रु. पां. पाजणकर २-२५

**उघडि नयन** ( संपादित काव्यसंग्रह )
संपादक : प्रा. भ. श्री. पंडित ६-००

**महाराष्ट्रलक्ष्मी** ( संपादित काव्यसंग्रह )
संपादक : प्रा. म. ना. अदवंत ३-५०

**झपूर्झा** ( संपादित काव्यसंग्रह )
संपादक : प्रा. वि. म. कुलकर्णी–प्रा. गो. म. कुलकर्णी ४-००

**पत्रं पुष्पम्** ( संपादित काव्यसंग्रह )
संपादक : प्रा. कृ. ब. निकुम्ब–प्रा. गो. म. कुलकर्णी ३-००

**उर्मिला** ( काव्यसंग्रह )
प्रा. कृ. ब. निकुम्ब ३-००

**उज्ज्वला** ( काव्यसंग्रह )
कृ. ब. निकुम्ब ३-५०

**रवींद्र काव्यदर्शन**
श्रीकांत गोगटे २-५०

नाट्यचिकित्सा
( 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' या नाटकाची )
शं. ना. सहस्रबुद्धे २-००
शिकार-कल्यार ( ऐतिहासिक नाटक )
कै. य. ना. टिपणीस २-००
मुलगा पाहिजे ( विनोदी नाटिका )
दत्ता श्री. टोळ–के. श्री. जोगळेकर ०-८०
पुनर्जन्म ( नाटिका )
दा. रा. टंकसाळे १-८०
सं. सौभद्र – नाट्यसमीक्षा
डॉ. वि. पां. दांडेकर १-००
ग्रंथालयशास्त्राचीं पाच सूत्रें
कृ. मु. उजळंबकर १-८०
अधिक अन्न-धान्य पिकवा
तु. ग. तेली–पवार १-२०
शेतीचीं जनावरें : रोग व उपाय
तु. ग. तेली-पवार १-८०
पिकें, खतें, रोग व उपाय
तु. ग. तेली-पवार ४-००
उसाची लागवड
तु. ग. तेली-पवार १-५०
नौका आणि नाविक कथा
य. ग. वझे ३-००
शास्त्र चाललें पुढें : ( भाग १ ला )
डॉ. प्र. न. जोशी ३-००
शास्त्र चाललें पुढें : ( भाग २ रा )
डॉ. प्र. ना. जोशी ३-००
दोन ध्रुवांचा स्वामी मानव
डॉ. प्र. न. जोशी ३-५०

**असे होते नामदार गोखले**
दत्ता श्री. टोळ — १-२०

**शाळा**
श्रीपाद जोशी — २-५०

**राधा**
ह. मो. मराठे — ०-७०

**पोर्तुगीजांशीं रणसंग्राम**
शं. रा. देवळे — १-५०

**भारताच्या इतिहासांतील थोरांच्या कथा**
त्र्यं. ग. बापट — १-२०

**भारतीय पुरुषश्रेष्ठ माला**
संच १ ला : : एकूण पुस्तके दहा — ६-००

**भारताचे रणझुंझार माला**
संच १ ला : : एकूण पुस्तके पाच — ६-२५

**विदर्भाचे मानकरी**
डॉ. अ. ना. देशपांडे — २-५०

**शूरांची भूमी**
वि. स. गवाणकर — २-५०

**भारताचे मानकरी माला**
संच १ ला : : एकूण पुस्तके २० — १५-००

**थोरांची लोकसेवा** : पुष्प १ ले
ग. म. वैद्य — २-५०

**थोरांची लोकसेवा** : पुष्प २ रे
ग. म. वैद्य — २-५०

**थोरांची लोकसेवा** : पुष्प ३ रे
ग. म. वैद्य — २-५०

**मुलांचे शिवाजीमहाराज**
शं. रा. देवळे — १-५०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम.......................... दि: ..................
क्रमांक .......................... नों: दि: ..............